नं-१०६८

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
निबंध

लेखक नारायण भास्कर पांडव व बाळाबापू कोरगांवकर

सन
१८८५

संग्रहालय क्रमांक
५२८

पुस्तकाचें नांव स्त्रियांची कर्तव्यें

१०६

सं क्र ५२८

स्त्रियांची कर्तव्ये

निबंध

[illegible]
किंमत (८) आठ आणे

५.१.५८




FRANCES POWER COBBE.
1894.

# स्त्रियांचीं कर्तव्यें.

अथवा

मिस् फ्रान्सिस पावर कॉब बाईनें केलेल्या
"ड्यूटीज ऑफ वुइमेन" नांवाच्या
ग्रंथाचें भाषांतर.

हें पुस्तक.

रा. रा. नारायण भास्कर पंडित, बी. ए.
आणि
रा. रा. बावण बापू कोरगांवकर

यांनीं तयार करून

मुंबईंत,
जावजी दादाजी यांच्या
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

(या पुस्तकासंबंधी सर्व हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.)

सन १८९६.

किंमत रु. १॥.

(*Registered under Act XXV of 1867.*)

[All rights reserved by the publishers.]

मिस् फ्रान्सिस पावर कॉब

यांस

हा अल्प प्रयत्न,

त्यांच्या उन्नत विचारांबद्दल, शुद्ध व अनुकरणीय

आचरणाबद्दल आणि निस्सीम भूतदयेबद्दल

अत्यंत आदरपूर्वक

भाषांतरकर्त्यांनीं अर्पण केला असे.

To

MISS FRANCES POWER COBBE,

This translation of her "Duties of Women"
is most respectfully Dedicated,
in recognition of her high
ideal of human Life, her
loyalty to convictions,
her independence
of character and
her kindness to
God's creatures.

By the Translators.



*NEWBRIDGE, CO. DUBLIN. (Front View.)*

# मिस् फ्रान्सिस पावर कॉब हिचें त्रोटक चरित्र.

या बाईचा जन्म इ० स० १८२२ त डिसेंबर महिन्याच्या ४ थ्या तारखेस आयर्लन्दची राजधानी डब्लिन शहर येथें झाला. मिस् कॉब ही आईबापांचें सर्वांत लहान मूल असल्यामुळें तिला बाळपणीं आपल्या आईबापांच्या घरीं एकटेंच राहवें लागलें. सुटीच्या दिवसांत मात्र तिचे भाऊ, चुलतभाऊ वगैरे वीस पंचवीस मुलें घरीं येत. त्यावेळीं तिला अत्यंत आनंद होत असे. बाकीच्या दिवसांत ती कांहीं वेळ आपल्या आईच्या सहवासांत, कांहीं वेळ पुस्तकें वाचण्यांत व कांहीं वेळ बाहेर फिरावयास निघाली ह्मणजे सृष्टिसौंदर्य पाहण्यांत घालवीत असे. आणि त्यापासून तिला आनंद होत असे; तो इतका कीं आपल्याप्रमाणें दुसऱ्या कोणास असा आनंद होत असेल किंवा नाहीं याबद्दल शंका वाटून ती या देणगीबद्दल ईश्वराचे आभार मानीत असे. मायलेकींचें तर परस्परांवर प्रेम इतकें असे कीं त्या जणुं काय एकमेकींचा जिव्हाळाच असत; व एकत्र असल्या ह्मणजे जसें काय, त्यांच्या सुखांत कोणतीच उणीव राहिली नाहीं असें त्यांस वाटे. तिला शिक्षण देण्याकरितां एकीमागून एक अशा चार बाया ठेविल्या होत्या. त्यांच्यापासून जितकें ज्ञान मिळण्यासारखें होतें तितकें मिळविल्यानंतर इ० स० १८३६ त (ती १४ वर्षांची झाली तेव्हां) तिच्या आईनें तिला ब्राईटन येथें एका मुलींच्या शाळेंत विद्याभ्यासाकरितां ठेविलें. तेथें इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित

नृत्यगायनादि विषयांचा त्या वेळच्या ईयत्तेप्रमाणें तिचा अभ्यास झाल्यावर ती परत घरीं यावयास निघाली. तिचा एक वडील बंधु तिला आणण्याकरितां गेला होता. तो गाडीच्या बाहेर बसून गाडी हांकीत होता. तेव्हां ही आंत एकटीच असल्यामुळें तिच्या मनांत नानाप्रकारचे विचार घोळूं लागले. आपलें सर्व शिक्षण पुरें झाल्यामुळें आतां आपली गणना विद्वान् व संभावित स्त्रियांमध्यें होऊं लागेल, असें वाटून तिला हर्ष झाला. ती आपल्याशीं ह्मणाली, 'आमची शाळा उत्तम आणि त्यांत उत्तम मुलींना जितकें येतें तितकें मला येतें; तेव्हां स्त्रियांना जितकें शिकण्याची जरूर आहे तितकें मी शिकलें. आतां जास्ती शिकण्याचा मी आपल्या डोक्याला त्रास देणार नाहीं. सर्व जन्मभर नाटकें, कादंबऱ्या वगैरे वाचून आपल्या मनाची करमणूक करीन.'

पण हा तिचा निश्चय फार दिवस टिकला नाहीं. लवकरच तिचें अज्ञान तिला दिसूं लागलें. आणि तिनें खऱ्या अभ्यासास पुन्हां सुरवात केली. चार वर्षें तिनें इतिहासाचा, गणिताचा व ग्रीक भाषेचा अभ्यास केला. तिच्या आईचीं बरींच पुस्तकें होतीं तीं सर्व तिनें वाचलीं. शिवाय शिवणकामानें जे पैसे ती मिळवीत असे त्यांतून बरींच पुस्तकें तिनें घेतलीं. ज्योतिःशास्त्र, शिल्पशास्त्र वगैरे विषयांवरील ग्रंथ वाचून झाल्यावर धर्मविषयाकडे तिचें मन वळलें. तिनें इकडील झेंड आव्हेस्टा (पारशी लोकांचें धर्मशास्त्र), मनुस्मृति, वगैरे ज्या ग्रंथांचीं इंग्रजींत भाषांतरें त्या वेळीं झालीं होतीं तीं एकेक दोनदोनदां वाचून टाकिलीं.

ती १८ वर्षांची झाली तेव्हां तिच्या आईबापांस वाटूं लागलें कीं, आतां आपल्या मुलीनें सामाजिक मेळ्यांत जाऊं लागावें.

पण लवकरच अशा मेळ्यांपासून तिला करमणूक वाटेनाशी झाली. ती १९ वर्षांची झाली तेव्हांपासून शेजारच्या शेजारीं कधींकाळीं जेवणास जावें व घरीं राहून आल्यागेल्याचें आदरातिथ्य करावें, तसेंच वर्ष दोन वर्षांनीं लंदनास व आयर्लंदास जाऊन सृष्टिसौंदर्य व देखावे पहावे, यापलीकडे मेळ्यांस वगैरे जाण्याविषयीं आपणास आग्रह करूं नये अशी तिनें आपल्या वडिलांची विनंति केली. आणि अशा प्रकारें एकांतवासांत राहून आपला अभ्यासक्रम झपाट्यानें पुढें चालविला. या शिवाय शाळा सोडल्यापासून (१८३८-५७ पर्यंत) घरची सर्व व्यवस्था तिच्या आईबापांनीं तिच्यावर सोंपविली होती व तीही ती मोठ्या आनंदानें करीत होती.

ती एकदां एका नामांकित बाईच्या घरीं गेली असतां त्या बाईच्या तरुण मुलींस तिनें मोठ्या उत्सुकतेनें सांगितलें कीं, "अभ्यासापासून फार सुख आहे, तुह्मी ग्रीक भाषेचा व गणिताचा अभ्यास करा." हें तिचें भाषण त्यांच्या आईनें ऐकलें, तेव्हां ती **मिस कॉब** इजला ह्मणाली, "मुली, हे तुझे विचार मला पसंत नाहींत, स्त्रियांनीं गृहकृत्यांकडे पहावें आणि आपल्या नवऱ्यांस व मुलांस सांभाळावें, हेंच त्यांचें कर्तव्य असें मला वाटतें. तर तूं आपला अभ्यास आपल्यापाशींच ठेव, आमच्या मुलींना तो करण्याविषयीं उपदेश करूं नको." नंतर त्या बाईनें **मिस कॉबला** आपल्या घरांतील सामानसुमान दाखविलें; पण तें इतकें अव्यवस्थित आणि घाणेरड्या स्थितींत होतें कीं, कित्येक सुंदर चिनई भांड्यांवर तर एक वर्षाचें उष्टें चिकटलेलें होतें! तें पाहून ती बाई आपल्या चाकरांवर धुसपुस करूं लागली. तेव्हां **मिस कॉब** तिला ह्मणाली, "हें सामान फारच सुरेख आहे. आमच्या घरीं असलें कांहींच नाहीं. थोडींशीं हिंदुस्थानी भांडीं आहेत;

तीं, आपण मेहेरबानी करून जेव्हां आमच्या घरीं याल तेव्हां मी आपणास दाखवीन. ग्रीक भाषा आणि गणितशास्त्र जरी थोडेंबहुत मी शिकलें आहें तरी जेवण झाल्यावर तीं मी स्वतः धुऊन जिकडच्या तिकडे व्यवस्थित ठेवितें." यावरून स्त्रियांला शिक्षण दिल्यानें त्या गृहकृत्यांकडे दुर्लक्ष करतील याची भीति बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं; उलट, गृहकृत्यें उत्तम रीतीनें करण्याची त्यांस योग्यता येते, असें तिणें त्या डौली बाईस शिकविलें.

तिचें घराणें धर्मोपदेशकांचें होतें, यामुळें ती लहान होती तेव्हांपासून धर्माच्या गोष्टी तिच्या कानीं पडत असत. ती अकरा वर्षांची झाली तेव्हां आपला पुष्कळ वेळ एकांतवासांत बायबल ( ख्रिस्ती धर्मशास्त्र ) वाचण्यांत घालवीत असे; पण जसजसें तिला समजूं लागलें तसतसे बायबलांतील कांहीं असंभवनीय गोष्टी वाचून तिच्या मनांत धर्माविषयीं संशय उत्पन्न होऊं लागले. बायबलांत जे कित्येक अद्भुत चमत्कार सांगितले आहेत ते तिला खरे वाटेनातसे झाले. आतांच्या सारखें त्यावेळीं धर्मौदार्य लोकांत नव्हतें. बायबलांतील प्रत्येक शब्द ह्मणजे ईश्वराचा मानला जात असे; तेव्हां त्यावर संशय घेणें किंवा वाद करणें हें मोठें पाप असें लोक समजत असत. अशा स्थितीमध्यें एका बाजूनें संशयांचें व दुसऱ्या बाजूनें लहानपणापासून मनावर झालेल्या धर्मसंस्कारांचें तिच्या मनामध्यें जें एकसारखें युद्ध चाललें होतें त्यापासून तिला किती दुःख होत असे, याची कल्पना, परंपरागत चालीरीतींस डोळे झांकून अनुसरूं नये इतकी सुद्धां ज्यांची सत्यनिष्ठा जागृत झाली नाहीं त्यांस करतां यावयाची नाहीं. याप्रमाणें संशयरूपी वादळांत ४।५ वर्षें गटंगळ्या खाल्ल्यावर तिचा असा विचार झाला कीं ईश्वर आहे किंवा नाहीं याबद्दल आपणास कांहीं खात्रीनें सांगतां येत नाहीं,

नि. १०६९

तथापि, बायबल हें कांहीं ईश्वरप्रणीत नाहीं. तसेंच, मनुष्याचा आत्मा अमर नाहीं असेंही तिला वाटूं लागलें. तेव्हां तिनें असा संकल्प केला कीं, आपणास जें काय उत्तम व सत्यसें वाटतें त्याप्रमाणें वागलें ह्मणजे झालें. परंतु या कोरड्या नीतीनें तिच्या मनाचें समाधान होईना. तिला वारंवार आपल्या संशयांचा पश्चात्ताप होत असे, पण हे संशय तिनें मुद्दाम कांहीं आणले नव्हते. ते तिच्या विचारी स्वभावामुळें व विद्वत्तेमुळें आले होते. त्यांचें युक्तीस अनुसरून निराकरण होईपर्यंत त्यांस मनांत न येऊं देण्याचें तिच्या स्वाधीन नव्हतें. तथापि लहानपणीं तिच्या मनावर धर्माचा इतका संस्कार झाला होता कीं, परमेश्वराची प्रार्थना केल्यावांचून तिच्यानें राहवेना. अज्ञानरूपी अंधकारांतून काढून परमेश्वरानें आपणास ज्ञानरूपी प्रकाशांत न्यावें व सामर्थ्य द्यावें, हा तिच्या प्रार्थनेचा विषय असे. पण ख्रिस्तीधर्माच्या भ्रांतिमूलक भागांवरील तिचा जो एकदां भरंवसा उडाला होता तो पुन्हां कधींही बसला नाहीं. तिची आई मरण पावल्यानंतर तिनें आपला हा धर्मसंबंधी मतभेद आपल्या पित्यास कळविला. तेव्हां त्यास तें सहन न होऊन त्यानें तिला घर सोडून जाण्याविषयीं लिहून कळविलें. तेव्हां ती डोनेगल येथें जाऊन राहिली. पुढें दहा महिने लोटल्यावर तिच्या बापानें तिला परत बोलाविलें, परंतु या मतभेदामुळें तिच्यावरील लोकांचें जें प्रेम कमी झालें होतें त्यामुळें तिच्या मनास घरांत पूर्वींप्रमाणें सुख वाटेना. तथापि तिचा धर्मसंबंधी अभ्यास एकसारखा चालू होताच. तिनें थिओडर पारकर यांचा धर्मचर्चा Discourses on Religion हा ग्रंथ वाचला. त्यावरून आत्म्याच्या अमरत्वाबद्दल जो तिला संशय होता त्याचें निराकरण झालें. याप्रमाणें नास्तिकपणापासून आस्तिकपणापर्यंत व आस्तिकपणापासून एकेश्वरीमतापर्यंत ती येऊन पोहोंचली.

आणि ती आज जवळ जवळ ५० वर्षें या मतास चिकटून राहिली आहे. या मताच्या संबंधानें ती ह्मणते:-" एकेश्वरी धर्म हा माझ्या आयुष्यामध्यें मला मोठा आधार आहे. माझ्या या धर्मापासून मला जितकें साह्य मिळालें आहे त्याच्यापेक्षां अधिक, किंबहुना तितकें देखील साह्य मला दुसऱ्या कोणत्याही धर्मापासून मिळालें नसतें. हा धर्म या जगामध्यें मला शेवटपर्यंत उपयोगीं पडेल." एकेश्वरीधर्म (किंवा आपल्या देशांत ज्याला ब्राह्मधर्म ह्मणतात तो) मिस् कॉब बाईला इतका प्रिय झाला यांत नवल नाहीं. कोणाही विचारी मनुष्याला तो ग्राह्य वाटावा अशीच त्याची योग्यता आहे.

मिस् कॉब बाईच्या चोविसाव्या वर्षीं तिची आई मरण पावली; आणि तिचा बाप तिच्या पस्तीसाव्या वर्षीं मृत्यु पावला. पित्याच्या मरणानंतर तिनें पालेस्टाइन येथें, ह्मणजे खिस्ताच्या जन्मभूमीस, यूरोपखंड ओलांडून यात्रा करण्याचा निश्चय केला, यांत तिचें एक वर्ष गेलें. तेथून आल्यावर ती ब्रिस्टल शहरीं राहिली; आणि मिस् मेरी कारपेंटर हिला, बिघडलेल्या मुलांस सुधारण्याच्या आणि गरीब, निराधार मुलांची शुश्रूषा करण्याच्या कामीं साह्य करूं लागली. येथें तिच्या परोपकाराच्या कृत्यांस आरंभ झाला. मेरी कारपेंटर हिनें त्यावेळीं चारशें मुलें सुधारून त्यांस चांगल्या स्थितीस आणिलें, असें मिस् कॉब इणें एके ठिकाणीं ह्मटलें आहे. नंतर सन १८५९ सालीं कॉब बाईनें गरीब लोकांकरितां असणारीं उद्योगगृहें तपासण्यांत बराच वेळ खर्च केला. तेथें आजारी लोकांची आणि मुलांची कशी हेळसांड होत असे व त्यांना आंथरुणापांघरुणावांचून कसे हाल सोसावे लागत असत हें तिच्या दृष्टीस पडलें; त्यावरून

तिनें बरीच चळवळ केली. आणि मिस इलियट व मिसेस सीनीयर यांच्या साह्यानें उद्योगगृहांत बरीच सुधारणा केली.

मिस कॉब ही ब्रिस्टल शहरीं असतां तिचें लक्ष स्त्रियांच्या स्थितीकडे पोहोंचलें. मोठमोठ्या शहरांत स्त्रियांची जी मानसिक हानि होत असे ती तिच्यानें पाहवेना. ज्या कायद्यांत स्त्रियांच्या व पुरुषांच्या हिताचा सारखाच संबंध आहे ते कायदे करण्याच्या कामीं स्त्रियांस आपलें मत प्रदर्शित करण्याचा हक्क कां असूं नये, असा प्रश्न वारंवार तिच्या मनांत घोळूं लागला. परंतु शेवटीं सन १८७८ सालीं स्त्रियांस होणाऱ्या मारहाणीच्या व निर्दयपणानें वागविल्याच्या उदाहरणांची मालिका जेव्हां तिनें वर्तमानपत्रांत वाचली तेव्हां हा जुलूम बंद पाडण्यास आपल्या हातून होईल तितका यत्न केल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाहीं, असा तिनें निश्चय केला. तेव्हांपासून स्त्रियांसंबंधी कायद्यांत बराच फेरफार झाला आहे; व त्यामुळें पुष्कळ स्त्रिया अशा जाचणुकीपासून व मारहाणीपासून मुक्त होत आहेत व स्त्रियांस कांहीं नवीन हक्कही मिळाले आहेत. स्त्रिया पुरुषांपेक्षां बुद्धीनें मंद आहेत असें पुष्कळांचें मत आहे. त्यावर बाईचें असें ह्मणणें आहे कीं हल्लीं त्यांचें बुद्धिबल पुरुषांपेक्षां कमी दिसतें याचें कारण त्यांस पुरुषांप्रमाणें शिक्षण मिळत नाहीं व त्यांची निगा होत नाहीं हें आहे. ती ह्मणते: "ज्यांना स्वच्छ हवा घ्यावयास मिळत नाहीं, पोटभर अन्नही खावयास मिळत नाहीं, आणि रात्रीस अवश्य तितकी सुद्धां झोंप मिळत नाहीं अशा स्त्रिया शेंकडा पन्नास सांपडतील; असें असतां आह्मी त्यांस कनिष्ट मानितों हा केवढा अन्याय आहे बरें!" जेथें बहुतेक सर्व मनुष्यांस लिहिणें वाचणें येतें असें ह्मटलें तरी चालेल आणि जेथें स्त्रियांस स्वातंत्र्य व मान आहे अशा इंग्लंदसारख्या देशांत जर इतका अन्याय

होतो ह्मणावें तर जेथें स्त्रियांचीच काय पण पुरुषांपैकीं तीन चतुर्थांश भागाची अशी स्थिति आहे अशा आमच्या हिंदुस्थान देशांत किती अन्याय होत आहे याचा हिशोब वाचकांनींच करावा. स्त्रियांची नैतिक व सामाजिक स्थिति सुधारण्याच्या कामीं या बाईचे प्रयत्न अद्यापि जारीनें चालले आहेत.

परंतु एवढ्यानेंच ती स्वस्थ राहिली नाहीं. सज्जनांचें या जगतांत कर्तव्य ह्मणून कधींच संपत नसतें. कांहींना कांहीं तरी परोपकाराचें काम त्यांच्यामागें नेहमीं असायाचेंच. लहानपणीं मासे गरवण्याचा तिला नाद असे. पण ती सतरा वर्षांची झाली तेव्हां तिची भूतदया जागृत होऊन तिनें हें क्रूर कर्म सोडून दिलें. जिवंत प्राण्यांवर प्रयोग करून शास्त्रीय शोध लावण्यासाठीं जनावरांचे हाल करण्यांत येतात; आणि हे खरोखरच शोधाच्या इच्छेनें नसून केवळ गमतीसाठीं करण्यांत येतात, असा जेव्हां प्रकार पारीस येथें सन १८६३ सालीं तिच्या दृष्टीस पडला तेव्हां तिनें लगेच खरमरीत लेख वर्तमानपत्रांतून लिहिण्याचा सपाटा चालविला. पुढें सन १८७४ सालीं तिनें प्राणिदुःखनिवारण सभेस अर्ज पाठविला. यांत तिला बऱ्याच मोटमोठ्या वजनदार लोकांनीं मदत केली; पुढें लवकरच पार्लमेंटापुढें यांनीं एक बिल (कायद्याचा मसुदा) आणविलें; त्याच्याविरुद्ध डाक्टर लोकांनीं बरीच चळवळ करून आपणही एक बिल आणिलें. तेव्हां या प्रकरणाची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमण्यांत आलें. यामुळें हीं दोन्हीं बिलें मागें घेण्यांत आलीं. दरम्यान जिवंत प्राण्यांवरील प्रयोग बंद करण्याकरितां एक मंडळी स्थापन झाली. तिचें आनररी (बिनपगारी) चिटणविसीचें काम मिस कॉब बाईकडेच आलें. व ती त्या कामावर दहा वर्षें ह्मणजे सन १८८५ पर्यंत होती. एवढ्या मुदतींत मंडळीच्या उद्देशास अनुसरून

मंडळीनें असंख्य पत्रकें व लहान पुस्तकें प्रसिद्ध केलीं. सन १८९२ अखेरपर्यंतच्या सहा वर्षांत या बाईनें एकटीनेंच लहान मोठीं १७३ पुस्तकें या संबंधाचीं प्रसिद्ध केलीं. लोकांचें लक्ष या विषयाकडे वळत चाललें आहे असें पाहून परत सन १८७६ सालीं एक नवीन बिल पार्लमेंटापुढें आणिलें, परंतु त्याच्या विरुद्ध तीन हजार डाक्टरांच्या सह्यांचा अर्ज डाक्टर लोकांनीं पाठविल्या-वरून या बिलाचा निकाल होऊन डाक्टर लोकांस पाहिजेत त्या सवलती मिळाल्या. परंतु यामुळें यत्किंचितही न डगमगतां कॉब बाईनें, जिवंत प्राण्यांवर मुळींच प्रयोग करूं नयेत असा कायदा करून घेण्याचा निश्चय केला. सन १८७९ व ८० सालीं या संबंधाचीं दोन बिलें आणविलीं, परंतु त्यांतही यश आलें नाहीं, तरी तिचा उद्योग सतत चालू आहे.

या कामांत मुळींच प्रतिबंध करण्याचा मिस् कॉब बाईनें आग्रह धरला नसता व जिवंत प्राण्यांवर अगदीं जरूरीच्या बाब-तींत तितके प्रयोग करूं द्यावे अशी तोडजोडीची सवलत ठेविली असती तर मिस् कॉब बाईला बऱ्याच अंशीं यश आलें असतें असें कित्येकांचें ह्मणणें आहे; परंतु मिस कॉब बाईचें यावर जें कांहीं ह्मणणें आहे त्याचा आपण विचार केला ह्मणजे तिच्या वरील मागणीच्या योग्यपणाबद्दल व तिच्या नीतिमत्तेबद्दल आपली खात्री झाल्याशि-वाय राहणार नाहीं. तिचें ह्मणणें असें आहे कीं, जिवंत प्राण्यांवर प्रयोग करून ज्ञान मिळविण्याच्या रीतींतच क्रूरपणा खिळून गेलेला आहे आणि या क्रूरपणामुळें जिवंत प्राण्यांस चिरणारा शिक्षक व तसें चिरतांना पाहणारे शिष्य या दोघांचीही जी नैतिक अवनती होते ती सुद्धां फार शोचनीय आहे. सारांश, नीतिदृष्ट्या विचार केला तर तिला तिच्या मागणीबद्दल दोष देण्यास स्थळ नाहीं. या तिच्या प्रयत्नांत तिला बऱ्याच मोठमोठ्या भिन्न भिन्न पंथांच्या

व मतांच्या स्त्रीपुरुषांनीं साह्य केलें. त्यांत कार्डिनल म्यानिंग, लॉर्ड टेनिसन, चीफजस्टिस कोलरिज, राबर्टब्रौनिंग, डाक्टर मार्टिनो व त्याचप्रमाणें टामस कार्लैल व डार्विन वगैरे विद्वान् व नामांकित पुरुष प्रमुख होत. लार्ड टेनिसन यांनीं तर मरणापूर्वीं कांहीं दिवस मिस् कॉब बाईची भेट घेऊन जिवंत प्राण्यांस क्रूरतेनें वागविण्यांत येत आहे त्याचा प्रतिबंध होईपर्यंत अशीच लढाई करीत राहा, असें तिला सांगितलें.

ह्या बाईनें धर्मपर व नीतिपर बरेच ग्रंथ लिहिले आहेत. त्या शिवाय "एको" नांवाच्या वर्तमान पत्राला ती सात वर्षेपर्यंत मजकूर लिहित असे. वर्तमानपत्रांस लिहिणें हा एक आल्हाद-कारक आणि उपयोगी धंदा तिला वाटत असे, कारण त्यांत नि-रनिराळ्या गुणांचा उपयोग करण्यास अवकाश मिळतो, त्यामुळें तिनें एखाद्या कचेरींत कारकून वगैरे तेंच तेंच कंटाळवाणें काम करितांना पाहिले ह्मणजे त्यांची तिला कींव येत असे. या सात-वर्षांत तिनें एक हजारांवर आर्टिकलें (निबंध) व असंख्य स्फुट लेख लिहिले. पण त्यांत एकही आपल्या मतास सोडून लिहि-लेला नाहीं, ही गोष्ट तिला भूषणास्पद होय; कारण, पत्राचा मा-लक भिन्न मताचा होता; व साधारण नीतीच्या मनुष्यानें त्याला खुष ठेवण्याकरितां आपलीं मतें एकीकडे ठेविलीं असतीं.

तिचा आजा माजिस्ट्रेट होता, त्याच्या खुर्चीवर खालील वचन लिहिलेलें होतें: "ज्याला शत्रूंनीं गांजलें असेल त्याचा तूं बचाव कर." मिस् कॉब त्याप्रमाणें करीत आली आहे हें तिच्या चरित्रावरून उघड दिसतें; मग तो गांजलेला प्राणी पुरुष असो किंवा स्त्री असो किंवा एखादें जनावर असो.

आपल्या देशांत राजा राममोहनराय ह्मणून जो बंगाल प्रांतांत सुमारें ६० वर्षांपूर्वीं महापुरुष होऊन गेला त्याच्या च-

वा।नि ११६

रित्रांत व या बाईच्या चरित्रांत पुष्कळ साम्य आहे. त्यानेंही लहान असतांच सर्व लोकांच्या धर्मशास्त्रांचें परिशीलन करून सर्वांचें साररूप असा एकेश्वरी धर्म स्थापन केला. त्यामुळें त्यालाही लहानपणीं ( १४ व्या वर्षी ) धर्मासाठीं घर सोडावें लागलें; त्याच्या उद्योगाचा व्यापही फार होता. राजकीय, सामाजिक व धर्मसंबंधी वगैरे सर्व बाबतींत त्यानें सुधारणा केली. सती बंद करण्याविषयीं जर त्यानें खटपट केली नसती तर, न जाणों, ती आजपर्यंत तशीच राहिली असती आणि प्रत्यहीं शेंकडों अबलांना अग्नीच्या ज्वाळांत हंबरडे फोडीत प्राणत्याग करावे लागले असते.

याप्रमाणें जिणें जन्मभर अविवाहित राहून आपला देह सत्कार्यीं झिजविला तिच्या ७५ वर्षांच्या जीवनक्रमांतील लहान मोठ्या सर्व गोष्टी या चरित्रांत यावयास पाहिजे होत्या व त्या दिल्या असत्या तर त्यांपासून वाचकांस करमणूक व बोध झाला असता. परंतु तें सविस्तर देऊं ह्मटलें तर त्यासाठीं एक मोठा स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल. यासाठीं या थोर बाईची आमच्या तरुण बंधुभगिनींस थोडीशी ओळख होऊन तिचें त्यांनीं अनुकरण करण्याचा प्रयत्न करावा ह्मणून हें त्रोटक चरित्र लिहिलें आहे. ज्यांना तिचें संपूर्ण चरित्र जाणण्याची उत्सुकता होईल त्यांनीं बाईनें प्रसिद्ध केलेल्या आत्मचरित्राचे दोन भाग वाचून पहावे एवढें सांगून हें चरित्र आह्मी पुरें करितों.

या पुस्तकांत मिस् कॉब बाईची एक व तिच्या बंगल्याच्या दोन अशा ज्या तीन तसबिरी दिल्या आहेत त्यांपैकीं बाईची तसबीर दोन वर्षांपूर्वीं ह्मणजे तिच्या वयाच्या ७२ व्या वर्षी काढली होती.


या भाषांतरावर अभिप्रायः—

**रा. रा. विष्णु कृष्ण भाटवडेकर बी. ए. एल् एल्. बी.** × × × आपण या व्याख्यानांचें मराठी भाषांतर करून छापण्याचें योजिलें आहे तें फार स्तुत्य आहे. प्रस्तुतचें पुस्तक सुशिक्षित स्त्रियांकरितां योजिलें आहे त्यांना तर त्याच्या वाचनापासून फायदा होईलच; सुशिक्षित पुरुषांना सुद्धां हें पुस्तक संग्रहणीय आहे. ह्याची भाषा सुबोध आहे. स्थलविशेषीं येथील लोकस्थिति व इतिहास यांना अनुसरून आपण मुळापासून फेरफार केले आहेत. एकंदरींत भाषांतर चांगलें उतरून पुस्तक लोकप्रीतीला पात्र आहे.

**Dr. Ramkrishna Gopal Bhandarkar, C. I. E.**:-"Your translation of Miss Cobbe's Duties of Women is likely to prove very useful. The style is easy and intelligible."

**श्रीमती सौ० रमाबाई रानडे**:— × × मिस् कॉब बाईचा सत्यावर निष्ठा व सत्यावर प्रीति या दोन गोष्टींवर विशेष जोर आहे; त्याच्या शंभराव्या हिशानें जरी या गोष्टींबद्दल त्यांचें अनुकरण केलें तरी मिस् कॉब बाईच्या श्रमांचें व विशेषेंकरून भाषांतरकारांच्या मेहनतीचें चीज होईल, व यामुळें त्यांना सार्थक वाटेल. तर सर्व स्त्रियांनीं हें पुस्तक एकेक वेळ वाचावें अशी शिफारस आहे. एकंदरींत ग्रंथकर्त्यांचा प्रयत्न बऱ्याच रीतीनें सिद्धीस गेला आहे, याबद्दल आनंद वाटतो. अशींच पुस्तकें आणखी आपल्या भाषेंत पुष्कळ झालीं पाहिजेत. मुलींच्या शाळांमधून पांचव्या व सहाव्या इयत्तांला हें पुस्तक चालू केल्यास त्यांना पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे असें इकडील मत आहे.

**पंडिता रमाबाई**:— × × मूळ इंग्रजी भाषेंतील ग्रंथ विलायतेंत फार लोकप्रिय झालेला आहे. त्याचें भाषांतर या देशांतही लोकप्रिय व एतद्देशीय स्त्रियांस उपयोगी होईल असें मला वाटतें.



NEWBRIDGE, CO. DUBLIN. (Garden Front.)

# प्रस्तावना.

मिस् फ्रांसिस् पावर कॉब ही बाई इंग्लंदांतील प्रसिद्ध ग्रंथकर्त्री असून तिच्या सौजन्याविषयीं व विद्वत्तेविषयीं फार ख्याती आहे, आणि ती ख्याती योग्य आहे असें तिचे जे अनेक उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत ते अवलोकन केले असतां कोणासही वाटल्याशिवाय राहणार नाहीं. तिच्या ग्रंथांपैकीं Duties of Women "स्त्रियांचीं कर्तव्यें" हा एक असून त्यांत स्त्रीकर्तव्याच्या निरनिराळ्या भागांचें उत्तम रीतीनें पायरी-पायरीनें विवेचन केलें आहे. या पुस्तकांतील विवेचन केवळ नीतितत्त्वाच्या सर्वसाधारण नियमांस अनुसरून केलें असल्यामुळें तें सर्व देशांतील सर्व धर्मांच्या लोकांस व मुख्यत्वेंकरून स्त्रीवर्गास फार उपयोगी पडण्यासारखें आहे.

मिस कॉब बाईनें कांहीं वर्षांपूर्वीं इंग्लंदांतील स्त्रियांस ६ व्याख्यानें दिलीं तींच या पुस्तकाच्यारूपानें प्रसिद्ध केलीं आहेत. या पुस्तकाच्या आजपर्यंत ८ आवृत्ती इंग्रजींत निघाल्या व शिवाय फ्रेंच व इटालियन या भाषांमध्यें भाषांतरें झालीं आहेत; यावरून याची योग्यता ध्यानांत येईल. "हीं व्याख्यानें मूळ इंग्रजी स्त्रियांना उद्देशून आहेत; त्यामुळें त्यांतील विषय इंग्लंदच्या लोकस्थितीस विशेषेंकरून अनुसरून आहेत. तथापि उत्तम स्थितीस पोहोंचलेल्या स्त्रियांनीं कोणत्या रीतीनें वागावें याविषयीं त्यांत चांगला उपदेश आहे; त्यांत सत्यप्रीति, धर्मनिष्ठा, पतिप्रेम, मातृवात्सल्य वगैरे गुणांचे ठिकठिकाणीं दृष्टांत देऊन फारच सुरेख विवरण केलें आहे. नीतितत्त्वांचें विवेचन सामान्य वाचकांना बहुधा दुर्बोध आणि कंटाळवाणें असतें. प्र-

स्तुतच्या व्याख्यानांत श्रोतृमंडळ समक्ष असल्याकारणानें संभाषणरूपानें बोध केला आहे. व्याख्यात्याबाईचे विचार फारच प्रगल्भ आहेत. त्यांत सत्यवचन व सत्यवर्तन यांचा पराकाष्ठेचा आग्रह दर्शविला आहे. तो आपल्या स्त्रियांना काय पण पुरुषांना सुद्धां लक्षपूर्वक ग्रहण करण्यासारखा आहे. कितीहि अडचणीचा प्रसंग आला तरी सत्य सोडूं नये असें बाईचें मत आहे. हें मत विचारदृष्ट्या सर्व लोक मान्य करितील, पण व्यवहारांत याचा विपर्यास फार होतो. असा विपर्यास न होऊं देण्याकरितां आणि आपल्या डोळ्यांपुढें नेहमीं उदात्त उदाहरण राखण्याकरितां मिस् कॉब बाईचीं व्याख्यानें फार उपयोगाचीं आहेत. स्त्रियांना स्त्रियांकडून उपदेश झाला ह्मणजे विशेष ग्राह्य होतो. आपल्या सुशिक्षित स्त्रियांना मिस् कॉबसारख्या पोक्त बाईचा उपदेश मिळेल तितका थोडाच. आपल्या स्त्रियांची हल्लींची स्थिति अगदींच अजाणपणाची ह्मटली तरी चालेल. त्या मानानें व्याख्यानांतील विचार त्यांच्या आटोक्याबाहेरचे आहेत; तथापि त्यांची उदात्त विचारांकडे प्रवृत्ति झाली पाहिजे. हल्लींच्या स्थितीपेक्षां इतर स्त्रियांची स्थिति उच्च आहे असें त्यांना जागें केलें पाहिजे व त्यांचें मन तिकडे लाविलें पाहिजे. असें जागें करण्यास मिस् कॉब बाईच्या विचारांचा प्रसार देशीभाषाद्वारें आपल्या लोकांत झाला पाहिजे." यास्तव सदर पुस्तकाचें भाषांतर करून आह्मीं आमच्या महाराष्ट्रदेशभगिनींस सादर केलें आहे. हल्लीं आपल्या देशांत स्त्रियांस शिक्षण द्यावें किंवा न द्यावें याबद्दल संशय राहिलेला नाहीं व स्त्रीशिक्षणास सुरवातही झाली आहे. परंतु त्या शिक्षणाची दिशा कोणती असली तर इष्ट परिणाम होईल याविषयीं मात्र बराच मतभेद दृष्टीस पडतो. तेव्हां, या स्थित्यंतराच्या वेळीं ज्यांची मजल स्त्रीशिक्षणामध्यें आमच्यापेक्षां बरीच पुढें

गेलेली आहे त्यांच्या अनुभवावरून आह्मांस पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे; व तो करून घेण्याच्या कामीं या पुस्तकाचें आह्मांस पुष्कळ साहाय्य होईल अशी आमची खात्री आहे.

हें भाषांतर करण्यास आह्मीं मिस कॉब बाईची परवानगी मागतांच ती तिणें मोठ्या खुषीनें आह्मांस दिली याबद्दल आह्मी तिचे फार आभारी आहों. तसेंच भाषांतर वाचण्याची रा. रा. विष्णु कृष्ण भाटवडेकर बीए. एल एल. बी. यांणीं बरीच तसदी घेऊन आमचें भाषांतर लक्षपूर्वक वाचलें व कांहीं उपयुक्त सूचना केल्या; याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहों. त्याचप्रमाणें, डाक्टर भांडारकर, सौ. रमाबाई रानडे व पंडिता रमाबाई यांनींही आमचा ग्रंथ वाचून अभिप्राय दिले याबद्दल त्यांचेही आह्मी आभार मानितों.

शेवटीं, या पुस्तकांत सांगितलेले उदात्त विचार व उत्कृष्ट नीति यांचा आमच्या वाचकांच्या मनावर ठसा उमटून त्यांचा यत्किंचित् जरी इष्ट परिणाम झाला तरी आह्मी आमच्या श्रमाचें फळ मिळालें असें समजूं.

या भाषांतरास बाईचें त्रोटक चरित्र आह्मीं जोडलें आहे त्यापासूनही आमचे वाचक बोध घेतील अशी आह्मांस उमेद आहे.

# अनुक्रमणिका.


पृष्ठें.

व्याख्यान १ लें—स्त्रियांच्या स्थितीचें प्राचीन कालापासून दिग्दर्शन; स्त्रियांस हल्लींची स्थिति प्राप्त होण्याचें कारण व ती सुधारण्यास सद्गुणांची अत्यंत आवश्यकता. सर्वसाधारण नीतितत्वांस अनुसरून मनुष्यप्राण्याचीं कर्तव्यें:-(१) ईश्वरसंबंधी, (२) स्वत:संबंधी, (३) समाजसंबंधी. ... ... ... ... ... ... १

व्याख्यान २ रें—स्वत:संबंधी कर्तव्य:-(१) ब्रह्मचर्य, (२) मद्यादिनिषेध, (३) सत्यशीलता, (४) धैर्य, व (५) योग्य स्वातंत्र्याचें रक्षण. ... ... ... ४४

व्याख्यान ३ रें—सामाजिक कर्तव्य:-कुटुंबांतील एक व्यक्ति ह्मणजे माता, कन्या, भगिनी, पत्नी इ. नात्यानें. ७६

व्याख्यान ४ थें—सामाजिक कर्तव्य (चालू):-(१) पत्नी, मित्र या नात्यानें; (२) घरधनीण या नात्यानें. ... ... ... ... ... ... ११४

व्याख्यान ५ वें—सामाजिक कर्तव्य (चालू):-समाजांतील व्यक्ति या नात्यानें. ... ... ... १५३

व्याख्यान ६ वें—सामाजिक कर्तव्य (चालू):-राज्यांतील एक प्रजा या नात्यानें. ... ... ... १७३

# स्त्रियांचीं कर्तव्यें.

## व्याख्यान १ लें.

या अतर्क्य सृष्टीमध्यें मोठमोठ्या मौल्यवान वस्तूंचा नाश झालेला पाहिला ह्मणजे मनास फार खिन्नता उत्पन्न होते—समुद्रामध्यें मोठमोठालीं गलबतें बुडालीं असतां, प्रख्यात प्राचीन ग्रंथ जळाले अथवा नाहींसे झाले असतां, रमणीय देवालयांचा तोफांच्या भडिमारानें चुराडा झाला असतां, किंवा पिकास आलेलीं शेतें अवर्षणानें अथवा वादळानें बुडालीं असतां, तसेंच बुद्धिवान व सद्गुणसंपन्न मनुष्यें अकालीं मृत्युमुखांत पडल्यामुळें त्यांचें परोपकारार्थ संपादन केलेलें ज्ञान व्यर्थ गेलें असतां, आपणास दुःख झाल्याशिवाय राहत नाहीं.

परंतु सर्व देशांत व सर्वकाळीं स्त्रियांचें जीवित व्यर्थ जाऊन जी हानि होत आहे तिच्याशीं वरील निरनिराळ्या हानीच्या प्रकारांची तुलना केली असतां ते प्रकार कांहींच नाहींत असें ह्मणावें लागतें. कारण, स्त्रियांच्या आंगच्या सद्वृत्ति, नैसर्गिक आनंद आणि जगास सुखी करण्याची व सुधारण्याची मानसिक शक्ति हीं व्यर्थ जात आहेत. स्त्रियांचा स्वभाव किती जरी हलका मानिला आणि त्यांच्या आंगचें सामर्थ्य किती जरी अल्प मानिलें तरी कोणासही त्यांच्या स्वभावाचा व सामर्थ्याचा

उपयोग होऊं नये, अशा रीतीनें तीं पुरुषांच्या अज्ञानमूलक दुराग्रहामुळें निष्फल व्हावीं ही फार शोचनीय गोष्ट होय. वैधव्यस्थितींत स्त्रियांचें केशवपन करणें हें एक अज्ञानमूलक चाली आणि पुरुषांचा दुराग्रह यांचें ढळढळीत उदाहरण आहे. उंच आकाशांत मधुर व आल्हादकारक गायन करणाऱ्या स्वच्छंद कोकिलेस पिंजऱ्यांत कोंडून एखाद्या घाणेरड्या ठिकाणीं ठेविलें असतां जो तिला अपाय व अन्याय होतो त्याच्याहीपेक्षां अधिक अपाय आणि अन्याय पडद्यांत, जनान्यांत आणि घरांत कोंडून ठेविलेल्या आपल्या हजारों भगिनींस होत नाहीं काय?

लहान मुलींच्या आंगीं लहानसान साध्या वस्तूंनीं निरुपद्रवी खेळ खेळून मनोरंजन करून घेण्याची जी मनोवेधक शक्ति असते, तिची आपणास मोठेपणीं आठवण झाली ह्मणजे ते दिवस आतां आपणांस पुन्हा मिळावयाचे नाहींत ह्मणून वाईट वाटतें. मुलांचें अशाप्रकारें कोणत्या गोष्टीनें मनोरंजन होईल याचा विचार करून याबद्दलची तजवीज शाळांमध्यें सुद्धां करण्यांत येते, तथापि मुलींना ज्यावेळीं मोकळ्या हवेंत स्वच्छंद बागडण्याची हौस असते व सृष्टिसौंदर्य पाहून आनंद पावण्याची उत्सुकता असते, त्या वेळीं देखील त्यांना अशा

---

१ मूळग्रंथांत दिलेलें उदाहरण आपल्या लोकांस समजण्यासारखें नसल्यामुळें त्याच्याऐवजीं हें उदाहरण दिलें आहे.

प्रकारची मोकळीक देतात अशीं कुटुंबें फारच थोडीं, किंबहुना मुळींच नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. उंच वर्गांतील इंग्लिश मुलींना आज अशा प्रकारचें जितकें स्वातंत्र्य आहे, तितकें दुसऱ्या कोणत्याही देशांतील मुलींना मिळालें नसेल. घोड्यावर बसणें, होड्या वल्हविणें, टेनिस खेळणें, पर्वतांवर चढून जाणें वगैरे व्यायामाचे खेळ खेळण्यास त्यांस मोकळीक आहे. तथापि त्यांच्यांत देखील आरोग्यास आणि सुखास आड येणाऱ्या अशा पोषाखासंबंधी कित्येक मूर्ख चाली आहेत. आणि जसजशा त्या मुली मोठ्या होत जातात तसतसे त्यांचे आईबाप, शिक्षक आणि इतर वडील माणसें, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक शक्तींस, नैसर्गिक निरुपद्रवी उल्हासास आणि जगांत आपला कांहींनाकांहीं-तरी सदुपयोग व्हावा अशी जी त्यांची सदिच्छा असते तीस प्रतिबंध केला पाहिजे, असा वरचेवर उपदेश करीत असतात; परंतु त्यांचा पोकळ डामडौल, पोरकटपणा आणि चैनबाजी यांचा निरोध करण्याकडे मात्र त्यांचें लक्ष नसतें. अशा मुलींना आपल्या हजारों भगिनी दुःखामध्यें काळ कंठीत असतां आपण मौजेनें सुखोपभोग घेणें हेंच प्रायः स्त्रियांचें इतिकर्तव्य असा त्यांच्या सहवासांतील मंडळीच्या वर्तनावरून बोध होण्यासारखा असतो. याप्रमाणें अहेतुक व निरर्थक सहनशीलता आपल्या आंगीं वाढवून सद्गुणांचा निरोध करण्याचा व आपल्या शक्ति कुंठित

करण्याचा प्रघात स्त्रियांमध्यें पडला आहे यामुळें त्या दिवसें दिवस अधिकाधिक दुर्बळ व निरुत्साही होत आहेत.

जीं सुखें त्यांनीं भोगावीं असा ईश्वरी संकेत दिसतो, तीं त्यांस भोगावयास मिळत नाहींत एवढ्याच गोष्टींत त्यांचें नुकसान आहे असें नव्हे, तर उलट अनेक प्रकारच्या केवळ कृत्रिम आळेबंधांपासून उत्पन्न होणारीं पुष्कळ दुःखें त्यांना सोसावीं लागतात, ही गोष्ट अधिक खेदकारक होय. उंच स्थितींतील मुलींस आरोग्यास अनुकूल असे व्यवसाय नसल्यामुळें व पोषाखाच्या[1] बाबतींत कित्येक अपायकारक चाली पाळण्याची सक्ति असल्यामुळें नानाप्रकारचे रोग व दुर्बलता हीं उद्भवतात. कनिष्ठ वर्गांतील स्त्रियांस विवाहित स्थितींत फार काबाडकष्ट करावे लागतात आणि मेहनतीच्या मा-

---

१ ही गोष्ट यूरोपांतील स्त्रियांस जशी लागू आहे तशी आमच्या इकडील स्त्रियांस नाहीं. आमच्याइकडे स्त्रियांच्या पोषाखाची चाल पुष्कळ अंशीं बरी आहे; तरी, त्यांत दोष मुळींच नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ, चोळीनें सर्व पाठीचें व हातांचें संरक्षण थंडीवाऱ्यापासून व्हावें तसें होत नाहीं. तसेंच ती गरम कपड्याचीही होत नाहीं. चोळीच्या ऐवजीं पार्शीतऱ्हेची बंडी किंवा पोलका असला तर तो विशेष सभ्यपणाचा पोषाख होऊन वर सांगितलेली उणीव भरून येईल. पायांत जोडा घालण्याची चालही अशाच कारणासाठीं प्रचारांत आली पाहिजे; पायांतील जोडवीं अथवा मासोळ्या यांहींकरून चालतांना पायांचें संरक्षण न होतां उलट त्रास होतो. नाक कान टोंचून अलंकार घालणें हेंही सुधारलेल्या लोकांस संमत नाहीं.

नानें मजुरी कमी असल्यामुळें त्यांस पोटभर अन्नही मिळत नसतें. यामुळें त्यांसही अन्य प्रकारचे रोग जडतात. दारिद्र्यदुःख जसें स्त्रियांस तसें पुरुषांसही सोसावें लागतें; परंतु त्याचा परिणाम, पुरुषांपेक्षां स्त्रियांस उद्योगधंद्याचे मार्ग थोडे मोकळे असल्यामुळें, स्त्रियांवर अधिक होतो. आणि पुरुषांपेक्षां स्त्रियांचे बाबतींत आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे; ती ही कीं, क्षुधा आणि दारिद्र्य यांची पीडा होऊं लागली ह्मणजे त्यांस जारकर्मानें द्रव्यसंपादन करण्याची भयंकर लालूच उत्पन्न होऊन त्या विपत्तींत पडतात आणि फजिती पावतात. या गोष्टीचा अनुभव पुरुषांस येण्यासारखा नाहीं. स्त्रियांच्या स्वाभाविक दुर्बलतेंत वर सांगितलेल्या दडपणाची भर पडल्यामुळें ही सर्व विपत्ति त्यांस भोगावी लागते आणि स्त्रिया ह्मणजे जनावरें अशी पुरुषांची समजूत असल्यामुळें ते आपल्या स्त्रियांची पायमल्ली करतात. या गोष्टीचा विचार केला ह्मणजे आपलें अंतःकरण दयेनें विरघळतें आणि संतापानें पोळतें. हीं संकटें जरी भयंकर आहेत, तथापि स्त्रियांच्या गौण स्थितीमुळें त्यांस जीं संकटें भोगावीं लागतात तीं यापेक्षांही अधिक भयंकर आहेत. मानसिक दैन्यापेक्षां दारिद्र्य पुरवतें; तसेंच आत्म्याची वाढ खुंटून त्यास क्षुद्रता येणें, भित्रेपणा व खोटसाळपणा उत्पन्न होणें, नीचता व पराधीनता प्राप्त होणें, हांजी हांजी करणें, प्रसंग पडेल त्याप्रमाणें खरें खोटें

बोलणें आणि नीचपणाच्या युक्तयांनीं आपल्या पतीची अथवा पित्याची मर्जी संभाळणें याच्यापेक्षां जोड्याच्या लाथा घेणें पुरवलें. स्त्रियांस अशा प्रकारची कनिष्ठ स्थिति प्राप्त झाल्यामुळें सर्व मनुष्यजातीचें केवढें नुकसान झालें आहे बरें !

या जगांतील सर्व मौल्यवान वस्तूंमध्यें प्रेम, कोमलता आणि सहृदयता हे गुण अत्यंत श्रेष्ठ आहेत आणि या गुणांचें उत्पत्तिस्थान स्त्रियांचें अंतःकरण होय. स्त्रियांची वत्सलता, ह्मणजे, अंतःकरणांतील आपल्या बालकाविषयीं कळवळा, हाच रानटी स्थितींतील मनुष्यजातीची क्रूरता आणि स्वार्थपरता हीं हळू हळू नाहींशीं करण्यास कारणीभूत झालेला नाहीं काय? या व अशा प्रकारच्या अनेक सन्मार्गदर्शक, कल्याणकारक आणि सुखदायक दैवी शक्तींचा उपयोग स्त्रियांस कोंडून ठेविल्यामुळें किती संकोचित आणि परिमित झालेला आहे बरें?

अलीकडे मात्र युगांचींयुगें लोटल्यावर स्त्रियांचें भाग्य उदयास येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. गतकालाचें अवलोकन केलें असतां स्त्रियांच्या स्थितीचा तीन वेळ पालट झाला असावा असें दिसतें.

पहिला रानटी काल—यांत स्त्री ह्मणजे केवळ आपल्या धन्याच्या उंट, गाढवादि जनावरांप्रमाणेंच एक भारवाही जनावर मानली जात असे. आणखी त्यांत विशेष हें कीं, तिची मर्जी असो वा नसो, तिला मातृत्वाचे कष्ट भोगावे लागत असत.

दुसरा वीरकाल—या कालांत हिंदुस्थान, ग्रीस, रोम, पालेस्टाईन इत्यादि देशांत स्त्रियांस हल्लीं विलायतेंत आहे तसें स्वातंत्र्य होतें, इतकेंच नाहीं तर, त्यांस विशेष मानही मिळत असे. हिंदुस्थानांत वेदकालीं आणि त्यानंतरही पुष्कळ शतकें, ज्या वेळीं बौद्ध लोकांनीं मोठमोठे स्तूप बांधिले त्यावेळीं, स्त्रिया भोजनयज्ञादि समारंभांत पडद्याशिवाय मोकळेपणें मिसळत असत असें आपणास त्यावेळच्या काव्यग्रंथांवरून व कोरींव लेण्यांवरून दिसून येतें. महाभारत, रामायण इत्यादि संस्कृत काव्यांमध्यें कित्येक मोठ्या पराक्रमाच्या गोष्टी वर्णिलेल्या आहेत त्यांत स्त्रियांनीं सुद्धां फार शौर्य दाखविलें आहे; त्यांवर पुरुषांचें फार शुद्ध प्रेम असे. या गोष्टींचें रहस्य स्त्रियांविषयीं ज्यांची हलकी समजूत आहे, अशा सांप्रतच्या हिंदूंना बरोबर समजणार नाहीं. प्राचीन ग्रीस देशाच्या इतिहासांतही स्त्रियांच्या संबंधानें असाच लौकिक आहे. आथेन्सच्या लोकांनीं प्राचीन वीरकालाच्या इतिहासावरून **आल्सेस्टिस्**[1] आणि **आन्टिगोनी**[2] नामक

---

१ ही ग्रीस देशांतील थेसली नामक प्रांताच्या राजाची स्त्री होती. तिनें आपल्या पतीच्याऐवजीं आपण मरण्याचें कबूल केलें; परंतु शेवटीं हरक्यूलीज यानें तिला परत जिवंत केलें अशी दंतकथा आहे. पतीवरील प्रेमाचें उदाहरण दाखविण्याकरितां ग्रीस देशाच्या प्राचीन कवींनीं ही कथा वर्णिलेली आहे.

२ आन्टिगोनी हिची पितृभक्तीविषयीं व बंधुप्रेमाविषयीं ख्याति आहे. तिचा बाप ओडिपस यानें स्वतःच्या आईशीं नकळतां

स्त्रियांचीं चरित्रें रचलीं त्यांत आन्टिगोनी हिचें चरित्र तर पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या संबंधाच्या उन्नत नीतितत्वांनीं परिपूर्ण भरलेलें आहे; ह्मणजे, त्यांत मानवीनियम मोडल्याबद्दल देहांतशिक्षा भोगून ईश्वरी नियम पाळल्याचें उदाहरण दाखविलें आहे. **सोफोक्लीज** कवीनें आन्टिगोनीसारख्या स्त्रीच्या द्वारें—"ईश्वराचे नियम कोठेंही लिहिलेले नाहींत, ते बदलत नाहींत, ते शाश्वत आहेत, ते आजकाल केलेल्या नियमांप्रमाणें नसून कालास आरंभ होण्याच्या पूर्वींचे आहेत"—अशा प्रकारचे अत्यंत उदात्त विचार वदविले ही गोष्ट तो काल लक्षांत आणला ह्मणजे जगाच्या ग्रंथसंग्रहांत फारच आश्चर्यजनक आहे असें मला वाटतें. टासिटस् यानें असें लिहिलें आहे कीं, पुरुषांच्या अंतःकरणापेक्षां स्त्रियांचें अंतःकरण स्वभावतः अधिक धार्मिक आहे अशी जर्मन लोकांची समजूत असे ह्मणूनच ते नेहमीं आदरपूर्वक स्त्रियांची सल्ला घेत असत. परंतु या अशा स्वातंत्र्यरूप

---

विवाह केला ह्मणून त्यानें आपले डोळे फोडून घेतले आणि त्याच्या पुत्रांनीं त्यास देशांतून हद्दपार केलें. तेव्हां हिनें बापाबरोबर जाऊन तो मरेपर्यंत त्याची सेवा केली. तो मरण पावल्यावर ती स्वदेशीं परत आली. तेथें तिचे दोघे बंधु एकमेकांशीं लढून मरण पावले; त्यांतून पोलिनीसीस् याचें प्रेत, थीबीसचें राज्य या राजपुत्रांच्या पश्चात् ज्यानें बळकावलें होतें, तो राजा पुरूं देईना. परंतु आन्टिगोनीनें त्यास न जुमानतां आपल्या भावाचें प्रेत पुरलें. त्यामुळें राजास राग येऊन त्यानें तिला भुयारांत कोंडून ठेविलें व तेथें तिनें आत्महत्या केली, अशी कथा आहे.

सूर्योदयावर सर्वत्र पारतंत्र्य आणि अज्ञानरूपी मेघ येऊन अंधकार झाला. असें होण्यास प्रत्येक देशांत काय कारणें झालीं याची चौकशी करण्यांत कांहीं हांशील नाहीं. माझी समजूत अशी आहे कीं, ऐषआराम जसजसा वाढत गेला, तसतसा स्त्रियांच्या आंगच्या सद्गुणांचा ऱ्हास होत गेला आणि पुरुषांत मत्सर, स्वार्थपर विषयासक्ति आणि स्वामित्वबुद्धि हीं वाढत गेलीं. आणि याचा परिणाम इतका शोचनीय झाला कीं पूर्वेकडील व दक्षिणेकडील सर्व देशांत स्त्रियांस बाहेर जाऊं न देणें, घरांत त्यांच्या जागा पुरुषांच्या बसण्याउठण्याच्या जागयापासून वेगळ्या करणें, पुरुषांच्या सर्व सामाजिक करमणुकींतून त्यांस वर्ज करणें, त्यांना बुरखा वापरण्यास लावणें, त्यांच्यावर नपुंसकांचा (खोजांचा) पाहरा ठेवणें आणि चीन देशांत तर शेवटला उपाय ह्मणून श्रेष्ठ वर्णांतील सर्व स्त्रियांचे पाय [1]खुरटे करून त्यांस पंगु करणें इत्यादि अपायकारक चाली प्रचारांत आल्या आहेत.

पूर्वेकडील[2] व दक्षिणेकडील देशांतील स्त्रियांस जितकी नीचावस्था प्राप्त झाली, तितकी पश्चिमेकडील[3] व उत्तरे-

---

१ चिनीलोक स्त्रियांचीं पावलें आंखूड असणें हें एक सौंदर्याचें लक्षण समजतात; यामुळें स्त्रियांचीं पावलें आंखूड करण्याची चाल त्यांच्यांत इतकी वाढली आहे कीं, लहानपणापासूनच लोखंडाचे जोडे घालून स्त्रिया आपल्या पावलांची वाढ खुंटवितात, ती इतकी कीं, श्रीमंत घराण्यांतील स्त्रियांस एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जाणें असल्यास भिंतीस धरून चालावें लागतें.

२ ह्मणजे आशिया व आफ्रिकाखंडांतील देशांत.

३ ह्मणजे यूरोपखंडांतील देशांत.

कडील देशांतील स्त्रियांस कधींही प्राप्त झाली नाहीं. अशा नीचावस्थेपासून स्त्रियांचें रक्षण करण्यास केवळ ख्रिस्ती धर्मच कारण आहे असें माझ्यानें खात्रीनें ह्मणवत नाहीं. कारण लिव्हान्ट येथील ख्रिस्ती लोक आपल्या स्त्रियांस बहुतेक मुसलमान लोकांप्रमाणेंच पडद्यांत ठेवतात. तसेंच जर्मन लोकांत स्त्रियांस ख्रिस्ती धर्मापूर्वीं टासिटसच्या वेळीं जें स्वातंत्र्य होतें त्यांत ख्रिस्ती धर्माच्या क्याथलिक किंवा प्रॉटेस्टन्ट पंथांचा प्रवेश झाल्यानें फरक झालेला नाहीं. या गोष्टीशीं कोणत्याही धर्मापेक्षां स्त्रियांच्या वर्तणुकीचा फार संबंध आहे.—जी स्त्री मनोविकारांच्या स्वाधीन असते ती सर्वत्र पुरुषांच्या गुलामगिरींत असावयाची; आणि जी आपल्या नीतिमत्तेनें मनोविकारांस आटोक्यांत ठेविते तिला कोठेंही थोडेंबहुत तरी स्वातंत्र्य मिळावयाचेंच. झनानखाना याचा अर्थ नीट समजण्यास त्यांत कोंडून ठेविलेल्या पशुवत् वागणाऱ्या स्त्रियांची थोडीबहुत माहिती झाली ह्मणजे पुरे. झनानखान्यामुळें त्यांस अशी स्थिती प्राप्त झाली आहे; आणि त्यांच्या अशा अनावर मनोविकारांमुळें झनानखाना राखण्याची सबब पुरुषांस मिळाली आहे. परंतु पूर्वेकडील देशांतील स्त्रियांस जितकी नीचावस्था प्राप्त झाली आहे, तितकी युरोपांतील स्त्रियांस जरी कधींच प्राप्त झाली नाहीं तरी त्यांना दुःसह परवशता बरीच भोगावी लागली. तीबद्दल मी या ठिकाणीं विचार करूं इच्छित नाहीं. आ-

वानि ११८

पण येथें आपल्यावर होत असलेल्या जुलुमांचा विचार करण्याकरितां आलों नाहीं; तर आपल्या कर्तव्याचा विचार करण्यासाठीं आलों आहों. स्त्रियांना आजपर्यंत जे अन्याय सोसावे लागले आणि जे सांप्रत सोसावे लागत आहेत त्यांची बरोबर कल्पना होण्यास चांगल्या व थोर पुरुषांनीं देखील स्त्रियांची सरसकट अज्ञान मुलांत कशी गणना केली आहे हें ध्यानांत आणलें ह्मणजे झालें. केव्हां केव्हां त्यांस लाडक्या मुलांप्रमाणें, केव्हां केव्हां प्राचीन काळीं मुलांस जशी क्रूरतेनें व जुलमानें वागविण्याची सामान्य चाल होती त्याप्रमाणें वागविण्यांत येतें. सारांश चार वर्षांच्या मुलांनीं जशी आईबापांची आज्ञा पाळिली पाहिजे तद्वत् चाळीस वर्षांच्या स्त्रीनें आपल्या पतीची आज्ञा निमुटपणें पाळणें, आणि अधिकाराच्या बळावर पतीनें दर्शविलेल्या इच्छेनुरूप कुत्र्याप्रमाणें किंवा बालकाप्रमाणें वागण्यांतच इतिकर्तव्यता मानणें, हाच काय तो स्त्रियांचा सद्गुण असें लोक समजतात.

आतां शेवटीं, असें दिसतें कीं आमची अज्ञानस्थिति जाऊन सज्ञानस्थिति येत आहे. एक प्रचंड लाट येऊन ती सर्व पृथ्वीवरील स्त्रियांस वर उचलीत आहे. चीनदेशापासून पेरूपर्यंत जपानासुद्धां पृथ्वीवरील सर्व देशांतील स्त्रियांच्या स्थितीचें अवलोकन केलें असतां असें दिसून येईल कीं, स्त्रिया, आपल्या जातीकरतां शिक्षण, संसारांत स्वतंत्रता, आणि सामाजिक व राजकीय हक्क हीं मिळविण्याचा यत्न करीत आहेत.

आजपर्यंत या बाबतींत जें पाऊल पुढें पडलें आहे व यापुढें जें पडेल तें सांगून वेळ घालविण्याची गरज नाहीं. माझ्या वयाच्या स्त्रियांस लहानपणच्या स्थितीचें स्मरण झालें ह्मणजे आह्मीं एका प्रकारच्या नव्या ईश्वरी योजनेखालीं आहोंत असें त्यांस वाटतें. पृथ्वीवरील सर्व सुधारलेल्या देशांमध्यें स्त्रियांच्या स्थितींत मोठा फरक पडत चालला आहे, ही गोष्ट निर्विवाद होय. तिच्याशीं आपणांस या वेळीं कांहीं कर्तव्य नाहीं. परंतु या स्थित्यंतरापासून स्त्रियांना व पुरुषांनाही कितपत फायदा होण्याचा संभव आहे याचा विचार करणें ही गोष्ट मोठ्या महत्वाची आहे. यापासून पुष्कळ फायदा होईलच होईल असें आपणांपैकीं पुष्कळांस वाटत असेल, परंतु कदाचित् याच्या उलट देखील परिणाम होण्याचा संभव आहे, या गोष्टीकडे आमच्यानें डोळेझांक करवेल काय? या स्थित्यंतरापासून अव्यवस्था व कालिमा आणणारी कर्तव्यपराङ्मुखता उत्पन्न होण्याचा संभव, व तसेंच आमच्या हातून मोठमोठीं कृत्यें होण्याची जी आशा आहे ती निष्फळ होऊन नवीन सद्गुण व नीतिभूषणें कांहींच न येतां उलट हल्लीं असलेल्या सर्वसामान्य सद्गुणांचा लोप होण्याचा संभव इतका आहे कीं, आणखी पन्नास वर्षांनीं हा काल अनर्थकारक समजला जाणार नाहीं कशावरून? कदाचित् असल्या सुधारणांची पुन्हा सुधारणा करावी लागेल, किंवा पूर्वींची स्थिति पुन्हा

स्थापन करावी लागेल, किंवा या अनिष्ट स्थितीस सुरुवात करण्यास आह्मीच कारण झालों असें वाटून आह्मांस फार खेद करावा लागेल.

माझ्या डोळयांपुढें तर भयंकर संकटें असंख्य दिसत आहेत. त्यांपैकीं एक हें कीं, स्त्रियांच्या आंगचा स्वार्थत्याग जसजसा कमी होत जाईल आणि त्या स्वाभाविकरीत्या स्वार्थ साधण्यास व्यवसाय करतील, तसतसा त्यांच्या आंगीं कठोरपणा आणि आपलपोटेपणा वाढत जाईल. दुसरें संकट हें कीं, अशा स्थितींत नवीन कायदे करण्यास आणि स्त्रीपुरुषांच्या संबंधाच्या योग्यायोग्यतेचा विचार होऊन निदान हल्लीं आहेत तशा प्रकारचे नीतिनियम पुनः स्थापन करण्यास अवकाश मिळण्यापूर्वीं समाजामध्यें बरीच अव्यवस्था होऊन जाईल. सारांश, आमच्या सभोंवती संकटें दिसत आहेत. वैद्यकींत स्त्रियांचा प्रवेश होत आहे हें एक संकटच आहे. यापासून स्किफ्[१] आणि बर्नार्ड यांप्रमाणें जीवंत प्राण्यांवर प्रयोग करून पाहाणाऱ्या राक्षसी स्त्रियाही निपजण्याचा संभव आहे; पण असा काळिमा येण्याचीं चिन्हें ईश्वरकृपेनें अद्यापि दिसूं लागलीं नाहींत.

मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं, या बाबतींत तसेंच दुसऱ्या पुष्कळ बाबतींत आपल्यापुढें अनेक संकटें दि-

---

१ **स्किफ्** आणि **बर्नार्ड** हे जिवंत प्राण्यांवर प्रयोग करणारे यूरोपियन वैद्य होते.

सत आहेत. स्त्रियांना स्वातंत्र्य व उन्नतावस्था प्राप्त करून घेण्याचा जो मार्ग आहे तो अगदींच निर्भय व सुरक्षित आहे असें नाहीं. यास्तव ज्या स्त्रियांस या स्थित्यंतरापासून हितापेक्षां अनहित अधिक स्पष्टपणें दिसत आहे आणि त्यामुळें, ज्यापासून हित होईल अशी आह्मांस आशा वाटत आहे अशा या स्थित्यंतरास ज्या दोष देत आहेत त्यांचीही आपण अवहेलना करितां नये.

तर मग या मोठ्या स्थित्यंतरापासून मनुष्य प्राण्यावर जो अपरिमित परिणाम व्हावयाचा तो हितकारक किंवा अहितकारक होणें ही गोष्ट कशावर अवलंबून आहे? मला वाटतें ही गोष्ट या महास्थित्यंतरांत स्त्रिया जसें आचरण ठेवतील त्यावर अवलंबून आहे. आमच्यावर टीका करणाऱ्या भगिनी जें काय बोलतील अगर करतील किंवा सर्व पुरुष मिळून आमच्या बऱ्यावाइटासाठीं जें काय करूं शकतील त्यावर वास्तविकपणें या स्थित्यंतराचा परिणाम किंवा स्वरूप अवलंबून नाहीं; तर आमचा उद्योग, आपली स्थिति सुधारण्याच्या मार्गाचें ज्या रीतीनें आपण क्रमण करूं ती रीत, आपल्या आचरणाचें धोरण, आणि ज्या मार्गदर्शक नीतितत्त्वांचा आपण स्वीकार करूं तीं तत्त्वें, यांवर वरील स्थित्यंतराचा परिणाम अवलंबून असला पाहिजे.

ज्या मुद्याकडे मला आपलें लक्ष वळवावयाचें आहे तो हा. स्त्रीजात अत्यंत सुखी, इतकेंच नव्हे तर, अत्यंत

उन्नत आणि उपयोगी जेणेंकरून होईल अशा प्रकारच्या खऱ्या सुधारणेचा काल आपणास कधीं तरी प्राप्त होईल कीं काय, किंवा आमच्या आशेचा दीप क्षणभर प्रकाशून विझेल आणि आमच्यावर काळोख आणून निराशा उत्पन्न करील कीं काय ही गोष्ट, हल्लींच्या स्त्रियांची आपल्या कर्तव्याविषयीं जशी खरीखोटी समजूत असेल आणि तीस अनुसरून त्या जसें आचरण करतील त्यावर अवलंबून आहे.

आतां ज्यांच्या समजुतीवर आणि आचरणावर भावि स्त्रीजातीची सुधारणा अवलंबून आहे त्या स्त्रिया तरी कोणत्या हें पाहूं. त्या स्त्रिया ह्मटल्या ह्मणजे वरिष्ठ वर्गांतील स्त्रिया, ज्यांस विचार करण्याची शक्ति आहे व ज्या सुधारणेच्या कामांत मदत करितात आणि ज्यांच्या आचरणाचा परिणाम त्यांचें अनुकरण करणाऱ्या इतर स्त्रियांवर होतो त्या होत. अशा आणीबाणीच्या वेळीं मला एका गोष्टीचें महत्व फार वाटतें. ती गोष्ट ही कीं, अशा प्रसंगीं आह्मांपैकीं प्रत्येकीनें आपल्या अल्प सामर्थ्यानुरूप या नवीन मार्गाचें अवलंबन केलें पाहिजे; तें इतकें सावधगिरीनें केलें पाहिजे कीं, त्यापासून लोकांत आपली निंदा आणि उपहास होण्यास वास्तविक कारण मिळणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर आमच्या भावि स्थितीचा मार्ग सोपा व सरळ होईल. नेहमीं आमचें आयुष्यक्रमण खऱ्या मार्गानेंच झालें पाहिजे. त्यांत केवळ अधिक हक्क आणि

अधिक स्वातंत्र्य मिळालें ह्मणजे झालें असें समजूं नये; तर त्यांत आपणास जें योग्य वाटेल तिकडे चित्ताची स्थिति आदरयुक्त असून, उदार धर्मशीलता, कोमल साधुता, उत्कृष्ट शुद्धता आणि अचल सत्यता हे गुण आंगीं अवश्य असले पाहिजेत.

जुने सर्व नीतिबंध एक तर आह्मीं अगदींच तोडून टाकूं, किंवा हल्लींच्या स्थितींत सुद्धां ते जशाचे तसेच ठेवूं शकूं असें जर कोणांस वाटत असेल तर ही त्यांची समजूत अगदीं चुकीची आहे. शाश्वत नीतितत्त्वांचें बंधन आह्मांस नेहमीं पाहिजेच आहे; पण जसजसा मनुष्याच्या आयुष्यक्रमांत फेरफार होत जाईल तसतशीं तीं नीतितत्त्वें व्यावहारिक कर्तव्यांस कशीं लागू करावयाचीं याविषयीं पुनःपुनः विचार करून त्यांत सुधारणा केली पाहिजे. उदाहरणार्थ, बाल्यावस्थेंत मनुष्य असतांना त्याचें जें कर्तव्य असतें त्या कर्तव्याचें स्वरूप पुढें प्रौढ वयांत बदलतें. मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं, स्त्रियांस आजपर्यत मुलांप्रमाणें वागविण्यांत आलें आहे. त्यांस लहानपणाचे गुण, ह्मणजे आज्ञाधारकपणा आणि परावलंबन हे शिकविण्यांत आले आहेत. परंतु आतां त्यांना बाल्यावस्था सोडून मातृत्वाची योग्यता मिळवावयाची आहे; यास्तव, त्यांचीं कर्तव्यें मनुष्याच्या योग्यतेनुरूप असलीं पाहिजेत. त्यांत सर्वसाधारण सद्गुणांचा समावेश असून आणखी स्त्रियांचे जे विशेष धर्म—कन्याधर्म, मातृधर्म,

पत्नीधर्म वगैरे सामाजिक व राष्ट्रीय धर्म—तेही असले पाहिजेत.

अशा या उन्नत आणि खऱ्या स्त्रीस्वभावास आणि स्त्रीधर्मास अनुसरून प्रपंचांतील सर्व कृत्यें घडतील असे नियम बांधून देण्याचें काम फार विचाराचें आणि सावधगिरीचें आहे; तें माझ्यापेक्षां अधिक योग्यतेच्या मनुष्यानें प्रथम पतकरलें असतें तर बरें झालें असतें. आमचे धर्मगुरु पुरुषांच्या व मुलांच्या कर्तव्यांबद्दल त्यांस प्रसंगोपात उपदेश करितात; परंतु स्त्रियांच्या विशेष कर्तव्यांविषयीं ते कधींही विचार करीत नाहींत. (केलाच तर ते जे सर्वसाधारण नियम घालून देतील ते आह्मांपैकीं थोड्यांनाच सर्वथा मान्य होतील.) यास्तव, या नियम बांधून देण्याच्या कामास कोणी तरी स्त्रीनेंच प्रारंभ करावा हें बरें असें मला वाटतें; आणि ज्याअर्थी अधिक योग्य अशी कोणी बाई हें काम पतकरण्यास पुढें आलेली नाहीं त्याअर्थी, माझी तितकी योग्यता नाहीं हें मी पक्कें जाणत असूनही तो प्रयत्न करण्यास धजत आहें.

ज्या नीतिशास्त्राच्या आधारावर ही सर्व व्याख्यानमाला रचली आहे तें नीतिशास्त्र विस्तारपूर्वक सांगणें जरूर आहे; तसेंच नीतिशास्त्रविरुद्धमतवाद्यांचें खंडन करणें हेंही अवश्य आहे. परंतु तसें करूं लागलें तर या सर्व व्याख्यानमालेसाठीं जो वेळ नेमलेला आहे त्या-

पेक्षां अधिक वेळ लागेल. ज्यांना याविषयींची माहिती करून घेण्याची इच्छा असेल त्यांना या विषयावरील माझे निबंध वाचण्याची शिफारस करून तूर्त तुह्मांस पुढील मुख्य मतें मान्य आहेत असें गृहीत धरून चालतें; कारण, हीं मुख्य मतें पुढें जें कांहीं सांगण्यांत येत आहे त्याचा पाया होत.

प्रथमतः 'कर्तव्य' ह्मणून कांहीं गोष्ट आहे आणि ती अत्यंत पवित्र आहे असें आपणास मानलें पाहिजे. सद्गुण हा कांहीं स्वप्नांतील भ्रम नाहीं, तर तो सर्व शाश्वत गोष्टींपैकीं एक मुख्य गोष्ट आहे. आह्मांस आपलें कर्तव्य काय हें कसें समजतें, कर्तव्याची जबाबदारी आपणावर कोठून येते, आणि आपण निरनिराळ्या स्थितींत बद्ध असलों तरी सत्याची निवड आपणास कशी करतां येते, या सर्वांचें कारण पाहूं गेलें असतां फार खोल विचार करावा लागतो. यासाठीं तूर्त मला तें सर्व एकीकडे ठेविलें पाहिजे. या जगांत कांहीं पवित्र नियम आहेत, ते पाळणें हें आमचें कर्तव्य आहे आणि ते पाळण्याचें किंवा न पाळण्याचें स्वातंत्र्य आह्मास आहे, ही गोष्ट आह्मी जाणत आहों, इतकें सांगितलें ह्मणजे तूर्त बस आहे. या गोष्टी स्वतःसिद्ध असून कोणत्याही नीतिविषयाचें विवेचन करतांना कबूल केल्याच पाहिजेत.

दुसरी गोष्ट ही कीं, ईश्वराचें अस्तित्व आणि आत्म्याचें अमरत्व या गोष्टींवर तुमचा भरंवसा आहे हें मी

गृहीत धरतें. परंतु हीं मोठीं तत्त्वें वर सांगितलेल्या तत्त्वांप्रमाणें नीतिशास्त्र रचण्याच्या कामीं सर्वथैव आवश्यक आहेत असें नाहीं; तथापि, तीं आपणास कबूल आहेत असें समजून पुढें ठिकठिकाणीं त्यांचा उल्लेख केला आहे. आणखी असेंही मी समजतें कीं, जें सदाचरण करावयाचें त्याचा हेतु इहलोकीं किंवा परलोकीं आपणास कांहीं बाह्य लाभ व्हावा असा नसून आपण सद्गुणी व्हावें एवढाच नेहमीं असला पाहिजे. सत्कृत्याचें फळ आपल्या हातून सत्कृत्य झालें हेंच; कर्तव्याचें फळ आपण आपलें कर्तव्य केलें हेंच; आणि ईश्वरभक्तीचें फळ ह्मटलें ह्मणजे आपल्या हातून ती घडली आणि पुढें नेहमीं तशी घडावी हेंच होय.

या थोड्याशा वर सांगितलेल्या गोष्टींवरून जुन्या नीतिशास्त्राचें दिग्दर्शन होतें; आणि वेळ असता तर त्याविषयीं विशेष विस्तारपूर्वक विचार केला असता. तूर्त या गोष्टी आपणास गृहीत धरूनच चाललें पाहिजे. कारण, पुढें ज्या विषयाचा विचार करावयाचा आहे त्याचा या गोष्टी पाया होत. मीं वर ह्मटलेंच आहे कीं, नीतिशास्त्र उभारण्यास ईश्वराचें अस्तित्व आणि आत्म्याचें अमरत्व मानलेंच पाहिजे असें नाहीं. नीति धर्मापासून पृथक् करतां येईल. कित्येक गोष्टींत स्वाभाविकपणेंच सत्यता आहे आणि कित्येक गोष्टी मुळींच असत्य आहेत. यास्तव, या तत्त्वावर सुद्धां कर्तव्याविषयींचे साधारण

नियम बांधतां येतील. सांप्रतकाळीं ज्यांच्या दृष्टीआड संशयरूपी मेघ येऊन धर्मसूर्य जो परमेश्वर तो दिसेनासा झाला आहे त्यांना अशा रीतीनें कोणत्याही धर्ममतापासून नीतिविचार पृथक् करतां यावा ही गोष्ट सुद्धां अत्यंत महत्वाची आहे. आणि या विस्तीर्ण तमोमय ( धर्मसूर्याच्या अभावीं ) जगांत ज्याच्या ठिकाणीं सर्व प्रकारचा चांगुलपणा परिपूर्ण दिसत आहे असा कोणीच नाहीं, किंवा आह्मी असन्मार्गानें चाललों असतां आह्मांस सन्मार्ग दाखवील असा कोणी नाहीं, किंवा या जगामध्यें संकटें व विपत्ति सोसून जे सदाचरणानें वागले त्यांस मृत्यूनंतर पवित्रता व शांतिरूप फळ मिळण्याची मुळींच आशा नाहीं, ही गोष्ट खरी आहे असें जरी क्षणभर धरून चाललें तरी चांगलें तें नेहमीं चांगलेंच राहावयाचें, वाईट तें वाईट असावयाचें, आणि सद्गुण हा मनुष्याच्या खऱ्या उन्नतावस्थेचा धर्म आहे, ही गोष्ट कबूल करणें हेंही फार महत्वाचें आहे.

अशा रीतीनें धर्म व नीति हीं भिन्न असूं शकतील असें समजणें हें सुद्धां कांहीं वाईट नाहीं. ज्याच्या योगानें आत्म्याची उत्तरोत्तर उन्नति होण्यास साह्य मिळतें असा जो धर्म त्यावरचा विश्वास उडाला असूनही जे लोक संकटें सोसून दृढ निश्चयानें आपलें कर्तव्य बजावतात त्यांस आपण मान देणें उचित होय. तथापि, माझा समज असा आहे कीं, त्यांचें संशयात्मक मत अगदीं चु-

कीचें आहे; आपलें ऐहिक व पारमार्थिक जीवन ज्या-च्यावर अवलंबून आहे असा सर्वशक्तिमान् व सर्वगुण-संपन्न परमेश्वर आहे असा माझा दृढ विश्वास आहे. यास्तव, धर्माचा आणि नीतिशास्त्राचा परस्पर संबंध नाहीं असें माझ्यानें ह्मणवत नाहीं; इतकेंच नव्हे, तर, त्याच्या सान्निध्याचा प्रकाश आपल्या नीतिमार्गावर पडून त्याच्या योगानें जगांतील आडमार्ग आपणास दिसतात आणि परोपकारार्थ स्वार्थत्याग करण्यास उत्साह येतो. हें सर्व जग परमेश्वराचें राज्य आहे आणि आपण सर्व त्याचीं लेंकरें आहोंत असें आह्मीं समजतों ह्मणूनच आह्मी एकमेकांवर प्रीति करतों व मोठ्या उत्साहानें एकमेकांस मदत करतों. आणि तो न्यायी आहे असा आमचा विश्वास आहे ह्मणूनच इतके अन्याय आणि दुःख आपणास या जगांत सोसण्यास सामर्थ्य येतें.

यासाठीं नास्तिक लोकांच्या मताप्रमाणें नीतितत्त्वांचा विचार करण्यांत वेळ घालविण्यापेक्षां आस्तिक मताप्रमाणें त्याचा विचार करूं या. हा विचार विशेष विस्तारानें आपल्यापुढें ठेविल्यावर त्याच्या मननांतीं आपणास दिसून येईल कीं त्या योगानें मनुष्याला नीतिमार्ग अधिक स्पष्टपणें दिसूं लागतो.

पवित्र मनुष्याची पवित्रता व आनंद, तसेंच पाप्याची मलिनता व दुःख आणि इतर सर्व बऱ्या वाईट गोष्टी सर्वज्ञ परमेश्वराला कळतात. त्याच्या दृष्टीनें या संसा-

गांतील सर्व सुखदुःखें व मनुष्याच्या इच्छा, एकंदर जगांतील शाश्वत गोष्टींच्या मानानें रजःकणासारख्या क्षुल्लक आहेत. परंतु सत्य आणि असत्य यांतून आपण कोणतें निवडून घेतों, ही गोष्ट मात्र ईश्वराच्या दृष्टीनें अमर्याद महत्वाची आहे. सज्जन आणि दुर्जन यांच्या मध्यें जो भेद आहे तो कशाचीही उपमा देऊन व्यक्त करितां यावयाचा नाहीं. मनुष्याच्या आत्म्याचें चिरस्थायित्व ध्यानांत आणलें ह्मणजे सद्गुण व दुर्गुण खेरीजकरून मनुष्यजीवनासंबंधी इतर सर्व गोष्टी ईश्वराच्या दृष्टीनें लहान मुलांच्या खेळाप्रमाणें क्षुल्लक आहेत. यावरून सिद्ध होतें कीं, परम दयाळू परमेश्वरानें सद्गुण हा इहलोकीं केवळ सुख भोगण्याकरितां मनुष्याला दिलेला नाहीं; तर त्याच्या योगानें मनुष्यानें आपली भावि स्थिति सुधारावी आणि या जगांत जें शिक्षण मिळतें त्याचा मूळ हेतु सिद्धीस न्यावा यासाठींच दिलेला आहे. परमेश्वरानें आपणास जन्मास घातलें व सदाचरणाची जबाबदारी आह्मांवर ठेवून या अशा प्रकारच्या कसोटीच्या जगांत आह्मांस पाठविलें यांत त्याचा हेतु आह्मां क्षुद्र प्राण्यांस अत्यंत उन्नतावस्थेप्रत नेण्याचा आहे, याविषयीं मला कांहीं शंका वाटत नाहीं. ही उन्नतावस्था ह्मटली ह्मणजे सद्गुणसंपन्नता. तिच्या योगानें मनुष्य पवित्रपणामध्यें ईश्वराच्या अधिकाधिक जवळ जाऊं शकतो. सृष्टिरचनेमध्यें परमेश्वराचा हेतु आत्म्यास पूर्णावस्थेप्रत नेण्या-

चा दिसतो. प्रयास, प्रयत्न, सुख, दुःख, कसोटी व मोह इत्यादिकांपासून मिळणाऱ्या नानाप्रकारच्या अनुभवानें आह्मीं सद्गुणसंपन्न व्हावें, व उत्तरोत्तर उन्नतावस्था प्राप्त करून घ्यावी, ह्मणजे मग तेणेंकरून आह्मी आमच्या जीवात्म्याचा आत्मा जो परमेश्वर त्याच्या सन्निध जाऊन त्याच्या समागमसुखाचा अनुभव घेऊं; पवित्रता, नीति, मंगलस्वभाव या गुणांत त्याच्यासारखे होऊं; आणि शेवटीं परमेश्वरानें आपल्या भक्तांसाठींच नव्हे, तर तूर्त अज्ञानामुळें जे त्यास ओळखत नाहींत अशांकरितां देखील, आमच्या हल्लींच्या स्थितींत कल्पना करितां येत नाहीं असें ईश्वरीप्रेम आणि त्यापासून होणारा आनंद हीं उत्पन्न केलीं आहेत, त्यांचा उपभोग घेण्यास पात्र होऊं.

हाच मनुष्यजन्माचा हेतु असावा असा माझा समज आहे. हाच एक हेतु परमदयाळू व सर्वसमर्थ परमेश्वराचा आहे असें अत्यंत आदरपूर्वक ह्मणतां येईल; आणि यावरूनच या जगामध्यें ज्या पापानें व दुःखानें आपणास घेरलें आहे त्याचें थोडेंबहुत तरी स्पष्टीकरण करितां येईल. ह्मणून, मी आपणास पुनः विनंति करितें कीं, आह्मांपैकीं प्रत्येकीनें आपलें कर्तव्य बजावून व ईश्वरेच्छेप्रमाणें वागून आपली जी हल्लींची अध्यात्मिक स्थिति आहे तिची इतकी उन्नति करावी कीं तेणेंकरून आह्मी ऐहिक दुःखें व पातकें यांस मागें सारून निरंतर ईश्वरसमागमाचा आणि शाश्वतसुखाचा पूर्ण अनुभव घेऊं.

हाच ईश्वराचा हेतु आहे, ही गोष्ट आह्मी आपल्या कर्तव्यांचा विचार करितांना गृहीत धरली पाहिजे.

स्त्रियांच्या कर्तव्यांचा विचार करण्यांत आपली मजल बरें वाईट समजून वागणाऱ्या नैतिक प्राण्याचें सर्वकाळीं व सर्वत्र सामान्य कर्तव्य कोणतें आहे, याचा विचार करण्यापर्यंत येऊन पोहोंचली आहे. ह्मणजे, जेथें जेथें सत्यासत्याची निवड करितां येण्यासारखी आहे तेथें तेथें सत्याचें ग्रहण करावें व असत्याचा त्याग करावा. हा सार्वत्रिक ठळक नीतिनियम गृहीत धरून चाललों असतां आपणास स्पष्ट दिसून येतें कीं सर्व सद्गुणांचें महत्व मनुष्यास वास्तविक सारखेंच आहे; फरक काय तो आचरण करणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणीं आहे. ती व्यक्ति कोणीही असूं शकेल. राजा किंवा प्रजा, राव किंवा रंक, वृद्ध किंवा तरुण, श्रीमान् किंवा दरिद्री, पुरुष किंवा स्त्री सुद्धां असूं शकेल. जेथें जेथें ह्मणून सत्य आणि असत्य यांची निवड करण्यास जागा आहे तेथें सत्याचेंच ग्रहण करणें ही जी सार्वत्रिक व स्वाभाविक जबाबदारी येते, तींतच लहान मोठ्या सर्व सद्गुणांचा सारखा समावेश होतो. आणि व्यवहारामध्यें प्रत्येक प्रसंगीं सत्यास अनुसरून वागणें हाच त्या त्या प्रसंगाचा विशिष्ट सद्गुण आहे; ह्मणजे, खोटें बोलणें ज्या वेळीं फायदेशीर वाटतें त्या वेळीं खरें बोलण्यास उद्युक्त होणें हा सत्यवादित्वाचा सद्गुण होय, वाजवी रीतीनें व्यवहार करणें हा

न्यायाचा सद्गुण होय, दुसऱ्यास अपकार करण्यापेक्षां कोणतेंही दुःख सोसण्यास तयार होणें हा धैर्याचा सद्गुण होय. याचप्रमाणें सर्व सद्गुणांची गोष्ट आहे. ही गोष्ट स्वतःसिद्ध आहे असें आपणास वाटेल. तथापि, सर्व नैतिक प्राण्यांच्या संबंधानें व त्यांतही स्त्रिया व पुरुष यांच्या संबंधानें सर्व सद्गुणांचें महत्व सारखेंच आहे हें वरचेवर सांगितलें तर व्यर्थ जाणार नाहीं, अशी माझी खात्री झाली आहे. यावरून आपणास दिसून येईल कीं, थोर होण्यास किंवा साधुत्व पावण्यास पुरुषांच्या आंगीं जे सद्गुण पाहिजेत त्यांच्याहून भिन्न सद्गुण स्त्रियांच्या आंगीं पाहिजेत असें नाहीं. सद्गुण येथून तेथून सारखेच. मात्र व्यवहारांत स्त्रियांना व पुरुषांना त्यांचा उपयोग भिन्न भिन्न व्यवसायांत करावा लागतो हाच काय तो भेद. सृष्टिकर्त्याचा जो हेतु पुरुषांना उत्पन्न करण्यांत आहे आणि जो हेतु पुरुषांनीं सतत आपल्या पुढें ठेवून वागलें पाहिजे तोच हेतु आमच्याही उत्पत्तीचा असून आह्मीं स्त्रियांनीं तो सतत ध्यानांत बाळगला पाहिजे. मिल्टनसारख्या पुरुषाचेंही मत असें आहे कीं पुरुषांनीं प्रत्यक्ष ईश्वराची सेवा करावी आणि स्त्रियांनीं पुरुषांस दैवत समजून त्यांची सेवा करावी. परंतु हें मत अगदीं चुकीचें आहे. मला वाटतें कीं, आह्मीं स्त्रियांनींही ईश्वरास ओळखून चिरकाल त्याच्या सान्निध्याचा लाभ घ्यावा, त्याच्यासाठीं आपलें आयुष्य खर्चावें, त्याच्यासारखें

व्हावें; आणि त्याच्या राज्यांत न्याय, सत्य व प्रीति यांची वृद्धि, कोणत्याही पुरुषाच्या द्वारें नव्हे तर, प्रत्यक्ष रीतीनें करावी हाच हेतु सृष्टिकर्त्याचा आह्मांस उत्पन्न करण्यांत आहे.

व्यवहारामध्यें पुरुषांनीं स्त्रियांस गौणत्व दिलें आणि स्त्रियांनीं तें स्वसंतोषानें मान्य केलें हेंच स्त्रियांना योग्य स्थान न मिळण्याचें कारण होय. विवाहबंधनानें पुरुषांशीं बद्ध झालेल्या स्त्रियांनाच मोक्ष मिळण्याचा संभव आहे असें ब्रिघ्याम यंग नांवाच्या ग्रंथकाराचें जें मत आहे तें, विवाह करून पुरुषांच्या सुखास कारणीभूत होत नाहींत अशा स्त्रियांचें जीवित व्यर्थ असें ज्या इंग्लंदांतील कायदे करणारांस वाटतें, त्यांच्या मताहून अधिक चांगलें आहे असें नाहीं. पुरुषांशिवाय स्त्रियांना या जगांत राहण्याचें कांहीं कारण नाहीं या मतासच अनुसरून प्राचीनकाळच्या हिंदु लोकांनीं सती जाण्याची चाल अमलांत आणिली. पति मरण पावला कीं त्याच्या बरोबर त्याच्या स्त्रीसही दहन करणें हें साहजिक झालें. एका अर्थी प्रत्येक सृष्टप्राणी इतर प्राण्यांकरितां केलेला आहे असें ह्मणण्यांत कांहीं अर्थ आहे हें खरें. सृष्टि ही शरीरासारखी असून तिच्या प्रत्येक अवयवाचा उपयोग सर्व घटना सुरक्षित राखण्याकडे आहे. परंतु या अर्थानें विचार केला असतां पुरुषास स्त्रीच्या, पित्यास पुत्राच्या, कन्येस मातेच्या अशा प्रकारें सर्वांस परस्परांच्या उप-

योगाकरितां निर्माण केलें आहे असें होतें. या नियमाप्रमाणें कुटुंबास, राष्ट्रास, आणि मनुष्यजातीस बळकटी येऊन त्यापासून कोणास कनिष्ठपणा न येतां सर्वांस मान मिळतो. कां ह्मणाल तर अशा स्थितींत आपलें पहिलें कर्तव्य स्वतःच्या संबंधाचें असून दुसरें इतरांच्या उपयोगी पडणें हें होय. एकाचें जीवित केवळ दुसऱ्याच्या गुलामगिरीकरितां आहे असें यःकश्चित् कीटकाच्या संबंधानें सुद्धां आपणास ह्मणतां येणार नाहीं.

मानवप्राण्यास जे सद्गुण संपादन करितां येण्यासारखे आहेत ते सर्व स्त्रियांनीं संपादन करून घ्यावे हाच त्यांच्या जीविताचा मंगल हेतु आहे आणि सर्व सद्गुण प्राप्त करून घेऊन एकंदर नीतिनियम पाळणें हेंच आपलें कर्तव्य आहे ही गोष्ट आह्मीं स्त्रियांनीं आपल्या हृदयपटावर स्पष्टपणें कोरून ठेविली पाहिजे.

आतां, नीतिनियमांचें बारकाईनें विवेचन करूं गेलें असतां फार विस्तार होईल. यास्तव, त्यांचें थोडक्यांत दिग्दर्शन करून ज्या मुख्य विषयाचें येथें विशेष रीतीनें विवेचन करावयाचें आहे तिकडे वळूं.

व्यावहारिक नीतीमध्यें तीन प्रकारच्या कर्तव्यांचा समावेश होतो. पहिलें, **ईश्वरसंबंधी** कर्तव्य; दुसरें, **स्वतःसंबंधी** कर्तव्य आणि तिसरें, **समाजसंबंधी** कर्तव्य.

वास्तविक पाहिलें असतां हीं सर्व कर्तव्यें ईश्वरसं-

बंधीच आहेत असें ह्मटलें तरी चालेल. कारण, आपल्या आत्म्याची उन्नति करून ईश्वराचें सान्निध्य मिळवावें या हेतूनें आह्मांस त्यानें उत्पन्न केलें असल्यामुळें स्वतःसंबंधी कर्तव्य ईश्वरसंबंधीच होय. तसेंच ईश्वरानें उत्पन्न केलेल्या इतर प्राण्यांवर प्रीति करणें आणि त्यांच्या उपयोगी पडणें हें सुद्धां ईश्वरसंबंधीच कर्तव्य होय. परंतु नीतीचा विचार करतांना ईश्वरसंबंधी कर्तव्य वेगळें करण्यांत आलें आहे, तें एवढ्याचसाठीं कीं त्यांत, जेव्हां मनुष्यास आपल्यावर ईश्वर ह्मणून कोणी आहे आणि तो आपला स्रष्टा, हितकर्ता, सद्बुद्धिदाता, परमपवित्र आणि आपल्या जीविताचें आदिकारण आहे असें आपण समजतों तेव्हां अशा ईश्वरास अनुलक्षून जीं मनुष्याचीं प्रत्यक्ष कामें आहेत त्यांचाच केवळ समावेश व्हावा.

या ईश्वरसंबंधी कर्तव्याचे **कृतज्ञता, पश्चात्ताप, प्रार्थना, भरंवसा, आराधना** आणि **आत्मनिवेदन** असे सहा भाग करितां येतील. स्वतःसंबंधी कर्तव्य, ह्मणजे, ज्यांत प्रत्यक्ष आपलें स्वतःचें हित आहे तें; अर्थात् आमच्या जीविताचा जो खरा हेतु, तदनुसार वागणें; ह्मणजे, केवळ बाह्यात्कारें नव्हे, तर अंतःकरणपूर्वक सद्गुणानें वागणें हें होय. या कर्तव्याचे **ब्रह्मचर्य, मद्यादिपदार्थनिषेध, सत्यता, धैर्य** आणि ज्यावांचून इतर कोणतेंही कर्तव्य करितां येणार नाहीं असें **स्वातंत्र्य** रक्षण

असे पांच विभाग पाडतां येतील. तिसरें, सामाजिक कर्तव्य; याचा संबंध सर्व मनुष्यजातीशीं आहे. याचे निरनिराळया संबंधांनुरूप निरनिराळे अनेक विभाग करितां येतील. जसें, **कुटुंबसंबंधी, कुलसंबंधी, सामाजिक** आणि **राष्ट्रीय** कर्तव्यें.

आतां, या तीन प्रकारच्या कर्तव्यांपैकीं पहिल्या प्रकारच्या, ह्मणजे ईश्वरसंबंधी कर्तव्याचा विचार करण्याची या ठिकाणीं जरूर नाहीं. कारण, स्त्रियांचें ईश्वरसंबंधी कर्तव्य पुरुषांच्या कर्तव्याहून भिन्न आहे असें कोणी ह्मणणार नाहीं. जर कोणीं ह्मटलेंच तर तें पुरुषांनीं आपल्या भक्तीचा प्रकाश इतरांस दाखवून त्यांस जगत्पित्याचें गौरव करण्यास लावावें आणि स्त्रियांनीं त्या प्रकाशाचा उपयोग स्वत:पुरताच करावा असें ह्मणतील.

आतां स्वत:संबंधी व समाजसंबंधी कर्तव्यांचा विचार करणें आहे; तो करण्यापूर्वीं या दोहोंपैकीं अधिक श्रेष्ठ कोणतें याचा निर्णय प्रथम केला पाहिजे. कारण, जेव्हां दोहोंमध्यें विरोध दिसेल ( वास्तविक विरोध असूं शकत नाहीं, ) तेव्हां कोणतें कर्तव्य अधिक महत्वाचें हें आपणास लागलेंच समजलें पाहिजे.

स्वत:संबंधी कर्तव्य सामाजिक कर्तव्यापेक्षां अधिक श्रेष्ठ असून त्याच्याकडे सामाजिक कर्तव्याकरितां ह्मणून कधींही दुर्लक्ष करतां कामा नये, ही गोष्ट निर्विवाद आहे असें जर मीं ह्मटलें तर तुह्मांस आश्चर्य वाटूं नये.

सध्यांच्या काळीं सामाजिक कर्तव्य हेंच मुख्य होऊन बसलें आहे आणि त्याच्यापुढें ईश्वरसंबंधी कर्तव्य आणि स्वतःसंबंधी कर्तव्य यांची हेळसांड होत आहे. ईश्वरावर व आत्म्याच्या अमरत्वावर भरंवसा नसल्यामुळें सद्गुणांची वृद्धि होत नाहीं; आणि सामाजिक कर्तव्य हेंच काय तें मुख्य आणि खरें कर्तव्य असें लोकांस वाटूं लागलें आहे. असें झाल्यामुळें अर्थात् स्वतःसंबंधी कर्तव्य केवळ समाजाच्या हिताहितावर अवलंबून राहावयाचें.

अशा प्रकारच्या नीतिशास्त्रास माझें मत अगदीं प्रतिकूळ आहे. सद्गुण हा सर्वांत श्रेष्ठ आहे आणि त्याची आवश्यकता आह्मांपैकीं अति दुर्बलांना सुद्धां सुखापेक्षां अधिक आहे; यास्तव, मीं वर सांगितलेंच आहे कीं, सद्गुण हा आमच्या जीविताचा मुख्य उद्देश आहे आणि सद्गुणास अनुसरून जितकें सुख संपादन करितां येईल तितकें करणें हा मुख्य उद्देश नाहीं, तर गौण आहे. कित्येकांचें मत असें आहे कीं, सत्य, निर्मलता, आणि अंतःकरणाची पवित्रता हे गुण ज्या समाजामध्यें वास करितात तो समाज कांहींसा व्यवस्थित आणि सुखी होतो, एवढ्याच सामाजिक सोईसाठीं या गुणांची आवश्यकता आहे. हें मत अगदीं क्षुद्र आहे; तें मला मुळींच आवडत नाहीं. माझें उलट असें मत आहे कीं, प्रत्येक व्यक्ति, प्रत्येक समाज आणि या जगांतील प्रत्येक सृष्टपदार्थ परमेश्वरानें एवढ्याचसाठीं निर्माण

केला आहे कीं, मनुष्यानें त्याच्यायोगें इहलोकीं आपल्या आत्म्याची उन्नति करून घेऊन, निर्मलता, प्रेम आणि पवित्रता यांमध्यें वास करावा; आणि यःकश्चित ऐहिक सुखाचें जेथें स्मरण सुद्धां होणार नाहीं असें स्वर्गसुख ( मोक्ष ) प्राप्त करून घ्यावें.

यास्तव माझें मत असें आहे कीं, जेथें जेथें स्वतःसंबंधी कर्तव्याचा सामाजिक कर्तव्याशीं विरोध येईल तेथें स्वतःसंबंधी कर्तव्याचा हक्क अधिक समजला पाहिजे. आह्मीं आपल्या शेजाऱ्याचें हित करण्याच्या व्यर्थ आशेनें आपल्या स्वतःच्या आंगच्या सत्यतेचा, ब्रह्मचर्याचा किंवा मद्यनिषेधव्रताचा भंग होऊं देतां नये; कारण, एक तर सद्गुण हा मनुष्यमात्राच्या अस्तित्वाचा वास्तविक उद्देश असून त्याचा स्वीकार ज्याला त्याला केवळ स्वतःपुरता करितां येतो; दुसऱ्यास कोणी सद्गुणी करूं शकत नाहीं, परंतु सद्गुणी होण्यास अप्रत्यक्ष रीतीनें मदत मात्र करूं शकतो. यावरून ही गोष्ट सिद्ध आहे कीं, आपल्या स्वतःचा सद्गुण दुसऱ्या एखाद्या, ह्मणजे, समाजसंबंधी कनिष्ठ हेतूसाठीं एकीकडे ठेवणें हें मूर्खपण होय. दुसरें कारण असें कीं, दुसऱ्याच्या हितासाठीं ह्मणून जरी आपण असन्मार्गाचा स्वीकार केला तरी त्यापासून त्या मनुष्याचें वास्तविक कल्याण कधींही होणार नाहीं. आपल्या बांधवांच्या उपयोगीं पडण्याचा खरा आणि खात्रीचा मार्ग ह्मटला ह्मणजे त्यांच्यासाठीं कांहीं तरी क-

रणें हा नव्हे. तर आपण स्वतः फार सत्यशील, पवित्र, आणि उन्नत होणें हाच होय. ही गोष्ट अंतःकरणांत बिंबून राहणें फार कठीण आहे. आणि यासंबंधानें स्त्रियांस उद्देशून बोलतांना मीं जो विस्तार केला आहे, तो या बाबतींत फार विचारी मनाच्या स्त्रियांकडून देखील चूक होण्याचा संभव आहे ह्मणून केला आहे. आपल्या मातापितरांच्या, पतीच्या किंवा अपत्यांच्या संरक्षणासाठीं ह्मणून सत्याचा त्याग करतील अशा शेंकडों स्त्रिया सांपडतील. तसेंच आपल्या मातापितरांचें दारिद्र्य निवारणार्थ किंवा त्यांच्या संतोषास्तव आपल्या मर्जीविरुद्ध ह्मातार्‍या कोतार्‍या किंवा कुरूप पुरुषाशीं विवाह करण्यास सिद्ध होणार्‍या स्त्रिया हजारों सांपडतील. त्याचप्रमाणें, लोकांवर उपकार करण्यासाठीं, त्यांचे अपराध लपविण्यासाठीं किंवा कोणाला कांहीं उद्योगधंदा मिळवून देण्यासाठीं लाखों स्त्रीपुरुष सत्यास झुगारून देणारे सांपडतील. ज्यांनीं आपलें स्वातंत्र्य सोडून दिलें आहे, ज्या नीतिसंबंधी गोष्टींत केवळ गुलामासारख्या होऊन राहिल्या आहेत आणि ज्या पतीसाठीं किंवा पित्यासाठीं निमूटपणें असत्याचरण करितात अशा या पृथ्वीवर सर्व देशांत कोट्यावधि स्त्रिया सांपडतील. हें वर्तन मनुष्याचें वास्तविक जसें उत्तम आचरण असावें व कित्येकांचें असतें, त्याच्या अगदीं उलट होय. हे आत्माहुतीचे सर्व प्रकार सारखे दोषास्पद

आहेत. ते बहुधा जरी उदारपणाचे आणि दयाळूपणाचे असले तरी ते भ्रांतिमूलक आहेत. त्यांपासून कधींही हित व्हावयाचें नाहीं. मनुष्यजीवनाचा उत्तम हेतु त्यामुळें निष्फळ होतो; आणि त्यापासून ऐहिक लाभ होतील अशी जरी आशा असते तरी एकंदरीनें नैतिक हानि फार होते.*

---

* खालीं दिलेल्या गोष्टीवरून वरील सिद्धांताचें स्पष्टीकरण होईल. एका साहेबाचे घरीं एक बटलर होता. त्याला दारू पिण्याची संवय लागली; ती इतकी प्रबल झाली कीं त्या साहेबानें त्यास ती सोडण्याविषयीं अनेक वेळां धमकी देऊन सांगितलें, तरी त्याचा कांहीं उपयोग होईना. शेवटीं त्यानें त्यास नोकरीवरून दूर केलें. तेव्हां बटलरानें आपणांस दुसरीकडे नोकरी मिळावी ह्मणून चांगल्या वर्तणुकीबद्दल एक शिफारसपत्र धन्यापाशीं मागितलें. परंतु तो दारूबाज असल्यामुळें चांगल्या वर्तणुकीचें शिफारसपत्र त्या साहेबाच्यानें देववेना. पुष्कळ वेळ त्या बटलरास चाकरी मिळण्याची संधि आली. परंतु त्याजवळ पूर्वींच्या धन्याचें शिफारसपत्र नसल्यामुळें कोणी त्यास ठेवीना. शेवटीं उद्योगधंदा नसल्यामुळें त्याला अन्नवस्त्राची ददात पडूं लागली. ह्मणून त्यानें आपल्या धन्याची फार करुणस्वरानें विनवणी केली आणि "जर एकवेळ माझी शिफारस कराल तर मी पुन्हा कधीं दारूस शिवणार नाहीं" असें शपथ घेऊन सांगितलें आणि ह्मणाला "जर आपण शिफारस करणार नाहीं तर मला अन्न मिळण्याची कांहींच आशा उरली नाहीं, यास्तव, मीं आत्मघात करण्याचा निश्चय केला आहे." हें ऐकून त्या गृहस्थास मोठी पंचाईत पडली. परंतु सत्यास अवलंबून राहणें हेंच आपलें कर्तव्य असें समजून त्यानें शिफारसपत्र देण्याचें मोठ्या धैर्यानें नाकारलें. पुढें कांहीं वर्षांनीं त्या साहेबास आस्ट्रेलियाहून एक पत्र आलें; तें त्या बटलेरानेंच पाठविलें होतें. त्याव-

असत्याचरण करणें हें कधींही आणि कोणत्याही कारणानें योग्य होणार नाहीं. या गोष्टीची सत्यता स्वतःसिद्ध आहे. तसेंच, आपलें नैतिक स्वातंत्र्य बुडविण्याचा कोणीं प्रयत्न केला तर तो अन्याय सोसून घेणें सुद्धां योग्य नाहीं. सेन्ट बार्थलोम्यू यानें तर असें ह्मटलें आहे कीं, एखाद्या थोर पुरुषाच्या शेजाऱ्यानें जर पातक केलें तर त्याचा अर्धा दोष त्या थोर पुरुषाकडे येतो. कारण, जर त्यानें आपल्या आचरणांत पवित्रपणाचा कित्ता घालून दिला असता तर त्याच्या शेजाऱ्याकडून असें पापाचरण घडलें नसतें. आतां ही अतिशयोक्ति आहे असें जरी ह्मटलें तरी त्यांत सत्याचा अंश पुष्कळ आहे. आमच्या अंतःकरणांत जी सद्वृत्तीची दिव्य ज्योति आहे तिचा जर आह्मी पूर्णपणें प्रकाश लोकांवर पाडूं तर या प्रपंचरूप रात्रीमध्यें आह्मी चंद्राप्रमाणें प्रकाशूं. चांगुलपणा, पवित्रता आणि प्रेम आदिकरून सद्गुण, तसेंच भ्रष्टपणा, निर्दयता आदिकरून दुर्गुण मनुष्यास एकमेकांच्या संसर्गानें जसे लवकर जडतात तसे ते दुसऱ्यांनीं केलेलीं

---

रून, त्या बटलेराची दारूची संवय सुटून तो भरभराटीस चढला असें दिसून आलें. या पत्रांत आपल्या धन्यानें शिफारसपत्र न देण्यांत जो दृढनिश्चय दाखविला त्याबद्दल त्या बटलेरानें त्याचे आभार मानले आणि ह्मणाला 'महाराज, जर आपण मला दुसरीकडे नोकरी लावून दिली असती तर माझी दारू पिण्याची संवय सुटली नसती. आपण मला तो मार्ग सोडणें भाग पाडलें यामुळेंच माझा बचाव झाला.'

कृत्यें पाहून किंवा त्यांचीं भाषणें ऐकून जडत नाहींत. आह्मांस उन्नतिप्रत किंवा अवनतिप्रत नेण्यास चालत्या बोलत्या स्त्रीपुरुषांचा साक्षात् सहवास कारण आहे. त्याच्याच योगानें आह्मांस पवित्रता किंवा भ्रष्टता प्राप्त होते. ह्मणजे, चांगल्याच्या संगतीनें उदारपणा व थोरपणा आणि वाईटाच्या संगतीनें नीचपणा प्राप्त होतो. जगाच्या इतिहासांतील शूर पुरुष, धर्मसंस्थापक किंवा साधुपुरुष या सर्वांच्या उपदेशांचा किंवा कृत्यांचा लोकांवर जितका परिणाम झाला त्याच्या पेक्षां त्यांच्या संगतीचा परिणाम अधिक झाला आहे. हिंदुस्थान आदिकरून पूर्वेकडील देशांतील लोकांच्या नीतीमध्यें गौतम बुद्धाच्या विचारांचा आणि सदयतेचा ठसा दिसून येतो. गेल्या अठराशें वर्षांत ख्रिस्तीधर्माचा जो विलक्षण प्रसार झाला तो ख्रिस्ताच्या टेंकडीवरील उपदेशाचा किंवा त्याच्या काल्व्हरी येथील देहत्यागाचा परिणाम नव्हे. तर त्याच्या स्वतःच्या आचरणाचा परिणाम होय. आतां आपण व्यावहारिक नीतिशास्त्राचें जें दिग्दर्शन केलें त्याकडे पुनः वळूं.

१ **ईश्वरसंबंधी** कर्तव्य, ह्मणजे ईश्वरावर प्रेम (यासंबंधानें तूर्त मी कांहीं विचार करीत नाहीं ).

२ **स्वतःसंबंधी** कर्तव्य, ह्मणजे आत्म्याची उन्नति करून साधुत्वाची आणि ईश्वराची प्राप्ति करून घेणें.

३ **सामाजिक** कर्तव्य, ह्मणजे सर्व मनुष्यप्राण्यांवर प्रेम ठेवणें.

पुढील व्याख्यानांत स्वतःसंबंधी कर्तव्याचा विचार करण्यांत येईल. त्यांत विशेषतः या कर्तव्यापासून स्त्रियांच्या जीवितावर होणारा परिणाम आणि तत्संबंधी स्त्रियांकडून अज्ञानामुळें होणाऱ्या चुका यांचें विवरण करण्यांत येईल. आणि शेवटल्या चार व्याख्यानांत स्त्रियांच्या सामाजिक कर्तव्याचा विचार करण्यांत येईल; ह्मणजे, आपलें कुटुंब, आपलें गणगोत, आपला समाज, आपलें राष्ट्र आणि शेवटीं सर्व पृथ्वी यांवर त्या कर्तव्याची मर्यादा कशी पायरीपायरीनें वाढत जाते हें सांगण्यांत येईल.

आतां माझी आपणांस अशी विनंति आहे कीं, मीं ज्याप्रमाणें नीतीचें विवेचन वर केलें आहे त्याप्रमाणें आजपर्यंत आपण जर कधीं केलें नसेल आणि आतां मीं केलेलें विवेचन जर आपणास खरें आणि योग्य वाटत असेल तर मानवप्राण्याच्या योग्यतेविषयीं आणि कर्तव्याविषयीं जें मीं वर सांगितलें तें पक्कें ध्यानांत बाळगून व्यवहारांत आपण त्याप्रमाणें वागावें.

एकदां एक थोर धर्मोपदेशक मला ह्मणाले, "एखाद्या गोष्टीच्या सत्यत्वाबद्दल आणि योग्यतेबद्दल स्त्रियांची एकवेळ खात्री करून दिली ह्मणजे त्या बहुतकरून आपले आचार व विचार तदनुसार ठेवण्यास प्रयत्न करितात, असें माझ्या पाहण्यांत आलें आहे; परंतु निराशेची गोष्ट ही आहे कीं, आपण एखाद्या पुरुषाची

एखाद्या गोष्टीविषयीं पूर्ण खात्री करून द्यावी आणि त्यापासून त्याच्या आचरणावर कांहीं तरी परिणाम होईल ह्मणून जों आशा करावी तों त्याचें आचरण तिळमात्र न बदलतां अगदीं पूर्ववत् आहे असें आढळून येतें." असें जर आहे तर ज्या ज्या गोष्टींविषयीं मी आपली खात्री करून दिली असेल त्या त्या गोष्टींच्या संबंधानें आपण धैर्यानें वागून वर सांगितलेलें ब्रीद राखणें हें आपलें कर्तव्य नव्हे काय? यापुढें नेहमीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, आपण प्रथम स्त्रिया आणि नंतर मानवप्राणी अशी आपली वास्तविक स्थिति नाहीं. वास्तविक स्थिति याच्या उलट, ह्मणजे प्रथम मानवप्राणी आणि नंतर स्त्रिया, ह्मणजे, मनुष्यजातींतील मातृवर्गाचे प्राणी अशी आहे.

हल्लींच्या ज्या उलाढाली चालल्या आहेत त्यांत मीं बराच त्रास सोसून जो अनुभव मिळविला आहे त्यावरून आपणांपैकीं तरुण बायांस दोन शब्द सांगण्याची परवानगी मागतें. जागृत व्हा आणि या सृष्टीमध्यें तुमची जी योग्यता आणि तुमच्या उत्पत्तीचा जो मंगल हेतु आहे तो जाणून तदनुसार वर्तन ठेवा. चंद्राप्रमाणें दुसऱ्यासभोंवती फिरणें किंवा वेलीप्रमाणें दुसऱ्यावर अवलंबून राहणें हेंच काय तें तुमचें कर्तव्य, अशी जी समजूत आहे ती तुच्छ माना. पुष्कळ पुरुषांपेक्षां तुमचें बल, तुमची बुद्धि, तुमची संपत्ति, आणि तुमची विद्या

हीं कमी असतील. परंतु या गोष्टींवर नैतिक योग्यता अवलंबून नाहीं. तुह्मी ईश्वराचीं लेंकरें आहांत. तुह्मी उत्तरोत्तर अनंत कालपर्यंत ईश्वराच्या जवळ जवळ जात राहवें आणि त्याच्यासारखें होत जावें यासाठीं त्यानें पृथ्वीवर तुमची योजना केली आहे. यास्तव, सर्वांत उत्तम प्राण्याची योग्यता पुरुषांप्रमाणें तुह्मांसही आहे. कारण, कोणत्याही प्राण्याच्या योजनेंत ईश्वराचा यापेक्षां अधिक उद्देश नाहीं. यासाठीं शेंकडों वर्षांच्या स्त्रियांच्या अज्ञानावस्थेमुळें जे दोष व अविचार तुह्मांला जडले आहेत त्यांची तुह्मांला लाज वाटावी; ते तुह्मीं सोडून द्यावेत. लहान मुली बाहुल्या आणि खेळणीं घेऊन खेळत बसल्या तर तें त्यांस शोभेल; परंतु प्रौढ स्त्रियांनीं आपलें सर्व आयुष्य पोरखेळांत घालविणें ही गोष्ट खेदकारक आहे. माझी तुह्मांस इतकी विनवणी आहे कीं, क्षुद्र मनोविकार, पोकळ अभिमान, व नीचपणाच्या आणि फुसलावणुकीच्या युक्त्या यांचा तुह्मांला कंटाळा आणि तिरस्कार असावा; आणि अशाप्रकारें मनुष्याच्या खऱ्या योग्यतेस चढण्याचा तुह्मीं प्रयत्न करावा. वस्त्रप्रावरणादि बाह्य वस्तूंचा अभिमान बाळगण्यापेक्षां आपल्या आंगच्या गुणांचा अभिमान बाळगा. आणि बाहुलीप्रमाणें आपणास सजविण्यांत किंवा मोराप्रमाणें नटण्यांत वेळ घालवूं नका. आपल्या इतर भगनींसही मान द्या. आणि त्यांच्या शोचनीय स्थितीमुळें किंवा अशिक्षितपणामुळें त्यांच्यांत जे दोष दिसतील

त्यांबद्दल त्यांची हेलना करण्यांत पुरुषाशीं तुह्मीं सामील होऊं नका. जेव्हां एखादी गरीब, वस्त्रहीन, उदासीन, निराशेनें खचलेली, आणि सोशिक मुद्रा धारण करणारी स्त्री रस्त्यांत माझ्या दृष्टीस पडते तेव्हां ती नवऱ्यानें गांजलेली बायको किंवा उपासमार काढणारी विधवा असावी असें वाटून माझें हृदय दुःखानें व्याकूळ होतें. जेव्हां स्त्रिया सशक्त आणि भरभराटींत असून संसाराच्या गोष्टींत आपल्या पतींस स्वाधीन करून घेण्याकरितां तोंडपुजेपणा करून नीचपणाच्या युक्त्या योजितात किंवा त्यांचा राग टाळण्याकरितां आणि त्यांजपासून आपलीं निरुपद्रवी कृत्यें सुद्धां छपविण्याकरितां लबाडी सांगतात आणि अशाप्रकारें आपणास नीचपणा आणतात असें माझ्या दृष्टीस पडतें तेव्हां संतापानें माझें हृदय पोळून जातें. हा संताप त्या स्त्रियांविषयीं इतका नाहीं; तर, ज्या जुलमानें त्यांस जन्मभर दडपून टाकलें आहे आणि त्या वयोवृद्ध झाल्या तरी इतर गोष्टींच्या संबंधानें त्यांस बाल्यावस्थेंतच ठेविलें आहे त्या जुलमाचा मला अधिक संताप येतो. या स्थितीचें मला हांसूं येत नाहीं किंवा अशा स्त्रियांचा तिरस्कारही माझ्यानें करवत नाहीं. परंतु, ज्या समजुतीमुळें स्त्रियांस ही स्थिति प्राप्त झाली आहे त्या समजुतीचा मला अत्यंत तिटकारा येतो.

थोडेसे फार उदार मनाचे पुरुष खेरीजकरून बाकीच्या पुरुषजातीच्या मनामध्यें स्त्रीजातीविषयीं एकप्र-

कारची तिरस्कारबुद्धि आहे. अशी स्थिति जोंपावेतों आहे तोंपावेतों स्त्रियांनीं आपली खरी योग्यता सतत ध्यानांत बाळगणें हें काम फार कठीण आहे हें मी जाणतें. कधीं कधीं रूढीमुळें पुरुष स्त्रियांस सभ्यतेनें वागवितांना आपण पाहतों. परंतु अशाप्रकारें नम्र व हास्यमुख दाखविणाऱ्या मित्रांपैकीं शेंकडा नव्वद असामींस स्त्रिया काडीमात्र राजकीय हक्कास पात्र नाहींत, किंवा धर्मसंबंधी अगर राजकीय लहानसान बाबतींत सुद्धां त्यांचें मत घेण्यासारखी त्यांची योग्यता नाहीं असें वाटत असतें. या गोष्टीचें स्मरण झालें ह्मणजे वरील बाह्यात्कारी सन्मानानें आमची केवळ थट्टा करण्यांत येते असें वाटून आंगाचा तिळपापड होतो. पुरुष स्त्रियांस तुच्छ मानतात याचें कारण शोधण्यास फार लांब गेलें पाहिजे असें नाहीं. जे हक्क बजावण्याची प्रौढ वयांत आल्याबरोबर पुरुषास मोकळीक असते ते बजावण्यास स्त्रियांस कायद्यानें प्रतिबंध केला आहे असें बाळपणापासून पुरुष पाहात येतो; तसेंच बाप व्यवहारांतील हरएक बाबतींत आईचें मत घेतो परंतु शेवटीं निकाल करावयाचा तो आपल्याच मताप्रमाणें करितो असें त्यानें पुष्कळ वेळां पाहिलेलें असतें. जे पुरुष मातेपासून बालकाच्या मनावर होणाऱ्या पवित्र परिणामाविषयीं हृदयद्रावक गद्यपद्यात्मक लेख लिहितात आणि चांगल्या आईपासून मुलावर होणारा परिणाम दैवी आहे असें सांगतात तेच

पुरुष आपल्या बायकांस नेहमीं दटावून, दाबांत ठेवून आणि त्यांचें मत कवडीच्या मोलाचें मानून हा पवित्र परिणाम कमी करितात. बापाप्रमाणेंच आईलाही मान द्यावा असे नियम मुलास घालून देणें जरी फार सोपें आहे, तरी वर सांगितल्याप्रमाणें, आपल्या देशाचाराप्रमाणें आईची गणना गुन्हेगार, खुळे, वेडे, अज्ञान अशा लोकांत होते, असें जर मुलाला आढळून आलें तर तो आपल्या आईस तसा मान देईल हें संभवतें तरी काय?

आह्मांस आमची योग्यता स्थापन करण्यासाठीं ओढून-ताणून आढ्यता आणण्याची जरूरी नाहीं. उलट कोणत्याही प्रकारचा दांभिकपणा हा एक अत्यंत तिरस्कार्य दुर्गुण आहे; तो आह्मा स्त्रीजातीस अत्यंत हानिकारक आहे. मग तो दांभिकपणा वीस वर्षांपूर्वी प्रचारांत असणारा भित्रेपणा आणि ओढूनताणून आणलेला विनय यांसंबंधाचा असो, अगर हल्लींच्या पोषाखांत व चालचलणुकींत जो भपका व दांडगटपणा दिसून येतो त्यासंबंधी असो. मनुष्यास जर उन्नतावस्था प्राप्त झाली पाहिजे तर त्याच्या हातून चांगली वर्तणूक झाली पाहिजे. आणि तिचा पाया अंतःकरणांत असला पाहिजे. अशाप्रकारची खरी योग्यता प्रत्येक स्त्रीस प्राप्त करून घेतां येईल; मग ती स्त्री गरीब असो किंवा श्रीमंत असो, तरुण असो किंवा वृद्ध असो, विदुषी असो किंवा अविदुषी असो. आमच्यापैकीं पुष्कळांचें जीवन स्वाभाविकपणें अगदींच

मर्यादित आहे. आह्मीं अगदीं दरिद्री आहोंत. मोठमोठ्या बंगल्यांत राहणाऱ्या स्त्रियांस सुद्धां थोडेसे पैसे खर्च करण्यास मोकळीक नसते; तसेंच आह्मांपैकीं पुष्कळांची शरीरप्रकृति अगदीं क्षीण असून सर्वप्रकारचें सामर्थ्य परिमित असतें. तथापि अशाप्रकारचा कमीपणा आमच्या नीतिमार्गाच्या आड येऊं शकत नाहीं.

भावी स्त्रीजातीची स्थिति सुधारणें, त्यांचे दोष काढून टाकणें, गतकालच्या स्त्रियांसारखी लाजिरवाणी आणि दुःखकारक स्थिति त्यांस प्राप्त न होई असें करणें आणि आजपर्यंत कोणत्याही देशांत कोणत्याही काळीं स्त्रियांकडून जितकें पवित्र आचरण झालें आहे त्याच्याहीपेक्षां अधिक पवित्र आचरण करण्यास त्यांना मदत करणें, यासाठीं आमच्या हातून होईल तितका उद्योग आह्मीं करावा ही एक मोठी जबाबदारी आमच्या शिरावर आहे. येणेंकरून स्त्रियांचेंच जीवन पवित्र होईल असें नाहीं, तर पुरुषांचेंही खचित होईल. अशी स्थिति जेव्हां प्राप्त होईल तेव्हांच सुधारणा आणि धर्म यांनीं आपलें कार्य केलें असें होईल. जेव्हां स्त्रिया स्वतंत्र आणि उन्नत अशा स्थितीस पोहोंचतील तेव्हांच पुरुष सुधारतील आणि धार्मिक होऊं शकतील; आणि जेव्हां पुरुष नीतिमान् आणि पवित्र होतील तेव्हांच स्त्रियांस स्वातंत्र्य मिळेल. 'पुरुष आणि स्त्री यांची उन्नति किंवा अवनति बरोबरच होते' असें जें टेनिसन यानें ह्मटलें

आहे तें यथार्थ आहे. जो कोणी स्त्रियांची स्थिति सुधारण्यास यत्न करितो त्याचेच हातून पुरुषांची खास सुधारणा होते. जो कोणी स्त्रियांच्या आंगची दुर्बलता, पोरकटपणा, नीचपणा इत्यादि दुर्गुण काढून टाकण्याचा यत्न करील त्याच्या त्याच यत्नानें पुरुषांच्या आंगचें पशुत्व, आपलपोटेपणा आणि विषयासक्ति हीं नाहींशीं होतील. मनुष्याचें शरीर जसें दोन्ही पाय शाबूत नसले तर पुढें चालूं शकत नाहीं, तद्वत् मनुष्यसमाजाचे दोन पाय जे स्त्री व पुरुष ते नीट नसले तर त्याची प्रगति होऊं शकत नाहीं.

हल्लीं स्त्रियांमध्यें स्वातंत्र्याविषयीं जी उत्सुकता उत्पन्न झालेली दिसत आहे तिजपासून जर आमची कायमची सुधारणा व्हावयास पाहिजे आहे, (मला असें वाटतें कीं, स्त्रीजातीच्या आणि सर्व जगताच्या स्थित्यंतरास आरंभ झालेला आहे) तर आह्मीं सर्वांनीं आपल्या कर्तव्याचें महत्व जाणून ही सुधारणा योग्य दिशेनें व्हावी यासाठीं होईल तितका यत्न केला पाहिजे; आणि या यत्नाचा परिणाम निष्फळ किंवा अनर्थकारक न होतां जितका कल्याणकारक व्हावयास पाहिजे आहे तितका केला पाहिजे. ही एक आह्मांवर जबाबदारी आहे, ही गोष्ट सदोदित अंतःकरणांत वागविली पाहिजे. हें घडवून आणण्यास आह्मीं आपले आजपर्यंतचे दोष आणि अज्ञान हीं सोडून दिलीं पाहिजेत; आणि देवपणास उचित अशी उन्नत स्थिति प्राप्त करून घेण्यास झटलें पाहिजे.

## व्याख्यान २ रें.

### स्वतःसंबंधी कर्तव्य.

मागील व्याख्यानांत मनुष्याच्या कर्तव्याचे, ईश्वरसंबंधी, स्वतःसंबंधी आणि सामाजिक असे तीन भाग केले.

ईश्वरसंबंधी कर्तव्य हा विषय फार व्यापक आणि गहन आहे; त्याचा विचार या व्याख्यानमालेंत केलेला नाहीं. कारण कोणत्याही धर्मांत प्रार्थना, कृतज्ञता, पश्चात्ताप, भरंवसा वगैरे ईश्वरोपासनेच्या प्रकारांत पुरुषांच्या कर्तव्याहून स्त्रियांचें कर्तव्य भिन्न आहे असें सांगितलेलें नाहीं. या विषयावर जे ग्रंथ लिहिले गेले आहेत ते पुरुषांस व स्त्रियांस सारखे उद्देशून लिहिले आहेत.

कर्तव्याचा दुसरा विभाग स्वतःसंबंधी कर्तव्य; याचा या व्याख्यानांत विचार करावयाचा आहे. आपल्या सरणांत असेलच कीं मागील व्याख्यानांत या निरनिराळ्या कर्तव्यांचें दिग्दर्शन करतांना सामाजिक कर्तव्यापेक्षां स्वतःसंबंधी कर्तव्यास अधिक महत्व देण्यांत आलें आहे. अर्थात् ज्या ज्या वेळीं स्वतःसंबंधी कर्तव्याचा (ह्म. ब्रह्मचर्य, सत्यशीलता इत्यादिकांचा ) सामाजिक कर्तव्याशीं (ह्म. परोपकाराशीं ) विरोध येईल त्या त्या वेळीं, कांहीं झालें तरी, स्वतःसंबंधी कर्तव्याचेंच रक्षण केलें पाहिजे असें सांगितलें आहे. उदाहरणार्थ, आपल्या शेजाऱ्याच्या विरुद्ध खोटी साक्ष देणें हें जितकें दोषार्ह आहे तितकेंच त्याच्या हितासाठीं ह्मणून खोटी साक्ष देणें हें सुद्धां दोषार्ह आहे.

स्वतःसंबंधी सर्वप्रकारच्या सद्गुणांस नीतिशास्त्रांत इतकें महत्व कां दिलें आहे याचा येथें विचार करूं गेलें असतां फार विस्तार होईल. ज्या कोणाला या विषयाचें विशेष ज्ञान करून घेणें असेल त्याला क्यांटकृत नीतिमीमांसेंत फार मनोरंजक आणि उन्नत विचार सांपडतील. विचारस्वातंत्र्ययुक्त प्राण्याच्या जीवनाचा हेतु नैतिक पूर्णता पावणें हा होय. ती पूर्णता मिळविण्यास ज्या सर्वमान्य सद्गुणांची आवश्यकता आहे त्यांचा मात्र या ठिकाणीं विचार केला पाहिजे. अशा प्रकारच्या नैतिक पूर्णतेंत ब्रह्मचर्य (या शब्दाचा अर्थ पुढें देण्यांत आला आहे), मद्यादिनिषेधव्रत, सत्यशीलता, धैर्य आणि योग्य स्वातंत्र्याचें रक्षण या पांच गुणांचा अंतर्भाव आहे असें ह्मटलें असतां कोणी हरकत घेईल असें वाटत नाहीं.

सद्गुणांच्या उलट, दुर्गुणांचें नुसतें स्वरूप लक्षांत आणलें तरी आपली खात्री होईल कीं कोणताही एक दुर्गुण मनुष्यास उन्नतीच्या मार्गांतून ओढून अधोगतींत टाकण्यास पुरे आहे. आणि कोणत्याही विषयासक्त, दारूबाज, भ्याड, लबाड किंवा स्वतः होऊन गुलामगिरी पतकरणाऱ्या मनुष्याच्यानें आपल्या जीविताचा हेतु सिद्धीस नेववणार नाहीं; ह्मणजे, दैवी गुण संपादन करण्याचें सामर्थ्य त्याच्या आंगीं राहणार नाहीं.

सद्गुणी होण्यास कोणत्याही वाईट कृत्यापासून दूर राहिलें ह्मणजे झालें असें नाहीं, तर उलट चांगलीं कृत्यें व

चांगलें आचरण घडलें पाहिजे; ह्मणजे, जें आपणास कर्तव्यसें वाटतें तें केलें पाहिजे. तें न केलें तर त्याला नीतिशास्त्रांत **दोष** ह्मणतात आणि जें कर्तव्यसें वाटतें त्याच्या उलट कृत्य केलें असतां त्याला **अपराध** ह्मणतात.

जे पांच सद्गुण संपादन केले असतां मनुष्य सद्गुणी होतो ह्मणून वर सांगितलें त्यांचा आतां विचार करूं. वास्तविक हे सर्व सद्गुण प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या आंगीं असले पाहिजेत. परंतु त्यांपैकीं कांहीं स्त्रियांकरितां व कांहीं पुरुषांकरितां आहेत अशी वांटणी लोकमतानें केलेली आहे असें दिसतें. ती पाहून आपणांस आश्चर्य वाटेल. हे प्रत्येक वर्गास वांटून दिलेले सद्गुण त्या त्या वर्गानें राखणें यांतच त्यांची अब्रू मानली जात आहे. उदाहरणार्थ, स्त्रियांनीं ब्रह्मचर्य आणि मर्यादा राखली ह्मणजे झालें, मग इतर गुण त्यांच्या आंगीं नसले तरी त्याबद्दल त्या दोषार्ह होत नाहींत. तसेंच सत्यशीलता आणि धैर्य हे गुण पुरुषांमध्यें असले ह्मणजे झालें, ब्रह्मचर्य व मर्यादा हीं नसलीं तरी चालेल; अशा प्रकारचा लोकांचा समज आहे असें दिसतें; ह्मणजे, जणुंकाय पुरुषास किंवा स्त्रीस आपलें मनुष्यपण पूर्णत्वास नेण्यास सर्व सद्गुण आंगीं असण्याची जरूरी नाहीं; किंवा कोणत्याही एकाच दुर्गुणापासून पुरुष व स्त्री या दोघांसही सारखा कलंक लागत नाहीं. हा समज किती अविचाराचा आहे हें शब्दांनीं सांगतां येणार नाहीं. ही गोष्ट थट्टेवर घालविण्यासारखी नव्हे. ही अ-

विचाराची व मूर्खपणाची समजूत कोणतें उदाहरण दिल्यानें स्पष्ट होईल याचा विचार करीत असतां मला पुढें दिलेली गोष्ट आठवली:—आयर्लंडांत एकदां दोन गृहस्थ प्रवास करीत असतां वाटेंत तिसऱ्या एका प्रवाशास ह्यामस्टेड येथून किती लांब आहे असें विचारूं लागले; त्यानें उत्तर दिलें कीं सुमारें चार मैल आहे. 'ठीक आहे तर मग; आपल्या एकेकाच्या वांट्यास दोनच मैल येतील!' असें ह्मणून ते मोठ्या आनंदानें आणि झपाट्यानें चालूं लागले. त्यांना असें वाटलें कीं आपणापैकीं प्रत्येक जण दोन दोन मैल चालला ह्मणजे आपण दोघेही ह्यामस्टेड येथें जाऊन पोहोंचूं. सारांश, जेव्हां एखाद्या पुरुषाच्या आंगीं धैर्य व सत्यशीलता हे गुण असून ब्रह्मचर्य व मद्यादिनिषेधव्रत हे गुण नसतात; किंवा जेव्हां एखाद्या स्त्रीच्या आंगीं ब्रह्मचर्य व मर्यादा हे गुण असतात परंतु ती मोठी खोटें बोलणारी व भित्री असते, तेव्हां वरील गोष्टींतील प्रवाशांसारखीच त्यांचीही अविचाराची समजूत आहे असें समजावें. नैतिक पूर्णता येण्यास सर्व सद्गुण आंगीं असणें अवश्य आहे.

याशिवाय आपल्या ध्यानांत आलेंच असेल कीं, पुरुषांनीं आणि स्त्रियांनीं स्वतःला त्रास न पडतां सहज संपादन करितां येतील असेच गुण परस्परांमध्यें वांटून घेतले आहेत. स्त्रीच्या आंगीं ब्रह्मचर्य आणि मर्यादा हे गुण असले तर त्यांत कांहीं मोठें नवल नाहीं. तेवढ्यानें

त्या स्तुतीस पात्र होत नाहींत; कारण, याच्या उलट वागण्यास त्यांच्या मनाची प्रवृत्ति होणें हीच गोष्ट त्यांस लांछन आणणारी आहे. त्याचप्रमाणें पुरुषाच्या आंगीं धैर्य व सत्यशीलता हे गुण असले तर त्यांतही मोठें नवल नाहीं. कारण, सर्व प्रकारच्या प्राण्यांमधील नरजातीच्या आंगीं दांडगेपणा व लढाऊपणा हे गुण नैसर्गिक असल्यामुळें पुरुषांच्या आंगीं शौर्य आणि सत्यशीलता असणें हा त्यांचा स्वभावधर्मच आहे. यांत त्यांनीं कांहीं विशेष केलें असें नाहीं. हे गुण आणि औदार्य हे तर विशेष परिश्रमानें मिळविल्याशिवाय साहजिकपणेंच त्यांच्या आंगीं असले पाहिजेत. परंतु जी स्त्री धैर्य व सत्यशीलता हे गुण संपादन करिते किंवा जो पुरुष मनोनिग्रह करून ब्रह्मचर्य आणि मद्यादिनिषेधव्रत पाळतो तीच स्त्री किंवा तोच पुरुष स्तुतीस किंवा मानास पात्र आहे असें आरिस्टॉटल नामक तत्त्ववेत्त्यानें ह्मटलें आहे; आणि तें यथार्थ आहे.

१. **ब्रह्मचर्य**—या गुणाच्या संबंधानें विशेष विस्तारानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. ज्या स्त्रीपुरुषांमध्यें दुराचाराचा संबंध आहे त्यांनीं आपलें मनुष्यपण राखलें असें कोणी ह्मणणार नाहीं. सुशिक्षित नीतिमान् लोक ज्याला उत्तम प्रकारचा मनुष्यपणा समजतात त्यांत ब्रह्मचर्य हा गुण असणें अत्यंत अवश्य आहे. येथें ब्रह्मचर्य या शब्दाचा अर्थ अविवाहित राहणें एवढाच घ्यावयाचा

नाहीं; तर विवाहित स्थितींत पातिव्रत्य अथवा ( पुरुषाच्या बाबतींत ) एकपत्नीव्रत आणि अविवाहितस्थितींत पवित्रता अथवा असंग असा अर्थ समजावयाचा. ख्रिस्तीधर्माच्या क्याथलिकपंथांतील धर्मोपदेशकांमध्यें अनाचार होऊं लागला; ह्मणून, त्यांनीं ब्रह्मचर्य राखण्यासाठीं अविवाहित राहण्याचें व्रत पाळावें, असा फार कडक व जुलमी नियम केला; ही त्यांची चूक आहे. स्त्रीपुरुषांमधील संबंधाविषयींचे बिकट प्रश्न बरेच आहेत. त्यांचा विचार प्रत्येक जुनें मत बरेंवाईट कसें आहे याचा उहापोह करण्याची वेळ हल्लीं आली असल्यामुळें लवकर होईलच. या बाबतींत प्रथम विचारांत बराच घोंटाळा होईल अशी मला भीति वाटते. परंतु शेवटीं एकाच पुरुषाचा एकाच स्त्रीशीं जन्मभर संबंध असावा असें ठरून कोणाही स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या हातून व्यभिचार घडणार नाहीं अशी कडक व्यवस्था होईल अशी माझी खात्री आहे. विशेषेंकरून, ज्यामुळें स्त्रिया संसारांतून उठतात आणि पुरुष अधम होतात, असा जो व्यभिचार त्याचा लोक अगदीं तिरस्कार व धिक्कार करतील. स्त्रियांना पुरुषांकरितांच विशेषेंकरून निर्माण केलें आहे, ही समजूत ज्यांना पसंत असेल त्यांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, आमच्या देशांत आणि इतर सर्व देशांत लाखों स्त्रियांची शारीरिक व मानसिक हानि होत आहे, तिचें कारण हीच कोती समजूत होय. काय, स्त्रिया पुरुषांकर-

तांच केल्या आहेत? तर मग पुरुषांच्या संतोषासाठीं शेंकडों स्त्रियांचे बळी दिले ह्मणून काय झालें? माझ्या भगिनींनो, तुमच्या भोळेपणामुळें तुह्मांस वाटत असेल कीं, स्त्रियांचें पुरुषांकडून होणाऱ्या जुलमापासून रक्षण करण्याकरतां आश्रयस्थानें आहेत; परंतु ही तुमची चूक आहे. खुद्द स्त्रीजातीची उन्नति झाल्याशिवाय मोठमोठ्या शहरांत जें भयंकर दुराचरण होत आहे तें बंद पडणार नाहीं किंवा ह्मणण्यासारखें कमीही होणार नाहीं. माझी अशी पूर्ण खात्री झाली आहे कीं, समाज शुद्ध होण्यावरच स्त्रियांची मुक्तता अवलंबून आहे. विषयासक्त पुरुषांनीं फुसलाविल्यामुळें किंवा दारिद्र्यव्यथेमुळें कित्येक स्त्रियांच्या हातून ब्रह्मचर्याचा भंग होतो. ज्यांच्या हातून असलें दुराचरण घडलेलें नाहीं त्यांनीं आपल्या भगिनींच्या हातून घडलेल्या प्रमादांबद्दल बोलतांना शांतपणा आणि करुणा दाखवावी हें त्यांस उचित आहे. परंतु, ज्यांच्याकडून असे प्रमाद थिल्लरपणामुळें किंवा केवळ ऐषआरामाच्या इच्छेमुळें किंवा सूड उगविण्यासाठीं वगैरे क्रूर कर्में करण्याच्या इच्छेमुळें घडले आहेत, त्यांची मात्र अशी कींव करितां कामा नये. अशाप्रकारच्या पतित झालेल्या स्त्रियांविषयीं सदयता इतकी वाढली आहे कीं, जणुकाय, त्यांच्याकडून कांहींच दोष घडला नाहीं, असें पुष्कळांच्या बोलण्यांत येतें. त्यांना असें वाटतें कीं, स्त्रियांनीं आपल्या ब्रह्मचर्याचा भंग केला असतां त्यांत कांहीं

विशेष ह्मणण्यासारखें झालें नाहीं; हें पाहून मला फार खेद वाटतो. ही समजूत, पूर्वींच्या काळीं अशा स्त्रियांस फार कडक व निर्दयपणानें वागवून त्यांचा धिक्कार करण्याची जी चाल होती तिच्यापेक्षां अधिक हानिकारक व खोटी आहे असें मला वाटतें. अशा स्थितीमुळें स्त्रिया पवित्रतेच्या उच्च स्थानापासून ढळून अनावर मनोविकारांच्या खोल खाड्यांत पडतात. त्यांच्या या वर्तणुकीपासून एकंदर समाजाच्या सदाचरणास उतरती कळा लागते. यावरून या हानीचें खरें स्वरूप दिसून येतें. आतां या पापापासून सुद्धां मुक्त होतां येतें; याविषयीं कांहीं संशय नाहीं. ज्याप्रमाणें सर्प आपली मेंग टाकून शुद्ध होतो त्याप्रमाणें सर्व व्यसनग्रस्त मनुष्य देखील केव्हांना केव्हां तरी—यालोकीं नाहीं तर अन्यलोकीं—आपल्या सर्व दुरितांपासून मोकळा होईल. हें जरी खरें आहे, तरी, एखाद्या स्त्रीनें व्यभिचार किंवा जारकर्म करून आपला पवित्रतारूप मुकुट दुराचरणाच्या चिखलांत मळविला असतां त्यांत कांहीं विशेष झालें नाहीं, असें ह्मणून कानाडोळा केल्यानें त्या भ्रष्ट झालेल्या स्त्रीवर किंवा समाजावर दया केली असें होत नाहीं. परंतु, सख्यांनो, व्यभिचार किंवा लोक ज्याला जारकर्म असें ह्मणतात त्याच्या शिवाय आणखी दुसरा अपवित्रतेचा प्रकार नाहीं, असें तुह्मीं समजतां काय? आपण पहातों कीं, कित्येक वेळीं वधुवरांत परस्परांविषयीं प्रेम नसून जाणूनबुजून केवळ द्रव्याच्या क्षुद्र

लोभानें बरेच विवाह करण्यांत येतात. अशा प्रकारच्या विवाहांत, ह्मणजे, जेथें प्रेमाचा लवलेशही नाहीं, उलट एकमेकांविषयीं तिरस्कारबुद्धि असते व द्रव्यासाठीं किंवा लौकिकासाठीं संबंध जुळविण्यांत येतो, तेथें, जाणूनबुजून पवित्रतेचा भंग केल्यासारखें होत नाहीं काय? या घाणेरड्या विषयासंबंधानें माझ्यानें अधिक बोलवत नाहीं. परंतु चांगल्या स्त्रिया सुद्धां अशा प्रकारचे विवाह अपवित्र आहेत असें समजत नाहींत, आणि आपलें किंवा आपल्या मुलींचें द्रव्याच्या अथवा लौकिकाच्या लोभानें कोणाशीं तरी लग्न लावितात. यास्तव, त्यांस एवढें सांगणें जरूर आहे कीं, स्त्रीपुरुषांमधील प्रेम पवित्र होण्यास जशी विवाहाची आवश्यकता आहे तशी विवाह पवित्र होण्यास परस्परांमध्यें प्रेम असण्याची अत्यंत आवश्यकता आहे; ह्मणजे, जसें विवाहाशिवाय प्रेम पवित्र होत नाहीं, तसा प्रेमाशिवाय विवाह पवित्र होत नाहीं.

२ ब्रह्मचर्य राखणें, हें एक स्वतःसंबंधी कर्तव्य आहे असें, एथपर्यंत जें विवेचन केलें त्यावरून आपल्या लक्षांत आलेंच असेल. त्याचप्रमाणें [1]**मद्यादिनिषेधव्रत** राखणें हें दुसरें स्वतःसंबंधी कर्तव्य आहे. अपवित्रता आणि छाकटेपणा यांपासून समाजाची हानि होते आणि त्यामुळें

---

१ ह्मणजे मद्य, अफू, भांग, गांजा आदिकरून मादकपदार्थांचा निषेध करणें असा अर्थ समजावा.

२ मद्यपानाच्या संबंधानें हिंदुस्थानांतील स्त्रियांस उपदेश करण्याची जरी जरूरी नाहीं, तरी ज्याअर्थीं पाश्चात्य बऱ्यावाईट चाली-

सामाजिक कर्तव्याचा भंग होतो हें खरें आहे. तथापि, या हानीपेक्षां पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या आत्म्याची जी हानि होते ती फार मोठी आहे. कारण, त्यापासून सर्वांत जे पवित्र गुण ते भ्रष्ट होतात आणि पशुत्व आंगांत येऊन सारासार विचार नष्ट होतो; आणि शेवटीं इंद्रियनिग्रह होईनासा होऊन छाकटा मनुष्य बेफाम होतो; आणि डुकरापेक्षां[1] खालच्या पायरीस जाऊन पोहोंचतो. मद्यपानाच्या संबंधानें च्यानिंग यानें असें ह्मटलें आहे कीं, दारूबाज मनुष्याचें घर, त्याचा अव्यवस्थित पोषाख, त्याची जड व धुंदी आलेली मुखचर्या आणि क्षीण झालेलें शरीर यांकडे लोक बोट दाखवितात, आणि हे दारूचे परिणाम आहेत, असें ह्मणून तिचा निषेध करावयास सांगतात; परंतु, हे सर्व बाह्यात्कारी परिणाम होत. वास्तविक पाहिलें तर दारूचे परिणाम याहीपेक्षां जास्त भयंकर आहेत; दारूच्या योगानें विचारशक्ति नष्ट होते; त्यामुळें मनुष्य दिवसेंदिवस अधोगतीस जाऊन त्याच्या आत्म्याची व अध्यात्मिक जीवनाची कशी भयंकर हानि होते याचीं, वर सांगितलेले बाह्यात्कारी परिणाम केवळ दर्शकचिन्हें होत. तुह्मांस थकवा आला किंवा निरु-

---

रीतींचें वळण हिंदुस्थानांतील लोकांस लागत चाललें आहे, त्याअर्थीं सावधगिरीचे दोन शब्द या ठिकाणीं सांगितले असतां अयोग्य होणार नाहींत.

१ डुकर चिखलांत लोळत असतो यास्तव एथें डुकराचें उदाहरण घेतलें आहे.

त्साह वाटला तथापि तो घालविण्यासाठीं तुह्मीं कधींही एक चमचाभर देखील मद्य पिऊं नये अशी माझी विनंति आहे. लोक प्रथम चमचा चमचा मद्य चोरूनमारून पिऊं लागतात; व तेणेंकरून मद्याविषयीं तृष्णा अधिकाधिक उत्पन्न होऊन तिच्या योगानें दुर्दशा होते. मद्यपानानें ज्यांचा नाश झाला आहे, त्यांच्या नाशास कारण आरंभीं घेतलेलें चमचा चमचा मद्यच होय. असाच प्रकार इतर मादकपदार्थांचा आहे. मनाचें दुःख निवारणार्थ किंवा झोंप आणण्यासाठीं मादक पदार्थ देण्याची वैद्यांची चाल आहे ती अगदीं वाईट आहे. कारण, तिच्या योगानें मेंदूवर आणि मज्जातंतूंवर जो परिणाम होतो त्यापासून बुद्धीस मांद्य व मनास दुर्बलता प्राप्त होते. ह्या मादक पदार्थांचा परिणाम फार वाईट आहे. परंतु, तो मद्याप्रमाणें प्रारंभींच आपणास दिसून येत नाहीं; याकरितां त्यांबद्दल तर आपण फार सावधगिरीनें वागलें पाहिजे.

३ **सत्यशीलता**, हा तिसरा सद्गुण होय. तो मुख्यत्वेंकरून स्वतःसंबंधी कर्तव्याचा भाग आहे. सामाजिक कर्तव्यांत त्याचा समावेश होतो; परंतु तितका नाहीं. खरें बोलणें, हा जिव्हेचा पवित्रपणा होय; मनुष्यास पूर्णावस्था प्राप्त होण्यास साधेपणा, प्रामाणिकपणा आणि बोलण्याचालण्यांत खरेपणा, हे गुण अत्यावश्यक आहेत. क्यांट नामक तत्त्ववेत्त्याचें तर असें मत आहे कीं, अनृतभाषणासारखा

स्वतःविरुद्ध दुसरा कोणताच अपराध नाहीं. तो ह्मणतो, "मनुष्याचें स्वतःसंबंधी जें कर्तव्य आहे त्याचा भंग करणारी सर्वांत वाईट गोष्ट ह्मटली ह्मणजे सत्यपराङ्मुखता अथवा अनृतभाषण हें होय." आपण आपले विचार प्रगट करित असतांना जें जाणूनबुजून असत्य भाषण करितों, त्यास नीतिशास्त्रांत स्वतःसंबंधी कर्तव्यभंग हें नांव असलें पाहिजे हें उघड आहे. कायद्याच्या दृष्टीनें मात्र जेव्हां अशा प्रकारच्या असत्यभाषणापासून दुसऱ्याच्या हक्कास बाध येतो, तेव्हां त्यास लबाडी किंवा फसवणूक ह्मणतात. दुर्गुणापासून जरी स्वतःला किंवा इतरांला कांहीं उपद्रव झाला नाहीं, तरी तो दुर्गुणच आहे असें नीतिशास्त्रांत समजलें जातें; कारण, दुर्गुणापासून लागणारा कलंक मनुष्याच्या बरोबर छायेप्रमाणें असतो. दुर्गुणी मनुष्यापासून दुसऱ्याचें जें नुकसान होण्याचा संभव आहे, त्याबद्दल आह्मांस येथें बोलावयाचें नाहीं. कारण, नुकसानावरून दुर्गुणाची परीक्षा करावयाचीच नाहीं. दुसऱ्याच्या नुकसानावरून परीक्षा केली तर अनृतभाषण ह्मणजे दुसऱ्याच्या संबंधी जें कर्तव्य त्याचा भंग असें होतें. तसेंच स्वतःच्या नुकसानावरून परीक्षा केली तर अनृतभाषणाची गणना 'अविचार' यांत होईल.[१] वस्तुतः, अनृतभाषण ह्मणजे मनुष्याच्या मोठेपणाचा त्याग किंवा नाश होय. यास्तव

१ कारण, जाणूनबुजून आपलें नुकसान कोणी करीत नाहीं.

त्याला स्वत:संबंधी कर्तव्यभंग हेंच नांव उचित आहे.

सत्यतेविषयीं जो नियम वर सांगितला, त्यावरून पाहतां आपल्यास असें दिसून येईल कीं, प्रसंगोपात असत्याचें अवलंबन करणें हें सुद्धां योग्य आहे, असें जें वारंवार प्रतिपादन करण्यांत येतें, त्यासारखी चुकीची व खेदाची गोष्ट दुसरी नाहीं. द्रोणाच्या¹ तडाक्यांतून आपल्या पक्षाचें रक्षण करण्याकरितां धर्मराजानें खरी स्थिति माहित असतांही "नरो वा कुंजरो वा" असें ह्मटलें. आणि ह्यूगो ग्रोटिअस याच्या बायकोनें आपल्या पतीस शत्रूंपासून वांचविण्यासाठीं छपवून ठेवून तो घरांत नाहीं, असें सांगितलें. त्यांत कांहीं गैर नाहीं, असें वाटणें साहजिक आहे. परंतु अशा प्रकारचे प्रसंग टाळण्याकरितां खोटें बोलणें योग्य आहे असें क्षणभर धरून चाललें तर खोटें बोलण्याची मर्यादा कोठपर्यंत असावी? हा प्रश्न येतो. एकच वेळ खोटें बोलावें किंवा त्याचें समर्थन करण्याकरितां आणखी पन्नास वेळ खोटें बोलावें? एकच वेळ खोटी शपथ घ्यावी किंवा खोट्या शपथांची एकामागून एक अशी मालिका लावावी? ज्याप्रमाणें तोफांच्या भडिमारामुळें शिपाई घाबरून पळून गेला असतां कदाचित् त्यास एखादा वेळ आपण क्षमा करूं, त्याप्रमाणें एखाद्या पुरुषानें किंवा स्त्रीनें तशाच घोर प्रसंगीं असत्य भाषण

---

१ हें धर्मराजाचें उदाहरण, वरील गोष्ट वाचकांस चांगली समजावी ह्मणून आपल्या परिचयांतील दिलें आहे.

केलें असतां त्याबद्दल क्षमा करूं हा भाग निराळा. परंतु, नैतिक दृष्टीनें पाहिलें तर सत्यतेचा जो सद्गुण आहे, त्याचा त्याग करणें कोणत्याही कारणानें व कोणत्याही प्रसंगीं उचित होणार नाहीं. मीं वर सांगितलेंच आहे कीं, सत्यशीलता ह्या गुणाचा स्वतःसंबंधी कर्तव्यांत समावेश झाला आहे. यास्तव दुसऱ्याच्या ह्मणजे समाजाच्या हितासाठीं सत्यशीलतेकडे दुर्लक्ष केलें तरी चालेल, असें ह्मणणें वाजवी नाहीं. ज्याप्रमाणें ब्रह्मचर्य, या स्वतःसंबंधी सद्गुणाचा सामाजिक हितासाठीं त्याग करणें कधींहीं उचित होणार नाहीं, त्याचप्रमाणें सत्यशीलता, याही सद्गुणाचा भंग करणें कधींही योग्य होणार नाहीं. आजपर्यंत प्रसंगोपात खोटें बोललें तरी चालेल अशाविषयीं जे वादविवाद उपस्थित झाले, त्या सर्वांत बहुशः वाद करणारांनीं सत्याचा विचार ज्या[1] मनुष्याला लबाडी सांगितली त्यास अनुलक्षून केला आहे. जर त्यांनीं सत्याचा विचार लबाडी सांगणारांस अनुलक्षून केला असता (आणि असें करणें हेंच योग्य होय.) तर त्यांस दिसून आलें असतें कीं, ज्या गोष्टींसाठीं सत्यावलंबनाची जबाबदारी एकीकडे ठेवून असत्याचरण करणें

---

१ ज्या मनुष्याला लबाडी सांगितली—वरील उदाहरणांत धर्मराजानें **द्रोणाला** लबाडी सांगितली; तसेंच ह्यूगो ग्रोटिअसच्या बायकोनें शत्रूंस लबाडी सांगितली. लबाडी सांगणाऱ्या मनुष्यांस अनुलक्षून—ह्मणजे वरील उदाहरणांत धर्मराजास आणि ह्यूगो ग्रोटिअस याच्या स्त्रीस अनुलक्षून.

योग्य वाटलें, त्या गोष्टी केवळ इतरांसंबंधी ह्मणजे सामाजिक होत्या. आणि जेथें सामाजिक कर्तव्याचा स्वतःसंबंधी कर्तव्याशीं विरोध येतो तेथें स्वतःसंबंधी कर्तव्याचें रक्षण केलें पाहिजे, असा पूर्वीं नियम सांगितला आहे. असत्य भाषण केलें असतां कलंक लागतो, ही गोष्ट स्पष्टपणें ध्यानांत बाळगिली असतां, आपणास ज्या मनुष्याशीं बोलण्याचा प्रसंग येईल त्याला आपल्याकडून खरी बातमी ऐकण्याचा हक्क आहे कीं नाहीं याची चौकशी करण्याचें आपणास कांहीं कारण नाहीं. प्रामाणिक व भाविक अशा मित्राला खोटें सांगण्यांत दुप्पट[1] पाप आहे. परंतु शत्रूला खोटें सांगण्यांतही मोठें पाप आहे.

पुरुषांच्या किंवा स्त्रियांच्या गुणांची कशी वांटणी केलेली असते ती पाहूं. लबाड पुरुषास जवळ उभेंसुद्धां

---

१ दुप्पट– एक स्वतःसंबंधी आणि दुसरें समाजसंबंधी. मित्राला आपण खोटें सांगितलें ह्मणजे त्यांत दोन प्रकार घडतात; एक तर आपण खोटें बोललों याबद्दल आपणास कलंक लागला. दुसरें, तो मनुष्य आपला मित्र असल्यामुळें त्याला आपल्याकडून खरी हकीकत समजण्याचा हक्क असतांही खोटें सांगून त्याला आपण फसविलें. पहिला प्रकार स्वतःसंबंधी पापाचा आणि दुसरा प्रकार दुसऱ्याच्या संबंधी ह्मणजे सामाजिक पापाचा.

शत्रूच्या बाबतींत, त्याला आपल्याकडून खरी हकीकत ऐकण्याचा हक्क नसतो. कारण, त्याचा उपयोग तो आपल्या किंवा इतरांच्या नाशाकडे करणार. ह्मणून येथें फक्त पहिलाच प्रकार लागू आहे, ह्मणजे स्वतःसंबंधी पाप.

करूं नये असें आपणा सर्वांस वाटतें; तर मग लबाड स्त्रीस तसें कां वागवूं नये ?

स्त्रिया पुरुषांपेक्षां एकंदरींत जास्ती खोटें बोलतात, अशी साधारण समजूत आहे; ती कितपत खरी आहे याविषयीं जरी मला कांहीं माहिती नाहीं, तथापि स्त्रियांच्या बोलण्यावर अविश्वास दाखविला असतां जितका त्यांस साहजिकपणें राग यावा तितका येत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. आणि दुसरें असें कीं, त्यांच्या भाषणांत नेमकेपणा नसतो. ह्मणजे, त्यांत उडवाउडवीचा प्रकार दिसून येतो; तसा त्याच दरजाच्या पुरुषाच्या भाषणांत दिसून येत नाहीं. समाजास जेव्हां नीचावस्था प्राप्त होते तेव्हां सत्यशीलता या गुणाचा स्त्री आणि पुरुष या दोन्हीं जातींत अधिकाधिक ऱ्हास होत जातो. वर सांगितलेल्या टाळाटाळीच्या प्रकाराचें एक उदाहरण माझ्या एका दूरदर्शी मित्रानें मला सांगितलें; त्यावरून इंग्लिश आणि फ्रेंच स्त्रियांमध्यें स्पष्टपणाच्या संबंधानें किती भेद आहे हें दिसून येईल. तें उदाहरण असें:—समजा कीं, एका इंग्लिश बाईस व एका फ्रेंच बाईस 'अ'च्या घरीं जावयाचें आहे; परंतु तेथें जाण्याची त्यांच्या नवऱ्यांनीं त्यांना मनाई केली आहे. फ्रेंच बाई तेथें जाते आणि परत आल्यावर मी तिकडे गेलेंच नाहीं इतकेंच सांगते; इंग्लिश बाई 'अ'च्या घरीं जाते आणि मी 'ब'च्या घरीं गेलें होतें असें सांगतां यावें, ह्मणून आणखी 'ब'च्याही घरीं जाते,

आणि परत आल्यावर मी 'ब'च्या घरीं गेलें होतें इतकेंच आपल्या नवऱ्यास सांगते.

अशा प्रकारची स्थिती पुष्कळ कुटुंबांमध्यें सर्वसाधारण दिसून येते. परतंत्रतेमुळें उत्पन्न झालेल्या या दुर्गुणापासून आमची परमेश्वर लवकर सुटका करो.

सत्य कशाला ह्मणावें, आणि असत्य कशाला ह्मणावें; यासंबंधानें पुष्कळांच्या व विशेषेंकरून थोडेंसें शिकलेल्या स्त्रियांच्या मनांत बराच घोंटाळा झाला आहे. ह्मणजे, अर्थापेक्षां शब्दांत खरेपणा दाखविण्याकडे विशेष लक्ष द्यावयाचें, अशी प्रवृत्ति कित्येक वर्गांमध्यें सामान्य आहे असें दिसून येतें.

वास्तविकपणें, शब्दांत कांहीं अर्थ नसून आपण परस्परांच्या संमतीनें देऊं तो अर्थ त्या शब्दांचा समजला जातो. तेव्हां आपण दुसऱ्यास फसविण्याच्या हेतूनें दिसण्यांत बरोबर दिसतील, परंतु, त्याच्यापासून अर्थ मात्र आपल्या मनांत असावयाचा एक व ऐकणाऱ्याच्या मनावर ठसा करावयाचा निराळा, अशा प्रकारचे शब्द वापरतों तेव्हां ती लबाडी होते; व ती लबाडी फार निंद्य प्रकारची असते. परंतु याच्या उलट, शब्दार्थाहून वाक्यार्थ रूढीमुळें निराळा झाला आहे, असें एखादें वाक्य जेव्हां आपण वापरतों, व त्याचा अर्थ जेव्हां सांगणारा व ऐकणारा हे दोघेही एकच समजतात, तेव्हां ती लबाडी होत नाहीं.

सत्यशीलता राखावयाची ती केवळ भाषणांत आणि कागदोपत्रीं लिहिण्यांतच राखावयाची कीं काय? कित्येक लोक तोंडानें जरी कधीं खोटा शब्द उच्चारीत नाहींत, तरी त्यांचें सर्व आयुष्य लबाड्या करण्यांत जातें. सत्याचरण ह्मणजे काय याचा थोडा विचार करा ह्मणजे त्यांत कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो, आणि सर्व जन्म सत्यास अनुसरून घालविणें किती श्रेयस्कर आणि पवित्र आहे हें ध्यानांत येईल. असें आचरण जेथें असेल तेथें छपविण्यासारखें कांहींच राहणार नाहीं; मग मनुष्याच्या जीवनसंबंधी अत्यंत पवित्र व गहन विषयांवरील आपलीं मतें छपविण्याचें कारण मुळींच पडणार नाहीं हें निराळें सांगावयास नको. प्रस्तुतकाळीं किती पुरुष व स्त्रिया धर्मसंबंधी आपले खरे विचार छपवितात आणि ज्या गोष्टींवर त्यांचा विश्वास नसतो त्यांवर विश्वास आहे असें आपल्या आचरणानें दाखवितात, याची गणना करणें अशक्य आहे. यावरून हल्लींच्यासारख्या स्थित्यंतराच्या वेळीं विचारी मनुष्याच्या बुद्धीला क्लेश देणाऱ्या ज्या असंख्य संदिग्ध शंका उत्पन्न होतात त्या लोकांना किंवा आपल्या मित्रांना सुद्धां सांगत सुटणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे असें कोणी समजूं नये. गीथ यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, “ जर तुमचा ईश्वरावर विश्वास असेल तर त्यांतून थोडा मला द्या, पण संशय मात्र तुमचे तुमच्याजवळ ठेवा, आमच्याज-

चळ पुष्कळ आहेत." जेव्हां आपल्या संशयाचा संदिग्धपणा निघून जाऊन त्याला ठाम मताचें स्वरूप येतें, मग तें विश्वासाचें असो अगर अविश्वासाचें असो, तेव्हां मात्र तें उघडपणें बोलून दाखविणें हें आपलें कर्तव्य आहे. आपलीं मतें स्पष्टपणें बोलून दाखविलीं असतां नातलगांपासून (आणि आमच्या देशांत जातीपासून) जी अडचण, निंदा किंवा हेळसांड होण्याचा संभव असतो ती यत्किंचितही सोसण्यास हल्लींच्या काळीं कोणी कबूल होत नाहीं, हें एक दुश्चिन्ह समजलें पाहिजे. आमच्या पूर्वजांनीं तर आपल्या मतांसाठीं देहाची सुद्धां पर्वा केली नसती. ज्या नैतिक विचारांवर आमचें स्वातंत्र्य अवलंबून असतें, ते विचार आह्मीं छपवून ठेवले तर आह्मांला असत्यापासून दूर कसें राहतां येईल, किंवा आमचा मान कसा संभाळतां येईल, अथवा आह्मांकडून लबाडी घडल्याशिवाय कशी राहील, हें मला समजत नाहीं. वरील गोष्टी संभवनीय आहेत असें जरी मानलें तरी त्यांपासून कांहीं लाभ नाहीं; कारण, अशा मनुष्याचा सर्व आयुष्यक्रम लबाडीचा असतो. याच्या उलट पाहूं गेलें तर अशा महत्वाच्या बाबतींत सरळपणापासून अंतःकरणास व आत्म्यास जो फायदा होतो, तो अपरिमित आहे असें आढळून येईल. याप्रमाणें मनुष्यामध्यें सरळपणा असला ह्मणजे त्याच्या आत्म्यास धैर्य येऊन तो आपल्या खऱ्या स्वरूपानें लोकांत प्रगट होतो आणि त्याचा मार्ग सरळ व सोपा होत जातो.

त्याचप्रमाणें व्यवहारामध्यें प्रत्यक्ष ढळढळीत लबाडी सांगितली नाहीं तरी खोटसाळपणानें वागल्याचा दोष आपल्या शिरावर येण्याचा संभव असतो. कित्येक लोक दुर्दैवानें हलक्या कुळांत जन्मले असूनही आणि त्यांचें दळणवळण वास्तविकपणें हलक्या लोकांत असतांही, आपण उच्च कुळांत जन्मलों आहों आणि आपला मोठमोठ्या लोकांशीं स्नेह आहे असें बाहेरून दाखविण्याचा यत्न करीत असतात; आणि त्यांच्या भाषणांत नेहमीं स्वतःच्या महत्वाचें आणि डामडौलाचें प्रदर्शन होत असतें; हा डौल पोरकट असून त्यांत अत्यंत नीचपणा व मनाची क्षुद्रता हीं दिसून येतात. स्त्रियांची अशी ख्याति आहे कीं, त्या मित्रांशीं खोटसाळपणानें व विश्वासघातानें वागतात; कारण, ज्यांच्यावर त्यांची खरोखर प्रीति नसते आणि ज्यांना वास्तविकपणें शिष्टाचारानुरूप वागविणें हेंच योग्य होय, अशांवर सुद्धां त्या आपलें अत्यंत प्रेम आहे असें बाहेरून दाखवितात. या विषयाच्या संबंधानें पुढें स्त्रियांच्या सामाजिक कर्तव्याविषयीं सांगतांना विशेषरीतीनें उलगडा होईल.

४ **धैर्य** हा स्वतःसंबंधी चवथा गुण होय. जेव्हां दुःख सहन करणें किंवा संकटास सामोरें जाणें हें आपलें कर्तव्य असतें तेव्हां जर आपण पिछेहाट घेतली तर आपण क्षुल्लक हेतूसाठीं कर्तव्याचा त्याग केला असें होतें. क्षुल्लक हेतूसाठीं अशाप्रकारें भित्रेपणाचें आच-

रण करणें ही गोष्ट ऐषआरामांत सर्वदा गुंग असण्यापेक्षां मनुष्याच्या योग्यतेस अधिक लांछनकारक आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पुरुषाच्या सद्गुणांमध्यें धैर्यास इतकें उच्च स्थान दिलें याचें कारण हें कीं, या गुणाच्या योगानें इतर सर्व सद्गुणांचें रक्षण होतें. धैर्य नसलें तर मनुष्यास आपल्या नीतिमत्तेचें रक्षण करण्यास कांहीं साधन नाहीं; कारण भित्र्या मनुष्याला धमकी किंवा कांहीं भय दाखविलें असतां तो अपराध करण्यास प्रवृत्त होतो. पुरुषांचे व स्त्रियांचे गुण निरनिराळे आहेत असें मत कित्येकांचें आहे. या मतापासून इतर गुणांपेक्षां धैर्याच्या बाबतींत तर फारच अनिष्ट परिणाम होतात; आणि आतां ज्याअर्थी हा भेद आपणास कबूल नाहीं त्याअर्थी आजपर्यंत हेळसांड झालेल्या या धैर्यगुणाची आह्मांमध्यें जितकी वृद्धि होईल तितकी करण्यास दक्ष असणें हें आमचें पहिलें काम आहे. शारीरिक संकट आलें असतां आपण त्यास न जुमानतां व तिळमात्र देखील पिछेहाट घेतल्याशिवाय त्याशीं शौर्यानें लढण्यास होईल तितका यत्न करूं अशी आमच्याविषयीं आमची स्वतःची खात्री असली पाहिजे; ती जोंपर्यंत झाली नाहीं तोंपर्यंत लोक आह्मांस मान देणार नाहींत; एवढेंच नव्हे तर, आह्मीं मानास पात्र आहों असें आमचें आह्मांस देखील वाटणार नाहीं. उधळलेला घोडा, प्रवाहाच्या सपाट्यांत सांपडलेली नाव, चवताळून आंगावर धांवून येणारा बैल,

किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या क्षणिक संकटांत एखादी स्त्री सांपडली असतां, जेव्हां ती पुरुषाची दीनवाणीनें विनवणी करिते, तेव्हां त्या पुरुषास प्रायः मोठा अभिमान वाटतो (व ती स्त्री तरुण व सुंदर असली तर अधिकच वाटतो.) ही गोष्ट जिच्या लक्षांत येत नाहीं अशी मूर्ख स्त्री मिळणें विरळा. अशावेळीं पुरुष स्वतः कितीही भित्रा असला तरी स्त्रीनें त्याच्या हातास किंवा पायास विळखा घालून आपला बचाव करण्यासाठीं त्याची विनवणी केली ह्मणजे आपण भीमाप्रमाणें रणशूर आहों असा भास होऊन तो गर्वानें फुगून जातो. कदाचित् त्या पुरुषाला सुद्धां त्यावेळीं थरकांप सुटलेला असेल आणि स्वतःच्या बचावाखेरीज त्याला त्यावेळीं दुसरें कांहींच सुचेनासें झालें असेल. असें जरी असलें तरी अशावेळीं देखील एखाद्या स्त्रीकडून विनंति करण्यांत आली असतां त्याला तिचा राग येत नाहीं; मग ती स्त्री वृद्ध असो किंवा सौंदर्यहीन असो. ज्या स्त्रियांचा हेतु पुरुषांस भुलविण्याचा असतो अशा धूर्त स्त्रिया ही गोष्ट जाणून असतात, ह्मणूनच त्या स्वतः कितीही धीट असल्या तरी आणि भिण्यास कांहीं कारण नसूनही, भ्याल्याचें सोंग दाखविण्यास चुकत नाहींत. यावरून असें सिद्ध होतें कीं, आमच्या स्त्रीजातीस केवळ स्वाभाविक भित्रेपणाचा दोष लागतो एवढेंच नाहीं, तर ढोंगीपणाचाही दोष लागतो.

अलीकडे इंग्लंडांतील बऱ्याच युवतींस व्यायाम करण्याची अभिरुची लागत चालली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. त्या घोड्यावर बसतात, लांब लांब फिरावयास जातात, पोहतात, धांवतात आणि टेनिस खेळतात, सारांश, प्राचीनकाळच्या शूर स्त्रियांच्या आंगचे गुण दाखवितात.

ही शारीरिक सुधारणा उत्कृष्ट आहे. या सुधारणेचा असा चिरस्थायी व हितकारक परिणाम होईल कीं, या स्त्रियांपासून जन्मणाऱ्या भावी स्त्रिया व पुरुषही निरोगी व शूर निपजतील. हा सुखकारक परिणाम केवळ शारीरिकदृष्टयाच होईल असें नाहीं; तर तो स्त्रियांच्या एकंदर स्वभावावर पसरल्याशिवाय राहणार नाहीं. कारण, त्या शरीरानें बळकट झाल्यावर मग भ्याडपणाचें सोंग दाखविणें ही गोष्ट त्यांस निंद्य वाटेल; आणि त्यांस शूरपणांत व आपलें सत्व राखण्यांत अभिमान वाटेल.

व्यायामाचा लाभ तुह्मांस घेतां येवो, अथवा न येवो; तथापि एक नियम तुह्मीं सतत ध्यानांत ठेवला पाहिजे; तो हा कीं, संकट आलें असतां आपण भिऊन जाऊं अशी तुमच्या भाषणावरून तुह्मी कोणाची समजूत होऊं देऊं नका. आपण नेहमीं धैर्यानें, शांतपणानें व उदारपणानें वागूं अशी तुमची समजूत असूंद्या; ह्मणजे मग कसोटीची वेळ आली असतां धैर्यानें व शौर्यानें वागण्याची निदान प्रवृत्ति तरी होईल. तुह्मी भिऊन जाल हें संभ-

वनीय आहे. कारण, चिमट्यानें मांस तुटूं लागलें असतां शरीरास असह्य वेदना होतात. परंतु, अशावेळीं तुह्मीं भित्रेपणा दाखविला तर तो तुमच्या निश्चयाच्या व इच्छेच्या विरुद्ध दाखविला असें होईल; तुह्मीं मुद्दाम आपणास कनिष्ठपणा आणला असें होणार नाहीं. परंतु याच्या उलट, जर तुह्मी मुद्दाम होऊन भित्रेपणाची संवय आपणास लावून घ्याल तर भित्रेपणा आंगीं आणण्याची तुह्मीं तयारीच केली असें होऊन, अर्थातच प्रसंगविशेषीं तुमच्याकडून भित्रेपणाचें आचरण होईल. ही संवय हल्लीं स्त्रियांमध्यें सर्वसाधारण झाली आहे. तरुण पुरुष देखील शहाणपणाच्या आढ्यतेनें "आपण आपला बहुमोलाचा जीव कोणासाठीं धोक्यांत घालूं इच्छित नाहीं" असें स्पष्ट बोलून दाखवितात, ही गोष्ट त्यांस लाजिरवाणी आहे. आतां, सर्व प्रकारच्या संकटसमयीं शौर्य दाखविणें ही गोष्ट, पुरुषांपेक्षां स्त्रियांस अधिक कठीण जाईल यांत संशय नाहीं. कारण, पुरुष जन्मतः सिंहाप्रमाणें धीट असून शौर्यांतच आपला मोठेपणा आहे अशी त्यांची समजूत असल्यामुळें ते आपलें सर्व आयुष्य शौर्यांत प्रवीणता मिळविण्यांत घालवितात. आह्मां स्त्रियांची स्थिति तशी नाहीं. आमचा बांधा फार नाजूक व स्वभाव सहज क्षुब्ध होणारा असा आहे; आणि शौर्याविषयीं अभिमान बाळगण्याचें शिक्षण आह्मांस मुळींच देण्यांत आलेलें नाहीं. उलट, जसजशा आह्मी स्वाभिमान व यो-

ग्यता यांस सोडून वागत आलों, तसतसे लोक आमचे अधिकाधिक लाड करूं लागले. परंतु, या गोष्टीवरून आह्मीं काय शिकावयाचें? यावरून इतकेंच शिकावयाचें कीं, आंगांत शौर्य आणण्यासाठीं, मन क्षुब्ध झालें असतां तें शांत करण्यासाठीं, आणि हार घेण्याचा प्रसंग आला असतां धैर्यानें वागण्याचा निश्चय करण्यासाठीं, आह्मीं पुरुषांपेक्षां विशेष मेहनत घेतली पाहिजे, हा जो धैर्याचा गुण पुरुषांच्या आंगीं स्वभावतः वास करीत आहे तो आह्मीं संपादन केला पाहिजे. आतां आपण धैर्याचे तीन चार प्रकार घेऊन त्यांत स्त्रियांचें वर्तन कसें असतें तें पाहूं.

पहिला प्रकार शारीरिक व्याधी सोसणें हा होय. ह्मणजे, कांहीं रोग झाला असतां किंवा शस्त्रप्रयोग करण्यांत आला असतां त्यापासून होणाऱ्या वेदना सहन करणें. या बाबतींत आह्मी पुरुषांची बरोबरी करूं, कदाचित त्यांच्यापुढेंही जाऊं. मला वाटतें, एकाद्या रोग्यांच्या आश्रमांत जाऊन पाहिलें तर स्त्रिया पुरुषांपेक्षां ओरड अधिक करीत नाहींत, किंबहुना कांहीं कमीच करितात, असें दिसून येईल.

मीं एकदां एका दंतवैद्यास विचारिलें कीं, तुह्मांस दांत काढतांना अधिक त्रास कोणापासून होतो, पुरुषांपासून कीं स्त्रियांपासून? तो ह्मणाला 'अर्थात् पुरुषांपासून. क्रिमियाच्या लढाईस जाण्यापूर्वीं बरेच लष्करी अंमलदार माझ्याकडे दंतांवर प्रयोग करून घेण्यासाठीं आले

होते. त्यांपैकीं पुढें बऱ्याचजणांनीं लढाईंत तरवारबहादुरी मिळविली; परंतु, मी त्यांच्यावर प्रयोग करीत असतां ते फार भित्रेपणानें वागले. स्त्रिया जराशा किंकळतात; परंतु, जें काय मी त्यांच्यासाठीं करितों त्याबद्दल त्या माझे आभार मानण्यास नेहमीं तत्पर असतात; आणि पुरुष ओरडतात, परंवतात आणि मला शिव्या देतात.' यासंबंधानें दुसरे दंतवैद्य काय सांगतात, त्याची चौकशी करण्यासारखी आहे. कसेंही असो, दुःखक्षमता हा एक मोठा सद्गुण समजला पाहिजे. ज्या स्त्रियांच्या आंगीं हा गुण दिसून येतो, त्या खरोखरच मानास पात्र आहेत.

दुसरा धैर्याचा प्रकार ह्मटला ह्मणजे स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या संरक्षणासाठीं संकटांत उडी घालणें, ह्मणजे, प्रसंग पडला असतां लढाईंत जाणें, पाण्यांत किंवा आगींत उडी टाकणें, वाखा असेल त्या ठिकाणीं जाणें, तसेंच अशाप्रसंगीं प्रसंगावधान राखून न गडबडतां आपल्याकडून होईल तितका यत्न करणें, हा होय. याप्रकारच्या धैर्याची मात्र उणीव स्त्रियांमध्यें आहे; परंतु ही उणीव त्यांच्यामध्यें केव्हां कशी दिसून येते याचा शोध करण्यासारखा आहे. चौकशीअंतीं असें दिसून येईल कीं, आणीबाणीच्या प्रसंगीं पुरुषांमध्यें जितकें धैर्य दिसून येतें तितकेंच स्त्रियांमध्येंही दिसतें. लहानसान प्रसंगीं मात्र त्यांच्या ठिकाणीं शोचनीय भित्रेपणा दिसून येतो. ख्रिस्ती धर्माच्या

आरंभीं जेव्हां ख्रिस्ती लोकांचा परधर्मी लोकांपासून फार छळ होत असे तेव्हां ज्या ख्रिस्ती स्त्रियांनीं स्वधर्मासाठीं सिंह, व्याघ्रादि पशूंस आपल्या आहुती देऊं दिल्या त्यांस भित्र्या ह्मणतां येईल काय? तसेंच जोन[1] आफ् आर्क, ( अहिल्याबाई[2], चांदबिबी, झांशीची राणी ) वगैरे देशाभिमानी स्त्रिया भित्र्या होत्या काय? ज्या ज्या बाबतींत पुरुषांनीं आपलें शौर्य दाखविलें आहे त्या त्या बाबतींत स्त्रियांनींही आपलीं नांवें गाजविलीं आहेत. लढाईमध्यें पुष्कळ शिपायांनीं आपल्या जिवाची पर्वा न करितां वरिष्ठाची आज्ञा पाळल्याचीं इतिहासामध्यें पुष्कळ उदाहरणें सांपडतील. बर्कनहेड नांवाच्या बुडत्या जहाजावरील शिपायांनीं शौर्यानें वागून कीर्ति मिळविली ती अजरामर आहे. तथापि ती, फ्रान्सच्या राज्यक्रान्तीच्यावेळीं वीस निर्धन ब्रह्मचारिणी स्त्रियांनीं धैर्यानें वागून जी कीर्ति मिळविली तिच्यापेक्षां ज्यास्त नाहीं. त्या बायांना जेव्हां वध्यशिलेवर उभें केलें तेव्हां त्या ईश्वराचा जयघोष करीत एकत्र उभ्या राहिल्या; आणि जरी एकामागून एकीचें डोकें गिलोटाईन नामक यंत्रानें उडविण्यांत येत होतें तरी शेवटीं सर्वांचा नाश होईपर्यंत त्यांचा जयघोष

---

१ जोन ऑफ आर्क् ही फ्रान्स देशांतील एका गरीब शेतकऱ्याची मुलगी होती. तिनें मोठमोठे पराक्रम करून आपला देश इंग्रजांच्या तडाक्यांतून सोडविला. ही फार ईश्वरभक्तिपरायण, दयाळू व शूर स्त्री होती.

२ कंसांतील नांवें मूळ ग्रंथांत नाहींत.

बंद पडला नाहीं. आणि त्यांतील मुख्य बाई, जिची पाळी सर्वांच्या मागून आली, तिनें न घाबरतां सर्वांनीं आरंभिलेलें तें स्तोत्र पूर्ण केलें; आणि ईश्वराचा आशीर्वाद मागितला. तसेंच, हिंदुस्थानांतील रजपुत स्त्रियांनीं शत्रूच्या हातीं लागण्यापेक्षां मरण आलेलें चांगलें असें ह्मणून अग्नींत भडाभड उड्या टाकल्याचींही उदाहरणें पुष्कळ सांपडतील.

अशा प्रकारें ज्या ज्या वेळीं स्त्रियांवर मोठमोठाले प्रसंग आले त्या त्या वेळीं त्यांनीं धैर्यानें वागण्यांत कांहीं कमतरता केली नाहीं. याबद्दल आह्मां स्त्रियांस अभिमान वाटला पाहिजे. परंतु जेथें आवेश, देशाभिमान किंवा धर्म यांचा संबंध नसतो अशा लहानसान गोष्टींमध्यें मात्र स्त्रियांमध्यें पुरुषांपेक्षां अधिक भित्रेपणा दिसून येतो. सर जॉन बोरिंग यांनीं तांबड्या समुद्रांत ‘एडन’ नांवाचें जहाज बुडत होतें त्यावेळीं जो प्रकार घडला त्याची हकीकत सांगितलेली आहे, तींत ते ह्मणतात “जहाजावरील खलाशी त्यावेळीं फार घाबरून गेले, ते इतके कीं ते देवाला दोष देऊं लागले, ओरडूं लागले व वेड्यासारखे वागूं लागले, असें माझ्या दृष्टीस पडलें. परंतु स्त्रियांकडे जाऊन पाहतों तों माझी मुलगी गुडघे टेंकून ईश्वराची प्रार्थना करीत आहे आणि इतर सर्व स्त्रिया तिच्या सभोंवतीं प्रार्थनेंत गुंतल्या आहेत, असें दिसलें. या त्यांच्या शांतीच्या व धैर्याच्या उदाहरणानें माझ्या मनावर जो ठसा

उमटला तसा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें पूर्वीं कधींही उमटला नव्हता.'' आतां ज्या स्त्रियांनीं भरसमुद्रांत मरणाचा प्रसंग अगदीं समीप आला असतां इतकें उत्तम प्रतीचें धैर्य व शान्ति हीं दाखविलीं, त्याच स्त्रिया जर सहल करण्याकरितां होडींतून एखाद्या उथळ पाण्याच्या सरोवरांत गेल्या असत्या आणि होडी उलटण्याचा प्रसंग आला असता, किंवा गाडींतून फिरतांना घोडा किंचित् तुफान झाला असता, किंवा शेतांत फिरतांना गाईंचा कळप जवळ आला असता तर घाबरून गेल्या असत्या याविषयीं मला कांहीं संशय वाटत नाहीं.

आतां वर सांगितलेले मोठमोठाले प्रसंग वरचेवर येत नसल्यामुळें आमच्या आंगचा झांकलेला पराक्रम दाखविण्याची संधी फार विरळा येते; पण लहानसान प्रसंग वारंवार येतात. ह्मणून स्त्रियांनीं आपल्या आंगचें धैर्य दृढ करून पुरुषांप्रमाणें लहान मोठ्या सर्व प्रसंगीं हार न जाण्याविषयीं निश्चय केला पाहिजे.

धैर्याचा शेवटला प्रकार ह्मटला ह्मणजे नीतिधैर्य. यांतहीं मोठमोठ्या प्रसंगीं स्त्रिया पुरुषांची बरोबरी करूं शकतात. परंतु, लहानसान बाबतींत मात्र त्या पुरुषांपेक्षां अधिक घाबरतात. जेव्हां खरें बोलण्यापासून आपली हानि होण्याचा संभव असतो, तेव्हां खरें बोलण्यास धजणें, लोकांस अप्रिय झालेल्या आणि अपकीर्ति पावलेल्या एखाद्या गृहस्थास प्रसिद्धपणें साह्य

करणें आणि कसेही प्रसंग आले असतां सदसद्विवेक बुद्धीस अनुसरून वागणें हें काम फार कठीण आहे; आणि अशा प्रकारचें स्वातंत्र्य दाखविल्याबद्दल पुरुषांपेक्षां स्त्रियांस अधिक शासन भोगावें लागतें, ह्या गोष्टीचा विचार केला असतां स्त्रिया अशा प्रकारचें स्वातंत्र्य क्वचित् प्रसंगीं दाखवितात, याबद्दल आपणास आश्चर्य वाटणार नाहीं. तथापि सुधारलेल्या स्थितीमध्यें शारीरिकबलापेक्षां नीतिबल अधिक महत्वाचें आहे, आणि तें दाखविण्यास अधिक अवकाशही आहे.

माझ्या सख्यांनों, जेव्हां जेव्हां एखादी वेडगळ स्त्री आपल्या नेहमींच्या मूर्ख चालीस अनुसरून "मला बाई फार भय वाटतें!" "अरे देवा येथें भिण्यासारखें तर कांहीं नाहींना!" "मला बाई फार भीति वाटते," "मी बाई फार भित्री आहें." असें ह्मणतांना तुमच्या कानीं पडेल, तेव्हां तुह्मी माझ्यावर कृपा करून तिला असें विचारा. "कायहो बाई, तुमच्या आंगीं लबाडीचे आणि चोरीचे देखील दुर्गुण आहेत कीं काय? एवढेंच एक व्यंग वरचेवर पुढें आणतां यावरून इतर व्यंगें लपविण्याचा तुह्मी प्रयत्न करितां अशी शंका उत्पन्न होते." तुह्मी आपल्या स्वतःकरितां इतर कौशल्याचीं कामें शिकण्यास जसा झटून उद्योग करीत आहां, तसेंच धैर्य आंगीं येण्याविषयीं उद्योग करावा अशी माझी तुह्मांस आदरपूर्वक विनंति आहे. भयानें

किंकाळी फोडणें हें स्त्रीजातीच्या योग्यतेला शोभत नाहीं. सर्व प्रसंगीं शांत व गंभीर राहून स्वतःवर अवलंबून असण्याचा निश्चय करा. याप्रमाणें कांहीं वर्षे तुह्मीं अभ्यास केला तर तुह्मांस लवकरच आढळून येईल कीं, साधारण व्यवहारांत तरी स्वच्छतेप्रमाणें धैर्य हाही गुण तुमच्या आंगीं साहजिक होऊन राहील. आणि तसा प्रसंग आला असतां जर तुह्मीं धैर्य दाखविलें नाहीं तर त्याची तुह्मांस अधिक शरम वाटेल.

९ स्वतःसंबंधी कर्तव्याचा पांचवा किंवा शेवटला प्रकार ह्मटला ह्मणजे आपल्या योग्य **स्वातंत्र्याचें रक्षण** करणें हा होय. ह्मणजे आपण होऊन योग्य स्वातंत्र्याचा त्याग करूं नये; किंवा दुसऱ्याला तें हरण करूं देऊं नये. या बद्दलचा विचार तुह्मांपैकीं कित्येकांच्या मनांत कधींच आला नसेल. आपण आपल्या जीवनाचा हेतु कोणता गृहित धरून चाललों आहों, हें आपण विसरतां कामा नये. आणि असा विचार केला पाहिजे कीं, सृष्टिकर्त्यानें आपणास नैतिक आणि स्वातंत्र्ययुक्त जीवन दिलें तेव्हां त्याच्या बरोबर असणारीं नानाप्रकारचीं संकटें, दुःखें व शिक्षणाचे मार्ग यांची मालिका लावून दिली आहे; ती एवढ्याकरितां कीं, तेणेंकरून आह्मीं उत्तरोत्तर अधिकाधिक सद्गुणसंपन्न व्हावें. एथें एक गोष्ट आह्मीं सतत ध्यानांत ठेविली पाहिजे ती हीः—प्रथम आह्मीं आपल्या स्वतःच्या अंतःकरणांत आणि नंतर आपल्या सभोंवती, ह्मणजे

आपल्या कुटुंबांत, आपल्या समाजांत आणि एकंदर जगांत दैवी गुणांचें ह्मणजे न्याय, सत्य आणि प्रेम यांचें राज्य स्थापन केलें पाहिजे; हें आमचें या मनुष्यजन्मास येऊन कर्तव्य आहे. हा वर सांगितलेला ईश्वरी हेतु केवळ वरील स्वातंत्र्याच्याच योगानें सिद्धीस नेतां येतो. यास्तव, आमचें स्वातंत्र्य दुसऱ्या मनुष्यास—मग तो मनुष्य कोणीही व कसाही असो—हरण करूं देणें रास्त होणार नाहीं; याचा तुह्मीं विचार केला पाहिजे. आह्मीं स्वातंत्र्य दुसऱ्यास हरण करूं दिल्यानें आपण होऊन आपला घात केल्यासारखें होईल. मुलानें बाल्यावस्थेंत असेपर्यंत वडिलांच्या आज्ञेंत वागणें हें त्यास उचित होय. कारण, तेणेंकरून पुढें मोठेपणीं आत्मसंयमन करून सदाचरणानें वागण्याचें त्यास शिक्षण मिळतें. परंतु बाल्यावस्था जाऊन प्रौढ वय येतें तेव्हां त्याबरोबर आपल्यावर जी कर्तव्याची जबाबदारी ईश्वरेच्छेनें येते ती आपणास दुसऱ्या कोणावरही लोटतां येणार नाहीं. नैतिकस्वातंत्र्य हें नैतिकप्राण्यास आवश्यक आहे; ह्मणून त्याचें संरक्षण करणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे. या विषयाकडे मला लौकरच वळावयाचें आहे; तेव्हां सामाजिक कर्तव्यांच्या निरनिराळ्या अंगांवर या विषयाचा परिणाम काय होतो याचा विचार केला जाईल. सारांश, ज्याप्रमाणें पुरुषांच्या आंगीं, त्याप्रमाणें स्त्रियांच्याही आंगीं ब्रह्मचर्य, मद्यादिनिषेधव्रत, सत्यशीलता, धैर्य आणि स्वातंत्र्य हे गुण असणें हाच त्यांचा स्वधर्म होय.

# व्याख्यान ३ रें.

## सामाजिक कर्तव्यें.

### मातेचीं, कन्येचीं वगैरे कर्तव्यें.

स्वतःसंबंधी कर्तव्यांपुढें दुसऱ्या कोणत्याही कर्तव्याची मातबरी नाहीं, ही गोष्ट सतत लक्षांत बाळगली पाहिजे. स्वतःसंबंधी कर्तव्यें बजावण्याचा नेहमीं यत्न केला तर आह्मांस परमेश्वरानें ज्या हेतूनें जन्म दिलें आहे, तो हेतु पूर्ण होण्याची आणि परमेश्वर आणि सत्य यांच्या जवळ जवळ जाण्याची आह्मांस आशा उत्पन्न होईल; इतकेंच नव्हे तर आमचे बंधु जे पुरुष त्यांचें कल्याण करण्याचा व त्यांस मदत करण्याचा उत्तम व खात्रीचा मार्ग दिसूं लागेल. इतकें सांगून स्वतःसंबंधी कर्तव्यें हा विषय एथें सोडूं.

या व्याख्यानमालेपैकीं बाकी राहिलेल्या व्याख्यानांत नीतिशास्त्राच्या तिसऱ्या शाखेचा, ह्मणजे, सामाजिक-कर्तव्यांचा, विचार करूं.

स्त्रियांचीं सामाजिक कर्तव्यें चार प्रकारचीं आहेत. तीं अशीं–१ कुटुंबांतील एक व्यक्ति या नात्यानें; ह्मणजे, माता, कन्या, भगिनी किंवा पत्नी या नात्यानें; २ घराची मालकीण या नात्यानें; ३ समाजांतील एक व्यक्ति या नात्यानें; व ४ राष्ट्रांतील एक रयत आणि मानवी जातींतील एक व्यक्ति या नात्यानें.

सामाजिक कर्तव्यांच्या वर दाखविल्याप्रमाणें उत्तरो-

त्तर वाढत जाणाऱ्या विस्ताराचा विचार करतांना आम्हीं आपल्या मदतीसाठीं आणि धोरण समजण्यासाठीं दोन गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत.

पहिली गोष्ट ही कीं, सद्गुणी होणें हें सुखी होण्यापेक्षां मनुष्यपणास अधिक अनुसरून आहे; कारण, सद्गुणांची वृद्धी करणें हाच मनुष्यजन्माचा हेतु आहे. यास्तव, ज्या ज्या वेळीं मनुष्यप्राण्याला सन्मार्ग दाखविण्याची संधी मिळेल, त्या त्या वेळीं त्याला तो दाखविणें हेंच आपलें खरें कर्तव्य होय. जो, मनुष्याला त्याची चूक दाखवून सन्मार्गास लावितो किंवा तरुण मनुष्याच्या अंतःकरणांत सद्विचारांची प्रेरणा करितो त्याच्या हातून लोकांचें उत्तमप्रकारचें कल्याण होतें; तितकें कल्याण रोग्यांची शुश्रूषा करणाऱ्या किंवा क्षुधितांस अन्न देणाऱ्या मनुष्याच्या हातून घडत नाहीं. आपल्या शेजाऱ्यास सद्गुणी होण्याविषयीं मदत करणें (वस्तुतः एक मनुष्य दुसऱ्याला सद्गुणी करूं शकत नाहीं, केवळ सद्गुणी होण्यास मदत मात्र करूं शकतो) याच्या खालोखाल त्याला सुखी करण्याविषयीं मदत करणें—ह्मणजे त्याचें दुःख निवारण करून त्याचें सुख वाढविणें—हें होय. मनुष्येतर प्राण्याच्या संबंधानें सुद्धां आह्मीं आपलें कर्तव्य बजाविलें पाहिजे. त्यांच्या आंगीं स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति नसल्यामुळें त्यांस सद्गुणी होण्यास मदत करण्यासारखें त्यांच्या ठिकाणीं कांहीं नसतें. यास्तव, दुःखापासून त्यांचें संरक्षण

करून त्यांचें जीवित त्यांस जितकें सुखावह होईल, तितकें करणें एवढेंच कायतें मनुष्येतर प्राण्यांच्या संबंधानें आमचें कर्तव्य आहे. बिशप बटलर यांनीं असें ह्मटलें आहे कीं, कोणत्याही प्राण्याच्या ठिकाणीं दुःख व सुख जाणण्याची शक्ति आहे या एका गोष्टीवरूनच त्याचें दुःख कमी करणें आणि सुख वाढविणें हें आपलें कर्तव्य आहे ही गोष्ट सिद्ध होते. आणि हेंच सर्व सामाजिक नीतीचें मूलतत्व आहे.

एकंदर कर्तव्यें बजावतांना दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही. या जगतावर न्याय, सत्य आणि प्रेम यांचा प्रसार व्हावा असा ईश्वरीसंकेत आहे. यास्तव आह्मीं आमचें कर्तव्य बजावितों तेव्हां वरील सत्कृत्यास हातभार लावितों असें होतें. आमचें स्वतःसंबंधी कर्तव्य बजावण्यांत आह्मीं जें लहानसें परमेश्वराचें राज्य आमच्या अंतःकरणांत स्थापन करितों, त्याच राज्याचा सामाजिक कर्तव्य केल्यानें विस्तार होत जातो. आणि असें झालें ह्मणजे ज्याप्रमाणें समुद्रांत उदक ओतप्रोत भरलेलें असतें त्याप्रमाणें ईश्वराविषयीं ज्ञान पृथ्वीवर सर्वत्र भरून राहील. सत्य सर्वत्र विजयी होऊन असुरभाव नष्ट होतील; लोक सन्मार्गास लागतील; अधोगती नाहींशी होईल; आणि प्रेम व आनंद हीं सर्वत्र पसरतील. हा कल्याणकारक उद्देश साधण्याकरितां आह्मीं पुष्कळदां दुःख आणि संकटें सोसतों; परंतु, ज्याचा भरंवसा ईश्वराच्या न्यायीपणावर

आहे, त्याला अशा संकटाचे प्रसंगींसुद्धां आपलें जीवित केवळ स्वप्नवत् न भासतां आपल्या श्रमास कधीं ना कधीं तरी यश येईल असा उत्साह आणि उमेद उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. ईश्वराचें राज्य स्थापन करणें ही गोष्ट मला अत्यंत प्रिय असून त्यापासून मला अतिशय आनंद आणि समाधान हीं वाटतात. तूर्त आह्मांस जिकडून तिकडून सर्व प्रकारच्या संशयांनीं घेरलें आहे; किंबहुना व्याप्त केलें आहे. असें जरी आहे तरी ईश्वरी राज्याची कल्पना सर्वांच्या प्रत्ययास येते. जरी आह्मांस दुर्दैवानें ईश्वराचें राज्य ह्मणजे काय हें कांहीं वेळपर्यंत समजेनासें झालें आहे, तरी त्याचें राज्य ह्मणून जें काय यापूर्वीं आह्मीं समजत होतों तें वाढविण्याकरितां आह्मांस यत्न करतां येईल. आह्मांपैकीं जीं कोणीं मनुष्यें कोणत्याही प्रकारचें सत्कृत्य करण्यास, दारिद्र्याचें व दुःखाचें निवारण करण्यास, सन्मार्गाचा बोध करण्यास, निर्दयपणा बंद करण्यास, स्वातंत्र्य मिळविण्यास, आणि शुद्ध आनंदाची वृद्धि करण्यास यत्न करीत आहेत, तीं सर्व ईश्वराचें राज्य स्थापन करीत आहेत असें समजलें पाहिजे. त्या सर्वांनीं एकमेकांस मदत करावी, आणि सर्वांनीं प्रत्येकजण ईश्वराचा चाकर किंवा शिपाई आहे असें समजावें. ह्मणजे मग एकत्र जमून शब्दांनीं जरी आह्मांस प्रार्थना करितां आली नाहीं तरीही जोंपर्यंत जगामध्यें ईश्वराच्या राज्याची, ह्मणजे, न्याय, सत्य आणि

प्रेम यांची स्थापना करण्यास आह्मी मदत करीत आहों तोंपर्यंत आमच्या आचरणानेंच आह्मी प्रार्थना करीत आहों असें होईल.

सामाजिक कर्तव्यासंबंधी निरनिराळ्या गहन प्रश्नांचा उलगडा करितां यावा ह्मणून आह्मीं प्रथम त्याच्या स्वरूपाची व्याख्या आणि अनुक्रम हीं ठरविलीं पाहिजेत.

"[1]आपल्या प्रमाणें तूं आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर." या वचनामध्यें वरील सर्व कर्तव्यांचा समावेश होतो. पाहिजे तर नीतिशास्त्रांतील शब्द **परहितेच्छा** हा घेऊं, आणि त्याजवर आपली इमारत रचूं. सर्व मनुष्यप्राण्याच्या संबंधानें परहितेच्छा आमच्या ठिकाणीं असणें हें आमचें कर्तव्य आहे ही गोष्ट ग्रहण केली ह्मणजे बाकीच्या पुढें दाखविण्यांत येणाऱ्या सर्व गोष्टींचा उलगडा होतो.

जुन्या तत्त्ववेत्त्यांनीं **प्रेम** आणि परहितेच्छा यांजमधील भेद पूर्णपणें दाखविला आहे. प्रेमाचें स्वरूप असें असतें कीं, तें आपोआप स्वाभाविकपणें उपजतें; यामुळें तें प्रेम प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं दुसऱ्याविषयीं असावें अशाबद्दल कोणी बांधला जाणार नाहीं; कारण, तें साहजिक झऱ्याप्रमाणें वाहणारें आहे. सांगून उत्पन्न होणारें नाहीं; परहितेच्छा मात्र सर्व मनुष्यांचे ठिकाणीं सर्व प्राण्यांविषयीं असली पाहिजे व असूं शकेल. प्रेम

---

१ ख्रिस्ती धर्मशास्त्रांत ज्या दहा आज्ञा आहेत त्यांपैकीं ही एक आहे.

आणि परहितेच्छा यांजमधील हा वर सांगिलेला नैतिक भेद फार सूक्ष्म आणि महत्वाचा आहे. यास्तव, त्या विषयीं मला वरचेवर उल्लेख करण्याचा प्रसंग येईल. तथापि येथें इतकेंच सांगतें कीं, जेव्हां परहितेच्छेची वाढ पूर्ण होते आणि मनुष्याच्या अंतःकरणांत तिच्या विषयीं उत्सुकता उत्पन्न होते तेव्हां तिचें स्वरूप बदलून तिच्या ठिकाणीं प्रेमाचें स्वरूप येण्याचा संभव असतो. 'ज्यांस आह्मीं त्रास दिला आहे त्यांचा आह्मी तिरस्कार करितों' असें डारविन साहेब ह्मणतात. ही गोष्ट जरी कदाचित् खरी असली तरी ज्यांचें आह्मीं हित केलें आहे, किंवा करीत आहों, ह्मणजे, ज्यांच्याविषयीं आह्मी परहितेच्छा बाळगीत आहों, त्यालोकांविषयीं एका प्रकारचें आह्मांस हळू हळू प्रेम वाटत जातें, आणि ते आह्मांस प्रिय होतात ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

सारांश, परहितेच्छा ही सामाजिक कर्तव्याचें बीज आहे हें कबूल केलें पाहिजे. परहितेच्छा या शब्दाचा अर्थ परहिताविषयीं खरी **कळकळ** आणि परहित करण्याविषयीं कोणत्याही लोकोपयोगी कृत्यांत आपली **तत्परता** असा दुहेरी घेतला पाहिजे. या संबंधानें फार सांगण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. आपल्या शेजाऱ्यास अमुक कांहीं दिलें ह्मणजे झालें, असें समजणारे कित्येक लोक आहेत; परंतु हें बरोबर नाहीं. माझें मत असें आहे कीं, दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याविषयीं आपल्या अंतःकर-

णांत खरी इच्छा नसतांना दुसऱ्याला कांहीं तरी देण्याचा किंवा त्याच्यासाठीं काहीं तरी करण्याचा अधिकार आपल्यास नाहीं; इतकेंच नव्हे, तर हा एक प्रकारचा फाजीलपणा आहे. जर केवळ लोकांस दाखविण्याकरितां, कीर्तिसाठीं, केलें पाहिजे ह्मणून, आपल्याला संवय लागावी ह्मणून, किंवा दुसऱ्या कोणत्याही हेतूनें, आपण तसें केलें तर आपण आपल्या बंधूंचा अपमान केला असें होतें. याचा खुलासा पुढील दृष्टांतानें होईलः—मी एकदां रोम शहरांत असाध्यरोग्यांचें इस्पितळ पाहण्याकरितां गेलें होतें; त्यावेळीं त्यांपैकीं बऱ्याच निर्धन व्याधिग्रस्त रोग्यांनीं काफी व इतर वस्तु विकत घेण्याकरितां पैसे मागितले. त्या वस्तूंपासून त्यांस किंचित् आराम वाटला असता. त्या त्यांना इस्पितळांत मिळत नव्हत्या. त्यांचीं क्षतें पाहून, व त्यांची दीनवाणी याचना ऐकून मला फार दया आली; आणि जी बाई मला इस्पितळ दाखवीत होती, तिला मी विचारलें, "हें इस्पितळ पहाण्याकरितां एथल्या बाया कोणी येत नाहींत काय?" "होय, येतात; एथें मोठ्या चांगल्या थोर थोर कुळांतल्या बाया येतात." "तर मग या गरीब बिचाऱ्यांना जें काय पाहिजे तें त्या देत नाहींत काय?" ती ह्मणाली "नाहीं; त्यासाठीं त्या इकडे येत नाहींत;" "तर मग कशासाठीं येतात?" यावर तिणें जें उत्तर दिलें त्याचा अर्थ प्रथम माझ्या लक्षांत येईना. त्या स्त्रिया रोग्यांचे विखरलेले व घाणेरडे केश विंचरण्याचें

कंटाळवाणें काम करून आपल्या ठिकाणीं निरभिमानता आणण्यासाठीं फक्त तिकडे जात असत. यांत त्यांचा उद्देश रोग्यांचें दुःख निवारण करणें हा नसून आपले स्वतःचे ठिकाणीं निरभिमान आणणें हा होता. रोग्यांना व्याधिपासून मुक्त करण्याकरितां ज्या वस्तूंची जरूरी असे, त्या त्यांला देण्याची कल्पनासुद्धां या बायांच्या मनांत येत नसे.

माझ्या सख्यांनो, वर सांगितल्याप्रमाणें इतरांवर आलेल्या संकटाची संधी साधून देणग्या देऊन किंवा सेवा करून आपलें परलोकीं हित अथवा इहलोकीं लौकिक संपादन करण्याचा तुह्मी यत्न करूं नका. त्यापासून कांहीं व्हावयाचें नाहीं. प्रथम आपल्या मनामध्यें दुसऱ्यांविषयीं कळवळा बाळगला पाहिजे. ह्मणजे मग दुसऱ्यास सहाय्य करण्याची मोकळीक आपल्यास मिळेल.

यानंतर परहित करणें ही दुसरी गोष्ट. परोपकारास खरोखर ह्मटला ह्मणजे आरंभ घरींच झाला पाहिजे. आपले अगदीं जवळचे जे असतील त्यांच्याविषयीं आपल्या ठिकाणीं हितेच्छा आधीं असली पाहिजे; आणि हें त्यांच्या संबंधानें आपलें कर्तव्य यथाशक्ति आपण केलें ह्मणजे मग परहितेच्छेची व्याप्ति जसजशी पुढें वाढवेल तसतशी ती वाढवावी. आतां जवळचे कोण याचा निर्णय करणें तो ज्यानें त्यानें आपआपल्या स्थितीवरून केला पाहिजे.

१ पहिला हक्क ह्मटला ह्मणजे एका रक्ताचे जे अ-

सतील त्यांचा असला पाहिजे. ह्मणजे प्रथम आईबाप आणि मुलें यांचें परस्परांशीं कर्तव्य, नंतर बंधुभगिनीचें. या नात्यांस अनुसरून जीं कर्तव्यें आहेत त्यांस अनुक्रमें **पितृत्व, अपत्यत्व** आणि **सहोदरत्वविषयककर्तव्यें** अशी संज्ञा दिली असतां चालेल.

२ परस्परांमधील अभिवचनावर ह्मणजे करारावर अवलंबून असणारीं कर्तव्यें; अर्थात् पति व पत्नी यांजमधील विवाहकालीं विधिपूर्वक दिलेल्या परस्परांच्या अभिवचनावरून प्राप्त झालेले हक्क. तसेंच मित्रांचें परस्परांशीं कर्तव्य; या कर्तव्याच्या संबंधानें वरीलप्रमाणें जरी कायदेशीरपणें करार झालेला नसतो तरी तो गर्भित असतो, आणि एकंदरींत कांहीं व्यक्तींशीं तरी सारखाच पवित्र असतो. या दोन्ही कर्तव्यांस अनुक्रमें **वैवाहिक** आणि **मित्रत्व**विषयक कर्तव्यें अशी संज्ञा दिली असतां चालेल.

३ ज्यानें आपणांवर पूर्वी उपकार केले आहेत त्या मनुष्याच्या संबंधानें आपलें कर्तव्य. ज्यानें आपणांवर उपकार केले असतील त्याच्यावर आपण उपकार करणें हें आपलें कर्तव्य आहे. या कर्तव्यास **कृतज्ञता** असें ह्मणतात.

४ आपले शेजारी आणि आपले देशबांधव यांचा हक्क आपल्यावर परदेशीय लोकांपेक्षां अधिक आहे.

आतां आपण वर सांगितलेल्या कर्तव्यांपैकीं अगदीं जवळचे, एका रक्ताचे, जे असतील त्यांच्या संबंधानें क-

र्तव्यांचा आणि त्यांतूनही आईबाप आणि मुलें यांच्या कर्तव्यांचा विचार प्रथम करूं.

जें आचरण साहजिकरीत्या आपल्या हातून घडत असतें आणि ज्या मनोवृत्ति अंतःकरणांत स्वाभाविकपणें उत्पन्न होतात, त्यांची गणना केवळ कर्तव्यांमध्यें करणें हें पुष्कळांना मान्य नाहीं. आपल्या प्रिय मातापितरांकरितां किंवा लाडक्या मुलांकरितां तन, मन, धनानें खटपट करणें हें आपल्यास सांगण्यासाठीं कोणत्याही नियमाची जरुरी नाहीं, असें मानणारेही भाग्यशाली प्राणी पुष्कळ आहेत. नियम पाहिजेत ते प्रेम साध्य करून घेण्यासाठीं; यास्तव, जेथें नैसर्गिक प्रेम आहे तेथें नियमांची कांहीं आवश्यकता नाहीं. आणि असें असणें हेंच स्वाभाविक आहे. आईबापांनीं मुलांवर ममता करावी यांत कांहीं विशेष सद्गुण नाहीं. उलटपक्षीं, आईबापांची मुलांवर प्रीति जडावी असें मुलांमध्यें कांहीं विशेष सौंदर्य किंवा सद्गुण नाहीं; तर सृष्टिक्रमच असा आहे कीं, या सृष्टीमध्यें ज्यांचा परस्परांशीं निकट संबंध आहे त्यांनीं एकमेकांशीं प्रेमानें वागलेंच पाहिजे. प्रत्येकजण दुसऱ्यासाठीं स्वार्थत्याग करितो, तो ममतेचा साहजिक उमाळा आल्यामुळें करितो; यांत कांहीं आत्मसंयमन करावें लागत नाहीं. कारण, अशा बाबतींत दुसऱ्याचें कल्याण करावें हाच काय तो नेम, आणि कल्याण केलें असें आपल्या मनास वाटलें ह्मणजे त्यांतच कायतें बक्षीस, अशी स्थिती असते.

तुह्मांपैकीं कौटुंबिक प्रेम ह्मणजे काय हें समजण्याची ज्यांना अद्यापि स्थिति आलेली नाहीं (आणि दुसऱ्या सामाजिक संबंधांशीं त्याची तुलना करण्याचा प्रसंग आल्याशिवाय त्याची खरी किंमत समजणार नाहीं), त्यांना मी हें खात्रीनें सांगतें कीं, त्या प्रेमासारखें दुसरें प्रेम नाहीं. आणि त्याची उणीव दुसऱ्या कोणत्याही वस्तूनें भरून येणारी नाहीं. जेव्हां आईबापांच्या संबंधानें आमचें शेवटचें कर्तव्य संपतें, आपल्या प्रिय मातेसाठीं किंवा पित्यासाठीं अतःपर या जगांत कांहीं कर्तव्य राहत नाहीं, ह्मणजे ज्यांस पाहिलें असतां आनंद होत असे, ज्यांचें थंडीवाऱ्यापासून आह्मी संरक्षण करीत होतों, ते मृत्यु पावल्यानंतर, आपणास इतर सर्व कर्तव्यांविषयीं इतकी उदासीनता व कंटाळा येतो कीं तीं कर्तव्यें करण्यास आपली प्रवृत्ति आपल्या मातापितरांस तीं आवडत असत, याच विचाराच्या योगानें झाली तर होते. हा अपत्यांच्या प्रेमाचा प्रकार झाला. त्याच प्रमाणें मातेनें आपलें मूल आपल्या पोटाशीं कवटाळून घेतलें ह्मणजे ज्या प्रेमानें तिचें अंतःकरण भरून जातें तें प्रेम इतकें दिव्य, इतकें शुद्ध आणि इतकें निरपेक्ष असतें कीं, त्या मुलाकरितां सर्व प्रकारचे श्रम, चिंता आणि स्वार्थत्याग हीं मातेच्या हातून साहजिकच घडतात. ही गोष्ट आमच्यासारख्या मूलबाळ नसलेल्या स्त्रियांच्या सुद्धां ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. फार तर काय, मुक्या ज-

नावरांत सुद्धां हें प्रेम दृष्टीस पडतें. मांजरी आपल्या पिलांच्या बचावाकरितां आगींत सुद्धां उडी टाकील. पक्ष्यासारखा भित्रा प्राणी पारध्याकडून घरट्यांतील पिलांस उपद्रव न व्हावा या हेतूनें स्वतःच्या जीवाची पर्वा न करितां पारध्यास आपली स्वतःची लालूच दाखवून घरट्यापासून दूर नेतो.

मातापितरांचें मुलांवर आणि मुलांचें मातापितरांवर जें प्रेम असतें त्याचा उहापोह करण्याचा माझा हेतु नाहीं; तर त्या संबंधानें जें आमचें कर्तव्य आहे त्याची बरोबर व्याख्या करणें हा आहे. ती केली ह्मणजे ज्यांच्या दुर्दैवानें अशा प्रेमांत कांहीं उणीव अथवा चूक झालेली आहे त्यांस ती भरून काढण्यास किंवा दुरुस्त करण्यास कायमचें साधन मिळेल. सामाजिक कर्तव्याचा विचार केला ह्मणजे मातापितरांचें मुलांविषयीं आणि मुलांचें मातापितरांविषयीं कर्तव्य हीं परहितेच्छेच्या सदरांतील मुख्य कर्तव्यें आहेत असें दिसून येईल. त्यांनीं इतर सर्व हेतु एकीकडे झुगारून परस्परांचें कल्याण करण्याच्या योजनेंत असावें किंवा परस्परांच्या सद्गुणांची आणि सुखाची वृद्धि करण्याविषयीं प्रयत्न करावा हें त्यांचें कर्तव्य आहे.

प्रथम, आपण **मातापितरांचें अपत्यांविषयीं** कर्तव्य याचा विचार करूं. जी आई शहाणी व विचारी आहे तिची इतर गोष्टींपेक्षां आपल्या मुलांना चांगलें

नीतीचें वळण लागावें अशी इच्छा असते; तिला त्यांच्या भावी सुखदुःखाच्या संबंधानें आपल्यावर जबाबदारी मोठी आहे असें वाटतें, आणि हें कर्तव्य करण्यापलीकडे तिला दुसरें कांहीं सुचत नाहींसें होतें. मार्गारेट फुलर इणें आपल्या मुलाच्या जन्माची जी नोंद रोजनिशींत केली आहे ती अशी:—'मी आतां एका अविनाशी प्राण्याची माता झालें. परमेश्वर मज पापिणीवर दया करो!' हा उद्गार हजारों स्त्रियांच्या मुखांतून निघण्याजोगा आहे. हें पवित्र कर्तव्य बजावण्याच्या कामीं आपण अयोग्य व असमर्थ आहें असें तिच्या मनांत येणें हीच गोष्ट बहुतकरून तें कर्तव्य तिच्या हातून चांगल्या रीतीनें तडीस जाण्यास कारण झाली असावी. जी बाई आपण मातृपणाचें कर्तव्य बजावण्यास समर्थ आहें असें समजतें तिची या कर्तव्याविषयींची समजूत फारच कोती आणि क्षुद्र आहे असें समजावें.

माझ्या मैत्रिणींनों, मला तुमच्याप्रमाणें मुलांबाळांचा अनुभव नसल्यामुळें व तो पुढेंही मिळणार नाहीं अशी माझी (अविवाहित) स्थिति असल्यामुळें ज्या तुह्मांला मुलांबाळांचा अनुभव आहे त्यांना मातापितरांचें आपल्या अपत्यांविषयीं कर्तव्य काय या संबंधानें सांगणें हें जरी धाडसाचें काम आहे तरी मी माझ्या समजुतीप्रमाणें त्याची मुख्य दिशा दाखवितें. जर या कर्तव्याच्या संबंधानें एकमत झालें तर मग ज्याविषयीं सां-

प्रत इतका मतभेद दिसून येतो, असें जें अपत्यांचें मातापितरांविषयीं कर्तव्य त्याचा उलगडा होईल.

मातापितरांच्या कर्तव्याचा, इतकेंच नव्हे, तर एकंदर सामाजिक कर्तव्याचा विचार करतांना आपण एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे; ती हीः—आपण वारंवार ह्मणतों कीं ईश्वराचें प्रेम सर्वांत श्रेष्ठ आहे; आणि तें ह्मणणें यथार्थ आहे. कारण, ज्या शुद्ध प्रेमाचा मातेच्या अंतःकरणांत उमाळा येतो तें प्रेम ईश्वरापासूनच प्राप्त होतें. त्याची ईश्वराच्या प्रेमाशीं तुलना केली असतां तें प्रवाहांतील एका बिंदूइतकें, किंवा सूर्याच्या एका किरणाइतकें आहे असें आपणास दिसून येईल. परंतु ईश्वराच्या ठिकाणीं आपल्या बालकांविषयीं जें अतुल प्रेम दिसून येतें त्यांत अपार मृदुता, करुणा आणि त्यांस पापापासून परावृत्त करण्याकरितां किंवा पवित्र करण्याकरितां आवश्यक लागणारा कडकपणा, हे परस्परविरोधी गुण असले पाहिजेत याचा तुह्मीं कधीं तरी विचार केला आहे काय? या गुणविरोधांतच सर्व प्रीतीचें खरें लक्षण आहे. इकडे लक्ष पुरवून आपण आपल्या परिमित, दुर्बळ आणि स्वार्थपर प्रेमाला वळण लाविलें पाहिजे. प्रत्येक आईबापानें आपल्या मुलांसंबंधानें कर्तव्य बजावीत असतांना वरील कित्त्यास अनुसरून आचरण केलें पाहिजे. हेंच उत्तम प्रेम होय; आणि याचाच मुलाच्या मनावर ठसा उमटतो. मुलांकडून कांहीं अन्याय घडल्यामुळें त्यांस शिक्षा करण्याचा

प्रसंग आला ह्मणजे त्यावेळीं शिक्षा मिळत असतांना मुलांस जितकें दुःख होतें त्याच्याही पेक्षां अधिक दुःख या प्रेमामुळेंच अशा आईबापांस होतें; त्यांच्यानें जितकें मुलांस निरुपद्रवी सुख देववेल तितकें तीं देतात; तथापि, त्यांच्या खऱ्या भावी कल्याणाकडे लक्ष पुरवून शिक्षा करण्याचा प्रसंग आला तर तो कधींही टाळीत नाहींत. माझें असें मत आहे कीं जोंपर्यंत मातेचें किंवा पित्याचें आपल्या बालकाविषयींचें प्रेम वर सांगितलेल्या ईश्वराच्या प्रेमाप्रमाणें झालें नाहीं तोंपर्यंत त्यांत कांहीं तरी दोष आहे असें समजावें. परमेश्वराचें आह्मां सर्वांवर जसें प्रेम असतें, त्याच्यासारखें कांहींसें प्रेम आपल्याला बालकांविषयीं वाटणें ही केवढी आश्चर्यकारक आणि उन्नत स्थिति आहे बरें? केप्लर यानें ज्यावेळीं तारागणांमधील अंतर शोधून काढलें त्या वेळीं त्याच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन त्याच्या मुखावाटे फार गंभीर उद्गार निघाले, ते हे:—"हे देवा! तुझे विचार मला आतां समजूं लागले." ज्या ज्या वेळीं आह्मी सृष्टिनियमांचा अभ्यास करितों, त्या त्या वेळीं आह्मांस ईश्वराच्या विचारांचा यथार्थ बोध होऊन त्याचा परिणाम आमच्या मनावर होतो. अशा रीतीनें ईश्वराचे विचार आह्मांस समजणें, ही कांहीं लहानसान गोष्ट नाहीं; परंतु याही पेक्षां ईश्वरास त्याच्या बालकांविषयीं जें प्रेम वाटतें त्याचा आह्मांस प्रत्यक्ष अनुभव येऊन त्याच्यासारखें

प्रेम निदान एका मुलाविषयीं तरी वाटण्याचें सामर्थ्य येणें ही गोष्ट अधिक श्रेष्ठ होय. अशा प्रकारचें दिव्य प्रेम मातेच्या ठिकाणीं असलें ह्मणजे त्याचें स्मरण मुलाला जन्मभर राहतें. आणि जगामध्यें पूर्ण प्रेम ह्मणून कांहीं खरी वस्तु आहे अशी त्याची खात्री होते. या प्रेमाचा तो अनुभव घेतो; या प्रेमांत तो बाळपणापासून वाढलेला असतो; या प्रेमावर त्याचा अनन्यभावें विश्वास असतो; आणि कितीही वेळां आणि कशाही आपल्या हातून चुका घडल्या तरी हें प्रेम आपला कधींही त्याग करणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर आपणास वर काढील आणि शेवटीं सन्मार्गास लावील असा त्याचा दृढ विश्वास असतो.

यास्तव मातेचें प्रेम ईश्वराच्या प्रेमाचें प्रतिबिंबच असलें पाहिजे, ह्मणजे, ईश्वराच्या प्रेमाचा प्रतिध्वनि मातेच्या अंतःकरणांतून निघाला पाहिजे.

परंतु मातेला प्रेमरूप दीपाचें साधन मिळालें ह्मणजे त्याच्या योगानें तिच्या दृष्टीपुढें कोणकोणत्या गोष्टी येतात त्या पहा. प्रथम, आपल्या मुलाच्या नैतिक कल्याण्याविषयींची, ह्मणजे सर्वांत मुख्य कर्तव्यासंबंधी; दुसरी, त्याच्या आरोग्यरक्षणाविषयींची; तिसरी, त्याचा नैतिक स्वभाव ( नीति ) दृढ होऊन त्याचें जीवित सफल होईल आणि त्याला आपलीं इहलोकींचीं कर्तव्यें बजावण्यास सामर्थ्य येईल अशी विद्या शिकविण्याची; आणि चवथी,

त्याला होईल तितकें सुखी करण्याची. पुष्कळ चांगल्या आयांना सर्व गोष्टींची अनुकूलता नसल्यामुळें—कोणाची प्रकृति क्षीण असल्यामुळें, कोणास द्रव्यसाधन नसल्यामुळें व कोणास आपला पति प्रतिकूळ असल्यामुळें—वरील कर्तव्यें बजावण्याचें काम फार कठीण जातें. या विषयाच्या संबंधानें मला पुरता अनुभव आणि माहिती हीं जरी असतीं तरी त्याचें विवेचन या अध्यां व्याख्यानांत यथार्थपणें करितां आलें नसतें. त्यास एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. या बाबतींत एका मुद्याच्या संबंधानें नीतिशास्त्राचा उपयोग होईल असें मला वाटतें. तो मुद्दा मुलांस कोठपर्यंत आज्ञा पाळण्यास लावावें हा होय.

मातापितरांची अपत्यांनीं आज्ञा पाळणें, या विषयाच्या संबंधानें बोलतांना ज्या तीन प्रकारच्या आज्ञा आपण स्पष्टपणें ध्यानांत ठेवल्या पाहिजेत त्या येणेंप्रमाणें:—

१ अपत्यांच्या शारीरिक, मानसिक आणि नैतिक कल्याणाकरितां मातापितरांनीं त्यांस ज्या आज्ञा पाळण्यास लाविल्या पाहिजेत त्या.

२ मातापितरांनीं आपल्या स्वतःच्या हितासाठीं किंवा सोयीसाठीं ज्या आज्ञा पाळण्यास लावल्या असतां चालतील त्या.

३ ज्या आज्ञा नीतीस अनुसरून असल्यामुळें मुलांनीं व त्याच प्रमाणें आईबापांनींही पाळल्या पाहिजेत आणि

ज्या मुलांस शिकविणें हें आईबापांचें कर्तव्य आहे त्या.

वर सांगितलेले आज्ञाधारकपणाचे तीन निरनिराळे भेद आया आपल्या ध्यानांत स्पष्टपणें वागवितील तर त्यांची बरीच अडचण दूर होईल असें मला वाटतें. त्याच प्रमाणें मुलें, त्यांस जसजसें समजूं लागेल तसतसें जर वरील भेद जाणून वागतील तर त्यांचा सुद्धां बराच त्रास कमी होईल.

१ पहिल्या भेदाच्या संबंधानें डाक्टर टामस् ब्रौन यांनीं जो नियम घालून दिला आहे तो या बाबतींत चांगला लागू पडतो. तो नियम असा आहे कीं 'मातापितरांनीं अपत्यांवर जो दाब ठेवावयाचा त्याचा उद्देश जर त्यापासून होणाऱ्या तात्कालीन दुःखापेक्षां सुख अधिक व्हावें असा नसला तर कधींही ठेऊं नये.' लहान बालकांस दाबापासून कांहीं नुकसान नाहीं. अशा वयांत त्यांच्या ठिकाणीं सर्व बाबतींत आज्ञाधारकपणा असला पाहिजे. कारण, स्वतंत्रपणें वागण्याइतकी त्यांची समजूत नसते व अनुभवही नसतो. तथापि जसजशी बाल्यावस्था जाऊन त्यांची समजूत वाढत जाते, तसतसें त्यांचें स्वातंत्र्यही वाढविलें पाहिजे. आणि जरी अशा स्वातंत्र्यापासून त्यांना कधीं कधीं दुःख भोगण्याचा प्रसंग येतो, तथापि त्यापासून जो अनुभव मिळतो तो फार उपयोगी असतो. तें स्वातंत्र्य जर त्यांस दिलें नाहीं आणि त्यांस वाजवीपेक्षां फाजील दाबांत ठेविलें तर त्यापासून होणारें नुकसान कशानेंही

भरून येणार नाहीं. मुलांवर फाजील दाबाचा परिणाम[1] असा होतो कीं तेणेंकरून सुस्वभाव प्रौढदशेस येण्यास अडचण पडते; उत्साह कमी होतो; आणि आपण सर्वथैव परतंत्र आहों हा दुःखजनक अनिष्ट समज जसजसा दृढ होतो तसतशीं तीं अधिकाधिक कोडगीं आणि खोडकर होतात.

मुलाच्या कल्याणाच्या बाबतींत आईचें लक्ष सर्व जन्मभर त्याला सल्ला देण्याकडे असलें पाहिजे. 'सल्ला देणें' या शब्दाचा अर्थच असा आहे कीं तो देणाऱ्यानें आपल्याकडे अधिकार घेण्याचा आग्रह धरतां नये. जो मनुष्य आपला सल्ला देऊन माझ्या सल्याप्रमाणें तुह्मांस चाललेंच पाहिजे असें ह्मणतो त्याचा सल्ला कोणीही घेऊं इच्छित नाहीं. होईल तितका हुकुमाचा तोरा आपल्या भाषणांतून काढून टाकणें, आणि ममताळू व कळकळ बाळगणाऱ्या निरिच्छ मित्राचें जसें भाषण असतें त्याप्रमाणें आपल्या भाषणाचा रोंख ठेवणें, हेंच माझ्या मतें आईच्या शाहणपणाचें खरें लक्षण होय. माझी आई अशीच होती. आतां, ज्या मुलीस सावधगिरीनें कसें वागावें हें फारसें समजत नाहीं तिला आईनें प्रतिबंधांत

---

१ फाजील दाबाचा आणखी असा परिणाम होतो कीं मनुष्य मोठा झाला तरी त्याची परतंत्रपणाची अथवा दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची संवय जात नाहीं आणि प्रसंग आला असतां कसें वागावें हें त्यास सुचत नाहीं व तो दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करितो.

ठेवणें जरूर आहे. इतकेंच नव्हे, तर तसें करणें हा तिचा धर्म आहे. ब्रौन यांनीं वर सांगितलेल्या नियमाप्रमाणें, अशा ठिकाणीं दाब ठेवणें योग्य आहे. कारण दाबांत ठेवल्यापासून जें तात्कालिन दुःख व्हावयाचें त्याच्यापेक्षां जें संकट टळतें तें मोठें असतें. तरुण मुलींना आपल्या आईबापांच्या ताब्यांत राहणें आवडत नाहीं, याचें एक मुख्य कारण हें असावें कीं त्याला समाजांतील घाणेरड्या स्थितीमुळें आपणांवर कसकसे भयंकर प्रसंग लोटण्याचा संभव आहे हें समजत नसतें; आणि समजण्यासारखी त्यांची स्थितीही नसते.

२ आईबापांना आपल्या मुलांकडून चाकरी करून घेण्याचा नैसर्गिक हक्क आहे ही गोष्ट फारकरून कोणास समजत नाहीं. फक्त नीतिशास्त्राच्याच नियमास अनुसरून चाललों तरी मुलांच्या ठिकाणीं असलेल्या परहितेच्छेवर आईबापांचा हक्क पहिला आहे. कृतज्ञता आणि अत्यंत निकट संबंध या दुहेरी नात्यामुळें मुलांनीं आपल्या आईबापांच्या पवित्र ऋणांतून मुक्त व्हावें, हें त्यांचें सततचें कर्तव्य आहे. आणि आईबापांनीं तो हक्क बजाविणें हें अगदीं योग्य आणि मुलांस कल्याणकारक आहे. अशाप्रकारें आईबापांनीं केलेली आज्ञा ही चाकराला केलेल्या आज्ञेप्रमाणें समजावयाची नाहीं; तर केवळ, तुह्मी अमुक रीतीनें वागलां तर त्यापासून आह्मांस सुख आहे एवढीच इच्छा तींत दर्शविलेली आहे

असें समजावयाचें. अशा आज्ञा करतांना कोणत्याही प्रकारचा यत्किंचितही शक किंवा कडकपणा असूं नये. उलट, अशा प्रसंगीं आईबापांनीं आपल्या मुलांशीं सौम्यपणानें भाषण केल्यास त्यापासून फार फायदा आहे. आह्मी आपल्या चाकरांस त्यांनीं पगारासाठीं पत्करलेलें काम करावयास सांगतों तें सुद्धां सभ्यपणानें सांगतों. तर मग जी सेवा मुलांनीं कृतज्ञतेस आणि नैसर्गिक पवित्र संबंधास स्मरून करावयाची, आणि जी केल्यानें मुलें आणि मातापितरें या दोघांसही संतोष व्हावयाचा, ती सेवा करावयास सांगतांना कितीतरी ममताळूपणा आणि सभ्यपणा बाळगिला पाहिजे बरें? जेव्हां अशी सेवा सांगण्यांत येते आणि ती मोठ्या आनंदानें करण्यांत येते तेव्हां पितृभक्तीपासून किती संतोष वाटतो बरें! उदाहरणार्थ, जेथें गरीब वर्गांतील लहान मुली आपल्या बापासाठीं शेतांत जेवण नेतात आणि धाकट्या भावंडांस संभाळून आपल्या आईस मदत करितात, तेथें त्या आईबापांचा हक्क योग्यरीतीनें बजावण्यांत आलेला आह्मांस दिसतो; इतकेंच नव्हे तर, त्या मुलींना त्यापासून फार हितकारक नैतिक शिक्षण मिळतें असें आमच्या दृष्टीस पडतें. माझी समजूत अशी आहे कीं श्रीमंत लोकांत मुलांना अशाप्रकारें कामास लावण्याची चाल अगदींच नाहीं. आई कितीही श्रीमंत असली तरी तिनें आपल्या स्वतःच्या उपयोगीं आपल्या मुलींनीं प-

डावें असें वळण त्यांना लावून द्यावें ह्यांत त्या मुलींचें फारच हित आहे. स्वतःकरितां सर्व कांहीं तयार करून ठेवलेलें असावें, आणि दुसऱ्याकरितां यत्किंचित सुद्धां काम करण्यास स्वतःला कोणी सांगूं नये असा मुलांचा समज होणें ह्यापेक्षां अहितकारक दुसरी गोष्ट नाहीं. वास्तविक पाहिलें तर चांगल्या स्वभावाच्या मुलाला दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्यांत किंवा दुसऱ्याचे उपकार फेडण्यांत जो आनंद होतो तसा त्याला नेहमीं लाडविण्यांत किंवा त्याची बरदास्त राखण्यांत होत नाहीं. आतां, आईबापांनीं आपली सेवा कोठपर्यंत करून घ्यावी यालाही मर्यादा असली पाहिजे हें खरें आहे; कारण, त्यापासून मुलाच्या आरोग्यास किंवा विद्याभ्यासास व्यत्यय येतां कामा नये. परंतु वयाच्या संबंधानें मात्र अशा प्रकारचा निर्बंध नाहीं. उलटपक्षीं मुलें ( मुलगे अथवा मुली ) प्रौढ वयांत येऊन शक्तिमान झालीं आणि आईबापांवर जरेचा अंमल बसला ह्मणजे अशावेळीं मुलांवर आपल्या आईबापांसंबंधी कर्तव्य करण्याची जबाबदारी विशेष वाढते. वृद्ध मातापितरें, आपलीं मुलें लहान असतांना, त्यांस ज्याप्रमाणें आपलीं कामें करावयास सांगतात त्याप्रमाणें तीं प्रौढ वयांत आलीं ह्मणजे सांगत नाहींत, या गोष्टीवरून या आज्ञेचें पवित्र स्वरूप फारच थोड्या लोकांस अवगत आहे असें ह्मणावें लागतें.

३ आईबापांनीं व त्याचप्रमाणें मुलांनींही शाश्वत चालणारे नैतिक नियम पाळले पाहिजेत. आणि मुलांच्या स्वतःच्या कल्याणाकरितां किंवा आईबापांच्या सोयीकरितां ज्या आज्ञा मुलांकडून पाळावयास लावावयाच्या, त्यांच्यापासून या आज्ञा अगदीं भिन्न व स्वतंत्र ठेविल्या पाहिजेत. निषिद्ध गोष्टी आणि अनिष्ट गोष्टी यांजमध्यें भेद आहे. तो भेद जुनाट व महत्वाचा असल्यामुळें आपण विसरतां कामा नये. खोटें बोलणें, जनावरांशीं क्रूरतेनें वागणें, आपल्या सोबत्यांवर सूड उगविणें वगैरे नैतिक दोष अगदीं लहान मुलाचे ठिकाणीं जरी आढळले तरी ते क्षुल्लक ह्मणून त्यांकडे दुर्लक्ष करूं नये, किंबहुना त्यांबद्दल आपणास खेद वाटला पाहिजे. जसजसें तें मूल वाढत जातें तसतसे वरील नैतिक-दोष, धडे शिकण्याच्या संबंधानें दुर्लक्ष वगैरे इतर प्रकारच्या चुकांहून अगदीं भिन्न असून त्यांस भयंकर स्वरूप प्राप्त होतें, ही गोष्ट त्या मुलाच्या मनांत बिंबविली पाहिजे. आईबापांच्या शिक्षणाचा मुख्य झोंक ह्मटला ह्मणजे मुलांच्या मनावर नीतिदृष्ट्या सत्कृत्यें कोणतीं आणि दुष्कृत्यें कोणतीं याचा, आणि पुढें मोठेपणीं त्यांचें स्वरूप कसें विशाल होत जातें याचा ठसा वठविण्याकडे असला पाहिजे.

परंतु या बाबतींत सुद्धां एक अडचण येते. मुलांना नैतिक नियम पाळण्यास कोठपर्यंत लावावें? जोंपर्यंत के-

वळ जबरदस्तीनें किंवा शिक्षेची भीति घालून यत्किं-
चितही स्वातंत्र्य दिल्याशिवाय मुलास चांगलें कृत्य क-
रावयास आपण लावितों तोंपर्यंत मुलाच्या नैतिक स्वा-
तंत्र्यास अवकाश मिळूं शकत नाहीं; आणि त्यामुळें
त्याच्या नैतिक आचरणास सुद्धां आरंभ होऊं शकत
नाहीं. स्वतंत्र विचारांपासून उत्पन्न होणारा सद्गुण त्या
मुलाच्या आंगीं वास करीत नाहीं. यास्तव, जें कांहीं
आईबापांच्या हातांत करण्याचें आहे ( आणि तसें करणें
हें सद्गुण आणण्याच्या कामीं अत्यावश्यक आहे ) तें हें
कीं, चांगलें ह्मणजे काय हें प्रथम मुलास शिकवावें; त्याच्या
आंगीं जी नैतिकबुद्धि आहे ती प्रज्वलित करावी; स-
त्याचरण करण्याची इच्छा त्याला उत्पन्न होईल अशा
प्रकारचें स्फुरण त्याच्या आंगीं आणावें; आणि मग जो
मार्ग आपण त्याला दाखवून दिला आहे त्यांत त्याला
उत्तेजन द्यावें. कर्तव्य ह्मणजे काय याविषयीं एकदां मु-
लाच्या मनांत विचार येऊन चुकला आणि तें सद्गुणी
होण्याविषयीं हळूहळू यत्न करूं लागलें आणि पश्चात्ताप
पावण्याची किंवा उतराई होण्याची इच्छा दाखवूं लागलें
ह्मणजे त्यावेळीं त्याच्या त्या यत्नास आईनें मदत क-
रावी, व त्या संबंधानें गंभीरपणा ठेवून, जास्त न बो-
लतां, त्याबद्दल आपली चाहा दाखवावी, हें तिचें मोठें
पवित्र कर्तव्य आहे. मुलाच्या आंगीं नैतिक बळ आल्या-
शिवाय त्याला स्वातंत्र्य देण्याची घाई करणें ही कांहीं

ममता नव्हे; पण उलट, क्रूरता ह्मटली तरी चालेल. तथापि, नैतिक नाहींत अशा गोष्टींमध्यें ज्याप्रमाणें आह्मीं हळूहळू आपल्या आज्ञा व हुकूम करण्याचें सोडून देऊन त्याऐवजीं सल्ला व उत्तेजन देतों तोच नियम एथेंही पाळला पाहिजे.

आतां एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, मुलाचें नैतिक कल्याण साधण्याच्या आतुरतेमुळें नैतिकस्वभाव लवकर येण्यासाठीं कोणत्याही प्रकारें घाई व जबरदस्ती करितां कामा नये. तसें केल्यास त्याची स्थिति बाहेरची उष्णता देऊन वाढविलेल्या झाडाप्रमाणें होईल. झाड चांगलें मजबूत झालें पाहिजे तर त्याची वाढ स्वाभाविकपणें झाली पाहिजे; फार जलद होतां नये. अगदीं लहानपणीं हा नैतिकस्वभाव पक्कदशेस यावा असा ईश्वरी संकेत नाहीं. कारण, तो लहान मुलाच्या ठिकाणीं फार सुंदर दिसेल खरा; परंतु तो पुढें नाहींसा होण्याचा किंवा प्रौढवयांत निष्फळ होण्याचा संभव असतो. मुलें संभावित, ममताळू असूनही अल्पवयी असल्यामुळें त्यांनीं

दानधर्मासारख्या सत्कृत्यांकडे लक्ष न देतां खेळाकडे विशेष लक्ष दिलें तर त्यांच्या आयांस वाईट वाटूं नये. आणि यावेळीं ज्या मुली हें नैतिक विषयांवरील व्याख्यान ऐकण्यास बसल्या आहेत त्यांपैकीं कित्येकांचें मन त्यांच्या एखाद्या आवडत्या खेळाकडे धांव घेत असलें तरी मी त्यांस दोष देणार नाहीं.

परंतु आमच्या मानवी शहाणपणाचा उपयोग मुलांची नीति वाढविण्याकडे करवेल तितका केल्यानंतर मग आणखी एक आईबापांचें कर्तव्य शिल्लक राहतें. तें कर्तव्य सोपें असून बजावण्यास अवकाशही पुष्कळ असतो. तें कर्तव्य त्यांच्या सुखाची तरतूद करून ठेवणें हें होय. गरीब असोत किंवा श्रीमंत असोत, दहांपैकीं नऊ आईबापांला तरी आपल्या हातून होईल तितकें आपल्या मुलांस सुखी करावें असें वाटतें; आणि तसें करण्यांत त्यांस आनंदही वाटतो; यांत कांहीं विशेष सद्गुण आहे असें नाहीं. सृष्टिक्रमानें (संकोच कां, ईश्वरानें) आह्मांस असें बनविलें आहे कीं आमची मध्यमावस्था झाली ह्मणजे आमच्या स्वतःसाठीं ह्मणून प्रत्यक्षरीतीनें सुखोपभोग घेण्याची वासना कमी कमी होत जाते. आह्मी लहान होतों तेव्हां ज्या वस्तूंपासून आह्मांस अत्यानंद होत होता, त्या वस्तूंचें फारसें महत्व आह्मांस आतां या वयांत वाटत नाहीं; आणि आह्मी अधिक महत्वाच्या व्यवसायांत अगदीं गर्क असतों. परंतु मनुष्याचा तारुण्यरूपी सूर्य जसजसा मावळत जातो तसतसा त्याच्या सभोंवतीं लहान मुलें असलीं तर त्यांच्या आनंदाचा शांत व शुद्ध चंद्रप्रकाश पाहून त्याला आनंद होतो; ह्मणजे, जे सुखोपभोग त्याला स्वतः घेतां येत नाहींत ते सुखोपभोग त्याच्या मुलांनीं घेतले आणि त्यांना आनंद झाला ह्मणजे याला आनंद होतो. लहान मुलांचा आ-

नंद, त्यांची आतुरता, आणि त्यांचा उत्साह यांहींकरून आपल्या हृदयांत कोमलता आणि ममता हीं उत्पन्न होतात. एखादें चिमुकलें सुंदर बालक आकाशांत पतंग उडतांना पाहून मोठ्या आनंदानें टाळ्या पिटीत जेव्हां नाचूं लागतें तेव्हां त्यास पाहून आपल्या हृदयांत जो आल्हाद होतो त्याची बरोबरी कशानेंही होणार नाहीं.

आह्मीं मातापितरांस आणि मुलांस, जुन्या पद्धतीस अनुसरून सुखोपभोगाचा त्याग करण्यास, आणि लहानपणींच कर्तव्य आणि कामगिरी कंटाळा येईतोंपर्यंत बजावीत राहण्यास सांगावें काय? छे! छे! ईश्वर जो सर्व जगताची माता व पिता आहे तो तरी आपल्याकडे नेण्यासाठीं आह्मांस अशा प्रकारचें कडक शिक्षण देत आहे काय? नाहीं. त्यानें ही पृथ्वी फार सुंदर केलेली आहे. जिकडे तिकडे पुष्पें उत्पन्न केलीं आहेत. बुद्धि आणि इंद्रियें, रुची आणि प्रेम यांचे हजारों विषय उत्पन्न करून मनुष्याच्या अंतःकरणास आल्हाद उत्पन्न होईल अशी योजना त्यानें केली आहे. माझ्या मैत्रिणींनों, तुह्मी आपल्या मुलांस सुखोपभोगाचा त्याग करण्यास लावून असुखी करूं नका; किंवा त्यांजवरील तुमचें प्रेमही कमी होऊं देऊं नका; कारण, तसें केल्यानें धोका आहे. उलट, त्यांस फार सुखी करण्यास झटा; व त्यांच्यावर फार प्रेम करा. असें करण्यांत भीती बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. आह्मीं सर्वांनीं लेंकु-

रभाव धारण करून ईश्वराच्या राज्यांत प्रवेश केला पाहिजे असें एक खोल अर्थाचें वचन आहे. त्याच न्यायानें ईश्वराच्या कृपेनें आह्मांस लेंकरें प्राप्त झालीं असतां आमचीं घरें त्यांच्या राहण्यास योग्य व्हावीं यासाठीं त्यांत आह्मीं ईश्वराचें राज्य स्थापन केलें पाहिजे; ह्मणजे त्यांत शांतता, प्रेम, कोमलता आणि निष्पाप आनंद हीं असलीं पाहिजेत.

आतां आपण **कन्येचें मातापितरांसंबंधी कर्तव्य** या विषयाकडे वळूं या. मातापितरांविषयीं सर्वांत जास्त परहितेच्छा आमच्याठायीं असण्याचीं नैतिक कारणें अगदीं उघड आहेत. मातापितरांशीं आमचा सर्वांत जास्त निकट संबंध असतो. आह्मांस जीवन त्यांच्यापासूनच प्राप्त झालेलें असतें, आणि तीं आमच्याविषयीं अमर्याद काळजी आणि ममता बाळगितात. आईचा तर आपल्या मुलांवर हक्क पहिल्या प्रतीचा आहे; कारण, मुलांकरितां तिनें शारीरिक वेदना सोसलेल्या असतात; त्यांचें लालनपालन करण्याकरितां मेहनत घेतलेली असते; त्यांच्या बाळपणांत त्यांच्या रक्षणार्थ काळजी वाहिलेली असते; आणि मोठेपणीं ती प्रेम आणि कळकळ बाळगीत असते. या सर्व गोष्टींमुळें मुलांच्या ठिकाणीं तिच्याविषयीं कृतज्ञता आणि मातृभक्ति किती असली पाहिजे याची कोणत्याही प्रकारें मर्यादा ठरविणें अशक्य आहे.

हा हक्क अविवाहित मुली नेहमीं मोठ्या आनंदानें बजावतात. आईबापांच्या सुखाकरितां जितकी मेहनत घेववेल तितकी घेणें आपलें कर्तव्य आहे, असें त्या समजतात; तर मग विवाहित मुलींस मी एक प्रश्न विचारितें कीं तुह्मांलाच या पवित्र पितृऋणांतून कोणी मुक्त केलें? क्याथलिक पंथाच्या लोकांत तरुण मुली आपल्या वृद्ध मातापितरांस आपली कितीही गरज असली तरी तिकडे दुर्लक्ष करून मठांत राहून जोगिणी बनतात याबद्दल आह्मां प्रॉटेस्टंट लोकांस त्यांचा तिटकारा येतो; परंतु, विवाह करणाऱ्या आमच्या प्रॉटेस्टंट मुलींकडे लक्ष दिलें तर, जी मुलगी कामविकारास वश होऊन आपली पितृभक्ति सर्वथैव विसरून जाते आणि पतीच्या ठिकाणीं रत होते, तिचे आह्मी जास्त लाड करितों. मुलगी आपल्या आंधळ्या बापाला किंवा अंथरुणास खिळलेल्या आईला सोडून विवाह करून जाते त्याचा अर्थ साधारणपणें असा—"काल[2] रात्रीं अमुक गृहस्थांची आणि माझी गांठ पडली; ते बॉलामध्यें फार छान नाचतात. मी त्यांच्याबरोबर हिंदुस्थानास जात

१ आपल्या देशांत मुलींचीं लहानपणींच लग्नें झालीं पाहिजेत अशी चाल असल्यामुळें कित्येक विधवा मुली खेरीजकरून बाकीच्या मुलींस हा हक्क बजावण्यास संधि मिळत नाहीं.

२ ही गोष्ट आपल्या इकडील मुलींस लागू नाहीं, कारण त्या आपण होऊन विवाह करीत नाहींत.

आहे. आजपर्यंत माझ्यापासून तुला जो कांहीं लाभ झाला तो धर्माचा ह्मणून तूं समज."

असें करणें रास्त आहे काय? साधारण लोकमत या गोष्टीकडे दुर्लक्ष करितें; आणि आईबापांचें मुलीवर निष्काम प्रेम अमर्याद असल्यामुळें तीं अशावेळीं सुद्धां आपल्या मुलीस लग्न करण्याविषयीं अनुमोदन देतात; आणि यामुळें सहजच जणुं काय मुलगी पितृऋणांतून मुक्त झाली आहे असा भास होतो; परंतु आईस किंवा बापास आपल्या मुलीची वास्तविकपणें गरज आहे तोंपर्यंत, त्यांच्या अनुमोदनानें कां होईना, त्यांस टाकून जाणें हें त्या मुलीस नीतिदृष्ट्या योग्य होणार नाहीं. मग अनुमोदन मिळालें नाहीं तर जातां येणार नाहीं हें तर उघडच आहे.

वरील गोष्टीचें प्रत्यंतर विवाह खेरीजकरून इतर बाबतींत, ह्मणजे जेव्हां वरिष्ठ वर्गांतील मुलीस धर्मकृत्याकरितां, कलाकौशल्याकरितां किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक कामाकरितां आपल्या आईबापांचें घर सोडून जावें लागतें तेव्हां स्पष्टपणें दिसून येतें. अशावेळीं तिचे आईबाप जरी चांगले सशक्त असले व दुसऱ्या पांच सहा मुली जरी त्यांस असल्या तरी लोक त्या साहसी मुलीला दोष देतात, आणि ह्मणतात, 'तिनें आपल्या आईबापांच्या सेवेंत असावें, तें सोडून इकडे तिकडे भलत्यासलत्या कामासाठीं जाऊं नये.'

तेव्हां या सर्व बाबतींत एक सर्व साधारण नियम घालून देतां येईल. आईला किंवा बापाला जोंपर्यंत मुलीची जरूर आहे तोंपर्यंत तिनें त्यांस सोडून देऊन लग्न करूं नये किंवा मठांत राहून जोगीण बनूं नये, किंवा दुसऱ्या कोणत्याही उद्योगास लागूं नये. जर तिच्या आईबापांस तिची जरूर नसेल तर प्रौढ वय झाल्यावर लग्न करण्यास किंवा मठाचा स्वीकार करण्यास तिला मोकळीक आहे. वरील नियम दिसण्यांत फार कडक दिसतो; त्यांत पुष्कळ सद्गुण असावा लागतो; कारण, एखादे वेळेस मुलीला सर्व जन्मभर आपल्या सुखाचा त्याग करावा लागणार. परंतु आपलें कर्तव्य जेथें बजाविणें आहे तेथें अशा प्रकारचा स्वार्थत्याग करण्यास तिनें तत्पर असलें पाहिजे. आईबाप आपल्या मुलांकरितां सदैव स्वार्थत्याग करीत असतात. हजारों आईबाप आपल्या मुलांच्या कल्याणाकरितां रात्रंदिवस कष्ट सोसून आपली शरीरप्रकृती बिघडून घेतात, व सर्व सुखाचा त्याग करितात. तर मग मुलांनीं आपल्या आईबापांसंबंधी आपलें कर्तव्य बजाविण्यासाठीं स्वार्थत्याग करण्यास कां तयार असूं नये? आईबापांस आपली जेव्हां गरज असेल तेव्हां त्यांची सेवा करण्याविषयीं पूर्ण तत्परता असणें आणि त्यांच्याविषयीं नेहमीं जरूर ती काळजी बाळगणें हेंच पितृभक्तीचें खरें लक्षण होय असें मला वाटतें.

कित्येक लोकांच्या वृद्धावस्थेंत आपलपोटेपणा इतका वाढलेला असतो कीं, त्यांच्या ठिकाणीं 'साठी आणि बुद्धि नाटी' असा प्रकार आपण पाहतों. अशावेळीं मुलांनीं त्यांच्याशीं कसें वागावें हा एक मोठा बिकट प्रश्न आहे. अशा शोचनीय स्थितींत सुद्धां मुलांनीं आपली पितृभक्ति दाखवितांना हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ज्यांचें आपल्यास हित करावयाचें त्यांचें नैतिक हित करणें हेंच आपलें पहिलें कर्तव्य आहे; आणि आईबापांचे इच्छेस अनुसरून वागल्यानें आपल्याकडून नैतिक दोष होण्याचा जर संभव दिसला तर ते दोष न होऊं देणें हेंही आपलें कर्तव्य आहे. यास्तव, अशा प्रसंगीं मुलीनें फार नम्रपणानें व आदरानें दुसऱ्यांच्या गरजा व अडचणी आपल्या आईबापांच्या नजरेस आणण्याची काळजी बाळगिली पाहिजे. आणि त्यांची स्वार्थपरता कमी करण्याचा यत्न केला पाहिजे.

वरिष्ट वर्गांतील शेंकडों मुलींच्या वागणुकीच्या संबंधानें हल्लीं एक मोठी अडचण आढळून येते. त्यांच्या डोळ्यांपुढें दोन परस्परविरोधी मार्ग दिसतात; आणि त्यांतून आपण कोणता धरावा हें त्यांस समजत नाहीं. एका बाजूस लहानपणच्या संवया आणि प्रौढ वयांत सुद्धां लहान मुलांप्रमाणें नम्रपणा व आज्ञाधारकपणा बाळगण्याविषयीं मिळालेलें शिक्षण; आणि दुसऱ्या बाजूस लहान मुलांच्या आंगीं जात्याच असणारी बागडण्यावि-

षयीं, इकडून तिकडे जाण्याविषयीं, झाडावर चढण्याविषयीं, धांवण्याविषयीं, सारांश आंगांत असलेल्या स्नायूंचा व शक्तीचा उपयोग करण्याविषयींची इच्छा, अशी स्थिती आहे. ह्मणजे, एक मार्ग परतंत्रतेचा; व दुसरा मार्ग स्वतंत्रतेचा. पक्ष्याच्या पिलास घरटें कितीही नरम असलें तरी तें सोडून बाहेर उडावेंसें वाटतें. सशाचें पिलूं आपलें निर्भय स्थान सोडून बाहेर जातें. आणि जरी त्यांच्या सभोंवतीं ससाणे व लांडगे टपत बसलेले असले तरी त्यांनीं बाहेर फिरणें हेंच त्यांच्या वयास उचित व योग्य होय असें आपण समजतों. मुलीस मात्र आह्मीं तशा प्रकारें वागतांना पाहिलें ह्मणजे तिच्या त्या स्वभावास आह्मी दोष देतों, व तिला दोषी समजतों. "घरांत तुला काय कमी आहे? घरांत राहून तुला समाधान वाटत नाहीं काय?" असें तिला आह्मी ह्मणतों. अशाप्रकारें आह्मीं तिला जाच केला ह्मणजे बाहेर गेल्यानें जणुं काय आपल्या हातून गुन्हा घडला आहे असें तिला वाटतें. हा प्रकार सतत चालू आहे व शेंकडों घराण्यांमध्यें वारंवार दिसून येतो. आपल्या मुलाला "भाकरीच्या ऐवजीं दगड" खाऊं देणारा किंवा "मासळीच्या ऐवजीं सर्प" खाऊं देणारा बाप या जगांत मिळणें फार विरळा; परंतु वरिष्ठ दर्जाच्या मुलींस विद्येची क्षुधा लागली असतां त्यांस विद्येच्या ऐवजीं हिरे, माणिकरूपी दगड खाऊं घालतात व आरोग्यवर्धक उ-

द्योग करण्याची त्यांची इच्छा असतां त्यांच्या गळ्यांत ऐषआरामरूप सर्पाचे हार घालतात असे आईबाप पुष्कळ आहेत.

या विषयावर मी जास्त कडकपणानें बोलत आहें याबद्दल तुह्मी मला क्षमा करा. कारण, हल्लींच्या प्रसंगीं आमच्या स्त्रीजातीच्या स्थितीस वरील गोष्टीपासूनच मोठा धोका पोहोंचत आहे असें मी समजतें. लहान मुलींच्या ठिकाणीं असलेला उत्साह आणि त्यांच्या सदिच्छा हीं अशा रीतीनें एकसारखीं खुंटून टाकण्यांत व नाहींशीं करण्यांत येत आहेत कीं, पुढें स्वतंत्रपणें वागण्याची वेळ आली ह्मणजे या गुणांचा त्यांस उपयोग करितां येत नाहीं; त्यांची मानसिक वाढ खुंटते; त्या मनानें खुज्या होतात; त्यांना फारसें चांगलें होतां येत नाहीं, किंवा त्यांच्या हातून फारशीं चांगलीं कृत्यें होऊं शकत नाहींत हें पाहून मला फार वाईट वाटतें.

सारांश, आह्मी मोठ्या झालों तरी पुरुष आह्मांला अज्ञान मुलांप्रमाणें वागविण्याचा आग्रह धरितात अशी आह्मी स्त्रिया पुरुषांविषयीं कुरकुर करितों. ही कुरकुर मुलींची आपल्या आईबापांविषयीं बऱ्याच बाबतींत यथार्थ आहे. व्यायाम करण्याकरितां किंवा प्रत्येक अवयवास शक्ति येण्याकरितां सैल कपडे असण्याची जरूरी असतां त्यांस तंग कपडे घालावयास लावून आंखडून

टाकतात. आतां फाजील स्वातंत्र्य मिळालेल्या व वाईट सहवासांत असलेल्या मुलींवर आईबापांचा दाब विशेष असण्याची आवश्यकता आहे, हें खरें आहे. व तसें नसल्यास धोका येण्याचा संभव आहे. पण माझा अनुभव असा आहे कीं लहान मुलींवर निरुपद्रवी गोष्टींच्या संबंधानें फाजील दाब ठेवल्यानें ज्या मुलींचें जन्माचें मातेरें झालें आहे, अशांशीं वरील अपवादांची तुलना केली असतां ते अपवाद फारच थोडे असें ह्मटलें तरी चालेल. कनिष्ठ वर्गांत फाजील दाबाचे वाईट परिणाम नाहींत. वरिष्ठ वर्गाच्या मुलींना चैनींत दिवस घालविण्यास व अविचारीपणानें उधळपट्टी करून नवे नवे कपडे व तऱ्हा करण्यास मोकळीक व उत्तेजन मिळतें, आणि जेणेंकरून त्यांची उन्नति होईल किंवा त्या योग्य स्वार्थत्याग करण्यास शिकतील अशा त्यांच्या प्रत्येक यत्नांवर दाब ठेवण्यांत येतो, तो इतका कीं शेवटीं त्यांचा निरुपाय होऊन त्या संसार सोडून मठांत जाऊन जोगिणी बनतात. याचा दोष त्यांच्याकडे नाहीं; कारण, हल्लीं हाच काय तो वरिष्ठ वर्गांतील स्त्रियांला परोपकाराच्या कामीं देह झिजविण्याचा सुलभ मार्ग राहिला आहे.

आतां आपण **भगिनींच्या कर्तव्यांचा** विचार करूं. बंधुभगिनींनीं परस्परांवर प्रथम परहितेच्छा दाखविली पाहिजे, हें त्यांच्या सहोदरत्वाच्या नात्यावरून उघडच आहे. शिवाय साधारणपणें बालपणापासून एकमेकांविषयीं प्रेम

असतें तें इतकें वाढत जातें कीं, त्यापासून एकमेकांच्या मनांत परस्परांविषयीं कृतज्ञताबुद्धि उत्पन्न होते.

मिस ब्रेमर हिनें ह्मटलें आहे "प्रीतीचें साधारण लक्षण असें आहे कीं ज्याच्यावर आमची प्रीति असते त्याचे दोष आह्मांस दिसत नाहींत; परंतु ही गोष्ट बंधुभगिनींच्या प्रेमास लागू होत नाहीं." कारण, भाऊ आपल्या बहिणींचे नेहमीं दोष काढून त्यांस चिडवीत असतात. परंतु ही गोष्ट एकीकडे ठेविली तर इतर बाबतींत त्यांच्यापासून आह्मां बहिणींस फार आनंद होतो, व त्यांचा आह्मांस अभिमान वाटतो; आणि त्यामुळें साधारणपणें स्त्रियांस आपल्या बंधूंच्या उपयोगीं पडून त्यांना नेहमीं आनंदित करण्याविषयीं सांगण्याची गरज पडत नाहीं. तसेंच आपल्या भावाचें धर्मसंबंधी व नैतिक कल्याण, आरोग्य व सुख, यांविषयीं काळजी वाहणें हें आपलें कर्तव्य आहे असा त्यांचा दृढ समज असतो.

बहिणीच्या हातून आणि विशेषतः आईच्या हातून पुष्कळ वेळां एक चुकी होत असते, तिकडे त्यांचें लक्ष पोंहोंचलें पाहिजे. ती ही कीं, भगिनी बंधूचे व माता पुत्राचे विशेष लाड करीत असते. तशांतून मुलगा बहुधा पाठशाळेंत असून क्वचित्प्रसंगीं घरीं येणारा असला ह्मणजे मग तर त्या लाडांस मर्यादाच राहत नाहीं. यामुळें आईस व बहिणीस त्या लहान मुलाच्या संतोषाकरितां किंवा फायद्याकरितां एकंदर आपल्या सु-

खाचा त्याग करण्याची संवय लागते; आणि त्यापासून त्या मुलाच्या भावी स्थितीवर व वर्तणुकीवर फार अनिष्ट परिणाम होतात. मुलास, बाळपणीं जेव्हां सुटीच्या दिवसांत तो घरीं येतो त्यावेळीं स्त्रियांकडून एकसारखें आपलपोटेपणाचें शिक्षण मिळतें. त्याच्या स्वतःच्या संतोषाकरितां मुलींनीं व स्त्रियांनीं आपलें हित, आपला अभ्यास व आपलें सुख हीं एकीकडे ठेवणें हें त्यांचें कर्तव्यच आहे असा त्याचा समज होत जातो, याचा परिणाम स्त्रियांस व विशेषेंकरून त्याच्या बायकोस पुढें भोगावा लागतो.

**बहिणीचें बहिणीसंबंधी कर्तव्य**—हें भावासंबंधी कर्तव्यापेक्षां अधिक जवळचें व अधिक नाजूक आहे. याप्रेमामध्यें व दुसरे जवळचे नातलग ह्मणजे काका, मामा, मावशी वगैरे यांच्यावरील प्रेमामध्यें वारंवार एक उणीव दिसून येते; ती उणीव कोणती ह्मणाल तर सौम्यपणा. "अतिपरिचयादवज्ञा" अशी ह्मण आहे; ती कांहीं खोटी नाहीं. इतर मित्रांशीं वागतांना जो आह्मी थोडाबहुत सौम्यपणा दाखवितों तो यांच्याशीं वागतांना दाखवीत नाहीं. तसेंच त्यांचे दोष किंवा त्यांच्यावर आलेले प्रसंग यांविषयीं बोलतांना त्यांना फार टाकून बोलतों. या दोन गोष्टी आमच्या नातलगांस पुष्कळ अंशीं आमच्यापासून दूर करण्यास कारण होतात. जर आमच्या जवळच्या नातलगांस विशेष परहितेच्छा दाखविणें हें आमचें कर्तव्य आहे,

तर मग प्रत्येकवेळीं त्यांना दुखविणें, उदासीन करणें व कांहीं तरी हृदयभेदक शब्द बोलून, वर्मे काढून किंवा टोंचून त्यांची आह्मांवरील स्वाभाविक प्रीति नाहींशी करून टाकणें हें योग्य आहे काय? यांचें खरोखर कल्याण आमच्या हातून केव्हांतरी एखादे वेळ होण्याचा संभव असतो; पण त्यांचें मन दुखविणें, किंवा त्यांस खुष करणें हें मात्र ( ते आमच्याबरोबरच राहत असले तर ) दिवसांतून पन्नास वेळां आह्मांस करितां येईल. जी बहीण आपल्या बहिणीच्या वास्तविक कल्याणासाठीं ह्मणून विशेष प्रसंगाची वाट पहात बसते, परंतु तिला पदोपदीं चिडविते, टोंचून बोलते, तिची मानहानी करते, आणि तिला पुरेपुरे करून सोडते तिची दिशा सर्वथैव चुकली आहे यांत कांहीं संशय नाहीं. खरी परहितेच्छा ह्मटली ह्मणजे सुखी करण्याची इच्छा; हिचें लक्षण निराळेंच आहे.

नैसर्गिक नात्यापासून जी कर्तव्याची जबाबदारी आलेली आहे तिच्या संबंधानें एथें जास्त विस्तार करण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. ती जबाबदारी पवित्र व कल्याणकारक आहे. माझें असें मत आहे कीं, आमच्यापैकीं उत्तम व सर्वांत सुखी मनुष्यांस सुद्धां वरील कर्तव्याचें सुंदर स्वरूप अर्धवट अवगत असतें. तें पूर्णपणें समजण्यास परलोकाची वाट पाहिली पाहिजे.

पुढल्या व्याख्यानांत पत्नीचें कर्तव्य आणि घरच्या मालकिणीचें कर्तव्य या बिकट प्रश्नांचा विचार करण्यांत येईल.

## व्याख्यान ४ थें.

## परस्पराभिवचनावलम्बी कर्तव्यें.

### पत्नी–मित्र.

एवढा वेळपर्यंत एकाच रक्ताचे जे नातलग (आईबाप व मुलें, बहिणी, भाऊ इ.) आहेत त्यांच्या संबंधानें उत्पन्न होणाऱ्या कर्तव्यांचा विचार करण्यांत आला. आतां परस्परांच्या अभिवचनावरून, ह्मणजे, कराराच्या आधारावरून उत्पन्न होणाऱ्या अतिमहत्वाच्या कर्तव्यांचा विचार करावयाचा आहे. त्यांत वैवाहिक करारामुळें उत्पन्न झालेलें कर्तव्य सर्वांत श्रेष्ठ असल्यामुळें त्याचा प्रथम विचार करूं. बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांत स्त्रीपुरुषांमध्यें विवाहविधिपूर्वक जे करार होतात त्यांत दोन स्वाभाविक आणि एक मनुष्यकृत अशा तीन कर्तव्यांचा समावेश होतो.

१ पति व पत्नी यांचा **ऐक्यभाव** आणि परस्परांशीं **अव्यभिचरित विश्वासूपणा** हाच कायतो विवाहकालीं घेण्यांत येणाऱ्या शपथेचा मुख्य विषय आहे. व ही शपथ ज्या लोकांत एकच बायको किंवा एकच नवरा करण्याची चाल आहे त्या लोकांत महत्वाची आहे.

परंतु अशा तऱ्हेचा एकदां उभय पक्षांमध्यें करार झाला ह्मणजे त्या दोघांमध्यें परस्परांशीं संबंध इतका निकट होतो कीं, तसा दुसऱ्या कोणत्याही मानवी करा-

रानें होत नाहीं. यामुळें परस्परांविषयीं [1]परहितेच्छा असणें आणि इतरांपेक्षां परस्परांच्या कल्याणार्थ झटणें हेंच मुख्य कर्तव्य होतें. मात्र या नियमानें ज्यांच्या ऋणांत आह्मी अगोदरच असतों आणि ज्यांचें ऋण या नव्या करारानें नाहींसें होत नाहीं, त्यांच्या हक्कास बाध येत नाहीं; कारण, त्यांचा हक्क सर्वांत पहिला आहे. वर सांगितलेल्या पहिल्या अभिवचनास जें दुसरें अभिवचन जोडलें जातें तें फार योग्य व शहाणपणाचें आहे. पहिलें अभिवचन ह्मणजे परस्परांशीं अव्यभिचरित विश्वासूपणानें वागण्याचें; तें अगदीं साधें आहे. या अभिवचनाशीं दुसऱ्या एका अभिवचनाची सांगड घातली आहे. तें सुखदुःखांत एकमेकांच्या बरोबर असणें, संपत्तिविपत्तींत परस्परांस मान व उत्साह देणें हें होय. हें कर्तव्य सर्वांस कबूल आहे; आणि शपथ घेऊन त्यास बळकटी आणण्यांत येते. परंतु शपथ घेतलेली असो वा नसो, वास्तविक पाहिलें ह्मणजे विवाहाच्या संबंधानें हें दुसरें कर्तव्य स्वाभाविकपणेंच आलेलें असतें. या दोन शपथांशिवाय तिसरी एक शपथ ख्रिस्ती व इतर धर्मांमध्यें बायकांना घ्यावी लागते. ती शपथ "मी माझ्या

---

१ परहितेच्छा या शब्दाचा अर्थ पृष्ठ ८१ वर दिलेला आहे तो वाचकांनीं लक्षांत ठेवावा. आपण खेरीजकरून दुसऱ्याच्या हिताची इच्छा ती परहितेच्छा. तसेंच आपण खेरीजकरून दुसऱ्याच्या हिताविषयीं जें कर्तव्य तें सामाजिक कर्तव्य.

पतीची आज्ञा पाळीन" अशी आहे. याविषयीं मी क्र-मानुसार बोलेन.

सर्व जगाला वरील तीन शपथांपैकीं पहिल्या शपथेची पवित्रता मान्य आहे; आणि मुख्यत्वेंकरून पत्नीच्या बाबतींत तर सर्वथैव मान्य आहे. या शपथेच्या भंगास ह्मणजे व्यभिचाराच्या गुन्ह्यास शिक्षा देण्याकरितां यूरोपांत पूर्वींप्रमाणें कायदे नाहींत; तरी अशा माणसास साधारणतः समाजाकडून बहिष्काराची शिक्षा देण्यांत येते. ईश्वर करो आणि ही शिक्षा तरी कायम राहो. मी असें ह्मणतें ह्मणून तुह्मी मला कठोर समजाल. परंतु विचारांतीं माझें असें दृढ मत झालें आहे कीं, ज्या स्त्रीनें हा पवित्रतेचा नियम आणि वैवाहिक अभिवचन यांचा भंग करून स्वतःसंबंधी आणि सामाजिक असा दुहेरी भयंकर अपराध केला आहे आणि आपल्या पतीस मरणप्राय दुःखांत टाकलें आहे, त्या स्त्रीला समाजानें आपल्या दारांतसुद्धां उभें करूं नये हेंच योग्य होय. यासंबंधानें मी आणखी पुढें बोलेन.

आपल्या पतीविषयीं परहितेच्छा ठेवणें हें स्त्रियांचें आवडतें कर्तव्य आहे. याचा विचार करतांना आपण ज्याचें हित इच्छितों, त्याचें नैतिक बाबतींत हित करणें हें प्रत्येक स्त्रीचें प्रथम कर्तव्य आहे असें आढळून येईल. धर्माच्या बाबतींत आपल्या पतीच्या हिताविषयीं स्त्रिया दक्षता ठेवीत नाहींत अशाप्रकारचा

दोष साधारणपणें स्त्रियांवर येऊं शकत नाहीं. उलट पक्षीं, त्यांच्या अविचारी समजुतीप्रमाणें जें जें कांहीं ह्मणून मोक्षसाधनास अवश्य आहे असें त्यांस वाटतें तें मानण्याविषयीं त्या आपल्या पतीची धूम पाठ पुरवितात. स्त्रियांच्या धर्मसंबंधी समजुती जर अज्ञान-मूलक नसत्या, तर विचारी पतीस आपल्या शुद्धाचरणी पत्नीबरोबर अध्यात्मिक सुखाचा लाभ घेतां आला असता. आतां पतीच्या नैतिक कल्याणाविषयीं स्त्रियांचें लक्ष किती आहे हें जर पाहूं गेलें तर तें मात्र फारच थोडें आहे असें दिसून येईल. पुष्कळदां असें आढळून आलें आहे कीं पुरुषाचे विचार प्रथम उन्नत व निरपेक्ष असतात. तो पत्नीच्या सहवासांत राहूं लागला ह्मणजे मग दिवसेंदिवस त्याचे ते विचार कोते होत जातात. त्या पत्नीचा हेतु आपल्या पतीविषयीं चांगला असतो आणि ती जें कांहीं करिते तें शुद्धभावानें करिते. तर मग पतीचे विचार कोते कां व्हावे असा प्रश्न साहजिक-पणें उद्भवतो. पत्नीची ममता कोती, परिमित व एकदेशी असल्यामुळें, ज्यांकरितां स्वार्थत्याग करण्याची त्याची इच्छा असते त्यांच्याविषयीं त्याला विचार करूं न देतां, ती वरचेवर पतीस केवळ आपल्या पुरतें पहा, असा तगादा लावीत असते. "त्या थेरड्या आळशी मित्राला जेवायाला कशाला बोलावतां? आज त्या धर्म-कार्याकरितां जाण्याची कांहीं जरूरी नाहीं, तुह्मांला पडसें

झालें आहे, उद्यां गेलें तरी चालेल. त्या सभेचे तुह्मी सभासद होऊं नका, तुह्मांला त्रास होईल. कृपाकरून चार दिवस घरीं स्वस्थ बसा. तुह्मांला पाहिजे तर गाडी घोडा विकत घ्या. तुमचीं सुधारलेलीं मतें तुह्मी आपल्याकडे ठेवा, बोलून तरी दाखवूं नका." अशाप्रकारचे उद्गार वरचेवर नेहमीं कानीं पडूं लागले ह्मणजे ज्याप्रमाणें चहाच्या पेल्यांत साखरेचें प्रमाण हळूहळू वाढवीत गेल्यानें गोड चहा घेण्याची संवय होते, त्याप्रमाणें हळूहळू स्वार्थपरतेचें प्रमाण वाढत जाऊन शेवटीं पुरुषाचा स्वभाव बदलून जातो. आरंभीं तो पुरुष आपल्या पत्नीचा असा मंजूळ उपदेश झुगारून देण्यांत थोडासा पुरुषार्थ समजतो; नंतर तो विक्षिप्तपणें कसा तरी वागूं लागतो आणि शेवटीं तो अगदीं तिच्या सांगण्याप्रमाणें वागून पक्का मूढ बनतो. अशाच प्रकारची स्थिति बायकोची सुद्धां नवऱ्याच्या सहवासानें बनते. तोही तिला थोडा बहुत त्रास होईल किंवा मेहनत पडेल या भीतीनें कोणतेंही त्रासाचें कर्तव्य न बजावण्याविषयीं तिची विनवणी करितो. तीही त्रास न घेण्याविषयीं आपल्या पतीची विनवणी करिते. असें होतां होतां 'मी आणि माझा नाऱ्या' या ह्मणीप्रमाणें दोघेंही पूर्ण आपस्वार्थी बनतात. माझी अशी खात्री आहे कीं या गोष्टीची साक्ष तुह्मांपैकीं कित्येकांस पटलीच असेल. जर स्त्री आपल्या पतीच्या आंगीं असलेल्या उन्नत विचारांस व उदार स्व-

भावास मुळापासून उत्तेजन देईल आणि जर पती सुद्धां आपल्याकडून आपले पत्नीस स्त्रीजातीस शोभतील असे परोपकार व सत्कृत्यें करण्यास उत्तेजन देईल तर त्यापासून एकमेकांच्या मनावर उत्तरोत्तर फार चांगला परिणाम होत जाईल, त्यांस उन्नतावस्था प्राप्त होईल, त्यांचें परस्परांविषयीं प्रेम अधिकाधिक वाढेल आणि शेवटीं त्यांच्या अशा पवित्र आणि शुभदायक ऐक्यामुळें त्यांना स्वर्गसुख प्राप्त होईल. वस्तुतः विवाह ह्मटला ह्मणजे असाच असला पाहिजे. आणि कांहीं निवडक दंपत्यांच्या बाबतींत तो अशाच प्रकारचा असतो; आणि सर्वांस तो तसा करून घेतां येण्यासारखा आहे.

सुधारलेल्या नैतिक विचारांच्या साह्यानें स्त्रिया आपल्या पतींस पुष्कळ प्रकारें अधिकाधिक सुख देऊं शकतील. याविषयीं मला पुष्कळ बोलावयाचें होतें, परंतु वेळ थोडा आहे ह्मणून त्यांतील एक प्रकार येथें सांगतें. **कुशलता** ही एक मोठी उत्तम मौल्यवान देणगी आहे. परंतु तिचा उपयोग उघडपणें व शुद्धभावानें केला पाहिजे; नाहीं तर या कुशलतेचा दुरुपयोग पतीला आपल्या मुठींत धरून ठेवण्याच्या कामीं शेंकडों स्त्रिया करितात. हा परिणाम स्त्रियांचे ठिकाणीं आलेल्या अत्यंत परवशतेचा आहे. पुष्कळ चांगल्या चांगल्या स्त्रियांच्या आंगीं हा गुण आढळतो. त्यांना कुटुंबाच्या कल्याणाकरितां, किंवा मुलांच्या विद्याभ्यासासंबंधी कित्येक

चांगल्या गोष्टी जरी करावयाच्या असल्या तरी त्यांसाठीं त्या हलकट युक्तयांची योजना करितात, तसेंच खोटसाळपणा व तोंडापुरता लुब्रेपणा करितात. असें करणें हें निंदास्पद आहे. माझ्या मैत्रिणींनों, तुह्मांला कितीही अडचणी आल्या तरी तुह्मी आपलें कार्य साधण्यास अशा हलकट मार्गाचें अवलम्बन करूं नका. तुह्मांला वाटत असेल कीं अशा मोठ्या कुशलतेनें आपल्या पतीला स्वाधीन ठेवल्यापासून त्याचेंच आपण कल्याण करीत आहों आणि त्यालाच त्यापासून सुख होईल. पण तुह्मी हें खास समजा कीं, तुमची ही प्रत्येक दिवसाची लबाडी जरी तुमच्या पतीच्या लक्षांत आली नाहीं, तरी, आपल्याशीं आपली पत्नी मोकळया मनानें वागत नाहीं; तिच्या मनांत काय आहे हें ती आपणास समजूं देत नाहीं आणि ती आपल्यापासून कांहीं चोरून ठेवीत आहे असें त्याला नेहमीं वाटत असतें. आणि असें झालें ह्मणजे तो अशा पत्नीवर विश्वास ठेवीत नाहीं, तिला तो भितो आणि तिचा तिरस्कार करितो. अशा रीतीनें वैवाहिक-स्थिति कलुषित होते. सारांश, जितक्या जितक्या युक्त्या तुह्मी लढवाल तितका तितका तुमचा डाव अधिक फसेल.

आतां, या विषयाचा मुख्य भाग, ह्मणजे, तिसरी शपथ, इचा विचार करूं. बहुतेक धर्मांमध्यें विवाहकालीं वधूस ‘मी आपल्या पतीची आज्ञा पाळीन’ ही शपथ घ्यावी लागते. या संबंधानें थोडासा विचार करणें आहे.

ही शपथ कां घेण्यांत येते याविषयीं कारणें दाखविण्यांत येतात हें खरें आहे. परंतु आधीं शपथ घेण्यास लावण्याची चाल पडलेली आहे आणि मग तिचें समर्थन करण्यासाठीं मागाहून कारणें शोधून काढलेलीं आहेत, असा संशय घेण्यास सबळ आधार आहे. जेथें जेथें 'बळी तो कान पिळी' असा न्याय आहे तेथें तेथें स्त्रियांना पतीची आज्ञा पाळण्याची सक्ती केली जाते. आणि वरील शपथेमुळें स्त्रियांची स्वाभाविक परवशता द्विगुणित होते. आणि अशा रीतीनें त्यांचे पूर्णपणें हातपाय बांधण्यांत येतात.

कित्येक लोक धर्मशास्त्राचा आधार या गोष्टीच्या समर्थनाकरितां दाखवितात. पॉल नामक ख्रिस्ती धर्मप्रचारकानें असें ह्मटलें आहे कीं, 'स्त्रीनें आपल्या पतीस ईश्वराच्या ठिकाणीं मानून त्याची आज्ञा पाळावी.' या उक्तीवरून स्त्रीनें वरील प्रकारची शपथ घेणें आणि ती पाळणें हें स्त्रीचें कर्तव्य आहे असें कित्येक ह्मणतात. या मुद्याचा योग्यरीतीनें मला विचार करितां येत नाहीं. कारण, नीतिशास्त्राच्या मुद्याचा धर्मशास्त्रांतील वाक्यानें निर्णय करूं पहाणाऱ्या लोकांइतका धर्मभोळेपणा माझ्या आंगीं नाहीं. परंतु वरील शपथेच्या समर्थनार्थ जे लोक पॉल याच्या पत्रांतून आधार काढून दाखवितात, त्यांस मी त्याच साधूच्या दुसऱ्या एका पत्रांतील त्याच मासल्याचें एक वचन दाखवितें. त्याला या लोकांनीं वरील

वचनाइतकें महत्व दिलें पाहिजे होतें. या दुसऱ्या पत्रांत त्यानें गुलामांस आपल्या धन्याच्या आज्ञेंत राहण्याचा उपदेश केला आहे. फार तर काय पळून जाणाऱ्या गुलामाला पकडून त्याला परत त्याच्या धन्याच्या स्वाधीन करण्याविषयीं सांगितलें आहे. आतां हा उपदेश हल्लींच्या काळीं कोणत्या रीतीनें पाळला जातो हें पाहिलें असतां प्रस्तुतकालचा अमेरिकेंतील खरा ख्रिस्ती पुरुष किंवा स्त्री हा उपदेश एकीकडे ठेवून अशा गुलामाची मुक्तता करण्यास मदत करील असें दृष्टीस पडेल. प्रारंभीं ख्रिस्ती उपदेशकांचा एकंदर रोख अधिकाऱ्यांशीं अगदीं नम्रपणें वागावें अशा प्रकारचा होता. मग ते अधिकारी कितीही जुलमी असले तरी चिंता नाहीं. पॉल याचा वरील उपदेश हल्लींच्या काळीं धनी आणि गुलाम, जुलमी राजा आणि प्रजा यांच्या संबंधानें प्रायः एकीकडे झुगारून देण्यांत येतो, आणि तो पूर्वीच्या काळीं कायतो ठीक होता, हल्लींच्या काळीं तो उपयोगी नाहीं असें ह्मणण्यांत येतें. असें जर आहे तर स्त्रियांच्या आज्ञाधारकपणापुरताच वरील पत्राचा आधार घेण्याचा हक्क अशा लोकांला कसा पोहोंचतो हें मला समजत नाहीं.

हे लोक आणखी एक दुसरें कारण दाखवितात तें असें कीं, स्त्रियांनीं पतीची आज्ञा पाळल्यापासून सामाजिक सोय फार आहे. ही सोय अगदीं आवश्यक

असून पुष्कळ दिवसांपासून तिचा चांगुलपणा अनुभवास आलेला आहे. स्त्री आणि पुरुष या दोघांचा एक विचार झाला नाहीं तर दोघांचें जुळणार कसें हा प्रश्न जुना असून योग्य आहे. परंतु प्रस्तुतकाळीं या लोकांकडून निराळाच प्रश्न विचारण्यांत येतो. तो असा. दोघांतून एकाला आपल्या ह्मणण्याप्रमाणें संसार चालविण्याची पूर्ण सत्ता असल्याशिवाय दोघांचें एकत्र चालेल तरी कसें ? ही कल्पना यांच्या डोक्यांत इतकी भरून राहिली आहे कीं, एक धनी आणि दुसरा चाकर याखेरीज दुसरी कोणती जरी व्यवस्था केली तरी तिजपासून कुटुंबांत घोंटाळा उडून जाण्याचा धोका आहे असें त्यांना वाटतें. माझ्या मैत्रिणींनो, तुह्मीच आतां सांगा पाहूं, जेथें जेथें ह्मणून जुलुमानें अधिकार चालविण्यांत येतो तेथें तेथें सत्ताधारी लोक आपल्या वर्तणुकीचें अशाच रीतीनें समर्थन करीत नाहींत काय ? ते सत्ताधारी लहान मोठे राजे असोत, किंवा धर्मगुरु असोत, घरांत असोत किंवा बाहेर असोत, आपण अशा रीतीनें वागणें हेंच हितावह आणि सोईचें आहे आणि ज्यांवर सत्ता चालवितों त्यांच्या हितासाठीं आणि संरक्षणासाठीं अत्यावश्यक आहे असें ते ह्मणतात. मेंढरांनीं आपल्या मेंढपाळाच्या कह्यांत राहावें ह्यांतच त्यांचें कल्याण आहे, अशी छाप बसवून क्याथलिक लोकांचे धर्मगुरु लोकांची बुद्धि आणि विचारशक्ति यांस दडपून

टाकीत नाहींत काय? लोकांनीं मिळून आपलीं राज्यें चालवावीं त्यापेक्षां, स्वतंत्र आणि सर्व सत्ताधारी एका बादशहानें सर्व लोकांवर राज्य करावें यांत लोकांचें हित आहे, या बाहण्यावरून प्रत्येक मोठ्या राष्ट्राची स्थापना झाली नाहीं काय? धर्ममतें निश्चित करण्याकरितां पूर्ण सत्ताधारी कोणी तरी एक धर्मगुरु असल्याशिवाय धर्म कसा राहील? एकच पूर्ण सत्ताधीश राजा असल्याशिवाय राज्य कसें चालेल? घरांतील सर्व प्रश्नांचा आपल्या मर्जीनुरूप निकाल लावणारा कोणी तरी एक मालक कुटुंबांत असल्याशिवाय कुटुंब कसें चालेल? या सर्व प्रश्नांचें बहुतेक स्वरूप सारखेंच आहे. पण ज्याअर्थी पुष्कळ धर्मप्रचारकांनीं एकत्र जमून विचार केल्यानें धर्माची जास्त भरभराटी होते; ज्याअर्थी आमच्या भाग्यशाली इंग्लंद देशाप्रमाणें कोट्यावधि विचारस्वातंत्र्य असणाऱ्या लोकांनीं चालविलेलें प्रजासत्ताक राज्य जास्त विजयी होतें आणि भरभराटीस चढतें, त्याअर्थी ममतेच्या पाशांनीं एकवट झालेलें लहानसें कुटुंब चिमुकल्या प्रजासत्ताक राज्याच्या धर्तीवर जास्त सोप्या रीतीनें, आनंदानें, शांततेनें आणि भरभराटीनें चालेल यांत संशय नाहीं.

वर सांगितलेले दोन प्रकार शास्त्राधार आणि सामाजिक हित अथवा सोय यांजवरून आज्ञाधारकपणाचें समर्थन करण्याचे झाले. यांच्या शिवाय तिसरा एक

समर्थनाचा प्रकार आहे. कुटुंबाच्या साधारण हितासाठीं किंवा राष्ट्राच्या हितासाठीं स्त्रियांनीं पतीची आज्ञा पाळली पाहिजे असें आमचें ह्मणणें नाहीं, तर त्यापासून आज्ञा पाळणाऱ्या स्त्रीसच सुख मिळतें आणि तिच्यावरचें जबाबदारीचें ओझें निघून गेल्यामुळें तिच्या मनास शांतता प्राप्त होते, असें कांहीं लोक ह्मणतात. तर मग माझी सदसद्विवेकबुद्धि फारच निष्ठुर आहे असेंच ह्मटलें पाहिजे. कारण, लग्न केलें असतां आपल्यावरील सर्व जबाबदारी, नवरा जबाबदार झाल्यामुळें जुन्या फाटक्या जोड्याप्रमाणें आपल्यास एकीकडे सहज लोटून देतां येते, ही कल्पना आजपर्यंत माझ्या डोक्यांत कधींच शिरली नव्हती. मला जर नवरा असता तर त्याची आज्ञा पाळल्यानें माझ्यावरची कोणती जबाबदारी टळली असती? आपण उदाहरण घेऊं या. समजा कीं एक मूल तळ्यांत पडतांना दृष्टीस पडलें; आणि त्यावेळीं माझ्या नवऱ्यानें तें मूल बाहेर काढण्याचें तुला कारण नाहीं अशी मला आज्ञा केली; अशावेळीं ‘जशी आपली मर्जी’ असें ह्मणून जर मी आपल्या प्रियाच्या हातांत हात घालून पुढें चालती झालें तर माझ्यावरील जबाबदारी, नवऱ्याची आज्ञा पाळल्यामुळें नाहींशी झाली असें होईल काय? इंग्लंदांतील कायद्याच्या दृष्टीनें पाहिलें तर, जर माझ्या नवऱ्यानें स्वतः तें मूल तळ्यांत टाकलें असतें आणि मी जवळ उभी राहून त्याला मूल टाकण्याच्या कामीं मदत केली असती तर नवऱ्याची आज्ञा

मला पाळणें अवश्य होतें, या मुद्यावर मी निर्दोषी ठरलें असतें; परंतु माझ्या सदसद्विवेकशक्तीनें मला निर्दोषी ठरविलें असतें असें मात्र मला वाटत नाहीं.

दुसरें एखादें साधारण उदाहरण घेऊं या. समजा कीं माझी एक ह्मातारी मावशी आहे. ती स्वभावानें किरकिरीत आणि त्रासदायक आहे ( दुर्दैवानें कित्येकांचा वृद्धपणीं असा स्वभाव होतो ). पण तिचें मी लहान असतांना माझ्यावर अमर्याद प्रेम असे; तें इतकें कीं मी तिची उतराई होणेंच अशक्य आहे. आतां ती थेरडी भेरडी ह्मातारचळ लागलेली अशी आहे. ती माझ्या घरीं आली ह्मणजे माझ्या नवऱ्याला इतका त्रास देते कीं, त्याला घरांत राहणें सुद्धां नको असें करून सोडते. यास्तव, माझा नवरा तिला घरीं बोलावूं देत नाहीं, आणि तिच्या वृद्धवयांत जें थोडें बहुत सुखसमाधान माझ्यापासून होण्यासारखें आहे तें देण्याची मनाई करितो. अशा प्रसंगीं, मी त्या गरीब बिचाऱ्या मावशीला माझा कृतज्ञताधर्म विसरून 'तुला कळविण्यास फार वाईट वाटतें कीं, तुझा माझा कांहीं संबंध असूं नये, अशी माझ्या पतीची इच्छा आहे, आणि पतीची आज्ञा पाळणें हा माझा धर्म आहे' असें कळविल्यानें माझ्यावरची कृतज्ञतेमुळें आलेली जबाबदारी नाहींशी होईल काय ? सारांश, कोणताही अपराध होऊं न देण्याच्या कामीं अथवा कर्तव्य बजावण्याच्या कामीं आह्मांवर आलेलें जबाबदारीचें ओझें

दुसऱ्याच्या डोकीवर लादून आह्मी मोकळ्या होऊं असें ह्मणून चालणार नाहीं. माझा पति किंवा पिता हें ओझें माझ्याकडून घेऊं शकत नाहीं. कारण, मला एकाद्या कुत्र्याचा किंवा वेड्या मनुष्याचा जन्म न देतां स्वतंत्र विचारयुक्त प्राण्याच्या जन्मास ईश्वरानें घातलें तेव्हांच हें जबाबदारीचें ओझेंही त्यानें माझ्या शिरावर ठेवलें आहे. यास्तव, कोणत्याही देवालयांत कोणत्याही प्रकारची जरी मी शपथ घेतली असली तरी तीमुळें दुर्वर्तनास सद्वर्तनाचें स्वरूप किंवा सद्वर्तनास दुर्वर्तनाचें स्वरूप मिळूं शकणार नाहीं. कदाचित् शपथ घेणें यांतच पाप असूं शकेल. मला असें वाटतें कीं, जर शपथ घेतल्यानें त्या वेळापासून सद्वर्तन ठेवण्यास जास्त अडचणी येत असल्या तर अशी शपथ घेणें हें पातकच होय. इतकेंच नव्हे तर, सद्वर्तन न करण्याविषयीं घेतलेली कोणतीही शपथ आह्मांस बांधूं शकत नाहीं.

तर मग आतां ह्या गोष्टीचा स्पष्ट खुलासा आपण करूं या. जबाबदारी ह्मणजे नैतिक गोष्टींच्या संबंधानें आपल्या शिरावरचें कर्तव्याचें ओझें, असा जर अर्थ घेतला तर मनुष्याचें वय त्याला बरें वाईट समजण्याइतकें झालें ह्मणजे अशी जबाबदारी त्याला कोणत्याही कारणानें आ-पल्या शिरावरची काढून दुसऱ्याच्या शिरावर ठेवतां येत नाहीं, ही व्याख्या तुह्मीं ध्यानांत ठेविली पाहिजे. आई-बापांची आज्ञा पाळण्याच्या संबंधानें हा नियम ध्यानांत

ठेविला पाहिजे कीं अल्पवयस्क मुलींनीं ज्या गोष्टींचा बरे-वाईटपणा त्यांना अगदीं स्पष्टपणें समजतो तेवढ्या गोष्टी-खेरीज करून इतर गोष्टींत आपल्या आईबापांच्या अधि-काराखालीं नव्हे, तर त्यांच्या नैतिक विचारांप्रमाणें वागणें हें रास्त आहे. मला वाटतें कीं, एखादा मनुष्य आईबा-पांची आज्ञा सर्वथा मान्य करणारा जरी असला तरी तो कबूल करील कीं आईबापांनीं चोरी करण्याची आज्ञा केली तर ती मानतां कामा नये.

तर मग नवऱ्याच्या किंवा आईबापांच्या आंगावर लोटून देतां येईल अशी जबाबदारी तरी कोणती राहिली? नैतिक गोष्टींशीं जिचा संबंध नाहीं अशा प्रकारची ज-बाबदारी, ह्मणजे, कुटुंबाच्या खर्चवेंचाच्या वगैरे गो-ष्टींची जबाबदारी मात्र त्यांच्यावर लोटतां येईल. अशा प्रकारच्या पुष्कळ बाबतींत नवऱ्याचा शहाणपणा नेहमीं जास्त असतो. यास्तव, मिल्ल ह्मणतात त्याप्रमाणें नव-ऱ्यास पेढीवरील श्रेष्ठ भागीदार किंवा काम करणारा भागीदार याप्रमाणें समजावें. आणि मग जर कांहीं घों-टाळा झाल्यामुळें किंवा बुडत्या कुळांशीं व्यवहार ठेविल्या-मुळें पेढीस नुकसान झालें तर सर्व व्यवहार श्रेष्ठ भागी-दार पहात होता, माझा तिकडे कांहीं संबंध नव्हता; असें ह्मणून जसा दुसरा भागीदार समाधान करून घेईल तशा प्रकारची समजूत करून स्त्रीनें आपल्या मनाचें स-माधान होत असेल तर करून घ्यावें. बहुतकरून जर

ती शहाणी व हुशार बायको असली, तर अविचाराचा व्यवहार न करण्याविषयीं वरचेवर आपल्या पतीस सल्ला देण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतल्यावांचून राहणार नाहीं.

मुलांचें पालन आणि शिक्षण यांच्या बाबतींत तर आईला आपल्यावरची जबाबदारी दुसऱ्यावर लोटतां येणें अगदीं अशक्य आहे. बाळया घोड्यावरून पडून त्याच्या बरगड्या मोडल्या अथवा यमनीस देवी येऊन देवाज्ञा झाली तर द्वाड घोड्यावर बाळयास बसूं देण्याची अथवा देवीची सांथ आली आहे तिकडे यमनीला नेण्याची जबाबदारी मी सर्व माझ्या नवऱ्यावर टाकिली होती असें ह्मणून कांहीं आईच्या मनाचें समाधान होणार नाहीं.

स्त्रीनें पतीची आज्ञा पाळली पाहिजे या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ आणलेल्या मुद्यांचा जास्त विचार करण्याची जरूरी नाहीं. मला तर वरील मताचा नीतिशास्त्राच्या मूलतत्वांशीं (ह्मणजे वयांत आलेल्या प्रत्येक मनुष्यावर सद्वर्तनाची पूर्ण जबाबदारी आहे या तत्वाशीं ) मेळ पडत नाहीं असें आढळून येतें. येवढेंच नाहीं तर, प्रेम आणि ममता यांच्या स्वरूपाशीं तें मत अगदीं विरुद्ध आहे. त्यापासून प्रेम आणि ममता दृढ होतात असें समजणें मूर्खपण आहे. कारण जेथें प्रेम असतें तेथें आज्ञेची कल्पना सुद्धां राहूं शकत नाहीं. ज्या जोडप्यांमध्यें वास्तविक परस्परांविषयीं प्रेम आहे तीं दोघेंही एक दुसऱ्याची सेवा करण्याविषयीं

झटत असतात आणि त्यांत शेवटीं प्रेमांत कोण कोणास जिंकतें अशा प्रकारची स्पर्धा असते; आज्ञा कोण करितो अशी नसते. कारण, आपल्या अगदीं जिवाळ्याच्या मित्राच्या इच्छेआड येणें यासारखी दुसरी कोणतीही गोष्ट मनुष्यास जड वाटत नाहीं. एका कवीनें एक फार सुंदर आणि बोधपर श्लोक केला आहे तो तुह्मीं सतत ध्यानांत ठेवावा अशी माझी शिफारस आहे.

दंपत्यवृक्षावरि आदरानें, सत्प्रेमपक्षी असतां सुखानें।
तेथें जरी ये प्रभुता कठोर, उडोनि तो जाइ पळांत दूर ॥

उभयतांपैकीं कोणाही एकानें दुसऱ्याची सेवा करण्याचा आपला मधुर हक्क सोडून देऊन दुसऱ्याला हुकूम करण्याचा कठोर हक्क स्वीकारणें ह्मणजे प्रेमाचा अपमान करणें व त्यावर पाणी सोडणें होय. कित्येक भाग्यशाली दंपत्यांमध्यें हा कठोर हक्क बजावण्यांत येत नाहीं; तरी भाषणामध्यें त्याची झांक मारते. यामुळें वैवाहिक प्रेमाचें तेज कमी होतें.

वरील मताचे परिणाम व्यवहारांत फार दुःखकारक झालेले आहेत. कित्येक थोर मोकळया मनाच्या स्त्रियांची हलकट मनाच्या पुरुषांशीं गांठ पडल्यामुळें त्यांना त्यांच्या जाचणुकींत सर्व जन्मभर रहावें लागतें. कित्येकांस निमुटपणें ही जाचणूक सहन करून घेण्याची संवय इतकी लागून गेलेली असते, व त्यांच्या हाडीं परवशता इतकी खिळून गेलेली असते कीं, दुसऱ्यावर सर्वथा अव-

लंबून राहणें यांतच त्यांस आनंद वाटतो; आणि साठ वर्षांच्या वयावर जरी वैधव्य प्राप्त झालें तरी अशा वेळीं सुद्धां त्यांना आपलें घरदार संभाळण्याची एखाद्या सहा वर्षांच्या लहान पोराएवढी देखील अक्कल नसते. आणि जणुं काय, साठवर्षें जगांत घालविलीं तीं नीतिदृष्ट्या व्यर्थ गेलीं असें त्यांच्या पोरकटपणावरून दिसून येतें. माझ्या बाबांला स्त्रियांच्या आंगीं आज्ञाधारकपणा असणें ही गोष्ट फार आवडत असे. तथापि ते देखील अशा विधवांला पाहून थट्टेनें हांसत असत. आणि ह्मणत कीं, अशा विधवांस पाहिलें ह्मणजे मला वजनें काढून घेतलेल्या मोठ्या घड्याळांची आठवण होते. तीं एकदम अगदीं झपाट्यानें टिक् टिक् टिक् टिक् करीत चालतात आणि शेवटीं त्यांची किल्ली संपून लवकर बंद पडतात. आपल्या बायकोनें आपली आज्ञा पाळली पाहिजे, हा आपला हक्क आहे, अशी राक्षसी समजूत ज्या पतीची आहे त्याला तरी या समजुतीपासून कांहीं सुख आहे काय? खरोखर कांहीं नाहीं. या समजुतीपासून नवऱ्यांच्या आपस्वार्थीपणास आणि जुलमी स्वभावास प्रोत्साहन मिळाल्याशिवाय राहत नाहीं. आणि जिचा बहुमान करण्यांत स्वतःच्या मनास आनंद व उत्साह हीं वाटलीं पाहिजेत अशा आपल्या पत्नीविषयीं तिरस्कारबुद्धी त्यांच्या मनांत उत्पन्न होते. ज्या घरांत नवरा आपल्या बायकोला खरोखरच मान देत आहे त्या घरांत प्रत्यक्ष लक्ष्मीचा वास

असतो ही गोष्ट कोण नाकबूल करील ? मात्र उभयतांमध्यें जें कायदेशीर नातें असतें त्याचा संबंध तेथें कांहींच असतां नये. कारण, कायद्याप्रमाणें पाहिलें तर स्त्रीनें तनमनानें सर्व जन्मभर आपल्या पतीची आज्ञा पाळली पाहिजे. तिच्या पोटच्या मुलांवर सुद्धां तिचा हक्क नसून त्यांस तिचा पति तिच्याकडून एका क्षणांत पाहिजे तर काढून घेऊं शकतो. तेव्हां, अशा स्थितींत पतीकडून पत्नीला मनापासून मान मिळणें हा लाभ कांहीं लहानसान नसून अलभ्य आहे. कायद्यानें स्त्रिया ह्या आपल्या चाकरांप्रमाणें किंवा मालमिळकतीप्रमाणें आहेत असें पुरुषांस शिकविलें नसतें तर कित्येक दुष्ट क्रूर पुरुषांच्या हातून त्यांच्या बायकांच्या संबंधानें इंग्लंडांत जे नित्यशः असंख्य गुन्हे होतात ते होते ना; परंतु स्त्रियांनीं पुरुषांच्या गुलामगिरींत राहिलेंच पाहिजे हा समज समूळ खणून काढल्याशिवाय अशाप्रकारें होणारी स्त्रियांची मारहाण, जाचणूक किंवा खून हे गुन्हे कधीं बंद पडणार नाहींत, अशी माझी पक्की खातरी आहे. ह्यासंबंधानें एथें जास्त सांगण्यास अवकाश नाहीं. यास्तव, वरील विवेचनावरून जें अनुमान निघतें त्याचेंच संक्षेपानें पुनः अवलोकन करूं.

प्रौढवयांत आलेल्या स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं, जन्माच्या, उपकाराच्या किंवा कराराच्या नात्यानें ज्यांच्याशीं तो पुरुष किंवा ती स्त्री बद्ध झाली असेल त्यांच्याविषयीं वि-

शेष परहितेच्छा असली पाहिजे; ह्मणजे, त्यांची सेवा केली पाहिजे, हें त्याचें किंवा तिचें विशेष कर्तव्य आहे. ही सेवा इतर सर्व सेवेपेक्षां इतकी महत्वाची आहे कीं, जोंपर्यंत वर सांगितलेल्या संबंध्यांस तिची गरज आहे तोंपर्यंत त्यांच्याकडे दुर्लक्ष करून परक्यावर उपकार करण्यास जाणें योग्य होणार नाहीं. या सेवेंत एका गोष्टीचा समावेश झाला पाहिजे. ती ही कीं, संसाराच्या लहानसान बाबतींत त्यांच्या आड न येतां त्यांचें ऐकावें आणि आपल्या ठिकाणीं संपूर्ण औदार्य, ममता आणि विचार हीं बाळगावीं. आणि विनाकारण त्यांच्या आड येऊं नये. आपण आपले आईबाप, नवरा किंवा बायको यांचा उद्देश किंवा इच्छा हीं आदरानें आणि शांतपणें ऐकून घ्यावीं. इतकेंच नव्हे तर होतां होईल तों त्यांच्या इच्छेनुरूप वागण्याचा मनापासून हेतु ठेवावा. याच्या पलीकडे, कोणत्याही प्रौढवयाच्या मनुष्यानें दुसऱ्याची आज्ञा पाळण्याच्या बाबतींत जातां कामा नये. कारण, यापेक्षां जास्त करणें ह्मणजे सेवा नव्हे, तर गुलामगिरी होईल. अशा गुलामगिरीस नैतिक आत्मघात ह्मटलें तरी चालेल. तो करणें हुकमाच्या, रूढीच्या, सोईच्या, सुखाच्या किंवा कोणत्याही अन्य कारणावरून रास्त होणार नाहीं. जर विवाहामुळें वर सांगितलेल्या प्रकारचा आज्ञाधारकपणा आणि नैतिक पराधीनता हीं उत्पन्न होत असतील तर मग कोणत्याही स्त्रीस अशाप्रकारें लग्न क-

रणें रास्त होणार नाहीं असें माझें मत आहे; आणि हाच आपणापुढें विवेचनाचा विषय आहे. एकमेकांशीं विश्वासूपणानें वागणें आणि एकमेकांविषयीं विशेष परहितेच्छा ठेवणें ह्या ज्या दोन शपथा विवाहकालीं घेण्यांत येतात त्या योग्य असून बस आहेत. परंतु त्यांत आणखी दोहोंपैकीं एकानें मात्र त्या वेळापासून दुसऱ्याच्या कल्याणासाठीं झटावें एवढेंच नव्हे, तर सर्वथा त्याच्या इच्छेनुरूप वागावें, या शपथेची भर घालण्याचें कांहींएक कारण नाहीं.

असो. नैतिक स्वातंत्र्य इतकें पवित्र आहे कीं त्याच्या संबंधानें आलेली जबाबदारी आमच्या अगदीं जिवाळ्याच्या माणसाकरितां सुद्धां आह्मीं एकीकडे लोटतां कामा नये असें मी वर सांगितलेंच आहे. असें जर आहे, तर मग, त्या स्वातंत्र्याचा उपयोग योग्य रीतीनें करणें, याविषयींची जबाबदारी आमच्यावर केवढी मोठी आहे बरें? जी स्त्री आपल्यावरील नैतिक जबाबदारीच्या मिषानें आपल्या आईबापांच्या किंवा नवऱ्याच्या आज्ञेंत राहण्याचें झुगारून देईल आणि मग आपलपोटेपणानें, आळसानें किंवा ऐहिक सुखांत राहून, ईश्वरसंबंधी कर्तव्याची आह्मांवर जी मोठी जबाबदारी आहे तिच्याकडे दुर्लक्ष करील त्या स्त्रीला राक्षसीच ह्मटलें पाहिजे. त्यापेक्षां, नवऱ्याच्या गुलामगिरींत, सदैव बाल्यावस्थेंत किंवा परवशतेंत, तुह्मी आहां त्याहून हजारपटीनें जास्त असलां

तर बेहत्तर; पण नैतिक स्वातंत्र्ययुक्त मनुष्यप्राण्याचे हक्क प्राप्त झाले असून माकडें, पोपट किंवा आपसंती उनाड पोरें यांच्याप्रमाणें करणी करूं नका.

पुढच्या पिढीच्या स्त्रीजातीला चांगला मार्ग घालून देण्याची जर तुमची इच्छा असली तर तुह्मी जागृत व्हा आणि तुह्मांला जें कांहीं स्वातंत्र्य मिळालें आहे त्याचा स्वच्छंद वागण्याकडे दुरुपयोग करूं नका. कांहीं स्त्रिया हल्लीं आपणास स्वतंत्र ह्मणवीत आहेत. त्यांचें आयुष्य सर्वथैव जरी दुराचरणाचें नसलें तरी तें उच्छृंखल आणि घाणेरडें आहे. त्यांना अपवित्रपणा किंवा व्यभिचार या तिरस्कार्य घाणेरड्या पापासंबंधानें फारसें वाईट वाटत नाहीं. माझ्या तरुण मैत्रिणींनो, अशा स्त्रियांशीं सावधगिरीनें वागा. त्यांची संगती तुह्मी धरूं नका, किंवा त्यांच्याद्वारें कोणत्याही प्रकारचें स्वातंत्र्य मिळविण्याची इच्छा तुह्मी करूं नका. त्या स्त्रिया कितीही मोठ्या दरजाच्या असोत, त्यांचा तुह्मीं तिरस्कार केला पाहिजे. त्यांच्या हातून स्त्रियांची स्थिति सुधारण्याचा यत्किंचित सुद्धां संभव नाहीं.

वरील शास्त्रविधिपूर्वक झालेल्या मोठ्या वैवाहिक कराराखेरीज दुसरे मित्रत्वाचे करार आहेत. ते विधिपूर्वक केलेले नसून गर्भित असतात. जुन्या ग्रीक ख्रिस्तीपंथांत मित्रांमित्रांमध्यें मित्रत्व स्वीकारतांना कांहीं विधि नेमलेले असत. परंतु वास्तविक सख्य किंवा मित्रत्व हें

पवित्र होण्याकरितां किंवा परस्परांविषयीं विश्वासूपणा येण्याकरितां आणि परस्परांच्या उपयोगीं पडण्याची नैतिक जबाबदारी येण्याकरितां अशा विधींची आवश्यकता आहे असें कांहीं नाहीं. कांहीं वेळानें हा विषय परत मी हातीं घेईन.

## घरधनीण अथवा गृहिणी या नात्यानें स्त्रीचें कर्तव्य.

वैवाहिककरार आणि मित्रत्व यासंबंधी कर्तव्याचा विचार एथपर्यंत केला; आतां आह्मांस गृहिणी या नात्यानें स्त्रीचीं कर्तव्यें कोणकोणतीं आहेत हें पहावयाचें आहे.

प्रारंभीं मी इतकेंच सांगतें कीं ज्या स्त्रिया, पुष्कळ कुटुंबांनीं एकत्र जमून एक सामान्य घर करावें अशाविषयीं उत्तेजन देतात, ह्मणजे इंग्रज लोकांची **घर** ह्मणून जी संस्था आहे ती मोडावयास पहातात, त्यांस माझें मत अनुकूल नाहीं. कलाकौशल्य, गायनकला अथवा विद्याव्यासंग यांत निष्णात अशा स्त्रियांना गृहव्यवस्था आपल्या हातीं घेतल्यानें वरील व्यासंगांस अडथळा येण्याचा संभव असेल. अशा स्त्रियांपैकीं फार प्रसिद्ध स्त्रियांची मला माहिती आहे. परंतु चमत्कार हा कीं यांपैकीं बहुतेक स्त्रियांला, गृहव्यवस्था ठेवण्याचा अभिमान वाटतो इतकेंच नव्हे तर, चांगलीं चांगलीं पक्वान्नें करण्याच्या वगैरे गृहकृत्यांत त्या प्रवीण आहेत. याच्या समर्थनार्थ त्यांचीं नांवें येथें देण्याची कांहीं जरूर दिसत

नाहीं. अशीं उदाहरणें पाहिजेत तितकीं मिळतील. तथापि एक उदाहरण देतें. मेरी समरवील ही आजपर्यंत ज्या स्त्रिया झाल्या त्या सर्वांमध्यें गणितशास्त्रांत फार हुशार होती, तथापि गृहकृत्यांमध्येंही तिच्या हुशारीबद्दल ख्याती होती. मला असें वाटतें कीं ज्या स्त्रिया गृहकृत्यें सोडून देण्यास तयार होतात त्या, त्यांच्या आंगीं वरील प्रकारचे व्यासंग आहेत ह्मणून नाहीं, तर, गृहव्यवस्थेसंबंधी येणाऱ्या अडचणी दूर करण्याचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें नसतें ह्मणून होतात; अशा स्त्रियांविषयीं आपल्याला थोडीबहुत कींव असावी. परंतु असा प्रकार फार स्त्रियांत होऊं लागला आणि जी ती स्त्री उठून घर ह्मणून जें काय आहे तें मोडून टाकावयास लागली आणि जिकडे तिकडे अमेरिकेंतील भोजनवसतिगृहांसारखीं गृहें स्थापन होऊन मनुष्यास वस्तुतः घर नाहींसें झालें तर ती फार शोचनीय स्थिति समजली पाहिजे. ज्या स्त्रीला घरांतील व्यवस्था चांगली ठेवितां येत नाहीं ती वास्तविक कुचकामाची स्त्री समजली पाहिजे.

**घर** हें इंग्लिश स्त्रीचें एक खरोखरच लहानसें राज्य आहे. गृहसंस्थांत कितीही आणि कसेही दोष असले तथापि त्या आमच्या देशास ( इंग्लंडास ) सांप्रतचें वैभव आणण्यास कारण झाल्या आहेत. इंग्रजलोकांच्या स्वभावांत जे कांहीं उत्तम गुण आहेत ते बहुतेक या इंग्लिश गृहसंस्थेपासूनच त्यांना प्राप्त झाले

आहेत; आणि ही गृहसंस्था जर मोडली तर मुलांच्या ठिकाणीं असणारा उनाडपणा, व कौटुंबिक प्रेमाची शिथिलता, हीं प्राप्त होऊन त्यापासून अमर्याद दुष्परिणाम उद्भवतील यांत संशय नाहीं. यासाठीं माझी तुह्मांस अशी विनंति आहे कीं आमच्या या गृहसंस्थेंत जे कांहीं मोठे दोष आहेत ते काढून टाकण्यासाठीं होईल तितके प्रयत्न तुह्मी करा, परंतु ती संस्था मात्र मोडून टाकूं नका.

तुमच्या गृहव्यवस्थेंत सुधारणा करून ती जास्त सुखदायक आणि जास्त स्वतंत्र होईल असें करा, परंतु गृहव्यवस्था मोडून तिच्या ऐवजीं भोजनवसतिगृह स्थापन करण्याचें नांव सुद्धां काढूं नका. इंग्रज पुरुषांचें अशा फेरबदलापासून फार नुकसान होईल. आणि इंग्रज स्त्रियांवर तर त्यापासून भयंकर संकटें ओढवतील.

खरें घर करणें हा वास्तविकपणें आह्मां स्त्रियांचाच विशेष हक्क आहे. तो आह्मांस दुसऱ्या कोणास देतां येत नाहीं. पुरुषांना तो हक्क आह्मांपासून काढून घेतां येत नाहीं. कारण नरजातीच्या मधमाशांना जसें मधाचें पोळें करितां येत नाहीं, तसें पुरुषांचे हातून घर होणार

---

१ आमच्या लोकांतही पूर्वापार समजूत अशीच आहे; संस्कृतांत विवाहित स्त्रीला गृहिणी ह्मणजे घराची मालकीण आणि विवाहित पुरुषाला गृहस्थ ह्मणजे केवळ घरांत राहणारा, या संज्ञा आहेत; यावरून घर करण्याचा अधिकार आमच्यांतही स्त्रीचाच समजला जातो. कोंकण प्रांतांत, अमक्याची स्त्री असें ह्मणावयाचें असल्यास, अमक्याची **घरकरीण** असें ह्मणतात.

नाहीं. पुरुष पाहिजे तर किल्ले किंवा हवेल्या बांधूं शकतील; ते वाचस्पतीसारखे शहाणे किंवा कुबेरासारखे श्रीमंत असले तरी त्या गरीब बापड्यांस घर ह्मणून जें काय आह्मीं समजतों तें करितां येण्यासारखें नाहीं. कारण ही पुरुषाच्या हातून होण्यासारखी गोष्टच नाहीं. स्त्री जर मनावर घेईल तर ती एकटीसुद्धां कोणा पुरुषाची मदत न घेतां कोणत्याही वसतीस्थानास घराचें रूप देऊं शकेल. मला क्लबाची व्यवस्था ठेवतां येते, मग घराची तर सहजच ठेवूं शकेन, असें ह्मणून स्त्रीचा घर करण्याचा स्वतंत्र हक्क जो पुरुष काढून घेण्याचा यत्न करील तो फार दुःख पावेल. अविवाहितपणांत त्याला ह्मातारपण आलें ह्मणजे मग घराची त्याला अत्यंत आवश्यकता वाटते, आणि त्याची फार दुर्दशा होते. आणि ज्याला एक वेळ घर करण्याचा हक्क स्त्रियांचाच आहे असें कोणीं ह्मटलें तर त्याचा राग येत असे, त्याचे आतां स्वयंपाक्याच्या हातून हाल होत आहेत किंवा त्याची दाई त्याला निर्दयतेनें वागवीत आहे, आणि हें सर्व त्याला निमूटपणें सोसून घ्यावें लागत आहे असें आह्मी पाहतों.

परंतु कोणत्याही इमारतीस, फार तर काय, उष्ण प्रदेशांत फिरतांना वाटेंत रहाण्याकरितां जे तंबू उभारण्यांत येतात त्यांस सुद्धां, आमची मर्जी असल्यास घराचें रूप देण्याचें आह्मां स्त्रियांस सामर्थ्य आहे; आणि तसें करणें हा आह्मां स्त्रियांचाच अधिकार आहे. या हित-

कारक सामर्थ्याचा उपयोग करण्याचें सोडून देऊन केवळ पुरुषांप्रमाणें इकडे तिकडे घराशिवाय कोठें तरी पडून राहण्यांत आह्मीं समाधान मानणें हें आह्मांस उचित होईल काय? आमच्या आज्या पणज्या यांच्या पुण्याईनें तरी आह्मांस अशा प्रकारची अवनति कधींही प्राप्त न होवो! परंतु अशा विचारांत वेळ न घालवितां आह्मांस घर आहे असें गृहीत धरून त्या घरांत जें आमचें स्थानिकराज्य आहे, तत्संबंधी आमचीं कर्तव्यें काय काय आहेत हें पाहूं. (आह्मीं स्त्रियाच खरोखर स्थानिक स्वराज्यकर्त्या आहोंत. पार्नेल आणि कपंनी हे दांभिक लोक आहेत.)

प्रथमतः घर हेंच आमचें राज्य आहे असें जर आपण समजतों तर तें ईश्वरी राज्याचा एक प्रदेश शोभेल असें करण्याचा झटून प्रयत्न करणें यांतच आह्मांस समाधान आणि हाच आमचा अधिकार वाटला पाहिजे. कारण, मी मुळापासून सांगत आलें आहें कीं आह्मीं आपलीं सर्व प्रकारचीं कर्तव्यें याच दृष्टीनें मोठ्या आनंदानें व उल्हासानें केलीं पाहिजेत. प्रथम ईश्वरी राज्याची स्थापना आपल्या स्वतःच्या अंतःकरणांत करून

---

१ पार्नेल हे आयर्लंद देशास स्थानिक स्वराज्य मिळावें म्हणून पार्लमेन्टसभेंत भांडणाऱ्या पक्षाचे पुढारी होते; परंतु पुढें त्यांच्यावर व्यभिचाराचा आरोप आल्यामुळें त्यांस त्या पक्षाच्या लोकांनींच तोंड काळें करावयास लाविलें; कारण, जो दुसऱ्याचें घर मोडतो तो काय करील याचा भरंवसा नाहीं.

तें अंतःकरण शुद्ध, सत्यशील आणि प्रेमयुक्त झालें ह्मणजे मग आमच्या घरांस त्याच ईश्वरी राज्याचे लहानसे प्रदेश करण्यास झटलें पाहिजे. आणि शेवटीं त्याच राज्याचा–न्याय, सत्य आणि प्रेम यांचा–विस्तार वाढवीत वाढवीत सर्व पृथ्वीवर पसरेल असें केलें पाहिजे. प्रथम आमच्या स्वतःच्या अध्यात्मिक हितासंबंधी जबाबदारी सर्वप्रकारें आह्मांवर आहे. त्याच्या खालोखाल आपल्या कुटुंबांतील मनुष्यांच्या हिताविषयींची, आणि त्याच्या खालोखाल इतर सर्वांच्या हिताविषयींची जबाबदारी आमच्यावर आहे. यास्तव आपल्या घरांस ईश्वरी राज्याचे प्रदेश करण्याकरितां आपण काय केलें पाहिजे याचा विचार करूं.

१ आमच्या घरांत कोणी राहील त्यास नीतिदृष्ट्या अवनति प्राप्त होऊं नये अशाविषयीं होतां होईल तितकी खबरदारी ठेविली पाहिजे. किमानपक्षीं कोणालाही कोणत्याच प्रकारच्या दुर्वर्तनाची गोडी लागणार नाहीं अशी खबरदारी ठेवणें, वैमनस्य वाढूं न देणें, कोणालाही उदासीनपणाची अथवा शिरजोरपणाची अथवा मद्यपानाची संवय लागूं न देणें, तंटे बखेडे वाढूं न देणें, एवढें तर प्रत्येकीनें केलेंच पाहिजे. परंतु एवढ्यानें आह्मीं आपलें कर्तव्य पुरें बजावलें असें होत नाहीं; तर, प्रत्येकाला सुधारण्याविषयीं मदत केली पाहिजे. हें करण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे, रागें भरणें, उत्तेजन देणें, किंवा मर्जी असो वा नसो, प्रत्येकास देवळास जावयास ला-

वणें, किंवा कौटुंबिक उपासना करणें (जरी ही चाल फार उत्तम आहे तरी), हा नव्हे, तर सर्व चाकरांशीं मोकळ्या मनानें, विश्वासानें आणि दयेनें, आणि मुलांशीं व इतर आप्तांशीं प्रेमानें आणि भरंवशानें वागणें हा होय. येणेंकरून वैमनस्य व दुर्वर्तन यांना वास्तविकपणें मुळींच स्थळ मिळणार नाहीं, आणि मिळालें तरी त्याचें वास्तव्य फार वेळ टिकणार नाहीं.

अशा प्रकारच्या पुष्कळ गोष्टींमध्यें आम्हीं स्त्रियांनीं एक गोष्ट विशेषेंकरून ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही: जी स्त्री स्वतःस सजविण्यानटविण्यामध्यें हजारों रुपये आणि रोज तासांचेतास खर्ची घालिते, आणि सभ्यपणाला अनुचित असे नवे नवे तऱ्हेवाईक पोषाख करून लोकांचें मन आकर्षण करण्यांत संतोष मानिते, ती जर आपल्या ठकू मोलकरणीला साधा पोषाख करावा, फुलांवेण्यांत उधळेपणा करूं नये, त्यापासून नुकसान आहे असें व्याख्यान देऊं लागली तर तिला आम्ही मूर्ख नाहीं का म्हणणार? जी गृहिणी स्वतः शहाणपणानें व सभ्यपणानें बेताबाताचे कपडे वापरते तिला, आपली मोलकरीण सुद्धां आपल्याप्रमाणेंच वागूं लागेल अशी आशा बाळगण्यास कारण आहे. पण जोंपर्यंत मोलकरणींच्या तरुण आणि अविचारी दृष्टीपुढें धनिणीच्या उधळेपणाचें आणि मूर्खपणाचें उदाहरण दिसत आहे तोंपर्यंत त्या सुधारण्याची आशा करणें व्यर्थ आहे.

२ आपल्या कुटुंबांतील मनुष्यें सदाचरणी होतील अशी सावधगिरी बाळगणें हें प्रत्येकीचें आदिकर्तव्य आहे ह्मणून वर सांगितलें. दुसरें कर्तव्य त्यांच्या सुखाची तरतूज करणें हें होय. यासाठीं आपण प्रथम होईल तितकें करून एवढी खबरदारी घेतली पाहिजे कीं आपल्या घरांतील कोणताही प्राणी कधींही दुःखी नसावा. खाण्यापिण्याची चांगली सोय असतां ज्यांमध्यें एकही मनुष्य दुःखी नाहीं, अशीं कितीशीं कुटुंबें सांपडतील बरें? कधीं कधीं हा दोष त्या दुःखी मनुष्याचाच असतो. त्याचें मन संकोचित असल्यामुळें नेहमीं उदासीन असतें. आणि आपण त्याला प्रसन्न ठेवण्याविषयीं कितीही प्रयत्न केले तरी त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. परंतु पुष्कळ वेळां असें घडून येतें कीं, घरांतील एखाद्या गरीब साध्या मनुष्याची इतर सर्व मनुष्यें थट्टा करून आपली करमणूक करितात, त्याला टाकून बोलतात; कधींही त्याच्या सुखाकडे दृष्टी न देतां उलट नेहमीं त्याची हालअपेष्टा करितात. अशी स्थिती कधीं कधीं बिचाऱ्या शिक्षकाला किंवा शिक्षकिणीला, केव्हां केव्हां एखाद्या गरीब ह्यातार्‍या आश्रित होऊन राहिलेल्या आप्ताला, आणि कधीं कधीं एखाद्या मूर्ख चाकराला, परंतु पुष्कळवेळां घरच्या मालकिणीच्या सापत्नमुलाला भाच्यापुतण्याला, किंवा ज्याला कांहीं व्यंग आहे अशा आपल्या पोटच्या मुलालासुद्धां प्राप्त होते.

असें झालें ह्मणजे तो दुर्दैवी प्राणी नेहमीं भयभीत होत्साता आपल्या सभोंवतालच्या आपणावर सर्वकाल डोळे वटारून पाहणाऱ्या मनुष्यांच्या तोंडाकडे चोरासारखा पाहतो, आणि माराच्या भीतीनें कांहींना कांहीं युक्ति लढवून त्यांच्या तडाक्यांतून निसटूं पाहतो. ती त्याची युक्ति सहज उघडकीस येण्यासारखी असल्यामुळें त्याला जास्त शिक्षा भोगावी लागते व लबाड ह्मणून घ्यावें लागतें. आणि अशा प्रकारें हा अनिष्टप्रकार दिवसेंदिवस वाढत जातो. हा मनुष्याचा कठोर स्वभाव अशा निर्दय आणि भयंकर स्थितीप्रत कसा पोहोंचतो हें पाहिलें ह्मणजे आपणास फार आश्चर्य वाटतें. कारण, दुःखितांच्या दुःखाची कींव न येतां उलट त्यांविषयीं तिरस्कार उत्पन्न होतो, आणि शेवटीं कुटुंबांतील सर्व मनुष्यें त्या बिचाऱ्या अनाथ मनुष्याचे हाल करण्यास प्रवृत्त होतात.

माझ्या मैत्रिणींनो, जर कांहीं असा प्रकार तुमच्या घरांत तुह्मांला आढळून आला तर तुह्मी तात्काल तो बंद करा. जरी तुमचा त्या गरीब मनुष्यावर विश्वास नसला आणि तो तुह्मांस आवडत नसला तरी कांहीं चिंता नाहीं. सर्वांशीं न्यायानें वागणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे. ह्मणजे, कोणताही प्राणी कितीही क्षुद्र किंवा कंटाळवाणा असला तरी त्याला अन्याय होऊं देतां नये. जर घरधनिणीचा अधिकार तुमच्याकडे असला तर आपला अधिकार बजावून हा होणारा जुलूम बंद

करा. जर त्यांत तुमचाच कांहीं दोष असला किंवा तुमच्या आश्रितांच्या मनामध्यें त्या बिचाऱ्याविषयीं द्वेष उत्पन्न होण्यास तुमचीच गैरमर्जी कारण झाली असली तर तुह्मांस या तुमच्या मोठ्या दोषाबद्दल पश्चात्ताप वाटूं द्या. तुह्मी त्याचें दुःख निवारण करा. जरी तुह्माला घरच्या मालकिणीचा अधिकार नसला, केवळ पाहुण्याच्या किंवा मित्राच्या नात्यानें दोन दिवस तुह्मी तेथें राहत असलां तरी तुमच्या हातून त्याचें बरेंच दुःख कमी होण्यासारखें आहे आणि तुह्मीं तें केलें पाहिजे. जेव्हां जेव्हां त्या दुर्दैवी मनुष्याची थट्टा किंवा उपहास होत असेल तेव्हां तेव्हां गंभीर मुद्रा धारण करून आपणास वाईट वाटत आहे असें दाखवा; आणि मुद्दाम त्याच्याकडे दयादृष्टीनें पहा. त्याला मान द्या. अशा प्रकारच्या वर्तणुकीचा परिणाम, ज्यांना गरिबांस तिरस्कारानें वागविण्याची संवय लागली आहे त्यांच्यावर विलक्षण प्रकारें झाल्यावांचून राहणार नाहीं हें पक्कें समजा. त्यांस याबद्दल तुमचा राग येण्याचा संभवही आहे; परंतु अशा कृत्यांबद्दल दुसऱ्यांची इतराजी करून घेणें यापेक्षां अधिक सत्कृत्य तें कोणतें ?

अशा रीतीनें कुटुंबांतील एखाद्या मनुष्याचीच हेलना होत असते असें नाहीं. तर कुतऱ्यांमांजरांसारख्या जनावरांचे सुद्धां हाल करण्यांत येतात अशीं कुटुंबें तुमच्या पहाण्यांत असतील. जर तें कुत्रें किंवा मांजर वर सां-

गितलेल्या दुर्दैवी मनुष्याचें आवडतें असलें तर मग त्याचे हाल पुसूंच नका. त्याच्यावर सर्वजण मोठ्यानें ओरडतात; त्याला जिकडून तिकडून हांकून लावतात; व त्याचा कांहींएक अपराध नसतांही त्याला मारतात. यामुळें त्याला खालीं मान घालून चोराप्रमाणें पाहण्याची संवय लागते. असें झालें ह्मणजे सर्वांच्या मनांत त्याच्याबद्दल तिरस्कारबुद्धि अधिकाधिक वाढत जाते आणि आपण जरी एखादे वेळेस त्याची ममतेनें पाठ थोपटावयास गेलों तरी तें माराच्या भीतीनें आंगावर गुरगुरूं लागतें, किंवा पळून एखाद्या कोचीखालीं लपून बसतें. गृहिणींनो, आपल्या घरीं किंवा शेजारींपाजारीं कोणतेंही जनावर, तुह्मी त्याच्याजवळ गेलां असतां, भयानें दूर पळूं लागेल अशी स्थिति राहूं देऊं नका. मग तें जनावर कुत्रें असो किंवा मांजर असो,घोडा असो किंवा गाढव असो. सर्वच ठिकाणीं वर सांगितल्याप्रमाणें मनुष्याचे किंवा जनावराचे, तिरस्कारबुद्धीनें, मुद्दाम हाल करण्यांत येतात असें नाहीं. हयगयीमुळें बऱ्याच कुटुंबांत जनावरांस एकसारखे हाल सोसावे लागतात. या अशा प्रकारच्या हयगयीची जबाबदारी मुख्यत्वेंकरून गृहिणीवर आहे. केवळ आपल्या चाकरांना जनावरांची शुश्रूषा करण्याविषयीं फरमाविलें ह्मणजे तिचें काम झालें असें नाहीं; तर आपल्या हुकुमाप्रमाणें जनावरांस दाणापाणी देण्यांत येतें कीं नाहीं, तसेंच त्यांच्याकडून जरूर तितकी मेहनत क-

रून घेण्यांत येते कीं नाहीं हें पाहणें तिचें कर्तव्य आहे. मुक्या जनावरांना बोलण्याची शक्ति असती तर कांहीं कुटुंबांत तरी ईश्वरी राज्य दिसून आलें असतें; ह्मणजे न्याय, सत्य आणि प्रेम हीं दिसून आलीं असतीं. ज्या कुटुंबांत दोनवेळां उपासना होत असते तेथें सुद्धां पाळलेले पशुपक्षी अन्नपाण्याशिवाय घाणेरड्या पिंजऱ्यांतल्या पिंजऱ्यांत असतात. त्यांची काळजी कोणी घेत नाहीं. कुत्र्याचे पेटे नकोसे झाले तर खेळासाठीं मुलांच्या स्वाधीन करण्यांत येतात; मग त्यांनीं पाहिजे त्या रीतीनें त्यांचा निर्दयपणानें नाश केला तरी तिकडे कोणी लक्ष देत नाहीं; विश्वासू कुत्रा ह्मातारा झाला ह्मणजे त्याच्याकडे कोणी ढुंकूनसुद्धां पहात नाहीं, आणि त्याचे हाल इतके होतात कीं तितके एखाद्या शत्रूचे सुद्धां कोणी करणार नाहीं. त्याला उन्हांत सर्व दिवसभर सांखळीनें बांधून ठेवितात. पाण्याचे भांड्यांत कित्येक दिवस कोणी पाणी देखील घालीत नाहीं. त्याला सर्व रात्रभर थंडीनें कुडकुडत पडावें लागतें. त्याच्या आंगाखालीं उबेसाठीं गवत देखील घातलेलें नसावयाचें. आणि हें सर्व त्या बिचाऱ्यानें इतके दिवस इमानानें केलेल्या चाकरीबद्दल बक्षीस! अशी स्थिति कांहीं दिवस चालली ह्मणजे त्याला रोग होतो. कोणी मनुष्य जवळ गेला कीं तो उड्या मारून आपणाला कांहीं वेळ हिरव्या माळावर बागडण्याकरितां मोकळें सोडण्याविषयीं शेंपूट हालवून आपली

इच्छा प्रदर्शित करितो. ही इच्छा केवळ गमतीसाठीं फिरण्याकरितां तो दाखवितो असें नाहीं; तर ती त्याच्या आरोग्यरक्षणासाठीं अवश्य असते. आणि जर त्याला मोकळें सोडलें नाहीं तर तो रोगी होतो; त्याचें शरीर कंटाळवाणें आणि दादडल्यासारखें होतें; तो चिडखोर होतो; प्रत्येकाला त्याचा कंटाळा येतो, आणि असें झालें ह्मणजे ज्या मुलांचा तो मित्र आहे त्यांनासुद्धां त्याची दाई त्याच्याजवळ जाऊं देत नाहीं.

मी निक्षून सांगतें कीं, ज्या घरांत कुत्र्यांमांजरांचे असे हाल होतात त्या घरची मालकीण या मोठ्या पापास जबाबदार आहे असें ह्मटलें असतां चालेल आणि जोंपर्यंत तिच्या घरांत अन्नपाण्याविना पशुपक्षांचे असे हाल होत आहेत तोंपर्यंत तिनें कितीही व्रतें उपोषणें केलीं किंवा दानधर्म केला तरी त्यापासून कांहींच उपयोग नाहीं.

आपल्या घरांतील मनुष्यांचें किंवा जनावरांचें मानसिक अथवा शारीरिक दुःख निवारण करण्यासाठीं आपल्या हातून होईल तितका यत्न केल्यावर गृहिणीचें पुढचें कर्तव्य ह्मटलें ह्मणजे त्यांस होईल तितकें आनंदित करणें हें होय. आपणां सर्वांस माहित आहे कीं या आयुष्यक्रमांत सुख आणि दुःख यांचें मिश्रण असतें. गृहिणीच्या आंगीं सुख देण्याचें सामर्थ्य किती असतें याची मर्यादा ठरवितां येत नाहीं. परंतु एखाद्या स्त्रीनें

आपल्या सभोंवतालच्या सर्व मनुष्यांना होईल तितकें सुखी करण्याचा निश्चय केला तर त्याचा विलक्षण प्रकारें फायदा होईल. होईल तितकें करून ज्याला जशी जागा पाहिजे तशी त्याला देणें, ज्याला जी वस्तु आवडते ती त्याला देणें, कोणाला कोणता पदार्थ खावासा वाटतो आणि मानवतो याचा विचार करून भोजन तयार करविणें, आपण कितीही गरीब असलों तरी आपल्याकडे दुर्लक्ष होत नाहीं असा कुटुंबांतील प्रत्येक माणसाचा समज होऊं देणें, घरांतील सामानसुमान सुशोभित दिसेल अशा रीतीनें मांडून ठेवणें आणि घर अतिशय शोभिवंत करण्यापेक्षां तें त्यांतील मनुष्यांस सुखकारक आणि सोईवार करण्याकडे विशेष लक्ष देणें, आपल्या स्वतःच्या करमणुकीपेक्षां घरांतील माणसांच्या सुखाकडे लक्ष देणें, या सर्व गोष्टी आपलें घर ईश्वरी राज्याचा एक प्रदेश व्हावा अशी जिची इच्छा असेल त्या गृहिणीनें ध्यानांत ठेवून वागलें पाहिजे.

घरांतील नैतिक वळण घरधनिणीच्या स्वतःच्या स्वभावावर पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. या संबंधानें मला एक सूचना करावयाची आहे. घरधनिणीची वृत्ति सदोदित आनंदित किंवा उल्हासित असणें अवश्य आहे. कांहीं स्त्रिया पुष्कळ चांगल्या असतात; परंतु त्यांच्या मनास कधीं समाधान नसतें; त्या एकसारख्या चिंताग्रस्त असतात. तशांत शरीरप्रकृति नीट नसली मग तर

त्यांना आपलें काम करणें फार जड जातें. आणि त्यांनीं काम केलेंच तर तें त्या रडत कडत करतात. ज्या घरांत अशा स्त्रिया मालकिणी असतात तीं घरें नेहमीं दुःखी दिसतात. मला वाटतें कीं चांगला आनंदित स्वभाव असणें ही एक मोठी देणगीच आहे. कारण, अशा स्वभावाच्या योगानें संसारांतील अडचणी सोसण्याचें सामर्थ्य येतें. आणि कुटुंबांतील सर्व मनुष्यांची वृत्ति उल्हासयुक्त राखल्यानें त्यांस सुख होतें एतकेंच नव्हे तर, एकंदर कामें करण्यास त्यांस सोपें जातें. यास्तव, घरधनीण स्वभावतः कितीही उदास वृत्तीची असली तरी तिणें आनंदवृत्ति धारण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि आपल्या मुलांची आणि घरांतील इतर माणसांची आनंदवृत्ति कमी होईल असें करतां कामा नये. ज्यांना पुष्कळ वेळ शहरांत रहावें लागतें त्यांची आनंदवृत्ति कमी होत जाते. ते कधींही फार आनंदित किंवा फार दुःखी असे नसतात. मुलांच्या किंवा खेड्यापाड्यांतील लोकांच्या ठिकाणीं अनावर असें हांसें किंवा रडें जसें आपल्यास दिसून येतें, तसें तें यांच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं. आह्मां शहरांत राहणाऱ्यांचें हृदय त्यांच्याप्रमाणें कोमल असतें तर बरें झालें असतें.

चाकरांसंबंधी वादग्रस्त प्रश्नाविषयीं दोन शब्द सांगून हा विषय आटोपतें. माझ्या मतें घर हें कांहीं जु-

लमी राज्य नसून समाजासारखें आहे; आणि त्यांत कांहीं माणसांनीं कांहीं शर्तींवर घरच्या धन्याचीं किंवा त्याच्या मुलांमाणसांचीं कित्येक कामें करण्याचा पतकर घेतलेला असतो, तीं कामें कोणत्या रीतीनें त्यांनीं करावयाचीं याविषयीं नेहमीं हुकुम करण्याचा अधिकार घरधनिणीकडे दिलेला असतो. आणि घरांत व्यवस्थितपणा व सुरक्षितपणा राहण्यासाठीं, चाकरमाणसांचा पोषाख, त्यांची कामावर हजर राहण्याची वेळ, त्यांनीं कोणास घरांत घ्यावें आणि कोणास घेऊं नये, या व अशा इतर बाबतींत त्यांस हुकुम करण्याचा अधिकारही तिला असतो; पण तिचा अधिकार एथपर्यंतच आहे. याच्या पलीकडे नाहीं. चाकरमाणसें आपल्या फुरसतीच्या वेळाचा उपयोग कसा करितात या गोष्टींत आणि त्यांच्या साधारण खासगी बाबतींत हात घालण्याचा तिला, त्यांची धनीण या नात्यानें, बिलकूल अधिकार नाहीं. आणि हा नियम ध्यानांत ठेवून चाकरांशीं वागणें हाच खरा आणि सुखकारक मार्ग होईल; ह्मणजे तेणेंकरून चाकरांस आपण पतकरलेलें काम चांगल्या रीतीनें आणि इमानानें करण्याची हौस वाटेल. सेव्यसेवकभाव या नात्याखेरीज त्यांचे वरिष्ठ किंवा मित्र या नात्यानें पाहिजे तर आपल्या वजनाचा उपयोग करण्यास पुष्कळ स्थल आहे.

गृहिणी या नात्यानें स्त्रियांच्या कर्तव्यांचा विचार करितांना शेवटीं दोन शब्द सांगून हा विषय पुरा करितें.

जर व्यवस्थेनें, शांतपणानें, समंजसपणानें आणि शौर्यानें, ह्मणजे एकंदरींत पूर्णपणें, आह्मां स्त्रियांचीं अनादिकालापासून चालत आलेलीं वरील कर्तव्यें आह्मांस करितां आलीं नाहींत तर राष्ट्ररूपी मोठ्या घराच्या व्यवस्थेंत आपला कांहीं भाग असावा अशी आग्रहपूर्वक मागणी करणें हें मूर्खपण होय. माझे प्रिय आणि पूज्य मित्र थिओडर पारकर यांनीं स्त्रियांना नागरिकपणाचे सर्व हक्क आणि राज्यव्यवस्थेंत विभाग मिळावा असें समर्थन केलें, तें अशा मुद्यावर कीं ज्याप्रमाणें राष्ट्राचे कोशाधीश राष्ट्रीय खजिन्याची उधळपट्टी करितात, त्या प्रमाणें घरांतील द्रव्याची उधळपट्टी व अव्यवस्था करणाऱ्या स्त्रिया फार थोड्या सांपडतील आणि स्त्रियांच्या या सांसारिक चातुर्याचा उपयोग राष्ट्रीय कामाकडे केला तर पुष्कळ काटकसरीनें आणि प्रजेला सुखकारक अशा रीतीनें राज्यकारभार चालेल. पण जर आह्मांस आपल्या घराची व्यवस्था चांगल्या रीतीनें ठेवतां आली नाहीं आणि नोकरचाकरांस योग्य रीतीनें वागवितां आलें नाहीं तर वरील मुद्दा आमच्याच विरुद्ध जाईल. आणि ज्यापेक्षां आह्मांस एक कामगिरी चांगल्या रीतीनें बजावतां आली नाहीं त्यापेक्षां आह्मांस दहा कामगिऱ्या देण्यांत कांहीं अर्थ नाहीं असा जबाब आह्मांस मिळेल. लहानसान गोष्टींत जर आपण नालायक ठरलों तर कोणी शहाणा मनुष्य मोठ्या गोष्टीच्या संबंधानें आह्मांवर विश्वास ठेवणार नाहीं.

## व्याख्यान ५ वें.

## समाजांतील एक व्यक्ति या नात्यानें स्त्रियांचें कर्तव्य.

या मालिकेंतील दुसऱ्या व्याख्यानांत स्त्रियांच्या स्वतः-संबंधी कर्तव्यांचा विचार करण्यांत आला. तिसऱ्यांत त्यांच्या सामाजिक कर्तव्यांचा साधारणपणें विचार करण्यास आरंभ केला, व त्यांत कुटुंबांतील व्यक्ति या नात्यानें ह्मणजे आई, मुलगी, बहीण इत्यादि संबंधांस अनुसरून स्त्रियांचें कर्तव्य सांगितलें; आणि चवथ्यांत पत्नी व गृहिणी या नात्यानें त्यांच्या कर्तव्यांचा विचार झाला. आतां समाजांतील एक व्यक्ति या नात्यानें स्त्रियांचें कर्तव्य काय आहे तें पहावयाचें आहे. आणि पुढील, ह्मणजे, शेवटल्या व्याख्यानांत राज्यांतील एक प्रजा व मानवजातींतील एक मानव या नात्यानें स्त्रियांचीं कर्तव्यें कोण कोणतीं आहेत त्याचें निवेदन करण्यांत येईल.

प्रस्तुत विषयाचा विचार करितांना समाज या शब्दाचा वास्तविकपणें आपण जो अर्थ समजतों तो धरावयाचा नाहीं; तर केवळ ज्या आपल्या दरजाच्या लोकांशीं सुखदुःख, आदरातिथ्य, येणेंजाणें, आमंत्रणें वगैरे बाबतींत संबंध पडतो त्यांच्या पुरताच घेतला आहे. घर ह्मणजे स्त्रीचें राज्य असें ह्मटलें आहे तें योग्य आहे. तेव्हां अर्थात् घरांतील दिवाणखाना ह्मणजे तिच्या सिंहा-

सनाची जागा ह्मटली पाहिजे. हल्लींच्या सुधारलेल्या लोकांत बहुतेक सामाजिक करमणुकींत स्त्रियांचा भाग आहे एवढेंच नाहीं तर, त्यांना वर्चस्व दिलें पाहिजे असें सर्व लोक कबूल करितात. (ही गोष्ट पूर्वेकडील लोकांस आश्चर्यकारक[1] वाटेल.) आपणांस हें ठाऊक आहे कीं जसें इतर ठिकाणीं तसें घरांत सुद्धां बऱ्याच प्रसंगीं स्त्रियांस पुरुषांपुढें नमून वागावें लागतें असें व्यवहारांत आढळतें; तरी स्त्री ह्मणजे घरची मालकीण असें साधारणपणें लोक समजतातच.

चारचौघांत स्त्री कोणाही पुरुषाला मान देवो किंवा न देवो परंतु पुरुषानें मात्र लवून सलाम करणें, दरवाजा उघडून देणें, खुर्ची आणून ठेवणें वगैरे बाबतींत तिला मान देणें भाग आहे. (अशा प्रकारच्या मानाची कित्येक मूर्ख स्त्रियांस इतकी मातबरी वाटते कीं सामाजिक व राजकीय बाबतींत पुरुषांची बरोबरी करावयास गेलों असतां आपणास जो आज मान मिळत आहे तो सुद्धां मिळणार नाहीं अशा भीतीनें त्या सामाजिक व राजकीय हक्क संपादण्याच्या भानगडींतच पडत नाहींत.) यावरून आमच्या या अधिकाराचा उपयोग आह्मीं या-

---

१ दिवाणखाना ह्मणजे पाहुणेपई आदिकरून घरांतील सर्व स्त्री-पुरुष ज्या खोलींत एकत्र जमून गप्पागोष्टी करितात ती जागा. अशा प्रकारची वहिवाट आमच्या लोकांत नाहीं, एवढेंच नाहीं तर स्त्रियांना पुरुषांत मिसळण्याची मनाई असते, या मुळें ही गोष्ट आमच्या स्त्रियांस आश्चर्यकारक वाटण्याजोगी आहे.

पूर्वीच समाजाची स्थिति सुधारण्याच्या कामीं केला पाहिजे होता, असें कोणी साहजिक ह्मणेल. आह्मी आमच्या स्नेह्याच्या घरीं आमंत्रणास जातों, त्यांना आमच्या घरीं बोलावतों, हें सर्व करमणुकीकरितां असतें; उपदेश करण्याकरितां नसतें. तेव्हां उपदेश करण्याच्या हेतूनें एखादी स्त्री जर आह्मांस भोजनास बोलावील तर तें आह्मास फारसें रुचूं नये हें ठीकच आहे. जीं चांगलीं माणसें कधीं कधीं मित्रमेळ्यांमध्यें कांहींना कांहीं सार्वजनिक हित करण्याच्या हेतूनें येतात आणि सर्व वेळ एकामागून एका मनुष्याचें मन कोणत्यातरी सार्वजनिक कामाकडे वळवून घेतात, त्यांचा मलाही राग येतो. कारण, करमणुकीकरितां जमलेल्या मेळ्यांचा उपयोग करमणुकीच्या ऐवजीं परोपकाराच्या कामीं करून घेणें रास्त होणार नाहीं. याबद्दल मी स्वतःही अपराधी आहें. तथापि सामाजिक मेळ्यांवर आपल्या नैतिकगुणांचा जर स्वाभाविकपणें परिणाम होत असला किंवा जें जें ह्मणून सत्य, प्रेममय, आणि शुद्ध आहे त्याची आपण आवड दर्शविली आणि याच्या उलट ह्मणजे वाईट गोष्टींविषयीं कंटाळा दर्शविला, तर तेणेंकरून आह्मीं मेळ्याच्या मिषानें उपदेश करण्याची संधी साधली असें खचित होत नाहीं. कोणी चांगले उद्गार काढतो किंवा गमतीची गोष्ट सांगतो, तसेंच कोणी लाक्षणिक रीतीनें किंवा उखाळ्यापाखाळ्या काढून दुसऱ्यास टों-

चेल असें बोलतो; आणि या दोन्हीं गोष्टींचा आह्मी प्रायः सारख्याच रीतीनें स्वीकार करीत असतों. परंतु तसें न करितां जर आपण पहिल्या प्रकारच्या भाषणाविषयीं खरी आवड दर्शविली आणि दुसऱ्या प्रकारच्या भाषणाबद्दल तिटकारा दर्शविला तर शेवटीं या आपल्या वर्तनाचा परिणाम समाजावर हितकारक झाल्यावांचून राहणार नाहीं.

कोणी पुरुषांनीं स्त्रीजातीची निंदा केली असतां हांसून किंवा मान डोलवून त्यांस उत्तेजन देणें आणि जे सत्पुरुष स्त्रीजातीच्या उन्नत्यर्थ रात्रंदिवस कळकळ वाहत आहेत त्यांना आणि या निंदकांना सारखाच मान देणें हें आह्मां स्त्रियांस योग्य होणार नाहीं. कांहीं स्त्रियांस स्वाभिमान ह्मणून कांहींच नसतो. कोणी पुरुष स्त्रीजातीच्या विरुद्ध काय पाहिजे तें बोलोत, त्या केवळ त्यांची मर्जी संपादण्यासाठीं आपली मान डोलवितात. सर्व स्त्रिया जर एकमतानें राहून स्त्रीजातीची निंदा ह्मणजे प्रत्यक्ष आपलीच निंदा असें समजतील तर वरील निंदा करण्याचा प्रकार लवकरच बंद पडेल. पण याच्यापेक्षांही फार मोठे दोष होत असतात, ते दोष ह्मटले ह्मणजे ब्रह्मचर्य, सत्यशीलता आणि दया यांच्या नियमांचें उल्लंघन हे होत; हे अपराध ढळढळीतपणें ज्यांच्या हातून घडलेले असतील त्यांच्याशीं कोणताच संबंध न ठेवणें व त्यांच्यापासून दूर राहणें हें प्रत्येक

स्त्रीचें कर्तव्य आहे. कोणाच्या खासगी बाबती उकरून काढण्याची कोणास जरूर नाहीं. परंतु जेव्हां एकाद्याचें दुराचरण आणि अपराध उघडकीस येतात, ह्मणजे जेव्हां स्त्री किंवा पुरुष व्यभिचार, ठकबाजी आणि क्रूरता यांबद्दल अपराधी ठरतात तेव्हां अशा माणसांस सामाजिक मेळ्यांत आपल्या घरीं येऊं देणें किंवा आपल्या मित्रांच्या घरीं त्यांस भेटणें हें दूषणास्पद होय.

हें माझें मत लंडन एथें व्याख्यानामध्यें जेव्हां मी बोलून दाखविलें तेव्हां मला पुष्कळांनीं निष्ठुरपणाचा दोष दिला; आणि ते ह्मणाले कीं अशा गुन्हेगारांस कांहीं वेळ गेल्यानंतर पुनः समाजांत येऊं द्यावें. नेहमीं पश्चात्ताप पावलेल्या मनुष्यांस, त्यांतूनही लाचार झालेल्या स्त्रियांस दयेनें वागवावें अशी माझी उत्कट इच्छा असते; असें असतां निष्ठुरपणाचा आरोप मजवर लादणें बरोबर होणार नाहीं. परंतु या बाबतींत गैर समज दोन कारणांनीं झालेला आहे. माझें बोलणें फक्त सामाजिक करमणुकीस उद्देशून होतें. परंतु मी एकंदर सामाजिक व्यवहारासंबंधानें बोलत आहें असें ते समजले. त्यांच्या मनांत नम्र झालेल्या आणि पश्चात्ताप पावलेल्या अपराध्यांविषयीं विचार आला; आणि माझा कटाक्ष जे दुर्व्यसनी लोक प्रत्येक सामाजिक मेळ्यांत तोऱ्यानें मिरवतात त्यांच्यावर होता. या गोष्टीचें महत्व फार असल्यामुळें मी येथें चार शब्द विस्तारानें बोलतें.

कित्येक स्त्रीजातीचे मित्र नसतां आपणास मित्र ह्मणवितात व कित्येक तर उघडपणें शत्रुत्वानें वागतात. या दोहोंप्रकारच्या लोकांचे विचार व आचार समाजांत घोंटाळा उत्पन्न करण्यासारखे असतात. त्यांस वाटतें कीं प्रत्येक स्त्रीला पाहिजे तेव्हां पाहिजे त्या पुरुषावर प्रेम करण्याची मोकळीक असावी. हें घाणेरडें मत सर्वथैव त्याज्य आहे. या मताच्या बऱ्याच स्त्रिया अमेरिकेंत आहेत; तशी स्थिति इंग्लंदांत नाहीं. तथापि इंग्लंदांत उच्च प्रतीच्या लोकांत एक नवीन प्रकारचा अल्लडपणा प्रचारांत येत चालल्यामुळें स्त्रीजातींतून विनय नाहींसा होत चालला आहे. आणि उच्च प्रतीच्या लोकांचा कल पाहिला असतां त्यांच्यामध्यें ब्रह्मचर्याविषयीं बोलतांना शिथिलता दिसून येते. हल्लीं ही गोष्ट विचारापुरतीच येऊन राहिली आहे; परंतु कालान्तरानें ती आचरणांत येऊन तिचा परिणाम भयंकर होईल. यास्तव असा घोंटाळा उत्पन्न करणाऱ्या आचारांविचारांपासून खऱ्या सामाजिक व राष्ट्रीय उन्नतीचा विचार पृथक् करावा, हाच माझा हीं व्याख्यानें देण्याचा मुख्य हेतु आहे.

या व्याख्यानमालेंत नैतिक प्रश्नांचा शास्त्रीय रीतीनें विचार करण्याचा मीं प्रयत्न केला आहे. ह्मणजे, जीं मूलतत्वें आह्मां सर्वांस मान्य आहेत, त्यांच्या आधारें होईल तितकें करून पद्धतशीर रीतीनें सर्व प्रश्नांचा वि-

चार केला आहे. आतां या तत्त्वांपैकीं सर्वांत मुख्य तत्त्व ह्मटलें ह्मणजे सद्गुण, हा सुखापेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें आह्मीं सुखसाधनासाठीं सद्गुण एकीकडे ठेवतां नये हें आहे. यास्तव, सर्व समाजाच्या नैतिक कल्याणाशीं ज्याचा अत्यंत निकट संबंध आहे असा जो सन्मार्ग तो थोडक्याशा मार्ग चुकलेल्या व्यक्तींवर दया करण्याकरितां किंवा त्यांच्या सुखाकरितां ह्मणून सोडून चालावें असें जर कोणी ह्मणेल तर ती गोष्ट मला मान्य असूं नये हें योग्यच आहे.

पण माझ्या मैत्रिणींनो, एकंदर समाजाशीं न्यायानें वागणें किंवा अपराध्यांशीं दयेनें वागणें या दोहोंतून कोणती गोष्ट करावी या विचारांत पडण्याची आपणांस जरूर नाहीं. कारण माझें असें दृढ मत आहे कीं, अशा प्रकारें कोणाच्या गुन्ह्याकडे काना डोळा केल्यानें त्यावर दया केली असें होत नाहीं. कारण अशा अल्प प्रायश्चित्तानें त्यानें केलेल्या भयंकर पातकांचें क्षालन न होतां उलट तो अधिकाधिक बिघडत जातो, आणि त्याचें जीवित निरर्थक होतें; आणि त्याची स्थिति उन्नतीच्या मार्गास अयोग्य होते. असें झालें ह्मणजे अशा लोकांवर जी दया ह्मणून आपण करावयास जातों तिच्या योगानें ज्या बिचाऱ्या निर्दोषी लोकांचें या दुर्व्यसनी लोकांच्या संसर्गापासून रक्षण करणें आपलें कर्तव्य होय, त्यांना निर्दयपणानें वागविल्यासारखें होतें.

आतां जें मी बोलत आहें तें केवळ ब्रह्मचर्यभंग किंवा व्यभिचार यांच्याच संबंधानें बोलत आहें असें नाहीं. मी पूर्वींच सांगितलें आहे कीं, लबाडी किंवा क्रूरपणा हे दोषही वरील दोषांच्या तोडीचे आहेत. यास्तव जे लोक दुराचारी आहेत असें माहित आहे, त्यांच्याशीं समाजानें कसें वागावें याचा पुनः एकवेळ आपण विचार करूं. कांहीं एक नियमित काल गेल्यानंतर अशा दुराचारी लोकांस पुनः सामाजिक मेळ्यांत येऊं द्यावें असें आपली दयाबुद्धि आपणास सांगते काय ? ज्यांचीं मनें पापाचरणानें मळिण झालीं आहेत असे लोक, केवळ त्यांना आपल्या अपराधांबद्दल दुःख झालें ह्मणून, निर्दोषी व पापभीरू लोकांच्या करमणुकींत मिसळण्यास पात्र होतात काय ? अशा सामाजिक मेळ्यांत त्यांना घेणें हें त्यांच्या पश्चात्तापाबद्दल बक्षीस काय ? ठीक ! पश्चात्तापाला बक्षीस काय, तर ह्मणे मेजवानी ? दुःखानें विव्हळ झालेल्या अंतःकरणाचें समाधान करण्यास उपाय कोणता; तर खेळ !

अशा लोकांशीं त्यांच्या घरीं खासगी रीतीनें दळणवळण ठेवणें ही गोष्ट निराळी आणि ज्यांचा समज असा आहे कीं त्यांच्याशीं दळणवळण ठेवल्यानें त्यांचें आपण हित करूं, त्यांनीं तसें करणें हें ठीकच आहे; पण ज्या माणसाला खरा पश्चात्ताप झाला आहे तें माणूस अशा उत्साहाच्या ठिकाणीं जाऊं इच्छिणारच नाहीं, इतकेंच

नव्हे, तर उलट अशा ठिकाणीं जाण्यास त्याला शरम वाटेल. बेअब्रू झाली असतां निर्लज्यपणें अशा उत्साहांत मिसळण्याची इच्छा प्रदर्शित करण्यांत येते तेथें खरा पश्चात्ताप नसून केवळ कोडगेपणा आहे असें समजावें. आतां वर सांगितल्याप्रमाणें सामाजिक मेळ्यांतून बहिष्कृत केलेल्या लोकांस पुनः समाजांत घेण्याची कांहीं एक मुदत ठरवून टाकावी असें जें कित्येकांचें मत आहे त्याविषयीं मला वाटतें कीं, तसें केल्यानें कांहीं इष्ट लाभ होणार नाहीं; कारण पश्चात्तापाची मुदत कोणती ठरविणार? पांच वर्षें, कीं तीन वर्षें, कीं एक वर्ष, कीं एक-महिना? कोणतीही मुदत एकदां ठरविली तरी ती हळू हळू कमी होत जाणार, यांत संशय नाहीं. दुराचारी मनुष्याला परत समाजांत मिसळूं देणें यांत दया आणि क्षमा आहे असें एकदां गृहीत केलें ह्मणजे मग कोणालाही दुसऱ्याला फार वेळपर्यंत समाजाबाहेर ठेवून आपल्याकडे कडूपणा घेणें आवडणार नाहीं. असें झालें ह्मणजे बहिष्कार केवळ नांवाचा होईल, आणि असे लोक पुनः आपल्या इष्टमित्रांमध्यें पूर्ववत् स्वच्छंदानें मिसळूं लागतील.

माझ्या मतें ही दया नव्हे; तसेंच हिला सत्य किंवा सरळपणा तर मुळींच ह्मणतां येणार नाहीं. सत्यशीलता हा स्वतःसंबंधी सद्गुण असून त्याची पवित्रता अमर्याद आहे; व तो सद्गुण कोणत्याही परोपकाराच्या कृत्या-

करितां एकीकडे ठेवतां येणार नाहीं. हा माझा विचार मी या व्याख्यानमालेच्या आरंभापासून तुमच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करीत आलें आहें. आपल्या सर्व व्यवहारांत सरळपणानें आणि साधेपणानें वागण्यास झटावें असें मी माझ्या सामर्थ्याप्रमाणें आपणास सांगत आलें आहें; तर मग मोठमोठे गुन्हे करणाऱ्या लोकांस समाजांत घ्यावें असें कित्येक लोक सांगतात त्याची वाट काय? जर अशा लोकांस सामाजिक मेळयांत वगैरे घेतलें तर ह्यांना इतरांप्रमाणें सन्मानानें व स्वागतपूर्वक वागविलें पाहिजे. कारण त्यांस एकवेळ समाजांत घेतल्यानंतर तिरस्कारपूर्वक वागविणें व त्यांची हेळसांड करणें हें कोणासही आवडणार नाहीं. समाजानें सर्वांशीं सारख्या आदरानें वागलें पाहिजे आणि या गोष्टीचा लाभ वरील लोक समाजांत आले असतां त्यांसही मिळणें योग्य आहे; पण ज्यांच्या आंगीं सत्यशीलता, स्वाभिमान व सरळपणा ह्मणून वास करीत आहेत त्यांच्या हातून भामटे, व्यभिचारी आणि नाना प्रकारचीं घाणेरडीं व क्रूर कर्मे करणाऱ्या लोकांस मान देणें अथवा त्यांशीं सलोख्यानें वागणें ही गोष्ट होईल तरी कशी? एखाद्या भामट्यानें कांहीं थट्टेचें भाषण केलें असतां आपला आनंद दर्शविला पाहिजे; किंवा ज्यानें थोड्यावेळापूर्वीं एकाद्या प्राण्याचे क्रूरपणानें हाल हाल करून आपले हात दूषित केले असतील अशांना नमस्कार केला पाहिजे;

किंवा ज्यानें एखाद्या कुटुंबाच्या सुखाचा आपल्या दुराचरणानें विध्वंस केला असेल, त्याचा सुद्धां आदरसत्कार केला पाहिजे, असा प्रकार ज्या समाजांत असेल तो समाज ढोंगी व खोटा समजला पाहिजे. मला अशा समाजापासून कोणत्याही प्रकारें आनंद वाटणार नाहीं; त्याचा मी सर्वथा त्याग करीन, व प्रत्येक प्रामाणिक व सत्यशील मनुष्यानेंही त्याग करावा अशी मी इच्छा करीन. याबद्दल मला कोणी वाईट किंवा निर्दय ह्मटलें तरी चालेल; पण मी निक्षून सांगतें कीं, अशा प्रकारें आयुष्यामध्यें मिथ्याचार ठेवणें आणि ज्या पुरुषांच्या आचरणाचा मला तिरस्कार वाटतो त्यांशीं मित्राप्रमाणें वागण्याचें ढोंग करणें आणि ज्यांना मान मिळणें उचित नाहीं त्यांना मान दिल्याची बतावणी करणें ही गोष्ट माझ्या हातून कधींही होणार नाहीं. ज्या मनुष्याचीं कृत्यें ईश्वराच्या क्रोधास पात्र आहेत त्याचा सहवास मी कधींही करणार नाहीं. त्याचप्रमाणें दुराचरणी मनुष्याशीं शेकह्यान्ड करून मी आपला हात कधींही भ्रष्ट करणार नाहीं.

स्त्रियांनीं दुराचाराच्या कृत्यांविषयीं आपला तिरस्कार दाखविला पाहिजे, असें वर सांगितलें. आतां त्यांनीं समाजांत सद्गुण आणि सुख यांची वृद्धी करण्याविषयीं कशी मदत करावी याचा विचार करूं. समाजास एकदम उन्नत आणि सुखी करण्याचा माझ्या मतें उत्तम

आणि सर्वसाधारण असा उपाय ह्मटला ह्मणजे सत्याचा प्रसार करणें हा होय. मीं माझ्या दुसऱ्या व्याख्यानांत सत्यशीलता हा मुख्यतः स्वतःसंबंधी सद्गुण आहे आणि त्याच्या खालोखाल तो सामाजिक सद्गुण आहे असें सांगून सामाजिकदृष्टया त्याचा विचार पुढें करीन असें सांगितलें होतें. तो आतां या प्रसंगीं करावयाचा आहे.

साधारण सामाजिक व्यवहारांत सत्यशीलता आणि सभ्यपणा यांचा विरोध पडला असतां आपण अंगीकार कशाचा करावा याची बऱ्याच चांगल्या मनाच्या मनुष्यांस देखील केव्हां केव्हां पंचाईत पडते. कित्येक लोक तर सभ्यपणा दाखविणें हें सामाजिक कर्तव्य आहे असें समजून, कारण पडल्यास सत्यशीलतेला एकीकडे झुगारून देतात आणि कंटाळवाणा तोंडपुजेपणा स्वीकारतात. कित्येक सत्यशीलतेपुढें दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची मातबरी नाहीं असें ह्मणून सभ्यपणाला एकीकडे गुंडाळून ठेवितात, आणि दांडगटपणानें व बेपर्वाईनें वागतात, असें आपणास आढळून येतें. यास्तव, या प्रसंगीं जेथें सत्यशीलता आणि सभ्यपणा यांचा विरोध दिसून येईल तेथें आपण कोणत्या प्रकारें आचरण ठेवावें याचा नीतिदृष्टया विचार करून कांहीं नियम ठरविण्याचा प्रयत्न केला असतां वावगें होणार नाहीं.

मागच्या प्रसंगीं प्रत्यक्ष शब्दांस कांहीं अर्थ नसून आपण परस्परांच्या संमतीनें देऊं तो अर्थ त्या शब्दांचा

समजला जातो असें सांगितलें होतें, याची तुह्मांला आठवण असेलच. बोलणारा आणि ऐकणारा या उभयतांच्या मतानें जो अर्थ लागू होतो तो त्यांचा अर्थ आहे असें समजलें पाहिजे. खरें बोलणें ह्मणजे ज्याच्याशीं आह्मी बोलत आहों त्याला खरा प्रकार समजेल असें बोलणें, खोटें बोलणें ह्मणजे दुसऱ्याला आपल्या शब्दांनीं फसविणें किंवा फसविण्याचा प्रयत्न करणें, हा ढळढळीत नियम डोळ्यांपुढें ठेविला असतां तुह्मांला असें दिसून येईल कीं प्रत्येक भाषेमध्यें कांहीं कांहीं शब्दप्रयोग त्यांच्या शब्दार्थीं वापरण्यांत येत नाहींत; ह्मणजे सांप्रदायामुळें त्यांना निराळाच अर्थ प्राप्त झालेला असतो. अशा शब्दप्रयोगांपासून कोणी फसत नाहीं अथवा कोणाचा कोणाला फसविण्याचा हेतुही नसतो. उदाहरणार्थ कोठेंकोठें पत्राच्या शेवटीं 'आपला नम्र आज्ञांकित सेवक' असें लिहिण्याचा प्रघात असतो; परंतु वास्तविकपणें पाहतां 'नम्रता' किंवा 'आज्ञांकितपणा' कोणत्याही प्रकारें दाखविण्याचा हेतु नसतो. तसेंच एकादा मनुष्य घरीं आला असतां घरचा यजमान 'या, हें घर तुमचेंच आहे' असें ह्मणतो. परंतु याचा अर्थ शब्दशः समजून जर तुह्मी त्याच्या घरांतील एखादी चीजवस्त खिशांत घातली तर लगेच तुह्मांला चतुर्भुज करून पोलिसाच्या हवालीं करण्यास तो चुकणार नाहीं. तर मग अशा शब्दप्रयोगांचें महत्व तरी किती समजाव-

याचें ? केवळ सभ्यपणा दाखविण्यापुरतें. हे केवळ शिष्टसांप्रदाय आहेत, याच्या पलीकडे कांहीं नाहीं, असें समजलें पाहिजे. यास्तव तुह्मी जेव्हां ते वापराल तेव्हां सभ्यपणा दाखविण्यापुरतेच जर तुह्मी ते वापराल तर त्यांत तुमची सत्यशीलता कांहीं कमती होत नाहीं. कारण, अशा प्रसंगीं कांहीं लबाडी नसते किंवा कोणाला फसविण्याचा हेतूही नसतो. यास्तव, साधारणपणें जे शब्दप्रयोग शिष्टसांप्रदायानुरूप सभ्यपणा दाखविण्याकरितां वापरण्यांत येतात, ते त्यांच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें वापरल्यानें सत्यशीलतेच्या नियमांचें उल्लंघन होत नाहीं हें एकदांचें ठरवून टाकूं या.

एथपर्यंत सर्व ठीक आहे; परंतु, कांहीं स्त्रिया याच्याही पलीकडे जातात. दुसऱ्याची मर्जी संपादण्याच्या हेतूनें आपल्या ठिकाणीं विशेष कळकळ व ममता आहे असें दाखविण्याकरितां, सभ्यपणाचे प्रचारांत आलेले जे शद्बप्रयोग आहेत त्यांच्याही पेक्षां ज्यास्त शद्ब त्या वापरतात; आणि फाजील सभ्यपणा दाखवून खोटसाळपणाचें आचरण करितात. यासाठीं माझें प्रत्येक स्त्रीला हें सांगणें आहे कीं तिणें सभ्यपणा दाखवितांना साधारण रूढींत असलेल्या शद्बप्रयोगांहून दुसरे विशेष ममता किंवा कळकळ दाखविणारे शद्ब वापरूं नये. हे शद्ब फक्त ज्याच्याविषयीं खरोखरच ममता आणि कळकळ आपल्याला असते त्याच्यासाठीं राखून ठेवावे. तुह्मीं

आपल्याशीं, आपल्या कुटुंबाशीं आणि एकंदर समाजाशीं खरेपणानें वागावें अशी माझी तुह्मांस विनंति आहे. ह्मटलें आहे.

सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म ।
सत्य ईश्वरा आवडे । सत्यसंगें कीर्ति जोडे ।

व्यवहारांत सरळपणानें वागा. वांकडे मार्ग, हांजी हांजीपणा, तोंडपुजेपणा आणि नीचपणाच्या युक्त्या यांचें भय बाळगा, आणि त्यांच्या वाऱ्यासही उभ्या राहूं नका. अशाप्रकारें ज्यावेळेस स्त्रिया नीचपणाचें आचरण सोडून देतील, आणि असें आचरण केल्याचा कोणी आरोप आपणावर आणला असतां त्याबद्दल त्यांस मानहानि वाटून मरणप्राय दुःख होईल तो काळ स्त्रियांला राजकीय हक्क ज्याकालीं प्राप्त होतील त्या काळापेक्षां अधिक श्रेयस्कर समजला पाहिजे.

समाजाला सुधारण्याची आणि पवित्र करण्याची स्त्रियांच्या आंगीं जी विशेष शक्ति आहे तिचा उपयोग त्यांना कोणत्या मार्गानें करतां येईल, याविषयीं अधिक सांगत बसत नाहीं. स्त्री स्वतः जर शुद्धाचरणी आणि उदार मनाची असली तर ती जेथें जेथें जाईल तेथें तेथें आपल्या सदाचरणाचा प्रकाश पाडल्याशिवाय राहणार नाहीं.

येथें एक नियम विशेषेंकरून सांगितला पाहिजे तो असा. आमच्या एकंदर सामाजिक व्यवहारांत घरांत किंवा बाहेर, कोणत्याही मनुष्याच्या आंगीं लोकांविषयीं

कळकळ आणि मनाची उत्सुकता जितक्या अंशानें असेल, तितक्या अंशानें त्याच्या हातून लोकहित व्हावयाचें. विचारशक्ति आणि विद्वत्ता यांचें प्राधान्य वरील गोष्टीइतकें नाहीं. म्याथ्यु डेव्हनपार्ट हिल हे स्वतः फार बुद्धिवान आणि दयाळू होते. त्यांनीं ह्मटलें आहे कीं, प्रेम आणि दया यांच्या जबरदस्त सामर्थ्याची यथायोग्य अटकळ करणें फार कठीण आहे. प्रेम आणि दया यांच्या ओघाचा वेग इतका असतो कीं तो जबरदस्तीनें आपणास ओढून नेऊं लागला ह्मणजे त्याच्या पुढें आपलें कांहीं चालत नाहीं. तुह्मांपैकीं ज्या तरुण असल्यामुळें निरनिराळ्या साधनांनीं ज्ञानशक्ति वाढविण्याच्या उमेदींत आहेत त्यांनीं विचारशक्ति ही दयेपेक्षां, किंवा ज्ञान प्रेमापेक्षां, श्रेष्ठ आहे असें कधींही समजूं नये. कित्येक अधम लोक मोठमोठ्या शास्त्रज्ञ लोकांपेक्षां अधिक ज्ञान मिळवूं शकतील; परंतु इतकें ज्ञान प्राप्त करून घेतल्यानंतरही शेवटीं ते प्रत्येक प्रकारचें क्रूर, नीच आणि दुष्ट आचरण करण्यास मागें पुढें पाहणार नाहींत. खाटिकाचें ज्ञान स्वतः पाळलेल्या ज्या जनावराची तो मान कापतो त्याच्यापेक्षां अधिक असतें; परंतु या जनावराच्या आंगीं धन्याविषयीं जी प्रीती असते तीमुळें तें जनावर खाटकापेक्षां श्रेष्ठ समजलें पाहिजे. यावरून पाहतां असें दिसून येईल कीं, उन्नत व निरपेक्ष प्रेम आंगीं असणें ही एक मोठी देणगी आहे, आणि हीच स्त्रीजातीची शक्ति आहे.

ही शक्ति स्त्रियांस पुरुषांची योग्यता प्राप्त करून देणार नाहीं (आणि अशा योग्यतेची मी पर्वाही बाळगीत नाहीं.) परंतु तिच्या योगानें स्त्रिया, नैतिक गोष्टींत पुरुषांसारख्या किंबहुना त्यांच्याहूनही अधिक श्रेष्ठ होतील. वरील प्रकारचें प्रेम हा मनुष्याच्या आंगीं एक दैवी गुण आहे. या गुणाच्या योगानें आह्मां स्त्रियांस जय मिळेल.

ह्मणून घरांत किंवा घराबाहेर आपल्या सभोंवताल्च्या सर्व मनुष्यांशीं सुखदुःखाच्या सर्व प्रसंगीं स्त्रियांनीं एकसारखें प्रेमानें, आनंदानें व सौम्यतेनें वागलें पाहिजे, ही गोष्ट स्त्रियांची उत्तम वागणूक कशी असावी हें सांगत असतांना जर मीं तुमच्या मनावर स्पष्ट रीतीनें ठसविली नाहीं तर मी आपल्या कर्तव्यास चुकलें असें होईल. लंदन शहरामध्यें कोणा एका स्त्रीला दिवसांतून शेंकडों लोक भेटावयास येतात, पण त्यांत तिचा खरा मित्र असा एकही नाहीं असें मीं ऐकलें आहे, तें खरें असलें तर तिच्या सारखी दुःखी व दुर्भागी स्त्री या जगांत दुसरी नाहीं असें मी समजतें. अशा स्त्रियांविषयीं माझी कल्पना निराळीच आहे. माझ्या मतें प्रथम प्रत्येक चांगल्या मनुष्यास अत्यंत जिवलग असा एक तरी मित्र असला पाहिजे, नंतर पुष्कळांविषयीं त्याच्या मनांत ममता व शेवटीं सर्वांविषयीं दया व औदार्य हे गुण असले पाहिजेत. मला वाटतें कीं, प्रत्येक मनुष्यास त्याच्या सर्व आयुष्यांत केव्हांना केव्हां तरी

एकदां विजातीयाशीं (ह्मणजे स्त्रीला पुरुषाशीं किंवा पुरुषाला स्त्रीशीं) खरा विवाह करण्याची किंवा सजातीयाशीं खरी मैत्री जोडण्याची संधि मिळतेच. आणि अशा प्रकारचा निकट संबंध असणें ही एक या मृत्युलोकीं अत्यंत आनंदाची व वैभवाची गोष्ट होय. अशा संबंधानें बद्ध झालेल्या मनुष्यांस एकमेकांकडे आपलें सर्व अंतःकरण मोकळें करावयास सांपडतें व त्यांचें परस्परांवरचें प्रेम उत्तरोत्तर दृढ होत जातें.

सुख व आनंद प्राप्त करून घेण्याचा आमचा हक्क नैसर्गिक असून परंपरागत आहे; तो आपल्या स्वतःकडून दोष घडल्याशिवाय दुसऱ्या कोणाला हिरावून घेतां येणार नाहीं. तो आह्मां स्त्रियांना विवाहित स्थितींत प्राप्त होतो, असें नेहमीं सांगण्यांत येतें आणि तें खरें आहे; कारण, हा विवाह जर खरोखरच जसा योग्य प्रकारचा असावा तसा असला तर त्यापासून जें सुख व जो आनंद आहे त्याची तुलना कशानेंही होणार नाहीं यांत संशय नाहीं. किंबहुना त्यांत सुखाची व आनंदाची परमावधि आहे असें ह्मटलें तरी चालेल.

अलीकडे या देशांतील (विलायतेंतील) जवळ जवळ एक चतुर्थांश स्त्रिया अविवाहित राहतात; आणि ज्या विवाह करितात त्यांस तरी, स्त्रियांनीं पुरुषांशीं आपण होऊन लग्नाची गोष्ट काढण्याचा रिवाज नसल्यामुळें, आपणाला जो पुरुष मनापासून आवडतो त्याच्याशींच विवाह कराव-

यास सांपडतो असें नाहीं; या दोन गोष्टींचा विचार केला असतां मुलींनीं लहानपणापासून हें ध्यानांत बाळगिलें पाहिजे कीं, जरी विवाह हा एक मैत्री संपादण्याचा उत्तम मार्ग आहे तरी त्याच्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं किंवा पतिपत्नीच्या संबंधाशिवाय इतर संबंधांत आपल्या प्रेमाचा पूर्ण विकास होण्यास जागाच नाहीं असें नाहीं. आतां, कांहीं स्त्रियांना ( ह्मणजे विशेषें करून ज्यांचा स्वभाव हांजी हांजी करण्याचा आहे त्यांना ) लग्न[1] केल्याशिवाय आपल्या जन्माचें सार्थक झालें असें वाटावयाचें नाहीं. अशांना चांगला नवरा मिळो असें मी इच्छितें. पण केवळ मित्रत्वामध्यें तृप्ति मानून राहण्यास समर्थ अशाही पुष्कळ स्त्रिया आहेत, आणि विवाहापेक्षां स्नेहास अधिक योग्य अशा स्वभावाच्याही स्त्रिया कांहीं थोड्या नसतात; अशा स्वभावाच्या स्त्रियांना प्रपंचांत दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची गरज नसते. व त्या मित्रत्वास फार चांगल्या असतात. यापुढें दिवसांनुदिवस ज्यांना दुर्दैवानें स्वतःच्या बहिणी नाहींत अशा स्त्रिया

---

१ आमच्या देशांत स्त्रियांचें लहानपणीं लग्न झाल्याशिवाय राहत नाहीं, तेव्हां त्यांस ही गोष्ट लागू नाहीं. तथापि दुर्दैवानें वैधव्यदशा प्राप्त झाली आहे त्यांनीं ही गोष्ट ध्यानांत बाळगण्याजोगी आहे. स्वतः मिस् कॉब बाईचें मिस् मेरी कारपेंटर या बाईवर प्रेम फार असे. या दोघींनीं मिळून गरीब लोकांची व स्त्रियांची स्थिति सुधारण्याकरितां जे परिश्रम केले आहेत त्यांचें वर्णन थोडेंबहुत आह्मीं या पुस्तकाच्या प्रारंभीं दिलेल्या चरित्रांत केलें आहे.

विवाह न करतां, दुसऱ्या स्त्रियांशीं सर्व आयुष्यभर भगिनीप्रेमानें एकत्र राहून त्यांच्या समागमांत प्रेमानंदाचा उपभोग घेऊं लागतील.

अशा अत्यंत निकट व चिरकालीन स्नेहाशिवाय स्नेहाळू अंतःकरणाला या समृद्ध पृथ्वीवर निरनिराळ्या माणसांशीं विलक्षण प्रकारचा स्नेह साधतां येतो; मग तीं माणसें ज्यांच्याविषयीं आपल्या मनांत पूज्यभाव वसत आहे अशीं वृद्ध किंवा तरुण, समवयस्क किंवा अल्पवयस्क, पुरुष किंवा स्त्रिया, किंवा विद्वान सदाचरणी थोर माणसें असोत, अथवा ज्यांच्या मनांत आमच्याविषयीं पूज्यभाव असल्यामुळें आमच्या सभोंवतीं मधमाशांप्रमाणें जमतात अशीं नवीन उमेद्वार तरुण माणसें असोत.

सारांश, माझ्या मैत्रिणींनो, सामाजिक कर्तव्याचा समावेश प्रेम या एका शब्दामध्यें होतो. कुटुंबावर, घरांतील सर्वांवर, किंबहुना सर्व पृथ्वीवर प्रेम केलें तर सामाजिक कर्तव्याची आपल्याकडून पूर्तता झाली असें समजावें. प्रेमाशिवाय सामाजिक कर्तव्य होऊं शकत नाहीं. सर्वांशीं प्रेमानें वागल्यानें पुरुष किंवा स्त्री ईश्वराच्या सन्निध राहते, एवढेंच नाहीं तर, अशा मनुष्याच्या ठिकाणीं सर्व जगाला वळण लावण्याच्या आणि सुखी करण्याच्या दैवी शक्तींचा अंश असतो असें जाणावें.

## व्याख्यान ६ वें.

## राज्यांतील एक प्रजा या नात्यानें स्त्रीचीं कर्तव्यें.

राष्ट्रांतील सार्वजनिक कामांमध्यें स्त्रियांस जो भाग घेण्याची आजपर्यंत मोकळीक देण्यांत आली आहे ती अनियमित ह्मणजे कधीं फार संकुचित, कधीं अति विस्तृत अशी आहे. स्त्रीजात एक तर अगदीं शिखरावर नाहीं तर अगदीं तळाशीं, सिंहासनावर नाहीं तर अगदींच कोठें नाहीं, अशी होऊन बसली आहे. जगाच्या इतिहासामध्यें तीस चाळीस स्त्रिया राज्यकर्त्या झाल्या; त्यांपैकीं भरभराटीस चढलेल्या आणि हुषार राज्यकर्त्या स्त्रियांचें प्रमाण, जे हजारों राजे होऊन गेले त्यांपैकीं भरभराटीस चढलेल्या हुषार राजांच्या मानानें, जास्त आहे ही गोष्ट फार आश्चर्यजनक आहे. अहिल्याबाई, एलिझाबेथ, मेरिया थेरिसा, आन, महाराणी व्हिक्टोरिया, वगैरे स्त्रियांच्या आंगीं राज्य चालविण्याचें सामर्थ्य इतकें विशेष प्रकारचें होतें व आहे कीं, प्रत्येकीनें त्याबद्दल इतिहासांत आपलें नांव गाजविलें आहे. एकट्या फ्रान्स देशांत ह्मणजे, जेथें स्त्रियांस गादीचा अधिकार नव्हता तेथें मात्र, जणूं काय, त्या देशाला या अन्यायाबद्दल शिक्षा करण्यासाठीं, डायना डी पायटीअर्स, माडम डी पांपाडोर यांसारख्या वाईट स्त्रिया उत्पन्न होऊन त्यांनीं देशाची फार हानि केली.

मिल यांनीं ह्मटलें आहे, "मी इंडिया आफिसांत काम करीत असतां हिंदुस्थानांत कोणत्याही प्रदेशांत देशी राज्य चांगल्या प्रकारें चाललें आहे असें जेव्हां मला ऐकूं येई, तेव्हां पहावें तों चहूंपैकीं तीन बाबतींत तरी एखादी बेगम किंवा राणी हिनें झनाना सोडून मोठ्या चतुरपणानें आणि शहाणपणानें राज्याचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं आहेत असें आढळून येई. असा शहाणपणा राजांच्या आंगीं क्वचितच दिसून येतो. यावेळीं हिंदुस्थानांत देशी राज्यकर्त्यांमध्यें एक स्त्री राज्य करीत आहे, ती सर्वांत हुषार असून इंग्रजसरकारची विश्वासू मैत्रीण आहे." इतिहासकर्त्यांस राज्यकर्त्या स्त्रियांच्या आंगीं असलेली अशा प्रकारची विशेष कर्तबगारी व योग्यता हीं सहन झालीं नाहींत; आणि त्यांनीं त्यांचें कारण, पुरुषांच्या मानास कोणत्याही प्रकारें कमीपणा येऊं नये अशा रीतीनें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ते ह्मणतात कीं, स्त्री राज्यकर्ती असली ह्मणजे ती आपल्या मंत्रीजनांच्या सल्ल्यानें वागते; यामुळें तें राज्य चांगलें चालतें. आणि पुरुष राज्यकर्ता असला ह्मणजे तो बहुधा वाईट चालीच्या बायकांच्या नादीं लागल्यामुळें राज्यकारभाराची अव्यवस्था करितो. यावर माझें एवढेंच उत्तर आहे कीं, हुषार व चांगले मंत्री शोधून काढणें हें तर राजाच्या हुषारीचें मुख्य लक्षण होय. ती योग्यता ज्या राजाच्या आंगीं नाहीं तो राजा नालायक ह्मटला पाहिजे. तशांतही, वरील भरभराटीस चढलेल्या

बऱ्याच स्त्रियांनीं राज्यसूत्रें आपल्याच हातांत धरिलीं होतीं व त्यांनीं आपल्या हाताखालीं जे कामगार नेमिले होते ते मंत्री नसून केवळ चिटणीस होते असें ह्मटलें तरी चालेल. यावरून या इतिहासकर्त्यांचें अनुमान किती चुकीचें आहे हें सहजच दृष्टीस पडेल. तसेंच उलटपक्षीं पाहिलें तर जो राजा वाईट माणसें निवडून पदरीं ठेवितो आणि त्यांच्या सल्ल्यानें वागतो तो स्वतःच किती दुर्बळ व घातक असला पाहिजे याचें अनुमान सहज होण्यासारखें आहे.

मोठमोठ्या राज्यकर्त्या स्त्रियांची गोष्ट तर एकीकडे राहूंद्या; परंतु एकंदर इतिहास पाहूं गेल्यास आपणास असें आढळून येईल कीं, जेव्हां जेव्हां ह्मणून एखादें राज्य फार संकटांत पडलें आहे तेव्हां तेव्हां एखाद्या स्त्रीनें पुढें सरसावून आपल्या राष्ट्रास संकटांतून पार पाडिलें आहे. अशा स्त्रियांचे केव्हां केव्हां त्यांच्या देशबांधवांकडून हाल झाले आहेत; तथापि पुष्कळ प्रसंगीं त्यांच्या पराक्रमांबद्दल त्यांचें गौरवही करण्यांत आलें आहे.

परंतु राज्यपद आणि शौर्य यांच्या शिखरावर जाऊन बसणें किंवा अगदीं राष्ट्रीय हक्कविहीन होऊन राहणें या दोहोंच्या मधली पायरी आमच्या दुर्दैवी स्त्रीजातीला कधींच मिळालेली दिसत नाहीं. सार्वजनिक हितबुद्धि, या गुणाची वृद्धि करण्यास आह्मांस उत्तेजन मिळालेलें

नाहीं. अशा स्थितींत नागरिक या नात्यानें स्त्रियांच्या कर्तव्यांविषयीं मी जें बोलेन तें बहुतेक अंशीं काल्पनिक स्थितीस अनुलक्षून बोलल्यासारखें होणार. जुन्या रोमन लोकांमध्यें स्त्रियांस नागरिकपणाचे हक्क हल्लींच्या आमच्या विशेष हक्कापेक्षां जास्त होते. हल्लींचा आमचा विशेष हक्क ह्मटला ह्मणजे पुरुषांप्रमाणें आह्मीं सर्व प्रकारचे कर द्यावे, परंतु त्यासंबंधानें आह्मां स्त्रियांना मात्र कोणताच अधिकार मिळूं नये हा होय! स्त्रियांच्या दयाळूपणास आणि सार्वजनिक हितबुद्धीस घरांतच आरंभ व्हावा, एवढेंच नव्हे, तर त्यांची समाप्ति घरांतल्या घरांतच व्हावी, फार झालें तर त्यांनीं धर्मगुरूंच्या देखरेखीखालीं खेड्यांतल्या खेड्यांत धर्मपुस्तकें[1] वांटावीं असा समज झालेला आहे.

परंतु सरशेवटीं स्त्रियांचा दयाळूपणा आणि सार्वजनिक हितबुद्धि यांनीं वरील शृंखला तोडून टाकिली. आमच्या पहाण्यांतच आमच्या आयांस व आज्यांस ज्या प्रतिबंधांनीं घेरलें होतें त्यांपैकीं बहुतेकांस, मिस् नायटिंगेल आणि मेरी स्ट्यानले या दोन बायांनीं, त्या शिपाई लोकांची शुश्रूषा करण्यासाठीं क्रिमियास गेल्या तेव्हां वाटेस लाविलें. मेरी कार्पेन्टर ह्या बाईचे उपकार तर आपण विसरतां कामा नये. हिनें सुद्धां वर सांगितलेले स्त्रियांचे हक्क प्रति-

---

१ ही तरी मोकळीक ख्रिस्ती लोकांत आहे; हिंदु व मुसलमान लोकांत ती सुद्धां नाहीं.

पादन करण्यांत इतका निश्चय आणि इतकें धैर्य दाखविलें कीं शेवटीं तिला पुरुषांचें साह्य मिळून तिनें पार्लमेंटमार्फत स्त्रियांसंबंधी कायद्यांत बरीच सुधारणा करून घेतली, ती इतकी कीं, शेवटीं पार्लमेंटांतील सभासद आणि निरनिराळ्या खात्यांवरील अधिकारी यांस स्त्रियांच्या ह्मणण्याकडे वास्तविकपणें लक्ष देणें योग्य आहे असें वाटूं लागलें. मिस्टर स्टान्सफिल्ड ( यांच्या सर्व आह्मी आभारी आहोंत ) हे आपल्या कामावर पुष्कळ दिवस राहावयास पाहिजे होते, ह्मणजे त्यांनीं जी तजवीज चालविली होती तिजपासून अमर्याद हितकारक परिणाम झाले असते. त्यांनीं एका महत्वाच्या आणि विश्वासाच्या सरकारी जागेवर प्रथमतः स्त्रीची नेमणूक केली. त्यानंतर स्कूलबोर्डाकरितां निवड करणें व प्रतिनिधी पाठविणें हे हक्क स्त्रियांस प्राप्त झाले; यामुळें आह्मां स्त्रियांचें पाऊल बरेंच पुढें गेलें. तुह्मी आह्मी लहान होतों तेव्हां, अशा प्रकारच्या स्थानिक राज्यव्यवस्थेंत स्त्रियांस निवडण्याचा हक्क मिळेल आणि आज सर्व इंग्लंदभर जिकडे तिकडे स्त्रियांची मोठ्या आनंदानें निवडणूक होत आहे असें दृष्टीस पडेल असें कोणास वाटलें होतें तरी काय? लोक स्त्रियांलाच मतें देण्याविषयीं आग्रह धरितात आणि यामुळें आपलीं मतें व्यर्थ घालवितात अशी मोठ्या त्वेषानें वर्तमानपत्रकर्ते ओरड करीत आहेत. आह्मां स्त्रियांस म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीमध्यें मत देण्याचा हक्क

मिळाल्याकारणानें, तसेंच गरीब लोकांचे पालक या नात्यानें मेरिंगटनबाईसारख्या स्त्रियांची मधून मधून निवडणूक झाल्यानें, स्त्रियांची मजल सार्वजनिक बाबतींत बरीच पुढें गेली आहे. आणि सर्व चळवळीस बळकटी यावी ह्मणून आह्मीं बरीच सुधारणा केली आहे; किंबहुना आमचें स्थित्यंतर झालें आहे असें ह्मटलें तरी चालेल; ह्मणजे, सर्व कामाकाजांत पुरुषांची बरोबरी करितां येईल अशा प्रकारचें शिक्षण हल्लीं आह्मांस मिळत आहे. या सुधारणेच्या कामांत मार्गदर्शक बाया बऱ्याच होऊन गेल्या आणि त्यांनीं शेंकडों तरुण स्त्रियांचीं मनें जुन्या रुक्ष, दिखाऊ व पोरकट गोष्टींवरून काढून उत्तम ज्ञानप्राप्तीच्या मार्गाकडे वळविलीं, व यापुढें विद्यावृद्धि व सार्वजनिक कामें यांत स्त्रीजातीस यश मिळण्याचा खरा व सुरक्षित मार्ग घालून दिला.

सदरील बायांच्या साह्यानें स्त्रीशिक्षणाचा प्रसार इतका झाला कीं शेवटीं शिक्षण मिळालेल्या स्त्रियांस विश्वविद्यालयांतून पदव्या देऊन त्यांची योग्यता कबूल करणें लोकांस भाग पडलें. यानंतर ज्ञानाच्या बाबतींत स्त्रिया पुरुषांची बरोबरी करतील इतकेंच नव्हे तर, ही गोष्ट सर्वांस कबूलही करावी लागेल.

स्त्रियांच्या प्रगतीची मजल येथवर येऊन ठेपल्यावर पुढें सार्वजनिक आणि राज्यकारभाराच्या बाबतींत स्त्रियांचा प्रवेश कोठपर्यंत होईल ही गोष्ट स्त्रियांवरच

अवलंबून आहे असें मला वाटतें. फक्त एकच गोष्ट आमच्या सुधारणेच्या आड येण्यासारखी आहे, ती ह्मटली ह्मणजे "पुरे झालें! याच्या पलीकडे आह्मांला सुधारणा नको!" असे पुरुषांच्या (आणि शहाण्या शहाण्या स्त्रियांच्याही) मुखावाटे उद्गार येतील अशा प्रकारचे घोंटाळे, निंद्य गोष्टी आणि असमंजसपणा आह्मीं करणें ही होय. जसें पूर्वेकडील तसेंच पश्चिमेकडील देशांतील लोकांचें मत असें झालें आहे कीं स्त्रियांस जर प्रतिबंधांत ठेविलें नाहीं अथवा त्यांच्यावर अनुदार चालीरीतींचा दाब ठेविला नाहीं तर त्यांच्या मूर्खत्वाला व अनौदार्याला मर्यादाच राहणार नाहीं; आणि आमच्या दुर्दैवानें अशा लोकांला, ज्यावेळीं स्त्रियांस आतां आहे त्यापेक्षां विशेष स्वातंत्र्य होतें (ह्मणजे जेव्हां रोमन लोक राज्य करीत होते) त्या वेळच्या स्त्रियांचीं उदाहरणें त्यांच्या मतांच्या समर्थनार्थ द्यावयास सांपडतात. त्यावेळीं स्त्रियांना जें स्वातंत्र्य मिळालें त्याच्या आड राहून व त्याचा लाभ घेऊन पाहिजे तशा त्या चैनबाजी करूं लागल्या. सारांश, त्यांनीं स्वातंत्र्याचा चैनबाजी वाढविण्याकडे दुरुपयोग केला.

माझ्या मैत्रिणींनो! स्वातंत्र्यापासून स्त्रीजातीवर वर सांगितला त्यापेक्षां निराळाच परिणाम यापुढें होणार आहे, असें आह्मीं स्वतःच्या उदाहरणानें व उपदेशानें दाखविलें पाहिजे ही माझी तुह्मांस विनंति आहे; ह्मणजे, स्वातंत्र्यापासून जसे पुरुषांच्या आंगीं उदार सद्गुण उत्पन्न

होतात तसे स्त्रियांच्या आंगींही पवित्र सद्गुण वाढतील असें आह्मीं दाखविलें पाहिजे. यास्तव, खऱ्या स्वातंत्र्यास प्रारंभ करितांना अशी सावधगिरी बाळगिली पाहिजे कीं कोणताही संवय किंवा कोणतीही मोकळीक असो, तिच्यापासून आमच्या स्वतःच्या व्यक्तीवर वाईट परिणाम होण्याचा संभव नसला तरी, इतर स्त्रियांवर वाईट परिणाम होण्यासारखा असेल तर, ती आपणास लावून घेऊं नये. थोडा वेळपर्यंत कांहीं हक्क न मिळाले तरी पतकरलें, ते आह्मांस पुढें मिळतील; परंतु ती सुधारणा उतावळी किंवा गैरसावधपणा व मूर्खपणा यांजमुळें धोक्यांत घालणें योग्य नाहीं.

आतां आह्मीं आमचा सार्वजनिक कामांत प्रवेश आणि आमच्या ठिकाणीं सार्वजनिक हितबुद्धीची वृद्धि हीं होण्यासाठीं इंग्लंदांतील स्त्रियांचें कर्तव्य काय असावें याचा विचार करूं. ज्या सार्वजनिक कामांत आह्मांला भाग मिळणें शक्य आहे अशा संबंधानें हल्लीं आह्मीं काय केलें पाहिजे हें प्रथम पाहूं.

आमच्या भगिनींचे व बंधूंचे सद्गुण आणि सुख यांची वृद्धि करण्यास आमच्या हातून होईल तितका प्रयत्न करणें हें आमचें कर्तव्य आहे. यास्तव, सर्व प्रकारचा अधिकार, मतें, वजन वगैरे, सद्गुण किंवा सुख वाढविण्याचीं साधनें मिळतील तितकीं आह्मीं प्राप्त करून घेतलीं पाहिजेत. ह्मणजे, जर आह्मी ईश्वराचे राज्याचा विस्तार वाढविण्याची

इच्छा करितों तर ज्या साधनांनीं त्याचा प्रसार सर्व जगभर चोहींकडे होईल तीं साधनेंही मिळविण्याची इच्छा वाळगिली पाहिजे व तीं प्राप्त करून घेतलीं पाहिजेत. न्याय, सत्य आणि प्रेम यांचा विस्तार व्हावा अशी मनापासून इच्छा असूनही आपल्या राज्यांत त्यांचा विस्तार होण्यास जीं स्वाभाविक आणि सरळ साधनें आहेत तीं प्राप्त करून घेण्याचें नाकारील असा कोणी विलक्षण मनुष्य असूं शकेल असें मला वाटत नाहीं.

ज्यांचें अंतःकरण भूतदयेनें आणि न्यायबुद्धीनें पूर्ण भरलेलें आहे ते आपले हातून जितकें लोकहित होईल तितकें करून उगीच बसत नाहींत; लोकहिताकरितां जितके अधिकाधिक अधिकार आपणास प्राप्त करून घेतां येतील तितके घेण्याकरितां प्रयत्न करितात.

एखाद्याला झालेला अन्याय दुरुस्त केला पाहिजे, किंवा कांहीं तरी चांगलें कृत्य केलें पाहिजे, किंवा सन्मार्ग दाखविला पाहिजे, किंवा एखाद्याचें दुःख निवारण केलें पाहिजे असें जेव्हां आह्मांपैकीं एखाद्या स्त्रीला वाटतें तेव्हां वरील कामासाठीं आपल्याजवळ द्रव्य असतें, किंवा आपलें वजन असतें, किंवा आपल्या आंगीं वक्तृत्वशक्ति अथवा लेखनशक्ति अथवा कवित्वशक्ति असती तर बरें झालें असतें असें तिला वाटतें. ह्या सर्व इच्छा व मनोभाव पवित्र आहेत; आणि अशा कल्पना जेव्हां आह्मी ईश्वराच्या सान्निध्यांत असतों किंवा मन जेव्हां अगदीं पवित्र-

स्थितींत असतें तेव्हांच उत्पन्न होतात. परंतु वरील साधनांखेरीज व्यवस्थेशीर राज्यांत सर्वांत जें एक मोठें साधन आहे तें प्राप्त करून घेण्याची इच्छा व प्रयत्न आह्मीं कां करूं नये ? एकट्या मनुष्याच्या हातानें जें कांहीं बरें किंवा वाईट होण्याजोगें आहे त्याच्या दसपट बरें वाईट या साधनाच्या योगानें होऊं शकतें. आणि हें साधन ज्या प्रकारच्या बऱ्या वाईट लोकांच्या हातांत सांपडतें त्याप्रमाणें लोकांचें हित किंवा अहित होतें. तुह्मांस ठाऊकच आहे कीं मोठमोठ्या संकटांचें मूळ, तसेंच दारिद्र्य, दुर्गुण आणि अपराध हे सामाजिक रोग फक्त कायद्याच्या साहायानें काढून टाकण्याची आशा आहे. ज्या स्त्रियांचें हृदय कोमल असतें आणि ज्यांच्याठायीं सद्धेतु असतात त्या स्त्रिया सर्व जन्मभर लोकहितार्थ खपत असतात, हें खरें. परंतु त्यांच्या हातून फक्त डाहाळ्या काढून टाकण्याचें काम होतें. त्यांना मूळ खणून काढतां येत नाहीं. रोगाचीं कांहीं चिन्हें त्या कमी करूं शकतात परंतु त्यांच्या हातून रोग बरा होत नाहीं. हें सार्वजनिक रोगाचें मूळ खणून काढण्याचें किंवा रोग बरा करण्याचें पवित्र काम स्त्रियांस पुरुषांकडे सोपविणें भाग पडतें.

वरील गोष्टीवरून राजकीय हक्क प्राप्त करून घेणें हें स्त्रियांचें कर्तव्य आहे असें मी ह्मणतें याचें कारण काय असावें हें तुमच्या लक्षांत आलेंच असावें. कारण, पर-

हित करणें, मनुष्यमात्राचे सद्गुण व सुख यांची वृद्धि करून आमचें सामाजिक कर्तव्य बजावणें व ईश्वराचे राज्याचा विस्तार वाढविणें, हें साध्य करून घेण्याचें वरील राजकीय हक्क हें एक मोठें साधन आहे. हें कारण कर्तव्याच्या दृष्टीनें झालें. याशिवाय सोयीच्या किंवा सुखाच्या दृष्टीनें पाहतां आणखी दुसरीं अनेक कारणें आहेत. पुरुषांना हे राजकीय हक्क प्राप्त झालेले आहेत; परंतु ते बहुतकरून, किंबहुना कधींच, त्या हक्कांकडेस वरील दृष्टीनें, ह्मणजे कर्तव्याच्या दृष्टीनें, पाहत नाहींत हें आह्मी जाणून आहों. ह्मणून आह्मींही तसें करावें असें कांहीं नाहीं. निवडणुकींत एका मतानें ह्मणण्यासारखा फरक होतो असें नाहीं हें सुद्धां आह्मांस ठाऊक आहे; परंतु त्याची चिंता करण्याचें कांहीं कारण नाहीं. कां कीं, आह्मांस कांहीं तरी अधिकार मिळण्यासारखा असला तर तो आह्मांस प्राप्त करून घेतलाच पाहिजे; मग तो लहान असो वा थोर असो. पापभीरु असे लोक निवडण्याचा ज्यांनीं निश्चय केला आहे अशा स्त्रियांच्या मतांची संख्या जसजशी वाढत जाईल तसतसा त्यापासून ह्मणण्यासारखा फरक पडेल, एव्हढेंच नव्हे, तर त्यांचें वजनही तसतसें वाढत जाईल. प्रत्येक मताचा प्रत्यक्ष परिणाम फार कमी आहे; परंपरेचे परिणाम फार महत्वाचे आहेत. हल्लीं ज्या प्रकारच्या राज्यव्यवस्थेखालीं आह्मी आहों तिची लोकनियुक्तप्रतिनिधित्वाच्या पाया-

वर एथपर्यंत रचना झाली आहे कीं कायदे करण्याचें एकंदर काम तगाद्याच्या योगानें होत असतें. प्रत्येक वर्ग किंवा पक्ष आपल्या प्रतिनिधीला तगादा लावून त्याच्या मार्फत आपापलें हित वाढवितो. तेव्हां अर्थात् ज्या वर्गाला प्रतिनिधी नेमण्याचा हक्क मिळालेला नाहीं त्याची कांहींच विचारपूस होत नाहीं हें स्वाभाविक आहे. प्रधानमंडळ किंवा पार्लमेंटाचे सभासद या वर्गाकडे ह्मणजे मुद्दाम दुर्लक्ष करितात अशी कांहीं गोष्ट नाहीं. परंतु ज्यांनीं त्यांना आपल्या तर्फे निवडलें आहे त्यांच्या अडचणींकडे व त्यांच्या तगाद्याकडे प्रथम लक्ष पुरविणें त्यांना भाग आहे. (नाहीं तर त्यांची जागा किंवा सभासदपणा दुसऱ्या खेपेस निघून जावयाचा.) यामुळें, पार्लमेंटच्या बैठकीच्या वेळीं कामाची जी घाई आणि गर्दी उडून जाते तिजमुळें ज्यांचा प्रतिनिधी नाहीं[1] अशा लोकांच्या अडचणींविषयीं विचार करण्याला सवड कधींच मिळत नाहीं. सगळ्या वर्गाला आपल्या तर्फे प्रतिनिधी नेमण्याचा हक्क मिळणें ही गोष्ट इंग्लंद देशांत

---

१ याचें उदाहरण नुकतेंच एक घडून आलें आहे. म्यांचेस्टरच्या गिरणीवाल्यांना फायदा व्हावा ह्मणून हिंदुस्थानांतील एकंदर जाड्या भरड्या कापडावर सुद्धां साडेतीन टक्के जकात सरकारानें बसविली; यामुळें गरीबगुरिबांस कापड महाग झालें. याचें कारण, हिंदुस्थानांतील प्रजा पृथ्वीवरील लोकसंख्येच्या मानानें एक पंचमांशाएवढी असूनही हिंदुस्थानच्या वतीनें प्रतिनिधी पार्लमेंटांत मुळींच नाहीं.

एखाद्या व्यक्तीला मत देण्याचा अधिकार मिळण्यापेक्षां अधिक महत्वाची आहे. वर्गाला प्रतिनिधी नेमण्याचा हक्क मिळाल्यानें आपल्या वर्गाच्या अडचणींकडे व विचार करण्यास योग्य अशा सर्व इतर सार्वजनिक बाबतींकडे सरकारचें लक्ष पुरवून घेण्याचा हक्क त्या वर्गास प्राप्त होतो; स्त्रियांला आपल्या तर्फे प्रतिनिधी नेमून देण्याचा हक्क नसल्यामुळें त्यांची एक मोठी अडचण ही आहे कीं त्यांच्या हितासंबंधानें कायद्याचे मसुदे पार्लमेंटपुढें वाचण्यास कधींच संधि मिळत नाहीं. कारण ज्यांचे प्रतिनिधी आहेत अशा वर्गानें पुढें आणलेले मसुदे प्रथम वाचण्यांत येतात. उदाहरणार्थ, विवाहित स्त्रियांच्या मिळकतीसंबंधानें मसुदा एकाच बैठकींत सहा वेळां वाचण्याकरितां पुढें आणिला होता. परंतु पार्लमेंटाच्या सभासदांस प्रत्येक वेळीं इतर कामें अधिक महत्वाचीं वाटल्यामुळें तो सहाही वेळां तसाच पडून राहिला.

अशारीतीनें पार्लमेंटसंबंधी हक्क मागितल्यानें आह्मीं साधारणपणें कायद्यांत फेरफार करण्याचा हक्क मागित्यासारखें आहे; आणि दुसरे कोणतेही, ह्मणजे, म्युनिसिपालिटीसंबंधी वगैरे हक्क मागितल्यानें सार्वजनिक बाबतींत आमची न्यायबुद्धि आणि सत्यशीलता यांचा उपयोग व्हावा एतदर्थ अधिकार मागितल्यासारखें होत आहे. असा मोठा हेतु सिद्धीस नेण्याकरितां आह्मीं सर्वांनीं त्रास व कष्ट सोसण्यास तयार झालें पाहिजे.

मग कित्येक मूर्ख पुरुषांनीं आणि शतमूर्ख स्त्रियांनीं आमची थट्टा केली तरी चिंता नाहीं.

एकंदरींत ही सर्व सार्वजनिकहितबुद्धि नव्हे तर काय? एका दृष्टीनें पाहिजे तर तिला स्वदेशाभिमान ह्मणा; दुसऱ्या दृष्टीनें भूतदया ह्मणा; मिळून आमच्या कळकळीची मर्यादा आमच्या घराच्या बाहेर वाढविणें, अथवा जें कांहीं चांगलें आणि पवित्र ह्मणून आहे तें करण्याविषयीं निरपेक्षपणें कळकळ आणि हौस असणें यालाच सार्वजनिकहितबुद्धि ह्मणतात. मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं पुरुषांचीं अंतःकरणें अशा लोकहितचिंतेनें भरून राहणें ही गोष्ट प्राचीन काळापासून फार चांगली, उदार आणि हितकारक आहे असें सर्व जग मानीत आहे. आणि अशा लोकांला आपण कृतकृत्य समजतों. तर मग अशा विशाल, उदार व अस्वार्थपर विचारांनीं स्त्रियांचें अंतःकरण परिपूर्ण असणें, या गोष्टीपासून त्यांस तितकी कृतार्थता येत नाहीं असें तुह्मी समजतां काय? पोकळ डामडौलाच्या क्षुल्लक गोष्टी एकीकडे ठेवून स्त्री आपल्या देशाचा अभिमान वाहूं लागली, अन्याय व अविश्वासूपणा पाहून तिला संताप होऊं लागला, प्रगतीची मजल वाढविण्याची किंवा एखादी अवश्य असलेली सुधारणा करण्याची तिला एकसारखी उत्कंठा वाटूं लागली, किंवा या गोष्टींनीं तिचें मन उचंबळूं लागलें, तरीही तिला पुरुषाइतकी सुद्धां योग्यता प्राप्त होणार नाहीं असें तुह्मांला वाटतें काय?

स्त्रियांनीं सार्वजनिक हिताच्या कामांत हात घातल्यापासून फार अमूल्य आणि उन्नतिकारक परिणाम होण्यासारखे आहेत. त्यांपैकीं केवळ स्त्रियांची नैतिक उन्नति एवढा एकच लाभ जरी असता तरीही मीं त्यासाठीं स्त्रियांनीं सार्वजनिक हिताच्या बाबतींत भाग घ्यावा अशी इच्छा बाळगिली असती.

आह्मां स्त्रियांच्या आंगीं अनेक प्रकारचे दोष वास करीत आहेत. कोणत्याही विषयाचा विचार करतांना मनाच्या संकुचितपणामुळें आह्मी व्यक्तीस उद्देशून बोलतों; एखाद्या विषयावर वादविवाद चालला असतां सर्वसाधारण तत्वांवर नव्हे, तर एक दोन उदाहरणें आह्मांस माहीत असतील त्यांवरून आणि दुसऱ्या कोणाचीं तरी उच्छिष्ट वाक्यें बोलून कोणतीही गोष्ट ठरविण्याची दुराग्रहाची मूर्ख संवय आह्मांस जडलेली आहे; दुसऱ्याला आपल्यापेक्षां किंचित जास्त मान समाजाकडून मिळाला तर तो आह्मांस सहन होत नाहीं; केवळ घरांतल्या घरांत बाष्कळ गोष्टी बोलण्यासाठीं व गप्पा मारण्यासाठीं एकत्र जमण्यापासून आह्मी पोकळ मैत्री जुळवितों; अनेक घाणेरड्या घरगुती कुरापतींनीं आमचा एकंदर वेळ आणि विचार भरून जातो. हे आणि अशा प्रकारचे इतर शोचनीय दोष, आमच्या मनांत नवीन आणि थोर विषयांच्या विचारांचा प्रवेश झाला तरच निघून जातील. कारण अशा थोर विचारांपासून आह्मी स्त्रिया किंवा आ-

मचे नवरे किंवा मुलें यांतून कोणालाच आपलपोटेपणास अवकाश मिळत नसतो. उलट, संकुचित विचार व क्षुल्लक गोष्टींकडे लक्ष, यांच्या ऐवजीं उदात्त विचार, हलक्या सोबतीच्या ऐवजीं पवित्र स्नेह, ह्या गोष्टी उदार आणि अस्वार्थपर कृत्यें करणाऱ्या मनुष्याच्याच आंगीं वास करितात.

पुरुषांनीं मोठ्या गमतीनें आह्मांला काबाडकष्ट करण्यास लावावें, नाहीं तर मूर्खपणाची चैनबाजी आणि पोकळ डामडौल करण्यास उत्तेजन देऊन नंतर आपणच स्त्रियांची दृष्टी क्षुद्र, विचार संकुचित आणि भाषण पुळपुळीत असतें असें ह्मणून आमचा उपहास करावा, याचा मला फारच चमत्कार वाटतो. अशा प्रकारच्या वागणुकीनें भीमासारखे बलाढ्य शूर पुरुष सुद्धां दुर्बळ व भित्रे होऊं शकतील. मग आह्मी स्त्रिया तशा झालों तर त्यांत नवल तें कोणतें?

परंतु आह्मीं, इंग्लंदांतील उच्च वर्णाच्या स्त्रियांनीं, हल्लींच्या काळीं प्रजेचे हक्क मिळविण्यास कां झटावें याचीं अनेक कारणें आहेत. त्यांत मुख्य हें कीं, सांप्रत स्त्रियांना जो शोचनीय जुलूम, जें पराकाष्ठेचें दुःख आणि जो निर्दयपणें केलेला अन्याय सोसणें भाग पडत आहे त्याच्या निवारणार्थ चांगले कायदेकानू पसार करून घेतले पाहिजेत. ज्या लोकांचे तर्फे पार्लमेंट सभेंत प्रतिनिधी नाहींत त्यांच्या हक्कांकडे त्या सभेच्या अधि-

कार्‍यांकडून व सभासदांकडून कसें दुर्लक्ष होतें तें मीं वर सांगितलेंच आहे. स्त्रियांच्या संबंधानें फार रानटी स्थितीच्या काळापासून फार वाईट कायदे चालत आले आहेत. ते दुरुस्त करण्यास व स्त्रियांच्या हिताकडे लक्ष पोंचविण्यास हल्लींच्या काळीं कठीण जावें हा निर्दयपणा नव्हे तर काय? स्त्रियांचे हक्क चांगले सुरक्षित आहेत, त्यांच्याकरितां कायद्यांत फेरबदल करण्याची कांहीं जरूरी नाहीं असें कित्येक सभासद मोठ्या धिट्टाईनें ह्मणत असतात; परंतु मी निक्षून सांगतें कीं, इंग्लंदांत पुरुषांस हल्लीं जे हक्क आहेत ते जरी कमी केले तरीही त्यांचें स्त्रियांपेक्षां अधिक नुकसान व त्यांस अधिक अन्याय होण्याचा संभव नाहीं.

कायद्यामुळें ज्यांना नानाप्रकारचीं दुःखें सोसावीं लागतात अशा हजारों गरीब स्त्रिया आहेत; त्यांपैकीं कित्येकींना त्यांचे अडाणी पती जसे वागवितील तसें राहवें लागतें; कांहींना दिवसभर काबाडकष्ट करूनही पोटभर अन्न न मिळाल्यामुळें व्यभिचाररूप घोर मृत्यू-समुद्रामध्यें बुडून यातना भोगाव्या लागतात. साधारण स्थितींतल्या कित्येक स्त्रियांना तर आपल्या जिवंत किंवा मृत पतीच्या धर्मवेडेपणामुळें[1] अपत्यवियोगजन्य दुःख सोसावें

---

१ क्याथोलिक पंथाच्या ख्रिस्ती लोकांत मुलांस लहानपणापासून कानव्हेंट ( संन्यासाश्रम )मध्यें ठेवण्याची चाल आहे. असें झालें ह्मणजे मुलांचा व मातापितरांचा कांहीं संबंध राहत नाहीं. तीं देवास वाहिलेलीं असतात.

लागतें. या अत्यंत दयेस पात्र अशा ईश्वराच्या लेंकरांचीं हृदयें दिवसानुदिवस व वर्षानुवर्षे अन्यायाच्या व दुःखाच्या योगानें विदीर्ण होत आहेत; तरी कोणाही पुरुषाला तीं दुःखें समजत नाहींत व तीं निवारण्याविषयीं यत्न करण्यास अवकाशही मिळत नाहीं. यास्तव आह्मांपैकीं ज्यांना ही स्थिति कळत आहे व ज्यांची या दुःखाचें व अन्यायाचें निवारण व्हावें अशी इच्छा आहे अशांनीं स्त्रियांस आपलें मत देण्यास प्रतिबंध करून आमच्या सुखाच्या आड येणारा हा, ईश्वरकृत नव्हे, तर मनुष्यकृत कायदा स्वसंतोषानें ग्रहण करावा काय? हा अन्याय दूर करण्याचा यत्न केला असतां कांहीं तरी फलप्राप्ति होईल असें आह्मी समजत असूनही जर तो यत्न आह्मीं केला नाहीं, आणि हजारों मूर्ख व चैनी लोक चारचौघांत आमचें सौंदर्य व सभ्यपणा पाहून मान डोलवितात एवढ्याच गोष्टीला भुलून गेलों तर तें योग्य होईल काय? आतां, सार्वजनिक कामांत पडण्याची आपणास मोकळीक मिळाली ह्मणजे तीं कामें आपण फार दक्षतेनें, प्रामाणिकपणानें व निरपेक्षतेनें बजाविलीं पाहिजेत, हें या ठिकाणीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. मात्र आपण सर्वांनीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, स्त्रिया राजकीय प्रकरणांत पडूं लागल्या ह्मणजे त्यांची गंमत पाहण्याकरितां पुरुष मत्सरबुद्धीनें डोळ्यांत तेल घालून बसतील; आणि नवीन हक्क मिळ-

ण्याविषयीं ढिलाई व पूर्वी मिळालेल्या हक्कांकडे दुर्लक्ष आपण करितों असें जर का एकदां त्यांच्या दृष्टीस पडलें तर मात्र आमची पुरी फजिती होऊन आमच्या सर्व खटपटीवर पाणी पडल्यावांचून राहणार नाहीं.

यास्तव जिला ह्मणून थोडी बहुत फुरसूद मिळते किंवा थोडा बहुत पैसा अशा कामास लावतां येतो अशा प्रत्येक स्त्रीनें कोणती ना कोणती तरी एकादी सार्वजनिक हिताची किंवा परोपकाराची किंवा सामाजिक सुधारणेची संस्था निवडून तिला आपल्या सवडीप्रमाणें व सामर्थ्या-प्रमाणें साह्य करावें; ह्मणजे आपलीं खासगी गृहकृत्यें सांभाळून घराबाहेरही ईश्वरीराज्याचा प्रसार करण्यास झटल्यासारखें होऊन तिच्या जन्माचें सार्थक होईल. आपलीं खासगी कृत्यें सांभाळून, त्यांकडे दुर्लक्ष करून नव्हे, हें मात्र पक्कें ध्यानांत बाळगिलें पाहिजे. आपण पूर्वींच जी जबाबदारी घेतली असेल तिच्याकडे दुर्लक्ष करून नवीन सामाजिक कर्तव्यें अडविणें ही माझ्या मतें मोठी हानिकारक चूक आहे. वास्तविक पाहिलें तर अशी चूक स्त्रियांकडून प्रायः होत नाहीं. याचा मीं बराच अनुभव घेतलेला आहे; परंतु ज्या स्त्रीनें सार्वजनिक कामांत कीर्ति मिळविली आहे, तिच्या हातून मुलगी, बायको, आई, किंवा गृहिणी या नात्यानें आपल्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष झालें आहे असें एकही उदाहरण आजपर्यंत माझ्या पाहण्यांत आलेलें नाहीं. राजकीय प्र-

करणांत मन घालणाऱ्या स्त्रिया, पार्लमेन्ट सभेंत ठराव पसार करून घेण्याकरितां आपल्या कुटुंबाची हेळसांड करतील हें ह्मणणें, त्या गणिताचें उदाहरण सोडविण्यासाठीं आपल्या बालकाचा त्याग करतील असें ह्मणण्याइतकेंच भ्रमाचें असून, ही गोष्ट अगदीं असंभवनीय आहे. आतां, घराबाहेरच्या, ह्मणजे, परोपकाराच्या किंवा राजकीय कृत्यांकडे थोडा बहुत वेळ कोणत्या स्त्रियांना घालितां येईल? सुखवस्तु कुटुंबांतल्या मुलींना, बायकांना, किंवा आयांना? याचा विचार मला येथें केला पाहिजे. माझ्या मतें सुशिक्षित वर्गाच्या सर्व स्त्रियांनीं राज्यकारभाराच्या धर्मविषयक, शिक्षणसंबंधी, म्युनिसिपालिटी, पार्लमेन्ट सभा इत्यादि ज्या ज्या खात्यांमध्यें त्यांची मति चालेल त्या त्या खात्यांत उद्भवणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांची माहिती मिळवावी. त्यांवर आपण विचार करून रास्त मत देण्याइतकी फुरसूद मिळण्यास त्यांना अडचण पडणार नाहीं. जे पुरुष फार श्रमाचे धंदे करतात त्यांस जर अशा कामासाठीं वेळ सांपडतो तर स्त्रियांनाच कां सांपडणार नाहीं! कसें झालें तरी, आपल्या राजकीय हक्कांकडे दुर्लक्ष करणाऱ्या पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या हल्लींच्या स्थितींत अधिक असण्याचें कारण नाहीं.

मला वाटतें कीं ज्या मोठ्या वाढलेल्या अविवाहित मुली आपल्या आईबापांच्या घरीं राहतात त्यांस कोणतें तरी एखादें परोपकाराचें काम हातीं घेऊन पुढें सार्वजनिक

कामांत उपयोगी पडण्याची तयारी करण्यास खचित वेळ सांपडेल. आतां, पुष्कळ युवतींना आपलें सर्व सामर्थ्य व वेळ हीं आपल्या वृद्ध, अंध किंवा अशक्त मातेची अथवा पित्याची शुश्रूषा करण्याच्या अत्यंत पवित्र कर्तव्यामध्यें खर्चावीं लागतात हें खरें आहे. तसेंच, कित्येकींची घरची स्थिति चांगली नसल्यामुळें त्यांना पोटाचा उद्योग करावा लागतो; किंवा त्यांना आपल्या लहान भावाच्या किंवा बहिणीच्या शिक्षणाकडे पाहावें लागतें. परंतु अशीं उदाहरणें सोडून दिलीं तरी ज्यांना आईबापांच्या संबंधाचीं कर्तव्यें करण्यास दिवसांतून एक किंवा दोन तास सुद्धां लागणार नाहींत अशा वीसपासून पन्नास वर्षांच्या वयाच्या शेंकडों स्त्रिया सांपडतील. या वर्गाच्या मुलींच्या आईबापांस आतां आपल्या मुलींच्या हातून होण्यासारखीं व त्यांस हितकारक अशीं कामें ( तीं कोणतीं याची निवड करणें कांहीं सोपें काम नाहीं) करण्यास त्यांस मोकळीक व उत्तेजन द्यावें असें वाटूं लागलें आहे. आणि मला असें वाटतें कीं अशाप्रकारची जागृती, आळस जगांतून नाहींसा होईपर्यंत, अधिकाधिक वाढत जाणार. पण हें काम एका घटकेंत होण्यासारखें नाहीं. त्याला बराच काळ जावा लागेल. साधारण ऐपतीच्या आईबापांनीं—ह्मणजे ज्यांना आपल्या मुलींस सर्व प्रकारचें सुख देण्याइतकें द्रव्य साधन नसतें अशांनीं—आपल्या मुलींस पैसा मिळविण्याचा कांहीं तरी धंदा

शिकविणें ही गोष्ट मुख्य आहे. पण जेथें द्रव्य मिळविण्यासाठींच केवळ शिक्षणाची गरज नसते तेथें आईबापांनीं आपल्या मुलींस वडिलोपार्जित द्रव्याचा व आपल्या वेळाचा व्यय एखाद्या परोपकाराच्या कामासाठीं कसा करावा हें शिकविणें कांहीं कमी महत्वाचें कर्तव्य नाहीं. मग तें काम रोग्याची शुश्रूषा करण्याचें असो, किंवा अज्ञानांस सज्ञान करण्याचें असो, किंवा आंधळयापांगळयांस, किंबहुना जनावरांस, मदत करण्याचें असो. सारांश, हें काम भूतदयेचें असलें पाहिजे. आणि सर्वांत श्रेष्ठ ह्मटलें ह्मणजे आपल्या स्त्रीजातीच्या सुधारणेचें व दुःखनिवारणाचें काम. या बाबतींत विवाहित स्त्रियांच्या संबंधानें विचार केला तर, ज्यावेळेस त्यांना बहुतकरून संतति होते अशा वेळीं, त्यांनीं कुटुंब पोषणासाठीं ह्मणा, किंवा सार्वजनिक हितासाठीं ह्मणा, उद्योग करणें या गोष्टीस माझें मत अनुकूळ नाहीं.

मातृत्वसंबंधी कामें इतकीं बिकट आणि शरिराला, बुद्धीला व अंतःकरणाला थकवा आणणारीं आहेत कीं, तीं सर्व संभाळून बाहेरच्या कामास ह्मणण्यासारखा उत्साह व वेळ राहणें कठीण. यास्तव, जी स्त्री सदृढ व निरोगी अशा मुलांना जन्म देऊन त्यांच्या व्यावहारिक व नैतिक शिक्षणाकडे चांगलें लक्ष देते ती आपल्या समाजाची उत्तम प्रकारें सेवा करिते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या एका कर्तव्यांत खासगी व सार्वजनिक

अशा दोन्ही कर्तव्यांचा एकत्र समावेश होतो. मुलेंबाळें असणाऱ्या स्त्रियांना याच्यापेक्षां अधिक श्रेष्ठ कर्तव्य दुसरें नाहीं. आणि माझ्या मतें अशा स्थितींतल्या स्त्रियांना गरिबीमुळें पोटाचा कांहीं तरी धंदा करावा लागणें किंवा मनाच्या औदार्यामुळें आपल्या मातृत्वाच्या कामांत आणखी एखाद्या राजकीय अथवा परोपकाराच्या कामाची नेहमीं भर घालावी लागणें, यापासून सर्वांचें नुकसान आहे. जेव्हां मुलें वयांत येतात आणि त्यांना आईच्या साह्याची गरज नसते तेव्हां तिणें सार्वजनिक कामांत प्रवेश केला तर चालेल; ह्मणजे मग तिला मातृत्व स्थितींत असतां मिळविलेल्या विपुल अनुभवाचाही फायदेशीर रीतीनें उपयोग करितां येईल. परंतु मीं वर सांगितलेंच आहे कीं, जोंपर्यंत मुलांना आईच्या साह्याची गरज आहे तोंपर्यंत तिणें—मग तिच्या आंगीं कितीही कां कर्तृत्वशक्ती व औदार्य असेना—मातृत्वाच्या कर्तव्यां आड येणारें असें कोणतेंही सार्वजनिक मोठें काम पतकरणें ही मोठी चूक आहे; आणि त्यापासून हानि आहे असें मी समजतें.

ही व्याख्यानमाला मी आतां येथें संपवितें. येथें येऊन आपण सावधान चित्तानें हीं व्याख्यानें ऐकिलीं हे माझ्यावर आपले उपकार झाले असें मी समजतें. या सर्व लांब लचक व्याख्यानमालेंत जें काय सांगितलें आहे त्या सर्वांच्या संबंधानें जरी तुमचें व

माझें कदाचित एकमत नसलें तरी यापुढें तुमच्या व माझ्यामध्यें स्नेहभाव थोडाबहुत तरी राहील अशी मी आशा बाळगितें. पुष्कळ गोष्टींचा खरेपणा तुह्मांस पटून कळवळा आला असेल; निदान आपण येथें कांहीं तरी चांगल्या कामाकरितां जमलों आहों एवढें तरी तुमच्या मनास समाधान वाटल्याशिवाय राहणार नाहीं. तुह्मांपैकीं पुष्कळांनीं हीं कर्तव्यें माझ्यापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें केलीं असल्यामुळें मी आपणास व्याख्यानें देणें ह्मणजे लहान तोंडीं मोठा घांस घेण्यासारखें होय हें मी जाणून आहें. तथापि, आधीं आपला धडा पक्का करून मग दुसऱ्याला शिकवीन असें ह्मणून जर मी वाट पाहात बसलें असतें तर माझी बोलण्याची शक्ति ( जी दिवसेंदिवस क्षीण होत चालली आहे ती ) अगदीं नाहींशी झाली असती. आणि एकदां शक्ति गेली कीं, कोणाही मनुष्याच्यानें कसलेंच काम होत नाहीं. तुह्मांपैकीं पुष्कळांचा जन्म सुद्धां झाला नव्हता आणि ज्या माझ्या बरोबरीच्या आहेत त्या स्वाभाविकपणें नाचण्याबागडण्यामध्यें व विवाहसंबंधी विचारांमध्यें गढून गेल्या होत्या, अशा वेळीं रात्रंदिवस मी सर्वकाळच्या मोठमोठ्या पुरुषांच्या नीतीविषयक ग्रंथांचें अध्ययन करीत होतें. यास्तव, स्वकर्तव्याविषयीं तुमची आजपर्यंत जी अस्पष्ट कल्पना होती तिला जर कांहीं विशेष स्पष्टपणा या माझ्या व्याख्यानांनीं आला तर माझ्या हातून थोडें बहुत तरी कार्य

झालें असें मी समजेन. कारण, कोणत्याही विषयाविषयीं वरवर माहितीवरून मत ठरविणें याला वास्तविक मत ह्मणावयाचें नाहीं; ती केवळ कल्पनाच होय.

मीं आपणांस माझ्या अल्प सामर्थ्याप्रमाणें जो हा उपदेश केला आहे त्याचा हेतु केवळ आपल्या कर्तव्यांचा विचार व्हावा येवढाच नाहीं; तर त्या विचाराप्रमाणें आचारही घडावा हा आहे. आपलें कर्तव्य काय याचा चांगला विचार केला ह्मणजे झालें असें नाहीं; तर आपणाकडून सदाचरण घडलें पाहिजे. तें जर घडलें तर आपलें जीवित उत्तम प्रकारें सफल होण्यासारखें आहे; याची आपणांपैकीं कोणालाही हल्लींच्या स्थितींत कल्पना करितां यावयाची नाहीं. ईश्वरसंबंधी, स्वतःसंबधी, समाजसंबंधी वगैरे जीं निरनिराळीं कर्तव्यें वर सांगितलीं तीं सर्व जर यथायोग्य बजाविण्यास आह्मी मनापासून झटलों; शुद्धता, सत्य व धैर्य यांचे बळ आह्मांस प्राप्त झालें, ईश्वर व मनुष्य यांच्याविषयीं आमच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न झालें, आणि जेथें जेथें आह्मी असूं किंवा आपलें वजन पोहोंचेल तेथें तेथें जें सत्य त्यासच अनुसरून ईश्वरी राज्य स्थापण्याचा, ह्मणजे, ईश्वरीइच्छेस अनुसरून सर्व व्यवहार घडण्याचा आमच्या हातून यत्न झाला, तर आमच्या जन्माचें सार्थक खचित होईल यांत शंका नाहीं.

हल्लींच्या काळीं आपणांपैकीं पुष्कळ स्वतःस अध्यात्मिक जीवन प्राप्त व्हावें व संशय आणि पाप यांतून

मुक्ती मिळावी एतदर्थ कांहीं उपाय शोधून काढण्याकरितां निराशेनें यत्न करीत आहेत. तो त्यांचा यत्न कधीं सफल होईल हें कांहीं सांगतां येत नाहीं. तथापि, अशांच्या तारणाला एक उपाय आपल्याजवळ आहे. तो ह्मटला ह्मणजे कर्तव्य. ह्मणून आपण कर्तव्याकडे वळूं या आणि आपल्या मताप्रमाणें अत्यंत श्रेष्ठ, अत्यंत पवित्र आणि अत्यंत सत्यशील होण्याविषयीं, व जें परोपकाराचें काम आपणास आवडेल व करण्याची संधि मिळेल तें करण्याविषयीं उद्योग करूं या. याप्रमाणें जेव्हां आपण आपल्या जीविताचा उपयोग करूं तेव्हांच आह्मांस ज्ञानचक्षु प्राप्त होऊन संशयनिवृत्ति होईल आणि ईश्वर दिसूं लागेल; "जे ईश्वरी इच्छेस अनुसरून वागतात त्यांना त्याच्या नियमांचें ज्ञान होतें" या वचनाची सत्यता अनुभवास येईल; इहलोकीं ईश्वरी राज्याचा प्रसार करण्यास जे झटतील त्यांचा परलोकावर विश्वास बसेल; आणि परलोकीं त्यांच्या सद्गुणांस पवित्रतेचें व कर्तव्यास आनंदाचें स्वरूप प्राप्त होईल.

( समाप्त. )